शंकरानें स्वतःचें निरपराधित्व सिद्ध करण्यासाठीं या दिव्याचा अवलंब केलेला आहे. संदर्भावरून वाटतें कीं येथें उल्लेखिलेलें व्रत प्रतिमा-प्रतिबिंबाचें असावें; याज्ञवल्क्यांतील संकीर्ण स्वरूपाच्या दिव्याचें हें मूल स्वरूप असावें असें वाटतें.

क्र. २०५ या गाथेंत काकबळीची सूचना आहे. प्रत्यक्ष उल्लेख पिंडाचा आहे; पण त्यावर नजर कावळ्याची आहे, म्हणून हा उल्लेख काकबळीचाच असला पाहिजे. वैश्वदेव म्हणजे रोज भोजनापूर्वी अग्नीला आहुति देण्याचा विधि; यानंतर उरलेल्या भाताचा पिंड काकबळी म्हणून घराबाहेर ठेवण्यांत येत असे. कावळ्यानें पिंडाचें ग्रहण केल्यानंतर यजमानानें भोजन करावयाचें असा रिवाज होता. विषपरीक्षेसाठीं ही योजना असावी. मेघदूतांत यक्षानें आपल्या पत्नीचें वर्णन (उत्तर : २५) 'बलिव्याकुला' असें केलेलें आहे. मल्लिनाथानें याचा अर्थ 'देवताराधनेषु व्याकुला व्यापृता वा' असा दिला आहे. श्री. वामनशास्त्री इस्लामपूरकरांनीं आपल्या काव्यार्थदीपिका टीकेच्या टीपेंत (पृ. २१०) बलि म्हणजे पूजा असा अर्थ दिलेला आहे. श्री. भार्गवशरण उपाध्याय (India in Kalidasa: p. 328) यांनीं मात्र याचा अर्थ काकबळी असा घेतलेला आहे. ते सांगतात : Kakabali was performed for the safety of a husband living in a distant land. The wife hung up flowers corresponding to the number of days her husband was expected to remain absent. She then threw them on the floor one by one to ascertain the number of days that they had passed alone. हा अर्थ चूक आहे हें अगदीं स्पष्ट आहे. मला वाटतें त्यांचें हें स्पष्टीकरण उत्तरमेघातील सत्ताविसाव्या श्लोकांतील 'देहलीदत्तपुष्पैः' यावरील असावें व तें अनवधानानें बलीचे जागीं आलें असावें. मेघदूतांतील बळीचा काकबळीशीं कांहींही संबंध नाहीं. याज्ञवल्क्यस्मृतींत गृहस्थधर्म प्रकरणांत (मराठी भाषांतर : वे. शा. सं. रा. विष्णुशास्त्री बापट : पृ. ३२) सांगितलें आहे : "भूतयज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, ब्रह्मयज्ञ व मनुष्ययज्ञ या पांच यज्ञांस बलिकर्म, स्वधा, होम, स्वाध्याय व अतिथिसत्कार म्हणतात. स्वगृह्योक्त विधीनें वैश्वदेव होम करून त्यांतून राहिलेल्या अन्नानें भूतांस बलि द्यावा. त्यानंतर आपल्या शक्तीप्रमाणें कुत्रे, चांडाल, कावळे, कृमि, पापी, रोगी, पतित इत्यादींकरितां भूमीवर अन्न ठेवावें.

क्र. ४९६ या गाथेंत बळी देण्यासाठीं गळ्यांत माळा घालून चालविलेल्या रेड्याचा उल्लेख आलेला आहे. सुसंस्कृत आर्य यज्ञप्रसंगीं अनेक बळी देत. अश्वमेध व पुरुषमेध हे यज्ञ त्या त्या बळीवरच आधारलेले आहेत. आर्यांचे बळी मौल्यवान व यज्ञविधि संकीर्ण होते आणि ग्रामीणांचे बळी सामान्य व विधि धोपट, एवढाच फरक.

क्र. १०४ या गाथेची नायिका जणूं स्मशानांत बांधवांच्या अस्थि गोळा करीत आहे. ही नुस्ती उपमा असली तरी तिला हा विधि अभिप्रेत आहे. घरीं कोणी पुरुष मनुष्य नसल्यामुळें तिला हें कार्य करावें लागत आहे असें दिसत नाहीं. प्रेत जाळल्यानंतर अवशिष्ट अस्थि गोळा करून त्या एका पात्रांत घालावयाच्या व तें जमिनींत पुरावयाचे अशी पद्धत वैदिक काळांत (१०·१८·१०-१३) प्रचलित होती असें डॉ. विंटरनिट्झचें मत (Religion des Vedas : p. 571) आहे कौरवांच्या विधवांनीं श्राद्धादि कृत्यें केल्याचे उल्लेख महाभारतांत आहेत. हें स्त्रियांचें कर्तव्य व अधिकारही. गुप्तकालीन स्मृतिकारांनीं त्यांचा हा हक्क हिरावून घेतला.

क्र. १६५ या गाथेंत शेतकऱ्याची घरधनीण नांगराची पूजा करीत आहे. येथें जें पुण्यकृत्य चाललें आहे त्याचें नांव सीतायज्ञ. ऋग्वेद (४·५७) व अथर्व वेद (४·१५) यांत पृथ्वी व पर्जन्य यांचीं अनेक सूक्तें आहेत. नांगरट सुरू करतांना म्हणावयाचा तो मंत्र असा.

लाङ्गलं पवीरवँ सुशेवँ सुमतित्सरु ।
उदित्कृषति गामविं प्रफर्व्यं च धीवरीम् ।
प्रस्थानवद्रथवाहनम् ॥
शुनः न फाला वितदन्तु भूमिँ ।
शुनः कीनाशा अक्षियन्तु वाहान् ।
शुनं पर्ज्यन्यो मधुना पयोभिः ।
शुनासीरा शुनमस्मासु धत्तम् ॥

" नांगर कसा असावा ? वज्राप्रमाणें तीक्ष्ण, अनायासें चालणारा, जमीन खोल किंवा उथळ असेल त्या मानानें तींत घुसणारा. नांगराचे फाळ जमीन चांगली नांगरोत शेतकरी बैल हांकीत त्यांमागून चालोत. खराबी न करतां पोषक व मधुर उदकाची वृष्टि पर्जन्य करो. सूर्य व वायु कृषिकर्मांत सुख देवोत."

घृतेन सीता मधुना समक्ता
विश्वैर्देवैरनुमता मरुद्भिः
उर्जस्वती पयसा पिन्वमाना
अस्मान्सीते पयसाभ्यावबृत्स्व ॥

"नांगरलेल्या जमीनीवर तूप व मध शिंपडा. विश्वेदेव व मरुद्गण मंजुर होऊन जमीन सुपीक होवो. जमीनींत गारवा व उदकाचा अंश राखून ठेवण्याचें सामर्थ्य उत्पन्न होवो. उदकानें जमीन पुष्ट होऊन विपुल अन्नधान्य उत्पन्न होवो."

गाथासप्तशतींत असा मंत्रोच्चार झालेला नाहीं किंवा असे मंत्र म्हणणारा वैदिक इसम आसपास नाहीं. तूप व मधही नाहींत. तांत्रिक पूजाविधि तेवढा आहे.

गोभिल गृह्यसूत्रांत (S. B. E: XXX: IV. 4. 28) व बृहत्कल्पभाष्यांत (३·३६४७) सातायज्ञाचे उल्लेख आढळतात. सीता ही नांगरटीची व सुगीची (म. भा : ७·१०५·१९) देवता. तिचा पूजा शेतांत कोठेंही (Social & Religious Life in the Grhya Sutras · X 129) करावी असें सांगितलेलें आहे. हा यज्ञ घरधनिणीनेंच करावयाचा (The Position of Woman in Hindu Civilization: Dr. Altekar : p. 284) रिवाज होता.

क्र. ४०७, ६३३, ८५९ व ८७६ या गाथांत सती-प्रथेचे उल्लेख आलेले आहेत. या गाथांच्या नायिका उच्च वर्णाच्या आहेत क्र. ४०७ व ६३३ या गाथांतील उल्लेख गौरवपर आहेत आणि क्र. ८५९ व ८७६ यांतील उल्लेख कुचेष्टेचे भासतात. ऋग्वेदांत या प्रथेचा उल्लेख (१०·१८·८) आहे असें मानण्यांत येतें; पण ज्या पाठावरून हा निष्कर्ष काढण्यांत येतो तो या प्रथेच्या उत्तरकालीन पुरस्कर्त्यांनीं रूढ केला असावा असा श्री. मॅक्समुलर (Selected Essays on Language, Mythology & Religion: I. 335) यांचा अंदाज आहे. ब्राह्मण, सूत्र व आद्य स्मृतिग्रंथांत या प्रथेला आधार नाहीं. रामायण (७. १७·१४) व महाभारत (१·१२६; १६·७; १८·५) या वीरमहाकाव्यात आढळणारे सतीचे उल्लेख अपवादात्मक व अविश्वसनीय आहेत. हेरोडोटसनें सती प्रथेचा उल्लेख केलेला असून ती शक आदि जमातींत प्रचलित

(४,७१-७३) असल्याचें सांगितलेलें आहे. उत्तर व पूर्व भारतांतल्या त्यांच्या वसाहती फार प्राचीन आहेत. अलेक्झँडरच्या स्वारीनंतर मध्य आशियांत राजकीय क्रांतीच्या वावटळी उठल्या. यामुळें व नैसर्गिक आपत्तींमुळें स्थायिक जमाती भटक्या झाल्या. खि. पू. पहिल्या शतकांत शकांच्या आक्रमक टोळ्यांनीं सिंध-पंजाबांत राज्यें स्थापिलीं. येथून ते पूवकडे संयुक्त प्रांतांत आणि दक्षिणेकडे राजपुतान्यांत व सौराष्ट्रांत विस्तारले. जेथें त्यांच्या वसाहती व राज्यें दीर्घकालपर्यंत टिकलीं अगर जेथील बहुजनसमाजांत ते समाविष्ट झाले त्या भागांत सती, जोहार इत्यादि प्रथा प्रचलित झाल्या. राज्यकर्त्यांशीं संबद्ध असलेल्या वर्गांतच राज्यकर्त्यांचे रिवाज पुरस्कारले जातात आणि राज्य दीर्घकालपर्यंत टिकलें म्हणजे असे रिवाज बहुजनसमाजापर्यंत पोंचतात. म्हणूनच या प्रथेचा पुरस्कार फक्त क्षत्रियांनीं केला व तो बहुजनसमाजापर्यंत पोंचलाच नाहीं. महाराष्ट्रांतून शकांचें उच्चाटन त्वरित झालें. म्हणून येथें ही चाल फारशी रूढ झाली नाहीं.

५. विवाह :

विवाह या विषयाला अनेक अंगोपांगें आहेत. यामुळें या विषयाचें विवेचन अनेक शीर्षकांखालीं समाविष्ट होऊं शकतें. तसें तें येथें केलेंही आहे. या विषयाची कौटुंबिक व सामाजिक बाजू पूर्वी सांगितली. लैंगिक बाजू पुढें सांगेन; धार्मिक तेवढी बाजू येथें सांगतो. तरीही संकर होणारच. कारण या विषयाचें असें कोणतेंही अंग नाहीं कीं ज्याविषयीं धर्मशास्त्रकारांनीं नियम केलेले नाहींत व निर्बंध घातलेले नाहींत. साहजिक आहे. कारण आमचें धर्मशास्त्र हेंच आमचें समाजशास्त्रही आहे.

विवाहाच्या वेळीं वधूचें वय प्रौढ आहे. क्र. २९८ च्या नायिकेनें आपलें हृदय प्रियकराला अर्पण केलेलें आहे आणि संकल्पित संबंधाच्या शक्यतेबद्दल साशंकता निर्माण झाल्यामुळें ती बावरलेली आहे. क्र. ६४३ च्या नायिकेनें तर विवाहापूर्वी अनेकांबरोबर लैंगिक क्रीडा केलेली आहे. कन्येचा विवाह ठरला कीं तिच्या मैत्रिणी विवाहमंगलगीतें (क्र. ६४३) गाऊं लागतात. ही प्रथा आतां फारशी प्रचारांत नाहीं. कांहीं जातींत लग्नापूर्वी वधूवरांच्या घरच्या बायका गाणीं म्हणत मिरवणुकीनें जातात; पण तीं गाणीं मंगल

नसतात, भडवणीच्या स्वरूपाचीं असतात. विवाहाच्या वेळीं गाथिका म्हणतात त्या मंगलगीतांत वराच्या गोत्राचा म्हणजे नांवाचा उल्लेख करण्यांत येत असे. विवाहाचे वेळीं मंगलाष्टकें म्हणण्याचा मक्ता अगदीं अलिकडेपर्यंत पुरोहितांनीं काबीज केला होता. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा विस्तृत होत आहेत आणि आतां तर सुशिक्षितांच्या विवाहाच्या वेळीं वधूवरांच्या मैत्रिणींनींच मंगलाष्टकें म्हणावयाची पद्धत रूढ झाली आहे. क्र. ६९ या गाथेंत शिवपार्वतीच्या विवाहाचा प्रसंग वर्णिलेला आहे. पाणिग्रहणापूर्वी पशुपतीनें आपल्या हातावरील वासुकीचें कंकण दूर केलें आहे; वसुकी हा नागराज असला तरी त्याचें सान्निध्य लोकाचाराविरुद्ध व अमंगल म्हणून.

क्र. ६४४ या गाथेंत चतुर्थीमंगलाचे दिवशीं होणाऱ्या देवकार्याचा उल्लेख आलेला आहे. या विधींत ऋतुस्नात वधु गृहीत आहे. सूत्रकाळापर्यंत रजोदर्शनानंतर विवाह (History of Child Marriage : Dr. Bhandarkar : Z. D. M. G : Band 47) होत असत; म्हणूनच सूत्रकारांना गर्भाधान हा स्वतंत्र संस्कार माहीत नाहीं. सूत्रकाळांत वधूवरांची एकशय्या विवाहानंतर चवथ्या दिवशीं होत असे. चतुर्थीकर्म किंवा चतुर्थीमंगल हा विवाहाच्या विधींतीलच एक अखेरचा आणि आवश्यक भाग होता (आश्वलायन : १·११: १·१४; बौधायन : १·६: १·७: हिरण्यकेशी : ३.२३.११). या विधीचे दोन भाग असत: एक धार्मिक व दुसरा व्यावहारिक. विवाहानंतर चवथ्या दिवशीं अग्नि, वायु, चंद्र व सूर्य यांना आहुति द्यावयाच्या, हा धार्मिक विधि: त्या रात्रीं वधूवरांची एकशय्या व्हावयाची, हा व्यावहारिक विधि. विवाहानंतर तीन दिवसपर्यंत वधूवरांना व्रतस्थ रहावें लागे व समवयस्क मित्रमैत्रिणींच्या सहवासांत त्यांना परस्परांचा परिचय करून देण्यांत येई. या काळांत त्यांनीं एकाच खोलींत पण वेगवेगळ्या बिछान्यांवर झोपावयाचें असा सक्त नियम (The Position of Woman in Hindu Civilization : Dr. Altekar : p. 95) असे. हे तीन दिवस (नासदीयसूक्तभाष्य : राजवाडे. १ : ३१३-४) कामशास्त्राप्रमाणें कन्याविस्रंभणाचे, म्हणजे पुरुषानें नवोढेला आपल्या ठायीं हळूहळू प्रेम, विश्वास व

रति धारण करण्यास शिकविण्याचें होते. होमहवनानंतर चवथ्या रात्रीं त्यांना पूर्ण एकांत मिळत असे. या व्रताचा काळ अधिक असावा असें बोधायनाचें (१-७-९) मत होतें आणि मनोनिग्रहावर अतिशय ताण पडत असल्यामुळें ही मुदत आणखी कमी करावी असें अन्य सूत्रकारांचें. कामसूत्राच्या तिसऱ्या अधिकरणाच्या दुसऱ्या अध्यायांत वात्स्यायन सांगतो : " विवाहबद्ध झाल्यानंतर वधूवरांनीं तीन रात्री भूमीवर शयन करून ब्रह्मचर्य पाळावें...एक सप्ताहपर्यंत मंगलवाद्य व गायन यांसह स्नान करावें, एकत्र भोजन करावें. आप्तेष्ट व नट वगैरेंचें दर्शन घ्यावें. पहिल्या दहा रात्री वधूला एकांतांत साम्य उपचारांनीं विश्वासांत घेण्याचा...व ती संभोगास प्रवृत्त होईल असा प्रयत्न करावा...चौसष्ट कलांचा उपदेश करावा. बलात्कारें कांहींही करूं नये... चातुर्थिक होम झाल्यानंतर साक्षात् संभोगक्रियेनें नायिकेला न दुखवितां सतुष्ट करावें." वात्स्यायनानें सांगितलेलें व्रत दहा दिवसांचें आहे. अर्थात् तें उत्तरकालीन आहे.

गृह्यसूत्रकाळानंतर म्हणजे खि.पू.चौथ्या शतकानंतर हिंदुस्थानांतील राजकीय, धार्मिक व सामाजिक परिस्थिति झपाट्यानें बदलूं लागली. धार्मिक आवर्त व राजकीय परचक्रें यांमुळें निर्माण झालेल्या अस्थिरतेच्या काळांत घरांत प्रौढ अविवाहित कन्या असणें असुरक्षित वाटूं लागलें. या परिस्थितीमुळें धर्मशास्त्रकार प्रतिपादूं लागले कीं रजोदर्शनानंतर कन्यांना फार दिवस अविवाहित ठेवूं नये. जो तो आपआपल्या अनुभवाप्रमाणें मतप्रतिपादन करीत असल्यामुळें त्यांच्या अभिप्रायांत एकवाक्यता आढळत नाहीं. खिस्तोत्तर दुसऱ्या शतकाच्या अखेरीस कन्यांचे विवाह इतक्या बालवयांत होऊं लागले कीं वराची निवड करण्याची जबाबदारी सर्वस्वीं वधूपित्यावर येऊन पडली (Dr. Altekar : पूर्वोक्त पृ. ८२). बालविवाह प्रचलित झाल्यामुळें परिस्थितीच्या अनुरोधानें उत्तरकालीन स्मृतिकारांनीं गर्भाधान हा नवा संस्कार निर्माण व रूढ केला. सूत्रकारांना हा विधि माहीत नाहीं आणि स्मृतिकारांना चतुर्थीकर्म माहीत नाहीं. म्हणून कोणी चतुर्थीकर्माचा अन्य अर्थ लावतात आणि कोणी त्याचा उल्लेखच टाळतात (Dr. Altekar : पूर्वोक्त पृ. ९६).

गाथासप्तशतींतील उल्लेख संक्रमण काळांतला आहे. चतुर्थीमंगल या धर्म-

सूत्रकालीन वैवाहिक विधीचा उल्लेख येथें आलेला आहे; पण धर्मसूत्रकारांनीं या विधीचें जें स्पष्टीकरण दिलेलें आहे तें गाथेच्या संदर्भाशीं जुळत नाहीं. या विधीनंतर एकशय्या व्हावयाची म्हणून वधूवरांची वृत्ति समागमोत्सुक असावयास पाहिजे, पग येथें या विधीनंतर वियोग व्हावयाचा म्हणून वधूवर व्याकुलचित्त झालेलीं आहेत. या गाथेवरील टीकेंत गंगाधर सांगतो कीं "चतुर्थीकर्म केल्यानंतर जामातानें स्वगृहीं जावयाचें असा लोकव्यवहार" असल्यामुळें भावी वियोगाच्या दुःखामुळें तीं व्याकुलचित्त झालीं आहेत. मग हें चतुर्थीकर्म म्हणजे नुस्तेंच होमहवन करावयाचें कीं काय? वैदिक काळांत वधूवरांची एकशय्या विवाहाच्या रात्रींच वरगृहीं होत (ज्ञानकोशः बुद्धपूर्व जगः पृ. ३०१) असे. गाथेंतील संदर्भावरून दिसतें कीं चतुर्थीकर्म समाप्त होईपर्यंत जांवईबुवांचा मुक्काम वधूच्या गृहींच होत असे. गाथासप्तशतीच्या काळांत विवाहाच्या रात्रींच एकशय्या होत असती तर क्र. ४१७ मध्यें आला आहे तसा आनंदपटाचा उल्लेख आला नसता. क्र. २४ या गाथेचा, विशेषतः या गाथेवरील टीकांचा, आधार घेतला असतां दिसून येतें कीं गाथासप्तशतीच्या काळांत चतुर्थीकर्मानंतर, म्हणजे होमहवनानंतर कांहीं दिवसांनीं, बहुधा वधूला एकदां रजोदर्शन होऊन गेल्यानंतर ऋतुशांतीचा विधि करण्याचा प्रघात कुलीन कुटुंबांत रूढ झाला होता.

या सर्व विधींसाठीं पुरोहित अवश्य आहे हें मानलेंच पाहिजे; पण प्रत्यक्ष पणें त्याचा उल्लेख मात्र कोठेंही आलेला नाहीं.

६ समजुती :

समाजाच्या सांस्कृतिक पातळीशीं असंबद्ध अशा भोळ्या समजुती प्रत्येक देशांत, प्रत्येक कालखंडांत आढळून येतात. हें लक्षण बुद्धिवादानुसार दौर्बल्याचें, पण त्याचें मूळ संस्कारांत असतें, संकेतांत असतें. गाथाकवींनीं समाजांत प्रचलित असलेल्या कांहीं समजुती सशब्द केलेल्या आहेत.

देव नेहमीं तरुण (क्र. ५९३) असतात. ते आपले डोळे कधीं मिटीत नाहींत (क्र. १७६, ५९२) आणि विष्णूचा उजवा डोळा मिटला कीं सर्वत्र अंधार (क्र. ८१०) होतो. देव व दैव यांबद्दल त्यांच्या कल्पना होत्या तशाच

त्या आतांही आढळतात. देवांची प्रार्थना केली कीं इष्टप्राप्ति (क ४६, ४८, ८३८) होते; दैवाची गति अगम्य (क. १३२, २१२, २४५, २७९, ६५६, ७८३, ८३८, ९६९) आहे; आपण कर्म करावयाचें, त्याचें फळ मिळणें न मिळणें दैवाधीन (क. २७९) असतें. क. ६५६ मध्यें दैवाची खठ्याळ मुलाशीं केलेली तुलना अत्यंत हृद्य आहे. धर्माचें साहचर्य असतें तेंच विज्ञान (क. २५१) होय व धर्माक्षर बोलणें हें जाणत्याचें कर्तव्य (क. १७८) होय अशी गाथाकर्त्यांची भावना आहे; धर्मात स्वारस्य वाटूं दे अशी त्यांची प्रार्थना (क. ९८५) आहे. अमृतपान व स्वर्गाचें राज्य हीं सुखाची परिसीमा (क ८७२) आहे आणि व्यभिचाऱ्यांना नरकवास भोगावा (क. ८७२) लागतो अशी त्यांची श्रद्धा होती. पाप (क. १८३), पुण्य (क. १७४), पूर्वपुण्याई (क. ९९) व पुनर्जन्म (क.३७५, ४४१, ८१२, ८३८) यांवर लोकांचा विश्वास आहे. अखेरच्या क्षणीं जी इच्छा करावी किंवा त्याचें ध्यान करावें तीं पुढील जन्मीं तृप्त किंवा प्राप्त होतात अशी लोकांची श्रद्धा (क. ३७५) होती. अशाच कल्पनांचा परिपोष पुढें पुराणकारांनीं केलेला आहे. शाप (क. ३२४, ४४०) व शपथ (क. ३३३, ३५७, ५१८, ७७०) यांचे अनेक उल्लेख आहेत. मात्र येथें कोठेंही या संज्ञा गंभीर अर्थानें वापरलेल्या नाहींत; त्यांत मुग्धेचा लाडिकपणा आहे, मध्येची सूचकता आहे. शुभ व अशुभ शकुनांवर लोकांची श्रद्धा आहे. स्त्रीचा डावा डोळा लवणें (क. १३७) हें शुभ मानलेलें आहे. मालतीमाधवांत हीच समजूत आलेली आहे व ती आजही प्रचलित आहे. मात्र प्रेयसीनें प्रियकराला उजव्या डोळयानें संकेत द्यावयाचा असतो. यासाठींच या शकुनाचा उल्लेख गाथाकवीनें केलेला आहे. कोणी प्रवासाला जाणार असेल तर त्याला शुभशकुनासाठीं दारात मंगल (क. १४०) व शुभसूचक (क. ५७५) प्रस्थानकलश मांडण्यांत येत असे; तो जलपूर्ण असून त्यांत कमळ (क. २५६) किंवा आंब्याची डहाळी अथवा मोहोर (क. १४३) खोवलेला असे. यावरून दिसतें कीं तत्कालीन पुरुषांच्या प्रवासाचा प्रारंभ पावसाळयाच्या व हिंवाळयाच्या अखेरीस होत असावा; घरचीं शेतीचीं कामें उरकल्यानंतर अधिक द्रव्य संपादनार्थ कर्त्या पुरुषानें अन्यत्र जाण्याची रीत होती असें या संकेतावरून अनुमान होतें. प्रवासाला (क. २६१)

मंगळवार व विष्टीचे दिवस आणि पलाशकुसुमांचें व पर्यायानें बौद्धभिक्षूंचें दर्शन अशुभ (क्र. ३०८) मानण्यांत येत असे. आपण प्रवासांत असतांना कृष्णसार उजवीकडून डावीकडे गेला तर प्रवास किंवा यात्रा निष्फळ होणार असें मानून प्रवासी घराकडे परतत (क्र. २६) असत. दिवसां रजस्वलादर्शन (क्र. ४८०) व स्वप्नांत होतृदर्शन (क्र. ७२२) अशुभ मानीत. भुतांच्या अस्तित्वावर (क्र. ५५७) व ग्रहबाधेवर (क्र ३८३) लोकांचा विश्वास होता. यक्ष (क्र. ३७२) व विद्याधर (क्र. ४४३) यांच्या अस्तित्वावर व कर्तृत्वावर त्यांचा भरंवसा होता. ग्रह हा शब्द शतपथांत जादूमारखा परिणाम करणारी शक्ति या अर्थानें योजलेला आहे (ज्ञानकोश : बुद्धपूर्व जगः पृ. १९६). मोरपंखांत मोहनशक्ति (क्र. ५७२) असते अशी लोकांची कल्पना होती. हल्लींही फकीर–बैरागी मोरपंखांचा गुच्छ याच हेतूनें जवळ बाळगतात. हत्तींच्या गंडस्थळांत मोतीं (क्र. १७३) असतात, नागफणींत मणि (क्र. ९७०) असतो आणि भूमिगत संपत्ति सर्परक्षित (क्र. ५७६) असते अशी लोकांची समजूत होती.

७ धर्मपंथ :

गाथासप्तशतींत वैदिक व वेदोत्तर दैवतांचे व वीरदैवतांचे, त्याचप्रमाणें यज्ञ-संध्यादि वैदिक संस्था व विधि यांचे उल्लेख जागोजाग आढळतात. या उल्लेखांच्या स्वरूपावरून दिसतें कीं तत्कालीन सुसंस्कृत समाज वैदिक धर्मानुयायी होता. सुसंस्कृत व्यक्ति व कुटुंबें हींच समाजाचे व धर्माचें धारण करतात. त्यांची बहुजनसमाजावर छाप होती हें स्पष्ट दिसतें.

गाथासप्तशतींत मुख्यत्वेंकरून ज्यांच्या भावना सशब्द झालेल्या आहेत त्या बहुजनसमाजांत मात्र वैदिक दैवतांचें माहात्म्य ओसरलेलें दिसतें. येथें अग्नि परदारांभोंवतीं घोंटाळत आहे आणि प्रजापति सृष्टिनिर्मितीचें कार्य बाजूला ठेवून सुंदर स्त्रीची जडण करण्यांत गढलेला आहे. अग्नि यज्ञस्थानीं, तसाच चांडालकुटींतही पेटतो, अशा गांभीर्यहीन विधानानें अग्नीची अवहेलना केलेली आहे. हा बौद्धांच्या प्रचाराचा परिणाम असावा.

गाथासप्तशतींत भागवत व शैव संप्रदायांचा प्रसार झालेला आहे. शैवांत कापालिक पंथ सुरू झाला आहे पण भागवतांत प्रेमपंथ अद्याप सुरू झालेला

नाहीं. विष्णूच्या वामन या एकाच अवताराचा उल्लेख आला आहे. नव्याजुन्या दैवतांबद्दल आकर्षक अगर भयानक कथा निर्माण होत आहेत; मात्र त्यांना अद्याप पुराणांतील संकीर्ण वा संघटित स्वरूप आलेलें नाहीं. दिव्यें व व्रतें आहेत; पण पोटभरू पुरोहितांनीं आपला महिमा वाढविण्यासाठीं किंवा योगक्षेम चालविण्यासाठीं उत्तर कालांत निर्माण व पुराणांत नमूद केलीं तशीं हीं व्रतें नाहींत.

गाथासप्तशतींत नकली धार्मिकांबद्दल जागोजाग तिरस्काराचे उद्गार काढलेले आहेत. प्रेमसंगमेच्छु युगलांच्या संकेतांत विघ्न आणणाऱ्या स्वर्गेच्छु धार्मिकाला क्र. १६७ या गाथेंत शाप दिलेला आहे. गोदातीरावरील निकुञ्जांत निष्कारण लुडबुडणाऱ्या भित्र्या धार्मिकाला क्र. १७५ या गाथेंत धमकी दिली आहे. मठांत राहणारे धार्मिक महामूर्ख असतात अशी सूचना क्र. ३४६ या गाथेंत आलेली आहे. क्र. ६०८ या गाथेंत परलोकव्यसनिकांचा निषेध केलेला आहे. धर्माच्या नांवानें भीक मागणाऱ्या भुक्कड धार्मिकांचा क्र. ५५३ या गाथेंत उपहास केलेला आहे. क्र. ८७२ या गाथेंतील स्वसंतुष्ट धार्मिकाला कडु लिंबावरचा किडा म्हटलेलें आहे. जें नशिबानें मिळालें त्यांतच सुखसर्वस्व आहे, जें आपल्याला शिकविण्यांत आलें तेवढेंच सत्य आहे असें मानणारांचा हा निषेध आहे. क्र. ५५३ मधील धार्मिक हा भिक्षेकरी असून पुरेशी भिक्षा पडत नाहीं अशी त्याची तक्रार आहे. ज्यांना त्याचा उपसर्ग होतो त्या त्याला भिक्षा काय म्हणून वाढतील? हे अतृप्त जीव धर्माच्या नांवाखालीं अन्यांना व्यत्यय आणण्यांतच समाधान मानतात, कारण त्यांना जें सौख्य प्राप्त होत असतें किंवा होणार असतें तें यांना मिळण्याचा यत्किंचितही संभव नसतो व तें मिळविण्याची यांना हिंमत नसते; म्हणून यांची लुडबुड प्रेमिकांना असह्य होते. हा धर्म नाहीं व शिष्टाचारही नाहीं अशी या गाथांची स्पष्ट सूचना आहे. या गाथांवरून निष्कर्ष निघूं शकतो कीं त्या काळांतही प्रेमिकांना उपसर्ग होण्याइतके हे नकली धार्मिक बोकाळले होते.

क्र. ४०८ या गाथेंत कापालिकेचा उल्लेख आलेला आहे. ही स्मशानांत आपल्या जाराच्या चितेंतली राख आपल्या अंगाला लावीत आहे. कपालिन् म्हणजे शिव, हातीं कवटी धारण करणारा शिव. या स्वरूपांतील शिवाचे जे भक्त ते कापालिक. हा एक पाशुपत शैव पंथ आहे. एक माळ, एक अलंकार

एक कुंडल, एक चूडामणी, राख व यज्ञोपवीत या सहा मुद्रिका ते धारण करतात. ते धारण करतात ती माळ मानवी हाडांची असते व त्यांचें यज्ञोपवीत केसांचें असतें. ते शरीराला चिताभस्म फांसतात आणि नरकपालांतून मद्य-मांसादि खाद्यपेयांचें ग्रहण करतात. पतंजलीनें (३·९९) शिव–भागवतांचा उल्लेख केलेला आहे. त्याला समकालीन असलेल्या लकुलीशानें पाशुपत पंथाची प्रस्थापना केली. अथर्व परिशिष्टांत व उपनिषदांत (मै. उ : LXXXVII : 22. 432) त्यांचा उल्लेख आलेला आहे. वराहमिहिर, युआन च्वंग व भवभूति यांनीं त्यांचा उल्लेख केलेला आहे. नाशकास कपालेश्वराच्या देवळांत या पंथाचे जोगी आढळतात. कापालिक महाव्रतींना चरितार्थ चालण्यासाठीं पुलकेशी चालुक्याचा पुतण्या नागवर्धन यानें इगतपुरीजवळचें एक खेडें दान दिलेलें आहे.

क. ७२२ या गाथेंत (होउ) होत्याचा उल्लेख आलेला आहे. हा उल्लेख सांकेतिक आहे. स्वप्नांत होत्याचें दर्शन अशुभ अशी स्वप्नाध्यायाची ग्वाही आहे. यज्ञप्रसंगीं होत्यानें ऋग्वेदांतील मंत्र म्हणावयाचे असतात. या व्यतिरिक्त गाथासप्तशतींत ब्राह्मणाचा उल्लेख कोठेंही आलेला नाहीं. क. ६४४ मध्यें चतुर्थी मंगलाचें देवकार्य चाललेलें आहे. धार्मिक विधि करवून घेण्यासाठीं तेथें पुरोहित हजर असलाच पाहिजे. क. १७५ या गाथेंत घरधनिणीनें कपाशीच्या शेतांत नांगराची पूजा केलेली आहे. ह्या सीता–यज्ञाचा उल्लेख पारस्कर–गृह्य–सूत्रांत (२-१७; ३.८-१०) आलेला आहे. या यज्ञाचा अधिकार फक्त घरधनिणीचा आहे. हें पुण्याहमंगल चालू आहे—परंतु आसपास ब्राह्मण दिसत नाहीं. नसेलहीं, पूजाविधि अगदीं साधा असल्यामुळें; असेलहीं, विषयाला अप्रस्तुत म्हणून त्याचा उल्लेख आलेला नसेल, इतकेंच. वसाहतकाला पासून आतांपर्यंत ब्राह्मण हे अल्पसंख्यच आहेत; त्या काळांत तर ते अत्यल्प-संख्य असले पाहिजेत. ग्रामीण जीवनाशीं त्यांचा फारसा संबंध नव्हता असें दिसतें.

गाथासप्तशतींत बौद्धांचा स्पष्ट असा एकच उल्लेख (क. ३०८) आलेला आहे. त्या काळांत बौद्ध भिक्षु भगवीं वस्त्रें परिधान करीत आणि रानावनांतून थव्यानें भ्रमण करीत असें या उल्लेखावरून दिसतें. येथें त्यांची तुलना पळसफुलांशीं केलेली आहे. गंगाधर मानतो कीं पलाशपुष्पांप्रमाणें बौद्ध भिक्षूंचें

दर्शन हा अपशकुन मानण्यांत येत असे. क्र. ७२२ या गाथेंत याचा उत्तरपक्ष केलेला आहे कीं काय? जनतेच्या मनावर बौद्ध भिक्षूंच्या प्रचाराचा पुष्कळ परिणाम झाला होता हें मात्र खरें. याचें प्रत्यंतर क्र. ६०१, ६१८ व ६१९ या गाथांतील अहिंसेच्या पुरस्कारांतहि दिसून येतें.

८ निष्कर्ष :

गाथासप्तशतींतील दैवतें मूलतः वैदिक आहेत. त्यांवर उत्तरकालीन संस्कार झालेले आहेत. सुसंस्कृतांच्या या दैवतांचें स्वरूप बहुजनसमाजाला आकलनीय व्हावें व आकर्षक वाटावें म्हणून त्यांभोंवतीं कथांची प्रभावळ बुद्धिपुरःसर निर्माण करण्यांत येत आहे व कांहीं ग्रामीण दंतकथा निर्माण झालेल्या आहेत. त्याचप्रमाणें ग्रामीण व स्थानिक दैवतांचें आर्यीकरण होत आहे.

नाणेघाटांतील सातवाहन गुंफेंतल्या नायनिकेच्या शिलालेखांत सातकर्णानें केलेल्या अनेक यज्ञांचे व तन्निमित्त मुक्तहस्तानें दिलेल्या दानांचे उल्लेख आहेत; या लेखांत इंद्र व कुबेर या वैदिक आणि वासुदेव संकर्षण या भागवत दैवतांना वंदन केलेलें आहे. यावरून दिसतें कीं आद्य सातवाहन हे यज्ञ संस्कृतीचे पुरस्कर्ते होते व भागवत संप्रदायाचे अनुयायी होते आणि या लेखाच्या काळांत महाराष्ट्रांत वैदिकांचा भागवतांशीं समेट झाला होता.

शुंग-सातवाहन युगांत म्हणजे खि. पू. दुसऱ्या शतकांत पतंजलीच्या नेतृत्वाखालीं यज्ञ-संस्थेचें पुनरुज्जीवन झालें, शुंग-सातवाहनांनीं एकजूट होऊन इंडोग्रीकांचा पराभव केला. नाणेघाटांतील यज्ञलेख हें या विजयाचें प्रतीक आहे. वैदिक व भागवत दैवतांच्या संघर्षाचे अनेक उल्लेख भागवत संप्रदायाच्या साहित्यांत आढळतात; त्यांच्या समन्वयाचा दाखला सातवाहनांच्या या आद्यलेखांत मिळतो. दुसऱ्या सातवाहन राजाचें नांव कृष्ण असें आहे. आणि सोळाव्या राजाच्या नांवाचें वैकल्पिक अन्त्यार्ध कृष्ण हेंच आहे. असें आहे तरीही सातवाहनांनीं भागवत हें बिरुद धारण केलेलें नाहीं. कारण हा काळ संक्रमणाचा होता. पुढें गुप्त–वाकाटक कालांत तें रूढ झालेलें आहे.

सातवाहन राजांच्या नामावळीवरून असेंही दिसतें कीं त्यांच्या काळांत उत्तरोत्तर शैवांना प्रामुख्य येत आहे. पशुपति हा मूळचा अनार्यांचा देव.

मोहेंजोदरो येथील उत्खननांत योगीश्वर पशुपतीची मुद्रा मिळालेली आहे. अनेक संशोधकांच्या मतें ही मुद्रा वैदिक आर्यांचा हिंदुस्थानांत प्रवेश होण्याच्या पूर्वीची आहे. तत्सदृश केंद्रांच्या उत्खननांत लिंगें व शाळुंकाही मिळालेल्या आहेत. एकीकडे वैदिक रुद्राचा पशुपति-शिवाशीं व दुसरीकडे शिवाचा लिंग-पूजेशीं समन्वय होत होता. शिव हा पुरुष व लिंग हें त्याचें प्रतीक आणि पार्वती ही प्रकृति व शाळुंका हें तिचें प्रतीक, ही कल्पना पौराणिक आहे. गाथासप्तशतींत तिचा मागमूसही आढळत नाहीं. यावरून गाथासप्तशतीचें पुराणपूर्वकालीनत्व सिद्ध होतें. गाथासप्तशतींतील अज्जा ही मात्र ग्रामीण मातृदेवता आहे. आर्य व अनार्य यांच्या समन्वयाचें प्रतीक म्हणून मूळ एतद्देशीयांच्या बापदेवाला ही आर्या अर्पण करण्यांत आलेली आहे कीं काय?

गाथासप्तशतींत आरंभीं व अखेरीस शिवाला नमनें केलेलीं आहेत असें मुळदर्शनीं भासत असलें तरी वस्तुतः हीं नमनें सूर्याला केलेलीं आहेत. सात-वाहन हें अभिधान सूर्याच्या सप्तवाहन या संस्कृत नांवाचें प्राकृत रूप आहे असें माझें म्हणणें आहे. त्याला हे उल्लेख पोषक आहेत.

मौर्यकालीन शिल्पांत यक्षयक्षींच्या प्रतिमा वेगवेगळ्या स्वरूपांत आढळतात. खि. पू. दुसऱ्या शतकापासून महाराष्ट्रांत लेणीं कोरण्याची प्रथा सुरू झाली. त्यांत अशा व अन्य धर्तीच्या मूर्ति आहेत. नाणेघाटांतील सातवाहनांच्या देवकुलांत राजघराण्यांतील व्यक्तींच्या मूर्ति कोरलेल्या होत्या. ज्याचें कर्तृत्व सातवाहनांना देण्यांत येतें त्या सांचीच्या दक्षिण तोरणावरही मूर्ति आहेत. अर्थात् खि. पू. दुसऱ्या शतकापासून महाराष्ट्रांतील कारागिरांना मूर्ति कोर-ण्याची कल्पना अवगत असली पाहिजे. तरीही येथील सातवाहनकालीन शिल्पांत व गाथासप्तशतींतही देवतांच्या मूर्ति आढळत नाहींत. वायव्य सरहद्द, सप्तसिंधु व संयुक्त या प्रांतांत इंडो-ग्रीक व कुषाण राज्यकर्त्यांच्या अमदानींत बौद्धांनीं भव्य व सुंदर मूर्ति कोरण्याची व त्यांची पूजा करण्याची प्रथा सुरू केली. याचेंच पर्यवसान पुढें महायान पंथाच्या प्रस्थापनेंत झालें. बौद्धांच्या या प्रथेचा पुरस्कार पुढें वैदिक धर्मीयांनीं केला. मूर्तिपूजेचें हें लोण महाराष्ट्रांत वाकाटक काळांत आलें. गाथासप्तशतींत मूर्तिपूजा नाहीं. त्या अर्थी हा कोश वाकाटकांच्या पूर्वीचा असला पाहिजे.

गाथासप्तशतींतील कांहीं दैवताचे उल्लेख संकीर्ण स्वरूपाचे असल्यामुळें हा कोश पुराणोत्तरकालीन असावा असा निष्कर्ष कांहीं संशोधक काढतात. हा निष्कर्ष टिकण्यासारखा नाहीं. स्मृतींचा व महाभारताचा रचनाकाल विवाद्य असला तरी तो पुराणपूर्व आहे हें निश्चित. पुराणांची रचना साधारणतः गुप्त-कालांत झाली हा सिद्धांत मात्र बहुतेक संशोधकांना मान्य आहे आणि पुराण-कारांनीं प्राकृत जनांत प्रचलित असलेल्या दंतकथांचें संस्कृतीकरण केलें, हाही पौराणिकांनीं विशिष्ट हेतूनें प्रेरित होऊन नव्या कथा रचल्या, अनेक स्थानिक दैवतांचें आर्यीकरण केलें आणि नवीं माहात्म्यें व व्रतें निर्माण केलीं, हेंही निर्विवाद आहे. त्यांनीं समाजव्यवस्थेंत ब्राह्मणांना अग्रस्थान दिलें आणि धार्मिक कृत्यांत त्यांचा पुरस्कार अपरिहार्य केला. हीं लक्षणें आढळत नसल्या-मुळें गाथासप्तशती हा कोश पुराणपूर्वकालीन असला पाहिजे.

गाथासप्तशतींत उल्लेखिलेल्या दैवतांपैकीं अग्नि, इंद्र, प्रजापति, रुद्र, वामन,सूर्य व हरि हे वैदिक आहेत. यांपैकीं वामन हा अवतार सर्वांत प्राचीन, वेदकालीन आहे. या दैवतांच्या मूल स्वभावाच्या अनुरोधानें बहुजनसमाजांत प्रचलित झालेल्या काहीं दंतकथा येथें आढळतात; पण त्यांना अद्याप पुराणांतलें स्वरूप प्राप्त झालेलें नाहीं. प्रमथाधिप हें शंकराचें व अपर्णा हें पार्वतीचें-हीं अभिधानें येथें आढळतात. पुराणकालांत तीं नष्टप्राय झालेलीं आहेत. या काळांतील ज्या पंथाला भागवत संप्रदाय अशी संज्ञा आहे त्याचें तत्त्वज्ञान सामान्य जनांना अनाकलनीय असल्यामुळें त्यांनीं त्यांतला भक्तिमार्ग तेवढा स्वीकारला. महा-राष्ट्रांत कृष्णाचा विठ्ठल झाला. भक्ति व प्रीति यांचें साहचर्य आहे. गाथासप्त-शतींत आहेत तशीं गोपीगीतें अर्वाचीन वारकरी वाङ्मयांतही आहेत. राधेचा अन्यत्र समकालीन उल्लेख आढळत नाहीं म्हणून हा कोश नवव्या शतकाइतका अलीकडे ओढणें समंजस ठरणार नाहीं. गणपति हें दैवत मुख्यतः दाक्षिणात्य आहे. अष्टविनायक महाराष्ट्रांतच आहेत. गोतमी बलश्रीच्या लेखांत रामाचा उल्लेख आलेला आहे. या सर्व उल्लेखांचा विचार केला असतां त्यांवरून हा कोश अलीकडे ओढण्याला कांहीं सबळ कारण आहे असें दिसत नाहीं.

गाथासप्तशतींत जैन मुळींच नाहींत, बौद्ध क्वचित् आहेत.

जैन सम्राट् कलिंगाधिपति खारवेल याचें सातवाहनांशीं शत्रुत्व होतें. आपण सातकर्णीचा आणि भोजराष्ट्रिकांचा पराभव केला असें तो आपल्या हाथीगुंफा

लेखांत सांगतो. विशेष खोलांत न जातां म्हणतां येईल कीं या विधानांचा खरेपणा संशयास्पद आहे. या स्पर्धेमुळें जैनांना येथील वातावरण प्रसाराला प्रतिकूल असावें आणि म्हणून त्यांचा उल्लेख आलेला नसावा असें वाटतें.

हालाच्या काळांत बौद्धांची निकृष्टावस्था झाली होती. हा कान्तिकाल होता. महाराष्ट्रावर क्षहरात क्षत्रपांची सत्ता होती. त्यांनीं सातवाहनांची सत्ता खिळ-खिळी केली होती. त्यांचा नेता नहपान हा धर्मानें बौद्ध होता. हें त्याच्या लेण्यांवरून दिसतें. मात्र या काळांत बहुजनसमाजांत बौद्धांना महत्त्व राहिलें नव्हतें असें दिसतें. कारण नहपान व त्याचा जांवई उषवदात यांनीं जीं दानें दिलीं तीं मुख्यत्वेंकरून ब्राह्मणांना दिलेलीं आहेत; त्यांना संतुष्ट करण्याकरतां, त्यांचा पाठिंबा मिळविण्याकरतां, निदान त्यांचा विरोध विस्कळित करण्याकरितां. पण याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. लवकरच गोतमीपुत्रानें क्षहरातांचा समूळ उच्छेद केला; कुळाच्या, धर्माच्या व स्वातंत्र्याच्या नांवानें; ब्राह्मण्याच्या व चातुर्वर्ण्याच्या नांवानें. विजयोत्सवार्थ त्यानें आद्य सातवाहनांप्रमाणें यज्ञ मात्र केले नाहींत. गोतमी बलश्रीच्या लेखांत महाभारत व रामायण यांतील वीरदेवांचे व वीरपुरुषांचे उल्लेख आलेले आहेत. त्यांवरून मध्यंतरीच्या काळांत झालेल्या धार्मिक परिवर्तनाची कल्पना करतां येते. गाथासप्तशती हा कोश या संक्रमण काळां-तला आहे.

अर्थात् गाथासप्तशतींतील धार्मिक उल्लेखांवरून प्रस्तुत कोशरचनेचा काळ पहिल्या शतकाच्या प्रथमार्धाच्या अखेरीस मांडण्यास कांहींही प्रत्यवाय नाहीं असेंच प्रत्ययास येतें.

१४. गाथासप्तशतींतील सामाजिक जीवन.

यथार्थदर्शन (Positive Philsophy) शास्त्राचा जनक ऑगस्ट कोंट (१७९८–१८५७) यानें समाजशास्त्र या संज्ञेची योजना प्रथम केली. अर्थात् समाजशास्त्र हें सर्व शास्त्रांत अल्पवयी आहे. पण त्याचा प्रभाव तीन पावलांत त्रैलोक्य व्यापणाऱ्या वामनासारखा आहे. वर्षानुवर्षे त्याचा विस्तार वृद्धिंगतच होत आहे. अनुवंशापासून अणुवंशापर्यंत त्याची व्याप्ति आहे. समाजशास्त्र म्हणजे समाजजीवनाचें शास्त्र. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र वगैरे शास्त्रांचा समाज-शास्त्रांत समन्वय होतो. या प्रकरणाच्या शीर्षकांत ही संज्ञा एवढ्या व्यापक

अर्थानें योजलेली नाहीं. ग्रामीण, कौटुम्बिक व धार्मिक या सामाजिक जीवनाच्या अंगांची चर्चा झाली; आर्थिक, राजकीय, लैङ्गिक, सांस्कृतिक वगैरे अंगांचा उहापोह पुढें होत आहे. त्या व्यतिरिक्त अशीं जीं सामाजिक जीवनाचीं अंगें आहेत त्यांचा विचार या प्रकरणांत करावयाचा आहे. आहार-खाणें व पिणें; विहार—कालहरण, खेळ व उत्सव; वस्त्रें व अलंकार; आचार व आरोग्य आणि जाती जमाती इत्यादि सामाजिक जीवनाशीं संबद्ध अशा विषयांची माहिती या प्रकरणांत देत आहे.

(१) आहार :

अण्ण = अन्न : क. ८०८; **इच्छू** = उंस : ७३४; **उच्छू** = उंस : क. ५४१; **कञ्जि** = कांजि : क. २८६; **कलम** = साळी : क. ६९०, ६९१; **गुड** = गूळ : क. ५५४; **घिअ** = घृत : क. २२, ५१९; **चणअ** = चणे : क. ५५७; **जव** = यव : क. ४०२; **तण्डुल** = तांदूळ : क. ६८९; **तिल** = तीळ : क. ८, ६२७, ६९३, ७६३; **तुप्प** = तूप : क. २८९; **तुवरी** = तूर : क. ३५८; **दुद्ध** = दूध : क. ६०७, ६३७, ७९५, ८०६; **पहेणअ** = प्रहेणक = मोदक : क. ६०३, ६४१; **पाउ** = न्याहारी : क. ६९२; **पिट्ठ** = पीठ : क. ३८८, ६२४, ६९९, ८२०; **मिट्ठं** = मिष्ट, मृष्ट = मिष्टान्न : क. ७२; **राइआ** = राई = मोहरी : क. १७१; **लड्डुअ** = लाडू : क. ६४१; **लोण** = लवण : क. ३१६; **व्रीहि** : क. ९५२; **सालि** = साळी : क. ८, ९, ५६७, ७८२, ८१५; **सिणेह** = स्नेह = तूप : क. ३१६, ७७९; **सिन्धव** = सैन्धव : क. ६७९.

इतिहासपूर्व कालापासून भारतीयांचा आहार साधा आहे. ऋग्वेदांत धान्य, बीज व यव या तीनच उद्भिज अन्नधान्यांचा उल्लेख आढळतो. तैत्तिरीयांत व बृहदारण्यकांत दहा धान्यांचा उल्लेख आहे. दश ग्राम्यानि धान्यानि व्रीहि (तांदूळ) यवास्तिलमाषा (उडीद)। अणु (वरी) प्रियङ्गवो (राळे) गोधूमाश्च मसूराश्च खल्वाश्च खलकुलाश्च (कुळीथ)॥ वैदिक वाङ्मयांत व्रीहींचा पहिला उल्लेख अथर्वांत (६. १४०. २) आढळतो. ऋग्वेदांत यवांपासून सिद्ध केलेल्या खाद्यांचे व उत्तेजक पेयांचे अनेक उल्लेख आढळतात. यज्ञ व संस्कार कर्मांत यवांचें महत्त्व विशेष आहे. तिळांपासून तेल (अथर्व : १. ७. २.) काढीत व तें मातीच्या घटांत (अथर्व : २०. १३६. १६) ठेवीत. शांख

यन आरण्यकांत तलाभ्यंगाचा उल्लेख आहे. आर्यांच्या कौटुंबिक जीवनांत व धार्मिक विधींत तिल व तेल यांना विशेष महत्त्व आहे. प्रियङ्गु म्हणजे राळे (Watt : Commercial Products of India : p 988). श्री. चक्रवर्ती (Cultural History of the Hindus : p. 330) यांनीं याचा अर्थ बाजरी असा दिलेला आहे. ज्ञानकोशांत (बुद्धपूर्व जग : पृ. २९४) गोधूमाचा अर्थ मका असाही दिलेला आहे.

वैदिक ब्राह्मण व क्षत्रिय हे हिंसात्मक यज्ञसंस्थेचे पुरस्कर्ते होते. जसे लोक तसे त्यांचे देव. आर्य व त्यांचे देव मांसाचें भक्षण करीत. अतिथि सत्कारासाठीं व लग्नसमारंभांत (१०. ८५. १३) गाय, बैल व बोकड मारीत. आर्य लोक मांसें शिजवून खात आणि अनार्य कच्चें मांस खात (७. १०४. २); राक्षसांनीं घोड्यांचें व माणसांचें मांस (१०. ८७. १६) सेवन केल्याचा उल्लेख (१०. ८७. १६) आढळतो. मयसभा प्रवेशाचे वेळीं धर्मराजानें घातलेल्या प्रयोजनांत ब्राह्मणांनीं वराहांच्या व हरिणांच्या मांसांचीं पक्वान्नें सेवन केलेलीं आहेत. मृगया हा क्षत्रियांचा खेळ होता व हक्कही होता. मांस-भक्षणापासून परावृत्त होण्याची प्रवृत्ति महाभारत काळांत बळावत चाललेली दिसते. या प्रवृत्तीचा प्रारंभ वैदिक वाङ्मयांतहीं आढळतो. ऋग्वेदांत गाईला अघ्ना (८. १०१. १५) म्हटलेलें आहे. बैलांची किंवा गाईची हत्या हें ब्रह्महत्येसारखें महत्पाप आहे असें महाभारतकालांत मानण्यांत येऊं लागलें. बौद्ध व जैन धर्माच्या प्रसारामुळें नव्हे, गोपालकृष्णाच्या भक्तीच्या प्रसारामुळें ही आचार-क्रांति झाली, असें श्री. वैद्य यांचें मत (महाभारत : उपसंहार : पृ. ३६१-३६४) आहे. यज्ञसंस्था मागसल्यानंतर ब्राह्मणांनीं मांसाहार वर्ज्य केला आणि क्षत्रियांनीं मांसाहाराबाबत कांहीं निबंध स्वीकारले.

इक्षु, इच्छु व उच्छु हे शब्द उंस चावून रस चोखतांना होणाऱ्या आवाजावरून सिद्ध झालेलें असणें शक्य आहे. उंसाचा सर्वांत प्राचीन उल्लेख अथर्ववेदांतील (१. ३४. ६) एका प्रेम मंत्रांत आढळतो. प्रियकर म्हणतोः "प्रिये, मजविषयीं तुझ्या मनांत अप्रीति उत्पन्न होऊं नये म्हणून मी तुझ्याभोंवतीं उंसाचें कुंपण लावलें आहे." अले क्झँडरचा नाविक अधिकारी नेआर्कस सांगतो कीं या देशांत बोरुसारखी एक वनस्पति असून तिच्यांत मधमाशांच्या माध्यमाशिवाय तयार झालेला मध मिळतो. मौर्य दरबारांतला मेगॅस्थेनिस सांगतो : हे

बोरू जमीनींतलें पाणी शोषून घेतात. कडक उन्हानें हें पाणी शिजतें व त्यापासून मध तयार होतो. प्लिनी व एरियन यांनीं सच्छर, सच्छरीन या नांवानें शर्करापिंडाचा उल्लेख केला आहे. भरुकच्छ बंदरांतून रोमकडे सच्छर निर्यात होत असे. परदेशांत हे पिंड दुर्मिळ व महाग असल्यामुळें त्यांचा उपयोग त्यांच्या औषधी गुणधर्मासाठींच होत असे.

गाथासप्तशतींत तांदूळ व यव या दोनच अन्नधान्यांचे उल्लेख आहेत. कलम (कोळंबा), व्रीहि (देवभात) व सालि (साळी) या तांदळाच्या तीन जाती येथें आढळतात. चिरीटावर (क्र. ७९४) भात भरडीत आणि उखळांत कुटून (क्र. ६२४, ८२०) किंवा जात्यावर दळून (क्र. ३८८) धान्याचें पीठ करीत. भाकरी भाजण्यापूर्वी पीठ आंबवीत (क्र. ६९२) असावेत.

यव, चणक व तूर यांचा एक एकच उल्लेख आहे. क्र. २८६ मधील कांजी तांदळाची असेल किंवा यवांची. चवीसाठीं तींत मिठाचा खडा टाकलेला असेल किंवा शर्करेचा. मिठाचा उल्लेख दोनदां आला आहे; पैकीं सैन्धवाचा उल्लेख सांकेतिक आहे आणि दुसरा उल्लेख मिठाच्या अभावाचा आहे. प्राचीन भारतांत मीठ दुर्मिळ होतें. ऋग्वेदांत मिठाचा उल्लेख नाहीं; अथर्वांत फक्त एक उल्लेख आहे. उत्तरकालीन ब्राह्मण ग्रंथांत मीठ हा मौल्यवान पदार्थ गणलेला आहे. हीच परिस्थिति गाथासप्तशतीच्या काळांतही होती, असें या उल्लेखांवरून अनुमान होतें. सातवाहन कालांत मिठाचा मक्ता सरकारी (E. I : VIII : Nasik Inscriptions) होता. अन्नांना गोडी आणण्यासाठीं गुळाचा उपयोग (क्र. ५५४) होत असे. प्रहेणक, मिष्टान्न व लाडू हीं गोडीं पक्वान्नें उल्लेखिलेलीं आहेत; मात्र तीं सुसंपन्नांनाच उपलब्ध आहेत असें स्पष्ट दिसतें. क्र. ५५७ या गाथेंत चणे भाजण्याचा उल्लेख आहे. करञ्ज, तीळ व मोहरी हीं तैलबीजें; आम्र, जम्बु व बोर हीं वृक्षफळें आणि कांकडी (तउसी : क्र ५३४; वालुङ्कि: क्र. १०) व कोहळा (क्र. ७६२, ७९६) हीं वेलफळें यांचे उल्लेख आलेले आहेत. तसा स्पष्ट उल्लेख नसला तरी गाथाकालीन समाजांतले कांहीं वर्ग मांसाहारी होते हें निश्चित. क्र. ५९४, ६०१, ६१८ व ६२९ या गाथांत हरणांच्या शिकारींचे उल्लेख आलेले आहेत. ही शिकार केवळ खेळ म्हणून होत असलेली दिसत नाहीं. क्र. ६८० मध्यें खाटकाचा उल्लेख आहे. तो महिषांना हांकीत आहे. यावरून अनुमान

होतें कीं त्या काळांत या मांसालाही मागणी होती. वैदिक काळांतही हें मांस वापरींत (Economic Life & Progress in Ancient India : Bandopadhyaya : p. 197) होतें. क्र. ५८२ व ६३८ या गाथांत कोंबड्यांच्या आरवण्याचे उल्लेख आहेत. केवळ पहांटे जाग आणण्यासाठीं आरवण्याकरितां ते पाळलेले असतील असें संभवत नाहीं. क्र. ४१४ या गाथेंत **कमठ** (कांसव) व **पाठीण** (= पाढीण = मत्स्याविशेष) यांचे उल्लेख आहेत. या व्यतिरिक्त आणि येथें ही मत्स्याहाराची सूचना नाहीं हें विलक्षण वाटतें. कारण जेथें पाणी असेल तेथें मासे असतातच. उल्लेखां प्रमाणें अनुल्लेखावरून निष्कर्ष काढणें सहसा शक्य नसतें. तरी यावरून असें दिसतें कीं समुद्राच्या किंवा मोठ्या नद्यांच्या कांठीं राहणाऱ्या लोकांनीं गाथासप्तशतीच्या सांस्कृतिक योजनेंत विशेष भाग घेतला नसावा.

गाथासप्तशतींतील अन्नांच्या उल्लेखांवरून दिसतें कीं तत्कालीन लोकांचा आहार अगदीं साधा होता. हीं शब्दचित्रें ग्रामीण जीवनाचीं आहेत आणि आमचे खेडूत हे गरिबींत आयुष्य कंठणारे कष्टाळू शेतकरी आहेत. येथें तांदळाचे अनेक उल्लेख आलेले आहेत. मिष्टान्नांच्या तीन उल्लेखांपैकीं दोन मोदकांचे आहेत; मोदकाची पारी तांदळाची असते आणि सारण गूळखोबऱ्याचें किंवा खव्याचें असतें. यावरून हे लोक , तांदूळ निपजणाऱ्या भागाचे रहिवासी असावेत असें दिसतें. मत्स्याहाराचा व नारळाचा अनुल्लेख व लवणाची दुष्प्राप्यता यांवरून हे लोक समुद्रकांठचे नसावेत असें अनुमान होतें. गंगावतरणासारखीच गोदावरीची कथा पुराणांत आलेली आहे. उत्तर गंगेच्या अवतरणाचें श्रेय भगीरथाला, तसें दक्षिण गंगेच्या अवतरणाचें श्रेय गौतमाला. गौतमानें जलद पिकणाऱ्या साळीची लागवड करून या भागांतील रहिवाशांना दुष्काळांत वांचवलें अशी कथा आहे. या कथेवरून दिसतें कीं आर्य वसाहतकारांनीं या भागांत साळीची लागवड सुरू केलेली असावी. गाथांमध्यें गोपालांचे, गाईचे व दुधाचे अनेक उल्लेख आहेत; पण खिल्लारांची सूचना नाहीं. क्र ६३७ मधील घागरभर दूध देणाऱ्या गाईचा उल्लेख चमत्काराच्या सदरांत मोडावा असा मांडलेला आहे. यावरून दिसतें कीं तत्कालीन गाई मावळांतील हल्लींच्या गाईसारख्या अल्पदुधी असाव्यात. साधारणतः असें दिसतें कीं घरच्या बायकांनीं दुपारीं घिरीटावर भात भरडावें; सकाळीं किंवा सायंकाळीं उखळांत किंवा

जात्यावर तांदूळ कांडावे, कुटावे किंवा दळावे; भातभाकरींचें जेवण घरीं किंवा शेतावर, तुरीच्या आमटीबरोबर किंवा तिळाच्या तेलाबरोबर जेवावें. स्वतः गाय म्हेस बाळगावी तेव्हां दूध मिळावयाचें, स्वतः शिकार करावी तेव्हां मांस मिळावयाचें; अधूनमधून चण्याच्या फांक्या मारावयाच्या; फक्त श्रीमंतांनीं मिष्टान्नांचें सेवन करावयाचें, फक्त शहरच्या लोकांनीं स्वयंपाकांत मीठ व जेवणांत तूप वापरावयाचें, असा त्या वेळचा साधा आहार होता. यज्ञ किंवा राजकीय अगर सामाजिक उत्सव यांच्या निमित्तानें झडणाऱ्या मेजवान्यांचा येथें मागमूसही नाहीं. येथें वेदकालीन समृद्धि नाहीं, महाभारतकालीन विविधता नाहीं आणि या दोहोंचा कालीदासकालीन समन्वय नाहीं. जसा देश तसे तेथले रहिवासी, तसा तेथील लोकांचा आहार.

(२) मद्य व मद्यपान

चसअ=चषक : क. ९११;(**फलिह**=स्फटिक) ९२७; **जुण्णसुरा** : क. १९७; **पाणउडी**=पानकुटी क. २२७; **मइरा**=मदिरा : क. २७०, ५५०, ८६६, ९२७; **महुरस** = मधुरस : क. ९७८; **सरअ** = सरक : क. ५३४; **सीधु** : क. ५४४; **सुरा** : क. ९७, १९७, ७१०; क्रिया व मद्यपान : क. ९७, १९७, २७०, ५३४, ५४४, ५५०, ७१०, ८६६, ९११, ९२७, ९७८.

अमरकोशांत प्रचलित मद्यांच्या चोवीस संज्ञा दिलेल्या आहेत. प्रत्येक प्रांतिक भाषेंत आणखी अनेक संज्ञा आढळतात. या संख्याबाहुल्य वरूनव त्यांच्या प्राचीनत्वावरून सर जॉर्ज वॅट (Economic Dictionary; IV·4·258) यांनीं निष्कर्ष काढला आहे कीं मद्यनिर्मितीची कला भारतीयांना फार प्राचीन काळापासून अवगत होती आणि समाजाच्या सर्व वर्गांत मद्यपानाची प्रथा होती.

वेदकाळांत सोम व सुरा या मादक पेयांचा उपयोग करण्यांत येत असे. पैकीं सोमरस हा यज्ञप्रसंगीं ऋत्विजांकडून आवाहनपूर्वक सिद्ध व सेवन केला जात असे. सोमरस विक्रीसाठींहि तयार केला जात असे. सुरा धान्यांपासून (Cambridge History of India; I. p. 102), विशेषतः यव व तांदूळ यांपासून (Hymns from Atharva Veda : II. p. 192) तयार करण्यांत येई. सोम व सुरा यांचे निर्माते व विक्रेते

एकच असत, असा निष्कर्ष यजुर्वेदांतील सोमसुरा या जोड उल्लेखावरून (वेद-प्रकाश—श्री. पाठक, पृ. ३१५.) निघूं शकतो. सुरा हें पेय अशास्त्र व विशेष उत्तेजक असल्यामुळें किंवा व्यापारी सोमरसांत सुरेची भेसळ करीत असल्या-मुळें, त्यांना हीन लेखण्यांत येत असावें असें वाटतें. यज्ञप्रसंगीं ऋत्विजहि अशी भेसळ करीत असत. याविषयीं यजुर्वेदांतील उल्लेख पाहा : सुरे, मी तुला सोमरसाशीं युक्त करतों (१९. १.); सोमदेवा, सुरामिश्रित झाल्यानें तूं तीव्र होऊन मद उत्पन्न करीत आहेस (१९. ५.). सोम हें सुरांचें व सुरा हें मान-वांचें पेय; सोम हा पति व सुरा ही पत्नी, असा उल्लेख तैत्तिरीय ब्राह्मणांत (१. ३. २. २.) आढळतो. सुरा बलयुक्त आहे व सोम शांत आहे असें यजुर्वेदांत सांगितलें आहे (१९. ७.). सोमाचा उपयोग मुख्यत्वेंकरून यज्ञ-काळीं, निमंत्रित व वरिष्ठ समाजांत मित प्रमाणांत होत असावा आणि केवळ व्यसनासाठीं सुरेचा दुरुपयोग बहुजनसमाजाकडून केला जात असावा, म्हणू-नच ऋग्वेदांत सुरापानाचा निषेध करण्यांत आलेला आहे. पुढें आर्यांच्या वसाहतीचें क्षेत्र विस्तृत झालें, सोमवल्ली दुष्प्राप्य होऊं लागली आणि बदलत्या धार्मिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीमुळें आर्यांचें अनार्यांबरोबरचें संघटन वाढूं लागलें, तसतसें सुरापानाचें प्रमाण वाढूं लागलें. ऋग्वेदापेक्षां यजुर्वेदांत सुरापानाचे उल्लेख संख्येनें अधिक व आसक्तींत तीव्र असे आढळतात. पर-देशांतून जल व स्थल मार्गांनीं आक्रमक, व्यापारी व निर्वासित भारतांत येऊन स्थायिक होऊं लागल्यानंतर निरनिराळ्या देशांत प्रचलित असलेल्या, वेग-वेगळ्या पदार्थांपासून मद्यें तयार करण्याच्या पद्धती येथील रहिवाशांना अवगत झाल्या आणि अधिकाधिक कडक, रुचिर व सुगंधी मद्यें भारतांत तयार होऊं लागलीं. निःसारणाची (distillation) प्रक्रिया वाजसनेयी संहितेंत आढळते (Social and Religious Life in the Grihya Sutras : Apte : p. 118). भट्टी लावून निःसारणानें दारू काढण्याची सुरवात परशुरामकालीन हैहय क्षत्रियांच्या अमदानींत सुरू झाली, असा कांहींचा कयास (Origin and History of the Shaundi Caste, Saha, p 105) आहे. निःसारणप्रक्रियेमुळें मद्यनिर्माणपद्धतींत झालेल्या क्रान्तीचा सामाजिक व आर्थिक असा परिणाम झाला कीं सोम व सुरा यांचें निर्माते व विक्रेते यांचे विभक्ती-करण झालें. या विभक्तीकरणाचा पहिला उल्लेख याज्ञवल्क्यसंहितेंत (१ :

१६४-१; ३ : ३६, ४०) आढळतो. मद्यांची उत्तेजकता वाढविण्यासाठीं त्यांची मिश्रणें करण्याची पद्धत वेदकालापासून भारतीयांना माहीत आहे. सुरा तयार करणें व विकणें हा धंदा करणाऱ्या वैश्यांना शौण्डिक अशी संज्ञा होती. शुण्डा म्हणजे हत्तीची सोंड. निःसारण यंत्रांत तयार झालेलें मद्य त्याच्या सोंडेसारख्या तोंडांतून थेंबाथेंबानें गळतें. हलक्याभारी मद्यांची सांठवण व नेआण करण्यासाठीं प्राचीन काळीं कातडी पखाली व बुधले वापरीत असत. पखालीच्या सोंडेसारख्या मुखांतून मद्य सुरईसारख्या भाजनांत किंवा चषकांत ओतण्यांत येत असावें. यावरूनच शुण्डा, शुण्डापान व शौण्डिक हे शब्द प्रचारांत आलेले असणें संभवनीय आहे. कलालाला देण्यांत आलेली ध्वजवान् ही संज्ञा उत्तरकालीन असावी. दारूच्या दुकानदारानें आपल्या दुकानावर विशिष्ट ध्वज लावला पाहिजे, असा कायदा होता. ध्वज लावणें म्हणजे अपकीर्ति करून घेणें हा अर्थ या प्रथेवरून निघालेला असला पाहिजे. ध्वजावरील चिन्हांचा तपशील मला अद्याप उपलब्ध झालेला नाहीं; पण मनुस्मृतींतील एका उल्लेखावरून (९.३७) हीं चिन्हें सुराभाजनाचीं असावींत असें वाटतें. या ध्वजप्रथेवरून निष्कर्ष काढावासा वाटतो, कीं या काळांत मद्याची निर्मिति व विक्रय करण्याचा धंदा अगदीं कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तींच्या अथवा वर्गांच्या हातीं गेलेला असावा.

वेदकाळांतील लोक सुरापान करीत होते हें निश्चित. ऋग्वेदांत सुरापानाचे दुष्परिणाम सांगितलेले असून क्वचित् या व्यसनाचा निषेधहि केलेला आहे. या व्यसनाच्या व्याप्तीचा महाभारतांत मुबलक पुरावा आढळतो. श्री. चिंतामणराव वैद्य (श्रीमहाभारत-उपसंहार, पृ. ३७०-३७२) सांगतात : " भारतीय युद्धकाळीं भारतीय आर्य मद्य पिणें अशास्त्र मानीत नव्हते... इतकेंच नव्हे, तर मद्यपानाबद्दल ते पाश्चात्य आर्य—जर्मन लोकांप्रमाणेंच प्रसिद्ध होते. या कामांत यादव अग्रणी होते... बलराम अतिशय दारू पिणारा होता... श्रीकृष्ण सुद्धां मर्यादेनें मद्य पीत असे हें निर्विवाद आहे. " कथांच्या अनुरोधानें येणाऱ्या धार्मिक व नैतिक चर्चेत मात्र मद्यपानाचा निषेध केलेला आढळतो. हे भाग प्रक्षिप्त असावे असें अनेक संशोधकाचें मत आहे (Position of the Ruling Castes in Ancient India : Hopkins, p. 121.).

मद्यपानाचे बाबतींत पुरुषांइतक्याच स्त्रियाहि आसक्त होत्या. विवाहानंतर नववधूचें अंग भिजेल इतक्या सुरेचें तिच्यावर सिंचन करावें असा प्रघात,

गोभिलाच्या गृह्यसूत्रांत नमूद केलेला आहे. कुलीन स्त्रियांनीं मनमुराद मद्यपान केल्याचीं अनेक वर्णनें महाभारतांत आढळतात. स्त्री-पुरुषांच्या मद्यपानांत फरक एवढाच होता कीं चवीला गोड लागणारीं माध्वी, मधुमाधवी वगैरे मद्यें स्त्रियांना विशेष पसंत असत (म. भा: III. 278·40). ब्राह्मण आचार्यकन्या देवयानी व क्षत्रिय राजकन्या शर्मिष्ठा यांनीं वनभोजनाचे वेळीं मधुमाधवी मद्याचें सेवन केलेलें (म. भा : I. 81. 1) आहे. एकदां अर्जुन व कृष्ण संमिश्र परिवारासह वनभोजनास गेले. कृष्णानें अर्जुनाला विवाहानिमित्त भेट म्हणून दिलेल्या सहस्र तरुण सुंदरी या वेळीं त्यांच्याबरोबर होत्या; द्रौपदी व सुभद्रा या राजघराण्यांतील स्त्रियाहि वनभोजनाला हजर होत्या. या सर्व स्त्रियांनीं इतकें मद्यपान केलें कीं बेहोष होऊन त्या हालचाल करतांना अडखळूं लागल्या; कोणी खदखदां हंसूं लागल्या; गाऊं-नाचूं लागल्या; कोणी शेजाऱ्यांना मिठ्या मारूं लागल्या; कोणी भांडूं लागल्या; तर कोणी आपआपलीं रहस्यें प्रकट करूं लागल्या ! द्रौपदी व सुभद्रा यांनींहि मद्यपानाचा आनंद मनमुराद लुटला; त्या इतक्या खुषींत आल्या होत्या, कीं त्यांनीं आपआपल्या अंगावरील मौल्यवान् दागिने उतरून मेळ्यांतल्या स्त्रियांना ते देऊन टाकले (म. भा. I. 148. 5; 221. 14. 50; 222. 21; IV. 15. 7). रावणाच्या अंतःपुरांतील स्त्रिया मद्यासक्त होत्या, याचीं अनेक वर्णनें रामायणांत आढळतात; एवढेंच नव्हे, अशोकवनांत रामाची सीतेशीं भेट झाली तेव्हां त्यानें तिला स्वहस्तानें मादक मद्य पिण्यास दिलें. सुग्रीवानें वालीचा वध केल्यानंतर वालीची विधवा तारा विजयी सुग्रीवाकडे शृंगाराचा नवा आनंद अनुभवण्यासाठीं निघाली तेव्हां तिनें मस्त होण्याइतकें मद्य सेवन केलेलें होतें (रामा. IV. 33. 38). सोंवळ्या समजल्या जाणाऱ्या रामायणांतील हे उल्लेख आहेत हें विशेष मननीय आहे.

महाभारताचा काळ आणि कालिदासाचा काळ यांच्या दरम्यान गाथासप्तशतीचा काळ येतो. कालिदासाच्या काळांत वरिष्ठ व संपन्न वर्गांतच नव्हे, बहुजनसमाजांत आणि पुरुषांतच नव्हे, स्त्रियांतहि मद्यपानाचें व्यसन किंवा चाल सर्वत्र चालू असलेली दिसते; इतकेंच नव्हे, तर त्याच्या ग्रंथांत मद्यपानाचा औपचारिक रीत्याहि निषेध केलेला आढळत नाहीं. वरिष्ठ व संपन्न वर्गांतले लोक सुगंधित मद्यांचें सेवन करीत असत. मद्यें सुगंधित करण्यासाठीं सहकाराच्या मंजिऱ्या व आरक्त पाटल पुष्पें यांची योजना करण्यांत येत असे (रघु. १९.४६).

कधीं व्यसन म्हणून तर कधीं कामोत्तेजक किंवा सौंदर्यवर्धक म्हणून, कधीं शिष्टाचार म्हणून तर कधीं प्रियजनांच्या आग्रहामुळें स्त्रिया मद्यपान (रघु. ७. ११ ; ऋतु. ५. १०) करीत. अग्निमित्राची राणी ईरावती मद्यपानानें झिंगल्याचें वर्णन मालविकाग्निमित्रांत आहे. शिव स्वतः मद्य पितो आणि पार्वतीलाहि पाजतो (कुमार. ८. ७७.). अज तर इंदुमतीला स्वतःच्या मुखांतल्या मदिरेचा घोट पाजतो. सर्वसाधारण लोकांसाठीं असलेल्या रस्त्यालगतच्या गुत्त्यांचा (सोण्डिआपण) उल्लेख शाकुंतलांत (पञ्चमषष्ठांकमध्ये प्रवेशकः) आढळतो. वरिष्ठ वर्गांतील लोक मद्यपानासाठीं स्वतंत्र पानभूमि (रघु. ४. ४२) तयार करीत आणि उनाड स्त्रियांसह ते तेथें चैन करावयास जात (रघु. १९. ११).

वेदकाळांतील लोक सोम व सुरा या पेयांचा उत्तेजनासाठीं उपयोग करीत असत. अंगांत तरतरी व मद येण्यासाठीं, युद्धांत वीरश्री येण्यासाठीं, प्रतिभेच्या विकासासाठीं, वक्तृत्वाला भरती येण्यासाठीं सोमाचा उपयोग होतो असें ऋग्वेदांत सांगितलें आहे. अव्वल इंग्रजींतील सुधारक मद्यपानाचें समर्थन याच शब्दांत करीत असत. वैदिक वाङ्मयांत कोठेंहि सोमपानाचा निषेध केलेला नाहीं. कारण, मला वाटतें, सोम हें ब्राह्मणांचें पेय होतें आणि आचारांवर नियंत्रण घालण्याचा अधिकार ब्राह्मणांचे हातीं होता. ऐतरेय ब्राह्मणांत राम भार्गवेयाचा विश्वंतराशीं झालेला संवाद दिलेला (३५·२७) आहे. क्षत्रियांनीं सोमाबद्दल आसक्ति बाळगूं नये, असें प्रतिपादन करणारा राजा सांगतो : "सोमवल्ली फक्त ब्राह्मणांच्या उपयोगी आहे. क्षत्रियांनीं सोमवल्लीचा उपयोग केला तर त्यांची प्रजा ब्राह्मणांप्रमाणें दानप्रतिग्रह घेणारी, भटकणारी, दरिद्री व युद्धाला निरुपयोगी होईल." सोम हें पेय ब्राह्मणांचें, सोमवल्ली अगोदरच दुर्मिळ झालेली, अशा परिस्थितींत लढवय्या क्षत्रियांनीं सोमरसाचें जबरदस्तीनें हरण करूं नये किंवा वांटेकरी होऊं नये, म्हणूनच हे प्रचारात्मक उद्गार ब्राह्मणप्रेरित क्षत्रियामार्फत काढविलेले असावेत असें उघड दिसतें. सुरा हें पेय सोमाहून अधिक मादक. सुरापानामुळें मनुष्य उन्मत्त होऊन देवादिकांची निर्भत्सना करण्यास उद्युक्त होतो, सुरा व फांसे हे दुर्वासना उत्पन्न करतात. (ऋग्वेद. ७. ८६. ६) असें सांगून वैदिक ऋषींनीं सुरापानाचा निषेध केलेला आहे.

महाभारतांत शुक्राचार्यांची कथा आहे. सुरापानामुळें आचार्यांची प्रतिष्ठा

नष्ट झाली. त्यांची विद्या शत्रूंच्या आधीन झाली आणि त्यांच्या अनुयायांचा नाश झाला. म्हणून त्यांनी स्वतः सुरापान बंद केलें आणि ब्राह्मणांना मद्यपानाची मनाई केली. ब्राह्मणांतलें हें व्यसन शुक्राचार्यांनीं फार प्राचीन काळीं, म्हणजे महाभारताच्या काळापूर्वी बंद केलें असलें पाहिजे असें श्री. वैद्य यांचें म्हणणें आहे (उपसंहार : पृ. ३७१). पुराणांत कलियुगारंभाच्या धार्मिक, राजकीय व सामाजिक परिस्थितीचें वर्णन केलेलें आहे. ब्राह्मण व क्षत्रिय यांची स्पर्धा फार प्राचीन आहे. ब्राह्मणांची प्रतिष्ठा क्षत्रियांना सले आणि क्षत्रियांचें सामर्थ्य ब्राह्मणांना; आणि या उभय-तांची प्रतिष्ठा व सामर्थ्य हीं वैश्यशूद्रांना. बुद्ध आणि महावीर यांनीं अवैदिक धर्माची प्रस्थापना केली. त्यांनी व त्यांच्या अनुयायांनीं कधीं राजसत्तेचें पाठबळ मिळवून तर कधीं प्रचलित राजसत्ता उलथून पाडण्यासाठीं आक्रमकांना आणवून क्षत्रियांच्या सत्तांचा उच्छेद केला. वैश्यांनीं व शूद्रांनीं, आक्रमकांनीं व धूर्तांनीं या सोईस्कर धर्माचा स्वीकार केला. वैश्यांची संपत्ति व शूद्रांची संख्या, या सामर्थ्यांच्या जोरावर त्यांनीं ब्राह्मणांची प्रतिष्ठा नष्ट केली. स्वातंत्र्य ही राष्ट्राची प्रतिष्ठा. या काळांत माजलेल्या अंदाधुंदीमुळें भारताचें स्वातंत्र्य नष्ट होण्याचीं दुश्चिन्हें दिसूं लागलीं. म्हणून ख्रि. पू. दुसऱ्या शतकांत पतंजलींनें आणि नंतर स्मृतिकारांनीं राष्ट्राच्या व समाजाच्या सर्वांगीण पुनर्घटनेच्या योजना निश्चित केल्या. ब्राह्मण-क्षत्रियांना परकीय आक्रमकांचा उच्छेद अनेक वेळां करावा लागला. राजकीय स्थैर्य स्थापन झाल्यानंतर समाजधारणेच्या दृष्टीनें धर्मशास्त्रांत बीजरूपानें अस्तित्वांत असलेल्या निर्बंधांची व्याप्ति प्रसंगानुरोधें वाढविण्यांत आली आणि बदललेली परिस्थिति काबूंत आणण्यासाठीं वेळोंवेळीं नवे नवे निर्बंध निर्माण करण्यांत आले. मद्यपानबंदी हा या योजनांचा एक भाग होता. तत्कालीन परिस्थितीच्या अनुरोधानें ही बंदी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन द्विजवर्गांवरच लादण्यांत आली होती. कारण याच वर्गांना सामाजिक प्रतिष्ठेची मातबरी होती. स्मृतिकारांनीं निर्बंध निर्माण केले व कडक शासनें निश्चित केलीं; पण न्यायालयांमार्फत त्यांची अमलबजावणी होत असावी असें दिसत नाहीं. कारण हे निर्बंध अनिर्बंध होते, त्यांची निर्मिति व्यवहार्यतेच्या नव्हे, केवळ नीतितत्त्वांच्या अनुरोधानें करण्यांत आलेली होती. या अनधिकृत कायद्यांचा राजसत्तेनें कधींच पुरस्कार केला नाहीं आणि बहुसंख्य प्रजेची

मान्यता त्यांना कधींच मिळाली नाहीं. सातव्या शतकांत हिंदुस्थानांत प्रवास करणारा युआनच्वंग महाराष्ट्र-वर्णनांत सांगतो : " युद्धाला निघतांना सारे सैनिक मद्यपान करून धुंद होतात आणि मग एक भालाईत शत्रूच्या दहा हजार सैनिकांना भारी होतो. सम्राट् हर्षवर्धनहि ह्या शूरांचें राष्ट्र जिंकूं शकला नाहीं. " कायद्यांची प्रतिष्ठा सामान्यतः त्यांची अमलबजावणी करणाऱ्या सरकारच्या सामर्थ्यावर अवलंबून असते असें सकृद्दर्शनीं वाटतें. तत्त्वतः प्रजेची संमति व सहकार्य हेंच कायद्याचें अधिष्ठान. स्मृतिकारांच्या निर्बंधांना हें कधींच लाधलें नाहीं, म्हणून दुर्बलांच्या मनोरथांप्रमाणें त्यांच्या योजना कोलमडल्या. फक्त ब्राह्मणांनीं हीं नियंत्रणें बहुंशीं मानलीं; पण तीं त्यांनींच निर्माण केलेलीं, शिवाय तीं त्यांच्याच प्रतिष्ठेसाठीं निर्मिलेलीं आणि ते इतके अल्पसंख्य, कीं या प्रयोगाच्या यश-अपयशाच्या मूल्यमापनांत त्यांची मान्यता पासंगाचाहि फरक पाडूं शकत नाहीं. कौटिल्यानें अर्थशास्त्रांत नमूद केलेली नियंत्रणाची योजना अधिक यशस्वी झाली; त्याची योजना प्रातिनिधिक नव्हती, पण व्यवहार्य होती; आणि तिला राजसत्तेचें प्रामाण्य लाधलें होतें. एकीकडे प्राचीन व मध्ययुगीन, संस्कृत व प्राकृत ललित वाङ्मयांतील नायक व नायिका आणि सामान्य पात्रेंहि मद्यपानानें धुंद होत असलेलीं दिसतात; तर दुसरीकडे स्मृतिकार मद्यपानावर कडक निर्बंध घालीत बसलेले दिसतात. संस्कृत ललित वाङ्मय हेंहि पण्डितांनीं निर्माण केलेलें असल्यामुळें त्यांत जीवनाचे पडसाद किंवा प्रतिबिंब हीं उमटत नाहींत असा आक्षेप घेण्यांत येतो; प्रस्तुत विषयापुरता तरी हा अपवाद खरा नाहीं.

गाथासप्तशतींत स्पष्टपणें मद्यपानविषयक अकरा गाथा आहेत.

गाथासप्तशतींत मदिरा, मधुरस, सरक, सुरा व सीधु या मद्यांचा उल्लेख केलेला आहे. हीं सर्व मद्यें पूर्वीपासून ज्ञात असलेलीं अशींच आहेत. यांपैकी मदिरा, सरक व सीधु हीं इक्षुमद्यें होत असें टीकाकार सांगतात. सरक ही संज्ञा द्राक्षमद्याची ही द्योतक आहे. गाथासप्तशतीच्या काळांत ग्रीक व रोमन व्यापारी द्राक्षमद्य आणि अरबी व्यापारी खजुरीच्या मद्यांची जलमार्गानें पश्चिम किनाऱ्यावर आयात करीत (Commerce Between the Roman Empire & India : Warmingtion p. 265) असत. रिकामे रोमन मद्यकुंभ दक्षिण भारतांत व महाराष्ट्रांत जागोजाग उत्खननांत मिळालेले आहेत.

मधुरस ही मोहाची आणि सुरा ही तांदुळाची (अष्टांगहृदय : सूत्रस्थान :५:६७-६८). कदम्बांचीं व मधुकांचीं पुष्पें गोळा करण्यासाठीं जाणाऱ्या नायिकांचे उल्लेख गाथासप्तशतींत अनेक ठिकाणीं आलेले आहेत. कदंबाच्या फुलांपासून कादंबरी, वारूणी व हलिप्रिया हीं मद्यें तयार होतात. मोहाचीं फुलें जंगलांत मुबलक व त्यांचे मद्य लवकर तयार होतें व कडक असतें, म्हणून तें जंगली जमातींना विशेष आवडतें. मधुकाचीं फुलें गोळा करणाऱ्या गाथासप्तशतींतील नायिका या वनवासिनी नसून नागरिका आहेत ज्यांचीं फुलें त्या वेंचतात त्यांपैकीं बहुतेक सर्व मधूक वृक्ष नद्यांचे कांठाकांठावर आहेत; आणि फुलें गोळा करण्याच्या त्यांच्या क्रियेंत भुकेपेक्षां तहानच व्यक्त होत असल्याचा भास होतो. यावरून वाटतें कीं त्या हीं फुलें मद्याच्या निस्सारणाचे रसायन तयार करण्यासाठीं गोळा करीत असाव्यात. या सर्व उल्लेखांवरून दिसतें कीं जेथें तांदूळ व उंस पिकतात व मधूक फुलतात तेथें गाथासप्तशतीची रचना झालेली असावी.

क्रमांक ५३४ व ५४३ या गाथांमधील उल्लेख सुगंधित मद्यांचे असावेत. साधारणतः संपन्न लोकच सुगंधित मद्यांचा उपयोग करीत. कारण ताज्या मद्याचा उग्र दर्प नष्ट होण्यासाठीं तें बरींच वर्षेपर्यंत नीटपणें सांठवून ठेवावें लागतें आणि नंतर त्यावर सुगंधी द्रव्यांचीं बरींच पुटें चढवावीं लागतात. क्रमांक ५३४ या गाथेंतील मद्याला नीलोत्पलांचा सुगंध येत आहे.

क्रमांक १९७ या गाथेंत जुन्या (जीर्ण) सुरेचा उल्लेख आहे. जुन्या सुरेचा हा सर्वांत प्राचीन उल्लेख आहे. कालिदासानेंहि ' पुराणशीधु ' चा उल्लेख (रघु. १६. ५२; ऋतु. ४. ११) केलेला आहे. " गुरुत्रिदोष जननं नवं जीर्णमतोऽन्यथा। " — ' नवें मद्य जड असून दोषत्रयांचा प्रकोप करतें, जुनें त्याच्या विपरीत आहे,' असें वाग्भटानें अष्टांगहृदयांत (सूत्रस्थान–अध्याय ५. ६६) सांगितलें आहे. निघंटरत्नाकरांतील पुढील श्लोक (निघंटरत्नाकर : दातार, ताम्हणकर, महाबळ व पाटील : गुणदोष : पृ. ३१३) पहा : " जीर्णमद्यं भ्रामकं स्याद्दीपनं रुचिकृल्लघु ॥ सुगंधिवृष्यंहृद्यं च स्रोतसां च विशोधकं। लवणेनविना सर्व रसैर्युक्तं कफाहकं। वातं कृमीन् सर्वरोगान्नाशयेदिति कीर्तितम् ॥ " जुनें मद्य भ्रामक, दीपक, रुचिकर, लघु, सुगंधि, वृष्य, हृद्य, स्रोतोविषयक, लवण रसावाचून सर्व रसांनीं युक्त व कफ, वायु, कृमि आणि सर्व रोग यांचा नाश करितें. " सर्वच मद्यें मादक

असतात; पण मादकता या एकाच गुणावर मद्याचें मूल्य व दर्जा हीं अवलंबून नसतात. कोणाला इक्षुमद्य आवडेल तर कोणाला द्राक्षमद्य; कोणाला फक्त मोहाची दारू मिळूं शकेल, तर कोणाला वृक्षमद्य परवडेल. ज्याची त्याची रुचि भिन्न व प्रकृतिहि. सर्वसाधारणतः मद्य जेवढें ताजें तेवढें तें स्वस्त, मादक व जलाल; तेवढ्या तीव्रतेनें तें घसा भाजतें आणि तेवढ्या त्वरेनें तें मद चढवितें. मद्य जेवढें जुनें तेवढें तें महाग; तेवढी त्याच्या मादकतेची गति धिम्मी त्याची ऊब सुखकर आणि त्याचा स्पर्श परिपक्वतेमुळें मृदु. ताजें मद्य वातचक्रासारखें भिर-भिरतें; जमिनीवरील धूळ व कचरा वातचक्राबरोबर गिरक्या घेत आभाळांत उडतो, त्याचप्रमाणें ताज्या मद्यामुळें मनुष्यस्वभावांतील हीनवृत्ति उत्तेजित होतात. जुनें मद्य वाऱ्याच्या लहरींबरोबर डुलणाऱ्या पतंगासारखें आभाळांत चढतें! म्हणूनच मुरब्बी मद्यपी मुरलेली मदिरा पसंत करतात. जीं मद्यें ताजेपणीं विशेष कडक असतात तींच जुनीं झालीं म्हणजे लुसलुशीत होतात. जुनीं म्हणजे किती जुनीं? जाणते सांगतात, कीं निःसारणानें तयार केल्यापासून पन्नास वर्षांनीं ब्रँडीचे सर्व सद्गुण परिपक्व होतात आणि त्यानं-तर लवकरच तिचा आस्वाद घेतला नाहीं तर तीहि थकते, वृद्ध होते (Handbook of Wines : Todd. p. 93-4) आणि अपेक्षांचें समाधान करण्यास अक्षम होते!

गाथासप्तशतीच्या अधिकृत आवृत्तांत सातशें व संकलित आवृत्तींत सुमारें एक हजार गाथा आहेत. यांपैकीं फक्त अकरा गाथांमध्यें मद्यपानाचा उल्लेख आहे. यांपैकीं दहांमध्यें स्त्रियांच्या मद्यपानाचा उल्लेख आहे. उरलासुरला एक उल्लेख पानकुटीचा आहे. क्रमांक ९७, १९७, २७०, ५४४, ५५०, ७११ व ९२७ या गाथांच्या नायिका गृहिणी आहेत आणि क्रमांक ५३४ व ९७८ यांच्या नायिका स्वैरिणी आहेत. क्रमांक २२७ व ७१० यांच्या नायिका वेश्या अगर गणिका असणें संभवनीय आहे.

गाथासप्तशतींतील या नायिका मद्यपान करतात हें खरें; पण त्यांपैकीं एकीलाहि मद्यपानाचें व्यसन असावें असें दिसत नाहीं. प्रियकराच्या अनुरञ्जना-साठीं, मन्मथोन्माद यावा म्हणून किंवा प्रियकरानें आग्रह केला म्हणून त्या मद्यपान करतात. क्रमांक ९७ या गाथेची नायिका प्रियकराच्या स्वागतासाठीं

सज्ज होत आहे. मन्मथोन्माद यावा म्हणून ती कविसंकेतानुसार आम्राङ्कुरांचें दर्शन घेते, त्याचप्रमाणें सुरेचें सेवन करते. क्रमांक ५३४ या गाथेची नायिका सरक मद्याच्या सेवनानें इतकी उन्मत्त झालेली आहे कीं ती सर्वस्वीं विसदृश अशा नायकावर आसक्त झालेली आहे. क्रमांक ८६६ या गाथेची नायिका मद्यपानामुळें एवढी उन्मत्त झाली आहे कीं आपल्या तोंडाला मद्याचा वास येत आहे किंवा कसें याची शहानिशा करण्यासाठीं ती नवऱ्याच्या समक्ष दीराशीं लगट करीत आहे. क्रमांक ९७८ या गाथेची नायिका वृद्धा आहे. तिला मधुरसाच्या सेवनानें जणुं तारुण्याचा उन्माद आलेला आहे. क्रमांक २७० व ५५० या गाथांच्या नायिका मानिनी आहेत. त्यांचा रुसवा नष्ट व्हावा व त्या उपभोगाला अनुकूल व्हाव्यात म्हणून नायकांनीं त्यांना स्वतःच्या मुखांतल्या मदिरेचे घुटके पाजलेले आहेत. चिमणीच्या घोटानें मद्यपान करावयाचें किंवा करवावयाचें ही मद्यपानाची एकांतांतील शृङ्गारिक पद्धत. कुमारसंभवांत शंकरानें पार्वतीला याच पद्धतीनें व अनङ्गदीपनाच्या हेतूनें मद्य पाजलेलें आहे. "मान्यभक्तिरथवा सखीजनः सेव्यतामिदमनङ्गदीपकम्। इत्युदारमभिधाय शंकरस्तामपाययत पानमम्बिकाम्॥" ८·७७॥ आणि रघुवंशांत अजानें इंदुमतीला : "मदिराक्षि मदाननार्पितं मधु पीत्वारसवत्कथं नु मे। अनुपास्यसि बाष्पदूषितं परलोकपतनं जलाञ्जलिम्॥" ८·६८॥ क्रमांक ७१० व ९११ या गाथांतील नायकांनीं मानिनी नायिकांना मद्याचे चषक दिले आहेत; तेवढ्यानें त्यांचें समाधान होत आहे असें दिसत नाहीं. वर नमूद केलेलें अनुपान त्यांना हवें आहे कीं काय? क्रमांक ९२७ या गाथेंतील नायिकेच्या अधरांवर स्फटिकचषकाचा आरोप केलेला आहे. पूर्वी ते लालभडक होते, पण नायकानें त्यांतील रस शोषून घेतल्यामुळें ते पांढरे फटक पडले आहेत! मद्यपानामुळें स्त्रियांना धुंदी येते व त्यांचें मुख सुगंधित होतें आणि धुंद सौंदर्य विशेष आकर्षक व उत्तेजक असतें असें क्रमांक ५४४ या गाथेवरून दिसतें. पुष्पासवाच्या सेवनानें स्त्रियांची नजर चंचल होते व त्यांच्या सौंदर्याला अनुपमेय शोभा प्राप्त होते, असे उद्गार कालिदासानें कुमारसंभवांत (३·३८) काढले आहेत. जात्या कुरूप असलेल्या स्त्रियाहि मद्यपानामुळें सुस्वरूप दिसतात कीं काय? कीं अशा प्रसंगीं त्यांच्यावर सौंदर्याचा आरोप करणाराहि धुंदींत असावा लागतो?

सर्वसामान्य लोक चषकांतून मद्यपान करीत असत असें क्रमांक ७१०, ९११ व ९२७ या गाथांवरून दिसतें. ऋग्वेदकाळीं दारू पिण्यासाठीं कातड्याचें भांडें वापरीत; त्याचें नांव कारोत्तर (बुद्धपूर्वजग; पृ. ३५६). चषकाचा उल्लेख रघुवंशांतहि (७.४९) आढळतो. क्रमांक ९२७ या गाथेंतील चषक स्फटिकाचा आहे. अजंठ्याच्या लेण्यांत मद्यपानाचे प्रसंग चित्रित केलेले आहेत. कोणी एकएकटे मद्यपान करीत आहेत आणि कोणी जोडप्यानें. येथें मद्याचा कुंभ व चषक दोन्ही पहावयास मिळतात. उत्खननांतही त्यांचे नमुने उपलब्ध झालेले आहेत.

क्रमांक २२७ या गाथेंत पानकुटीचा उल्लेख आहे. पानकुटी म्हणजे गुत्ता. गाथेंतील संदर्भ निश्चितपणें गुत्त्याचा निर्देश करीत नसल्यामुळें वेगवेगळ्या टीकाकारांनीं निरनिराळे अर्थ दिलेले आहेत. गंगाधरानें 'चाण्डालकुटी', पण्डित मथुरानाथ शास्त्र्यांनीं 'मदिरापानकुटी', श्री. राजारामशास्त्री भागवतांनीं 'महाराचें घर किंवा पिठा' आणि वेबरनें 'पर्णकुटी' असे अर्थ दिलेले आहेत- गंगाधरनें चाण्डालकुटी व भागवतांनीं महाराचें घर असे अर्थ दिले; कारण पाणो या देशी शब्दाचा अर्थ नीच जातीचा पुरुष (देशीनाममाला : VI. 38) असा आहे. पाण म्हणजे पान, मद्यपान असें पण्डितजींनीं गृहीत धरलें आहे आणि वेबरनें पाण म्हणजे पर्ण हा अर्थ स्वीकारलेला आहे. अर्थशास्त्रांत कौटिल्यानें गुत्त्याला पानागार असें अभिधान (अधि. २, प्रक. ४२) दिलें आहे. पानागारांत स्वतंत्र खोल्या असाव्यात, त्यांत बैठकी व बिछाने, पुष्पपात्रें व पाण्याचे घडे असावेत अशी कौटिल्याची अनुज्ञा आहे. पानागाराच्या मालकाला त्यानें वणिक् म्हटलेलें आहे. गाथासप्तशतींतील पानकुटी ही अर्थशास्त्रांतील पानागाराहून खालच्या दर्जाची असावी असें उघड दिसतें. या पानकुटीचा रक्षक चाण्डाल असावा हें संभवनीय आहे. गाथासप्तशतींतील शब्दचित्रें ग्रामीण जीवनाचीं आहेत. आमच्या खेडेगांवांत पाटलाच्या घरींही तूप-मीठ मिळण्याची पंचाईत, मग तेथल्या गुत्त्यांत बैठकी व पुष्पपात्रें कोठून मिळणार ? गाथासप्तशतींत वर्णिले आहेत तसें झोंपडींतले गुत्ते डोंगराळ भागांतल्या खेड्यापाड्यांमध्यें अलीकडेपर्यंत दिसत असत. कौटिल्यानें वर्णिलेल्या पानागारांत शौकीन लोक आपल्या दासींना किंवा रखेल्यांना बरोबर घेऊन जात असत;

गाथासप्तशतींतील पानकुटी अगदीं हलक्या दर्जाची असल्यामुळें वेश्याहि तेथें जाण्यास धजत नसाव्यात.

समाजाला व्यसनांपासून परावृत्त करणारे सुसंस्कृत लोक नेहमींच अल्पसंख्य असतात. त्यांच्या चारित्र्यावर राष्ट्राची प्रतिष्ठा अवलंबून असते. मनुष्यमात्राची नैसर्गिक प्रवृत्ति सुखाकडे असते. निवृत्तीचा मार्ग दाखविणारे समाजाला नेहमींच अप्रिय वाटतात. व्यसनांच्या प्रादुर्भावामुळें जणुं हतप्रभ झालेला मनु (५·५६) सांगतो : न मांसभक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने। प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु महाफला ॥ प्रवृत्ति हा दोष नसेल, पण निवृत्ति हें महत्पुण्य आहे, हें खास.

(३) विहार :

मनुष्य कितीहि उद्योगी असला तरी त्याला दररोज थोडाबहुत फावला वेळ असतोच. मनुष्याला मनोरंजन व विश्रांति हीं आवश्यक असल्यामुळें त्यांसाठीं समाजनियंत्रकांनीं ज्या त्या विभागांतील नैसर्गिक परिस्थितीच्या अनुरोधानें व या ना त्या निमित्तानें कांहीं दिवस राखून ठेवलेले असतात. हा काल व्यतीत करण्याच्या साधनांवरून समाज स्थितीबद्दल अनुमानें काढतां येतात.

या विषयाचे स्थूलमानानें तीन विभाग पडतात : (१) कालहरण, (२) खेळ : जंगली, मैदानी व घरगुती आणि (३) उत्सव व सण. शिवाय मर्दानी व जनानी असेही आणखी विभाग पडतात. यांपैकीं कांहीं अन्य विषयांशीं संबद्ध असतात. म्हणून या विभागांत समाविष्ट होण्याजोग्या कांहीं विषयांची चर्चा त्यांच्या अंतर्यामाच्या अनुरोधानें अन्यत्र केली आहे. उदाहरणार्थ : आख्यान–कथन व श्रवण, हा उपाय सामान्यतः कालहरणासाठीं योजण्यांत येत असला तरी त्याचा समावेश सांस्कृतिक प्रकरणांत केलेला आहे; लताप्रहार ही क्रीडा असली तरी तिचा समावेश लैंगिक प्रकरणांत केलेला आहे; शिकार हा उत्तरकालीन नागरिकांचा जंगली खेळ आहे, पण गाथासप्तशतींत हा वन्य जमातींच्या चरितार्थाचा व्यवसाय आहे. सबब हा विषय आर्थिक प्रकरणांत दिला आहे. उत्सव व सण यांचे अंतर्याम धार्मिक किंवा

सांस्कृतिक असलें तरी त्यांचें लौकिक स्वरूप व उद्दिष्ट मनोरंजन हेंच असल्या-मुळें त्यांची चर्चा याच प्रकरणांत केलेली आहे.

कालहरण :

उत्सव व क्रीडा वगळल्या तर तत्कालीनांना कालहरणाचीं फारच थोडीं साधनें उपलब्ध असल्याचें दिसून येतें. आधुनिक ग्रामीण जीवनाची सामान्यतः अशीच अवस्था आहे. त्यांतल्या त्यांत सुसंस्कृत अशीं जोडपीं, मग तीं पति–पत्नी असोत किंवा प्रियकर–प्रेयसी, परस्परांचे सान्निध्यांत असतांना काल-हरण कसें करीत? तीं एकमेकांचा अनुनय करीत; प्रथम प्रेमकलह, नंतर प्रेमलीला. अकारण किंवा सकारण, एकानें रुसावयाचें व दुसऱ्यानें मनधरणी करावयाची किंवा सखीनें मध्यस्थी करावयाची आणि अखेरीस चाटुवचनांनीं त्यांचा समेट व्हावयाचा; सकारणांपैकीं अनेक प्रेमकलह गोत्रस्खलनामुळें किंवा प्रियकराचा प्रेमापराध प्रेयसीच्या प्रत्ययास आल्यामुळें झालेले आहेत. कोणी परस्परांना गद्य आख्यानें सांगतात, कोणी काव्यपठन करतात आणि कोणी व्यंग्य अथवा ग्राम्य गाथा ऐकवितात; कोणी कामकथांचें श्रवण करीत व कोणी कामशास्त्राची चर्चा करीत. कधीं गायन, वादन व नर्तन यांत कालक्रमणा करीत; केव्हां पति वाद्य वाजवी व प्रेयसी नृत्य (क्र. ३०४) करी. नवविवाहित दांपत्यें खासगी उद्यानांत दोहद–क्रीडा करीत, प्रोत्साहन प्रियकराचें व प्रत्यक्ष क्रिया प्रेयसीची; अशीं व सामान्य जोडपीं उघाडीच्या दिवसांत कुंजविहार, उन्हाळ्यांत जलक्रीडा व चांदण्यांत जोत्स्नाकेली; रात्रींच्या पहिल्या प्रहरीं मद्यपान, नंतर कामक्रीडा व अखेर एकशय्येव निद्रा. पति बाहेर गेला असेल तर तो परत येण्याच्या सुमारास पत्नी दरवाजांत त्याची वाट पहात (क्र. १४०, २५६, ३२२) उभी राहते. तो प्रवासाला गेलेला असेल तर त्याच्या आगमनाचे दिवस पुनः पुनः मोजण्यांत ती कालक्षेप करते. प्रोषितभर्तृका विरहाच्या काळांत पूर्वीच्या प्रेम-प्रसंगांच्या आठवणी (क्र. २९, ४४, ७१७) आळवतात, मनोरथ (क्र. १७, १३३) उडवितात किंवा आळसांत काळ (क्र. ६५, ६६, ३५२, ७९४) काढतात. साक्षर असतात त्या पतीशीं पत्रव्यवहार करतात. त्यांच्या मैत्रिणी त्यांना प्रवासी प्रियकरांच्या कल्पित कथा (क्र. ८३४) सांगतात. ज्या प्रोषित-

धुतिका ज्या प्रोषितपतिका उनाड असतील त्या अभिसरण करतात, संकेतस्थानें पडतात व रात्रीं धिंगाणा (क्र. ५८) घालतात. नव्या नवरीच्या नादीं लागलेला व्याध आसक्तीमुळें दुबळा होतो व त्याचें पूर्वींचें धनुष्य त्याला पेलावें म्हणून ती तें छिलून हलक (क्र. ११९, १२०) करते.

गाथासप्तशतीच्या नायिकांना नटून थटून गांवभर मिरवण्याची मोठी हौस. सौंदर्य-प्रसाधनें व वस्त्रालंकार यांनीं विभूषित होऊन आजूबाजूनें वावरणाऱ्या प्रेक्षकांना घायाळ करीत (क्र. २९, ३०) या ना त्या निमित्तानें त्या रस्त्यावरून भटकत (क्र. २०, ४७,५७, ४१५, ४१६) आहेत अगर मिरवत (क्र. ३८, १७३, २४१, ३२८, ४५७) आहेत; कधीं वायनें वांटण्याच्या (क्र. ३२८) सबबीवर, तर कधीं बाजारहाट (क्र. ५८८, ७८८, ८८३) करण्यासाठीं. या बाबतींत त्या आधुनिक नगरी स्त्रियांना हार जाणार नाहींत. कुलस्त्रिया घरांतल्या घरांत डोहाळे, गोत्रग्रहण इत्यादि क्रीडा करून कालहरण करतात. नववधू प्रियकराच्या सान्निध्यांत दोहद क्रीडा करतात. अशोक दोहदाला (क्र. ५५१) सरस्वतीकण्ठाभरणांत अशोकोत्तंसिका क्रीडा (पूर्वोक्त : पृ. ६६६) असें शीर्षक दिलें आहे आणि वात्स्यायनानें या क्रीडेसाठीं चैत्र शुद्ध अष्टमी नेमस्त केलेली आहे. वर उल्लेखिलेल्यांपैकीं कांहीं क्रीडा नायिकांनीं नायकांच्या साहचर्यांत केलेल्या आहेत आणि कांहीं नायक व नायिकांनीं स्वतंत्रपणें केलेल्या आहेत. नायिका कालहरणार्थ किंवा कांहीं हेतूनें कुडाच्या भिंतीवर चित्रें (क्र. ३५) किंवा आकृति काढतात. त्याचप्रमाणें नायक प्रेयसीच्या शरीरावर चित्रें (क्र. ८२४) रंगवतो. स्त्रियांप्रमाणें पुरुषही बाजारहाट करतात. पण हें केवळ माळणीच्या सौंदर्याच्या (क्र. ५९८) निरीक्षणासाठीं ! मुलांची अशी एकच क्रीडा उल्लेखिलेली आहे : पित्याच्या पाठीवर आरोहण करून ' घोडा-घोडा ' खेळण्याची; आणि हा उल्लेखही वात्सल्यानें प्रेरित झालेला नसून बन्धविशेष ध्वनित करण्यासाठीं झालेला आहे ! हिंवाळयांत थंडीनें कुडकुडणारीं मुलें शेकोटीभोंवतीं (क्र. ७६४) बसून कालहरण करतात असाही उल्लेख आढळतो. आईच्या गालाला चावणें किंवा आईबापांच्या मध्यें झोपणें या अजाण बालकांच्या लीला आहेत; त्यांना क्रीडा म्हणतां येणार नाहीं.

गोत्रग्रहण व गोत्रस्खलन यांना क्रीडा म्हटलेलें असलें तरी वस्तुतः हा एक कालहरणोपाय आहे. सबब त्याची चर्चा येथेंच केली पाहिजे.

गोत्रग्रहण : क्र. १२३, ३४३, ४४०, ८२७; **गोत्रस्खलन** : क्र. ३२, १३१; ४५२, ४९६, ८९९, ९०१, ९०२, ९०३, ९३८, ९६१.

गाथासप्तशतींत गोत्रहरण व गोत्रस्खलन यांचा उल्लेख क्रीडा किंवा अपराध म्हणून आलेला आहे. येथें गोत्र ही संज्ञा प्रचलित अर्थानें वापरलेली नाहीं. कुल किंवा कुलनाम या अर्थानें हा शब्द फक्त एकदां, क्र. ४१७ या गाथेंत योजलेला आहे; अन्यत्र त्याचा अर्थ व्यक्तिनाम असा आहे. गोत्रग्रहण म्हणजे नांव घेणें आणि गोत्रस्खलन म्हणजे नांव चुकणें. गोत्रग्रहणांतलें नांव पतीचें वा पत्नीचें किंवा प्रियकराचें वा प्रेयसीचें असतें; बोललेलें किंवा लिहिलेलें; आणि सामान्यतः गोत्रस्खलनांतलें नांव पुरुषानें उच्चारलेलें असतें व तें प्रेयसीचें असतें; तें अनवधानानें घेतलें जातें; क्वचित् मुद्दाम, क्रीडा म्हणून; किंवा चुकून, अन्यत्र चित्त गुंतल्यामुळें किंवा धुंदींत.

वात्स्यायनानें कामसूत्रांत (२-१०. ४०-४५ : प्रणयकलह प्रकरण) गोत्र-स्खलनाचा उल्लेख केलेला आहे : " वर्धमानप्रणया तु नायिका सपत्नीनामग्रहणं तदाश्रयमालापं वा गोत्रस्खलितं वा न मर्षयेद् नायक व्यलीकं च ॥ " नायकानें सवतीचें नांव घेतलें किंवा तिच्या नांवानें आपणांस हांक मारली अगर तिच्या गुणांचें वर्णन केलें तर नायिका त्याची क्षमा करीत नाहीं, कलह करते, कॆस विस्कटून टाकते, रडते व स्वतःला मारून घेते किंवा प्रसंगविशेषीं नायकाचेहि कॆस उपटते व त्याला ताडन करते. वात्स्यायन सांगतो, अशा प्रसंगीं नायकानें प्रियभाषणें करून किंवा जरूर तर पायां पडूनहि नायिकेचें आर्जव करावेत आणि क्रुद्ध नायिकेनें नायकाच्या मस्तकावर पादप्रहारही करावा. पण दाराबाहेर मात्र जाऊं नये. कारण त्यामुळें बेअब्रू होते.

सामान्यतः गोत्रग्रहण म्हणजे पत्नीनें पतीचें नांव घेणें. नववधूला समवयस्क मैत्रिणींनीं पतीचें नांव घेण्याविषयीं आग्रह करणें, तिनें लाजून आढेवेढे घेणें, ही मुग्धा नायिकांची लाडिक लीला किती प्राचीन आहे हें या उल्लेखांवरून दिसून येतें. विशिष्ट प्रसंगाच्या अनुरोधानें पति हा आपला वल्लभ नसून वैरी आहे असें क्र. १२३ च्या मुग्धा नायिकेनें कळवळून पण गालांतल्या गालांत

हंसून म्हटलेलें आहे. क्र. ८२७ मधील कल्पना रम्य आहे; प्रवासी पतीनें पत्नीला खुशालीचें पत्र लिहिलें, पण त्यांत मजकूर असा कांहींच नाहीं; तिचें नांव पुनः पुनः लिहून त्यानें पत्र भरून काढलें आहे. पतीच्या प्रीतीचा प्रत्यय आल्यामुळें बिचाऱ्या प्रोषितपतिकेला किती धन्यता वाटली असेल!

गाथासप्तशतींत बहुवल्लभनायक (क्र. ७२, १४७) आणि नायिकेच्या सवती यांचे अनेक उल्लेख आलेले आहेत; त्यांवरून सिद्ध होतें कीं त्या काळांत बहुपत्नीकत्वाची प्रथा रूढ होती. यांत गुप्त असें कांहींच नव्हतें. यामुळें सवतींना एकीमेकींचीं नांवें माहीत असत. आणि अन्येच्या नामोच्चारामुळें त्यांचा मत्सर जागृत होत असे. हल्लींप्रमाणेंच तेव्हांही कोठें कोठें व्यभिचार चालत होता. त्याचा बभ्रा होऊन आपली गणना स्वैरिणींत होऊं नये म्हणून विवाहित स्त्रिया घेतात तेवढी खबरदारी पुरुष घेत नाहींत व आपल्या विवाहबाह्य संबंधांच्या वाच्यतेची पुरुषांना तेवढी खंतही वाटत नाहीं. पण याचा तपशील अंतःपुरांत कर्णोपकर्णी दाखल होतो आणि पतीला याचें प्रत्यंतर पत्नीच्या अश्रूंच्या किंवा उपालम्भांच्या द्वारें येतें. या परिस्थितींतून व वृत्तींतून गोत्रस्खलनाचा संभव होतो.

स्पष्टपणें क्रीडा म्हणून गोत्रस्खलनाचा उल्लेख क्र. ९६१ या गाथेंत आलेला आहे. नायिकेला चिडविण्यासाठीं नायकानें अन्य स्त्रीच्या नांवानें तिला संबोधिलेलें आहे. क्र. ९०१, ९०२ व ९०३ या गाथांतील उल्लेख असेच आहेत. त्यांचे नायक निरपराध आहेत. क्र. ३२, १३१, ४५२ ४९६, ८९९ व ९३८ मधील गोत्रस्खलन क्रीडेसाठीं झालेलें नाहीं. या गाथांचे नायक अपराधी आहेत व गोत्रस्खलनामुळें त्यांचा अपराध व प्रेमस्थान हीं प्रकट झालीं आहेत. गोत्रस्खलनाची प्रतिक्रिया ही पाहण्यासारखी आहे. कोणी अश्रू (क्र. ९३८) ढाळतात; कोणी अगतिकपणें सहनशीलता व्यक्त (क्र. १३१) करतात; कोणी दटावून उपालम्भोद्गार (क्र. ३२, ४५२) काढतात आणि कोणी यांतही आनंद मानण्याइतक्या (क्र. ४५२) निढावतात. क्र. ४९६ मधील गोत्रस्खलनाचा प्रकार विशेष हृदयद्रावक आहे. हा प्रकार सणाचे दिवशीं किंवा नायिकेच्या वाढदिवशीं झालेला आहे. नायिकेनें अलंकार धारण केले होते. तिला अपेक्षा होती कौतुकाची, पण हें तिच्या नशीबीं आलें! तिला वाटलें

बळी देण्यासाठीं रेडा सजवतात, तशीच आपली अवस्था आहे. क्र. ८९९ व ९०१ ह्या गाथांच्या नायिका थोड्याबहुत तडफदार आहेत. पतीबरोबर हीच क्रीडा करून उट्टें फेडण्याची त्यांची तयारी आहे, पण तसें झालेलें मात्र नाहीं. क्र. ९०१ या गाथेंतील नायकाची आई मुलाला सांगते कीं तुझी तशीच चेष्टा करण्याइतकी बुद्धि तुझ्या दुखावलेल्या बायकोलाही आहे. अक्कल सर्वांना असते, हिंमत मात्र फार थोड्यांना. हिंदुस्थानांतील पुरुषांनाही स्वतःच्या स्वत्वावर किंवा हक्कांवर झालेल्या आक्रमणाची चीडसुद्धां येत नाहीं, मग प्रतिकाराची गोष्टच कशाला? आणि आपल्या स्त्रिया? त्या तर पुरुषांहून अगतिक.

गोत्रस्खलनाच्या पुनःपुनरुच्चारामुळें या प्रकाराला संकेताचें (motif) स्वरुप आलेलें आहे. मी या संकेताला "विरचिता-संकेत" असें अभिधान दिलें आहे. विरचिता हीं वत्सराज उदयनाच्या अंतःपुरांतील दासी. राजवाड्यांतल्या दासी अंगानें सुबक व पिंडानें उफाड्याच्या असावयाच्याच. उन्मादाच्या क्षणीं किंवा अनुकूल संधि मिळतांच अंतःपुरांतही थोडीबहुत गडबड चालायचीच. उदयनाचा विरचितेशीं संबंध होता. एकदां महाराज 'तयार' होऊन अंतःपुरांत आले व महाराज्ञी वासवदत्तेच्या महालांत घुसले. मद्याच्या धुंदींत उदयन वासवदत्तेला विरचितेच्या नांवानें संबोधून कुरवाळूं लागला! मानी राणीच्या कानउघाडणीमुळें महाराज शुद्धीवर आले. त्यानें राणीचे पाय धरले व तिला प्रसन्न केलें. हा प्रसंग कथासरित्सागरांत (कथामुख लम्बक : तरंग सहावा) वर्णिलेला आहे. पुरुषांचें चांचल्य व स्त्रियांची सहिष्णुता हीं अमर्याद व दिक्कालातीत आहेत, हाच या संकेताचा निष्कर्ष. प्रतिकार काय करणार आणि करून तरी काय होणार?

(२) खेळ :

खेळांचे जंगली, मैदानी व घरगुती आणि जनानी व मर्दानी असे पोटभाग पडतात असें वर सांगितलें. मैदानी खेळांपैकीं मल्लयुद्ध हा मुख्य आणि घरगुती खेळांमध्यें फुगडी व सोंगट्या. केवळ क्रीडा म्हणून खेळल्या जाणाऱ्या विहार-प्रकारांची चर्चा येथें केलेली आहे; लैङ्गिक आशय असणाऱ्या क्रीडांचा विचार त्या प्रकरणांत केलेला आहे.

उत्कुल्लिका : उप्पुल्लिआ, उकुल्लिआ, पप्फुल्लिआइ : क्र. १९६ : फुगडी हा

बालिकांचा खेळ भारतांतील सर्व प्रदेशांत प्राचीन काळापासून प्रचलित आहे. गाण्यांच्या साथींत चालणाऱ्या या खेळांत करमणुकीबरोबर सर्व स्नायूंना पुरेसा व्यायाम होतो आणि शरीराला व गतीला ढब येते; शिवाय आपल्या अन्य खेळांप्रमाणें यालाही उपकरणें लागत नाहींत. उत्फुल्लिका हा बालिकांच्या फुगडीचा एक प्रकार आहे. उत्फुल्ल, प्रफुल्ल वगैरे शब्द विकसित पुष्पांचें अगर अशीं फुलें ज्यांवर डंवरली आहेत अशा वृक्षलतांचे द्योतक आहेत. कामशास्त्रांत उत्फुल्लक ही संज्ञा विशिष्ट संभोगासन या अर्थानें वापरण्यांत येते. वात्स्यायन (२·६·८) सांगतो : शिरो विनिपात्योर्ध्वं जघनमुत्फुल्लकम्। जयमङ्गलेंत यशोधर सांगतो : शिरोभागमधस्ताच्छय्यायां विनिपात्योत्तानमूर्ध्वं जघनं कुर्यादितिभेदमेवंरूपं पश्चाद्भागेनेत्यर्थः। पाइअसद्दमहण्णवांत उप्फुल्लिआचा अर्थ दिला आहे तो असा : पाँव पर बैठकर बारंबार ऊँचा नीचा होना. उत्फुल्लिका या बालिका क्रीडेबद्दल गंगाधर सांगतो : पादोपविष्टानां मुहुरुत्पतनोत्पतनरूपा क्रीडा उत्फुल्लिकेत्युच्यते। आणि पण्डित मथुरानाथशास्त्री सांगतात : उत्तानं शयानस्य पादयोरुपविष्टानां बालानां मुहुः पतनोत्पतनरूपा क्रीडा उत्फुल्लिकेत्याख्यायते। ह्या क्रीडेनें बालिका कृशमध्या व जितश्वासा होते, ती तशी व्हावी व पुरुषायिताचे प्रसंगीं तिला धाप लागूं नये अशी या गाथेची अपेक्षा आहे. वेबरनें 'फूडाफूडिक' असा एका टीकेंतील या क्रीडेचा अर्थ दिलेला आहे : फुड : फुट्ट : विकसित; फुडिअ = विकसित, विदारित. अर्थ एकच.

उत्फुल्लिका म्हणजे बस फुगडी.

"मुली व स्त्रियांसाठीं सचित्र : मनोरंजक गाणीं व खेळ" या चोपड्यांत श्री. दामोदर विनायक वागळे (आर्यसदन छापखाना) यांनीं बसफुगडीचें गाणें दिलें आहे :

एक भुई सारवूं सारवूं। पांच खडे मांडूं मांडूं ॥
एक खडा मोठा मोठा। सई आली पोटा पोटा ॥
सईच्या कानीं बुगड्या बुगड्या। आम्ही खेळूं फुगड्या फुगड्या ॥

(पक्का घालून)

बसफुगडी बसूंगा बसूंगा। पांच खडे मांडूंगा मांडूंगा ॥
एक खडा मोठा मोठा। सई आली पोटा पोटा ॥

सईच्या कानी बुगड्या बुगड्या । आम्ही खेळूं फुगड्या फुगड्या ॥
असें चीट चांगलें चांगलें । वडाला नेऊन टांगलें टांगलें ॥
॥ फुई, फुई, फुई ॥

कोण गांव नगरी
भोवताल्या तगरी
कांटयांचीं कुलपें
मोत्यांची झुलपें

आम्ही लेंकी थोरांच्या । कानीं बुगड्या मोरांच्या ॥
एक भुई सारवूं सारवूं । पांच खडे मांडूं मांडूं ॥
एक खडा उडाला उडाला । खिडकींत जाऊन बुडाला बुडाला ॥
खिडकी माझी मायग मायगं । लाथा बुक्या खायग खायग ॥
लाथा बुक्या सोसेना सोसेना ।
जीव कसा जातो जातो । डोळे वासून पाहतो पाहतो ॥
डोळ्यांत होता बाऊ बाऊ । बडील माझी जाऊ जाऊ ॥
वड्या कशा कापिती कापिती । गोफण कशी मारिती मारिती ॥
भाऊजींनीं देखिली देखिली । खुंट्याखालीं ठोकिली ठोकिली ॥
असा खुंटा द्वाड ग द्वाड ग । हाताला आला फोड ग फोड ग ॥
हाताचा फोड फुटेना फुटेना । दारचा पाहुणा उठेना उठेना ॥
त्यांनीं घेतली म्हैस ग म्हैस ग । माझी मामी खईस ग खईस ग ॥

व्यायामकोशांतील 'मुलींचे खेळ' या भागांत (पृ. ३७६) सौ. लक्ष्मीबाई मुजुमदार यांनीं बसफुगडीचा तपशील दिला आहे: "ही फुगडी दोन मुलींनीं खेळावयाची असते. यांत एका मुलीनें खालीं वांकून व अर्धवट बसल्यासारखें राहून (व समोरच्या मुलीचे हात घट्ट धरून गोल फिरावयाचें अशी) फुगडी खेळावयाची असते. या प्रकारांत अर्धवट बसणाऱ्या मुलीच्या पायांवर जास्त जोर येतो व समोरच्या मुलीच्या हातास जास्त मेहनत पडते. या वेळीं मुली खालील गाणें म्हणतातः बसफुगडी बसूं गा। चतुर शिंगी लालुं गा ॥ एक पाय खोलीचा । सीताराम डोलीचा ॥ "

बसफुगडी वेगळ्या प्रकारानें खेळलेली मीं पहिली आहे. मुलीनें कमरेव

हात ठेवून चवड्यावर बसावयाचें, एकेका झटक्यासरशीं एकदां उजवा व एकदां डावा पाय तिरपा ताणावयाचा आणि थोडें थोडें पुढें सरकावयाचें, त्या बरोबर ऊर्ध्वांग आजूबाजूला व मागेंपुढें डोलवून एकदां या व एकदां त्या हाताच्या मुठींत फू, फू करावयाचें, अशी ही फुगडी आहे. एकीनें खेळावी किंवा अनेकींनीं, ओळीनें किंवा वर्तुळांत. हीच फुगडी या गाथेला अभिप्रेत असावी असें तिच्यांतील सूचनेवरून व खेळाच्या संभाव्य प्रतिक्रिये-वरून वाटतें.

पुरुषाचा कटिपश्चात्प्रदेश सिंहासारखा संकुचित असावा. व मांड्या पिळदार आणि प्रौढेचें नितंब पृथुल व जघन मांसल असावेत असें आपलें प्राचीन व मध्ययुगीन सौंदर्यतज्ञ सांगत आले आहेत. उपभोग्य सौंदर्याच्याच नव्हे, संसा-राच्या प्रधान उद्दिष्टाच्या दृष्टीनेंही त्यांनीं हीं वैशिष्ट्यें आदर्श मानलीं होतीं. जघन व नितंब हे मांसल व पृथुल, त्याचप्रमाणें चपल व श्रमक्षमही असले पाहिजेत. यासाठीं देशोदेशीं बालिकांकडून विशिष्ट पद्धतीचे व्यायाम करवून घेण्यांत येत असत. नितंब-भ्रमण या व्यायामाला अरब लोक ' घुंग ' म्हणतात आणि अबीसीनीयन लोक डक–डक म्हणतात. स्वाहिली स्त्रियांना हें नृत्य विशेष कसोशीनें शिकविण्यांत येतें. नितंब–भ्रमण–नृत्यांत प्रवीण झाल्यावांचून त्यांना बिबीचा दर्जा प्राप्त होत नाहीं (Chandra Chakraberty; Sexology of the Hindus : p. 8.). उत्फुल्लिका ही याच धर्तीची क्रीडा आहे; मग तिला क्रीडा म्हणा किंवा नृत्य. श्री. हॅव्हेलॉक एलिस सांगतात. (Psychology of Sex : Sex in Relation to Society : Vol II: Part III : pp. 515-7.) कीं रति ही एक कला असून विवाहेच्छु व्यक्ति-मात्रानें ती संपादन केली पाहिजे. हा सिद्धान्त ख्रिश्चन धर्माला अमान्य अस-ल्यामुळें ग्रीक व रोमन काळांत प्रचलित असलेल्या अशा नृत्यांचा व व्यायामांचा युरोपांत लोप झाला. आपल्याकडेही अशा क्रीडा लुप्त झालेल्या असून त्यांचें पुनरुज्जीवन अशक्य झालेलें आहे.

जलक्रीडा : क्र. ५८, १८९, २३१, २४६, २७३, ५५८, ५९९, ९४९

गाथासप्तशतीच्या नायिकांना न्हाण्याची व स्नानाची, नदींत डुंबण्याची व पोहण्याची मोठी हौस; मग तें न्हाणें सणासुदीचें अभ्यंगस्नान (क्र. ७९)

असो किंवा परसांतलें उघड्यावरलें दैनिक स्नान (क. ६८३) असो; प्रियकराच्या प्रलोभनार्थ अंगाला उटणें लावून दिवसा धीमेपणें गोदावरीच्या घाटावरलें स्नान (क. १८९) असो किंवा अपरात्रीं पूर आलेल्या गोदावरीचा प्रचण्ड प्रवाह पोहून ओलांडतांना अनिच्छेनें घडणारें साहसी स्नान (क. २३१) असो. नर्मदेंत (क. ५४८, ५७८, ५९९) आणि विशेषतः गोदावरींत (क. ५८, १०३, १०७, १७५, १८९, २३१, ३५५, ९४९) न्हाणाऱ्या व कांठावरील कुञ्जांत घुमणाऱ्या आणि जलाशयांत (क. १८६, ४७३, ५५८) डुंबणाऱ्या व डुबी घेणाऱ्या प्रियकराशीं गुप्त कामक्रीडा करणाऱ्या नायिकांचें उल्लेख पाहिले म्हणजे वरील विधान प्रत्ययास येतें.

जलक्रीडेची चर्चा वात्स्यायनानें कामसूत्रांत (१·४·४१; २·६·३२) केलेली आहे. या क्रीडेचा अंतर्भाव त्यानें उद्यानगमनांत केलेला आहे आणि ती ग्रीष्मऋतूंत करावी अशी शिफारस केलेली आहे. शिष्ट लोकांच्या व प्राचीन स्मृतिकारांच्या अनुरोधानें त्यानें जलांतील सुरतक्रीडेचा निषेध केलेला आहे.

पाशक-शारि : (क. १३८) : पासअ म्हणजे फांसे आणि सारि = शारि म्हणजे सोंगट्या. या शब्दांचा अर्थ फांस व मैना असाही होतो. पण तो येथें अभिप्रेत नाहीं असें संदर्भावरून दिसतें; उलट क. २०५ या गाथेला फांसच अभिप्रेत आहे. फांशांचा खेळ भारतांत फार प्राचीन काळापासून चालत आहे. फांशांच्या खेळामुळें होणाऱ्या सर्वनाशाचें वर्णन ऋग्वेदांत (१०·३४) आलेलें आहे. " खुळखुळणारे फांसे मला बेभान करतात. फांशांचा आवाज ऐकल्याबरोबर व्यभिचाराला चटावलेल्या स्त्रीप्रमाणें मी त्यांच्याकडे धांव घेतों. फांसे हे मांसापर्यंत रुतणारे गळ आहेत. तरीही जुगाऱ्यांना त्यांचा मोह पडतो. " यावरून हा द्यूतप्रकार होता हें निश्चित होतें. मात्र तो कसा खेळला जात असे याचा खात्रीलायक तपशील मिळत नाहीं. ज्ञानकोशकारांनीं (बुद्धपूर्व जगः पृ. ३५१-२) वैदिक वाङ्मयांतील उल्लेख व त्यांवरील टीका विचारांत घेऊन या खेळाची मांडणी दिली आहे. फांसे पुष्कळ असत व ते टाकण्याकरितां जमीनींत खोलगट जागा करीत असत असें तेथें सांगितलेलें आहे. महाभारताची कथावस्तु द्यूतावर आधारलेली आहे. येथेंही मद्य व द्यूत या व्यसनांपासून आलिप्त राहण्याचा उपदेश श्रीकृष्णानें व नारदानें युधिष्ठिराला केलेला आहे. महा-

भारतांत झालेला संहार दृष्टीसमोर होता तरी उत्तरकालीन क्षत्रिय द्यूताला पराङ्मुख झाले नाहींत, उलट हें व्यसन वाढतच गेलें असें दिसतें. मोहेंजो दारो येथें आणि नालन्दा येथील संघारामांच्या उत्खननांत फांसे (A. S. I. R : 1923-4 : p. 74) सांपडलेले आहेत. वैदिक वाङ्मयांत उल्लेखिलेल्या आहेत तशा खोलगट जागा सह्याद्रींतील अनेक लेण्यांत दिसून येतात. त्यांचा उपयोग फांसे टाकण्यासाठींच होत असावा असें माझें अनुमान आहे. कामशास्त्रांत उपयोगी अशा चौसष्ट कला वात्स्यायनानें (कामसूत्रः अधिकरण १ अध्याय ३) नमूद केल्या आहेत. त्यांत त्यानें आकर्षक्रीडा या द्यूत प्रकाराचा उल्लेख केलेला आहे. टीकेंत जयमङ्गलेचा कर्ता यशोधर सांगतो, पाशकक्रीडा हा द्यूताचाच एक प्रकार आहे. तरी वात्स्यायनानें या क्रीडेला दर्शक क्रमांक व स्वतंत्र स्थान दिलें आहे. कारण ही क्रीडा विशेष अभ्यासण्यासारखी व अवघड आहे आणि ही क्रीडा चांगली अवगत नसल्यामुळें नल व युधिष्ठिर यांचा पराभव झालेला आहे. ही क्रीडा स्त्रियांनींही शिकावी अशी वात्स्यायनाची शिफारस आहे. याज्ञवल्क्यस्मृतीच्या व्यवहाराध्यायांत व कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत द्यूत समाह्वय प्रकरणें आहेत. येथें द्यूताला प्रतिबंध नाहीं; इतकेंच नव्हे, द्यूताध्यक्षानें जुगाऱ्यांना जागा व पिण्यासाठीं पाणी आणि फांसे वगैरे जुगारीचीं साधनें भाड्यानें पुरवावींत आणि खोटे फांसे वापरणाऱ्या व खोटें खेळणाऱ्या जुगाऱ्यांना दंड करावा, असें कौटिल्यानें सांगितलें आहे. आपस्तंब (२.२५) तर सांगतो कीं राजानें द्यूतकरांच्या सोयीसाठीं राजवाड्यांतल्या एका दिवाणखान्यांत सुसज्ज असा जुगारीचा सार्वजनिक अड्डा ठेवला पाहिजे. गुप्तकालांत तर अक्षक्रीडा हें सुसंस्कृततेचें लक्षण मानण्यांत येत असे. कालिदासानें द्यूताचे अनेक उल्लेख केलेले आहेत; आणि बाणानें व दण्डीनेंही. गाथासप्तशतींतील उल्लेख स्पष्टपणें सारीपटाचा आहे. येथें सोंगटी उडवावयाची आहे. पणाचा मात्र उल्लेख आलेला नाहीं. बुद्धिबळांना फांसे लागत नाहींत, सोंगट्यांना लागतात. बाणभट्टानें कादंबरींत व हर्षचरितांत उल्लेखिलेली चतुरंगक्रीडा हा सोंगट्यांचाच खेळ असावा; कारण सोंगट्यांच्या पटाला चार पाखीं असतात व सोंगट्या चार वर्णांच्या असतात. हा बैठा खेळ विशेष लोकप्रिय झाला, कारण जुगाऱ्यांना तो पण लावून खेळतां येतो; नागरिकांना चुरशीनें आणि

गृहस्थांना संबंधित स्त्रीपुरुषांच्या समावेत; त्याचप्रमाणें स्त्रियांना अंतःपुरांत व जोडप्यांना एकांतांत.

मल्लयुद्ध : क्र. ६८४ व ६८५ या गाथांत मल्लयुद्धाचे उल्लेख आलेले आहेत. मल्ल व मल्लयुद्ध यांची थोडीफार माहिती व अनुभव असेल त्यांना हीं शब्दचित्रें निःसंशय यथार्थ व हृद्य वाटतील. क्र. ६८४ या गाथेंत 'जुण्णमल्ल' म्हणजे कसलेला पण वृद्ध मल्ल, तालमींतला वस्ताद आणि भित्रा मल्ल यांच्या सामन्याच्या सुरवातीचें वर्णन आलेलें आहे. जुण्णमल्लाचे कान चढलेले व फाटलेले आहेत. सलामीनंतर मुंडीला हात घालण्याच्या निमित्तानें कानाशिलावर तळहाताचा दणका देण्याचा मल्लांचा प्रघात असतो. प्रतिपक्षाची शक्ति व सहनशीलता अजमावण्यासाठीं, चिरडण्यापूर्वी त्याला चिडवण्यासाठीं, त्याचें व्यवधान नष्ट करण्यासाठीं, त्याला झांज आणून आरंभींच नामोहरम करण्यासाठीं. चुरशीचे सामन्याचे वेळी अशा प्रहारांचा दुष्परिणाम होऊं नये म्हणून मल्लविद्येचे साधक कानाशिलांवर थपडा मारून घेऊन आगाऊ तयारी करून ठेवतात. यामुळें कधीं कानांच्या गुठळ्या होतात तर कधीं ते फाटतात. या मल्लानें कक्षाबन्ध चढविलेला आहे. कच्छाबन्ध या शब्दावरून दिसतें कीं हा लंगोटीसारखा काचा आहे. खेडेगांवांत भरणाऱ्या हगाम्यांतले हौशी मल्ल हल्लींही सामान्यतः असाच काचा धारण करतात. स्त्रियांची जशी नीवि तसाच मल्लांचा हा कक्षाबन्ध. मल्लांना उत्तेजन यावें आणि प्रेक्षकांच्या गलक्यामुळें त्यांचें व्यवधान ढळूं नये म्हणून हगाम्याचे वेळीं होलार कडीं वाजवीत असतात. विजयी मल्लांची मिरवणूक त्यांच्याच कडकडाटांत निघते. क्र. ६८५ या गाथेंत मल्लांचा विजय दवंडी वाजवून साजरा करण्यांत येत आहे. हा मल्ल विवाहित आहे आणि त्याच्या यशामुळें त्याची पत्नी आनंदित होऊन नाचत आहे.

भारतांत मल्लयुद्धाची प्रथा फार प्राचीन आहे. वैदिक यज्ञप्रसंगीं मल्लांचे सामने होत असावेत. रामायणांत व महाभारतांत मारुती व भीम यांनी केलेल्या मल्लयुद्धांचीं अनेक वर्णनें आलेलीं आहेत. क्र. ४४३ या गाथेंत भीमानें कुरुनाथाशीं केलेल्या मल्लयुद्धाचा उल्लेख आलेला आहे. बाहुयुद्ध, वज्रमुष्टि व गदायुद्ध हे मल्लयुद्धाचे तीन प्रकार प्रचारांत होते. लढणाऱ्या मल्लांनीं युद्धाचे शिष्टसंमत निर्बंध कांटेकोरपणानें पाळले पाहिजेत असा पंचांचा व प्रेक्षकांचा आग्रह असे.

शुकनीतींत चौसष्ठ कळांची यादी आहे; पैकीं (१८) पदन्यासपूर्वक शस्त्रसंधाननिक्षेप, (१९) संध्याघाताकृष्टि भेदयुक्त मल्लयुद्ध आणि (२०) बाहुयुद्धनिपीडन या कला प्रस्तुत विषयाशीं संबद्ध आहेत. पवित्र्याच्या अनुरोधानें शस्त्रसंधान, सांध्यावर आघात किंवा त्यांचें आकर्षण आणि मोक्याच्या जागीं मुष्टिप्रहार इत्यादि हीं मल्लयुद्धाचीं वैशिष्ट्यें असून त्यांमध्यें प्रयत्नपूर्वक प्राविण्य प्राप्त करून घ्यावें लागतें; म्हणून मर्दानी असल्या तरी या कलाच आहेत. कला या संज्ञेला अलीकडेच जनानी अभिप्राय आलेला आहे. जातकांतहीं मल्लयुद्धांचें संदर्भ आढळतात. हीं युद्धें 'समज्ज' समयीं ग्रामांगणांत किंवा राजांगणांत होत असत. राजघराण्यांतील प्रेक्षकासाठीं मंडप उभारण्यांत येत. अंगणाभोंवतीं (युद्धमंडल) असलेल्या पायऱ्यांवर प्रेक्षकांच्या वर्तुलाकार रांगा (चक्रातिचक्रे मंचातिमंचे) बसत. शड्डू ठोकणारे व मांड्या थोपटणारे मल्ल मोठमोठ्यानें गर्जना करीत प्रतिपक्षावर तुटून पडत (Pre-Buddhist India; Ratilal Mehta ; p. 356). राजे व श्रीमंत लोक मल्लांना आश्रय देत आणि त्यांचे सामने करवीत. सोपारय येथील सीहगिरी राजानें विजयी मल्लांना बक्षिसें ठेवल्याचा उल्लेख जातकांत आहे. गाथासप्तशतींतील मल्ल मात्र केवळ लोकाश्रयांवर पोसलेले आहेत.

सण व उत्सव :

छण = खण = क्षण = उत्सव, सण क्र. ३९, ६८, ७९, ४६६, ४९६, ५३५, ६२४, ७३१, ७७८, ८२०, ९५७ ; इन्द्रध्वजमहोत्सव : ? क्र. ८५८; **फग्गुच्छण** : फाल्गुनोत्सव : क्र. ३६९; **मअण** : मदनोत्सव क्र. ५४४, ५४५; वसंतोत्सव व स्वागतोत्सव : क्र. ७७४.

मनुष्य उत्सवप्रिय आहे. ही हौस भागविण्याकरितां तो सण निर्माण करतो. कांहीं सणांचें माहात्म्य ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक असतें आणि कांहीं नैसर्गिक परिस्थितीवर आधारलेले असतात. मागासलेल्या व सुधारलेल्या समाजांतील सणांचा तौलनिक अभ्यास करून डॉ. हॅव्हेलॉक एलिस (Psychology of Sex : I. 127) सांगतो कीं सण हे सूर्याच्या स्थितीवर व कृषिसंपत्तीच्या समृद्धीवर अवलंबून असतात; मकर (winter solstice), मेष (vernal equinox), कर्क (summer solstice) व तूळ

(autumnal equinox) या राशींत सूर्य प्रविष्ट होतो तेव्हां मनुष्य सामान्यतः महत्त्वाचे सण साजरे करतो. हा सिद्धान्त देश–काल–परिस्थितीच्या अनुरोधानें विचारांत घेतला पाहिजे हें उघड आहे. मकर संक्रान्तीचे सुमारास दिवस दीर्घ होऊं लागतो आणि कर्क संक्रान्तीचे सुमारास दिवस दीर्घतम झालेला असतो. मेष संक्रान्तीचे सुमारास रब्बी आणि तूळ संक्रान्तीचे सुमारास खरीप पिकें हातीं आलेलीं असल्यामुळें शेतकरी आनंदांत असतात; म्हणून याच सुमारास होळी व दिवाळी यांसारखे सण साजरे होतात. सणांच्या मांडणीवरून समाजाच्या वैशिष्ट्यांबद्दल, संस्कृतीबद्दल व स्वभावाबद्दल अनुमानें काढतां येतात.

कांहीं सण दिवसां (वासर : क्र. ७९) व कांहीं रात्रीं (राइ : क्र. ६८, ४६६) साजरे होतात. रात्रीचे सण सामान्यतः पौर्णिमेच्या (क्र. ६८, ४६६) सुमारास असतात. सणाच्या दिवशीं स्त्रिया गरम व सुगंधी पाण्यानें (क्र. ७९) न्हातात आणि वेषभूषा (क्र. ३९, ४९६) करतात. कामकाजानिमित्त अन्यत्र गेलेलीं माणसें सणासाठीं घरीं परत (क्र. ७७८) येतात आणि सणांचा आनंद लुटण्यासाठीं स्त्रियाही परठिकाणीं पाहुण्या (क्र. ७३१) जातात. सणाचे दिवशीं गोरगरीबही नवे कपडे धारण करतात असे उल्लेख जातकांत (J. III. 446) आढळतात. सणासाठीं मुद्दाम पीठ दळून (क्र. ६२४, ८२०) विशिष्ट प्रकारचीं पक्वान्नें तयार करण्यांत येतात. क्र. ८२० मधील सण हा वसन्तावताराच्या दिवशीं साजरा करण्यांत येणारा सुवसन्तक संज्ञक सण आहे असें सरस्वतीकण्ठाभरणांत (पूर्वोक्तः पृ. ६६४) सांगितलेलें आहे. वात्स्यायनानें या उत्सवाची तिथि माघ शुद्ध अष्टमी अशी दिलेली आहे. सणांच्या निमित्तानें होणारे उत्सव ग्रामांगणांत, चौकांत किंवा देवळांच्या पटांगणांत (क्र. १९०) अगर नदीकांठच्या वाळवंटांत (क्र. ५८) साजरे होत. उत्सव म्हटला म्हणजे थोडीबहुत गडबड, गोंधळ व धिंगाणा व्हावयाचाच. क्र. ५३५ या गाथेंत नगारे धडाडत आहेत, करमणुकीचीं स्थानें जाहीर करण्याकरितां; तिकडे गर्दी लोटत आहे, धाईमुळें व धक्काबुकीमुळें लोकांना रस्त्यांची शुद्ध राहिलेली नाहीं, सर्वत्र गोंगाट चाललेला आहे. जागरणाच्या निमित्तानें गोदातीरावर रात्रीं होणाऱ्या धिंगाण्याचें वर्णन क्र. ५८

या गाथेंत आलेलें आहे. उत्सव आटोपला कीं उत्साह ओसरतो आणि प्रभात-कालीं पौर्णिमेचा चंद्रही निस्तेज (क्र. ६८) होतो. पौर्णिमेच्या रात्रींच्या उत्सवामुळें उत्साहित झालेला क्र. ४६६ या गाथेचा नायक संधि साधून नायिकेला जनसंमर्दाच्या ओहोटींतून बाहेर काढतो व तिनें प्रसन्न व्हावें म्हणून तिला आडोशाला नेऊन तिची प्रार्थना करतो जणूं तो तिला सांगत आहे कीं अशी संधि पुन्हां प्राप्त होणार नाहीं !

क्र. ४९६ मधील सण हा सार्वजनिक नसून वधूच्या वाढदिवसाचा असावा असें अनुमान करण्यास जागा आहे. क्र. ७७४ या गाथेंत वसंतोत्सव व राजाच्या स्वागताचा उत्सव यांची तुलना केलेली आहे. समाज स्वयंस्फूर्तीनें वसंतोत्सव साजरा करतो आणि त्या मानानें राजाचा औपचारिक स्वागेतोत्सव कृत्रिम असतो. राजाची मिरवणूक कार्तिकी पौर्णिमेला काढीत असत असें जातकांतील उल्लेखांवरून (J. I. 449; III. 446) दिसतें.

इंद्रध्वजमहोत्सव :

क्र. ८५८ या गाथेंत इंद्राच्या लांकडी मूर्तीचा उल्लेख आलेला आहे. इन्द्राच्या मूर्तीचे उल्लेख ऋग्वेदांत व इन्द्रध्वजमहोत्सवाचे महाभारतांत आढळतात. कालिकापुराणांत (अ. ८८) सांगितलें आहे कीं वार्षिक इन्द्रध्वजमहोत्सवाचे वेळीं ध्वजाबरोबर इन्द्राच्या काष्ठ, मृत्तिका अगर धातु यांपासून सिद्ध केलेल्या मूर्तींची पूजा करावी. कालकाचार्य कथानकावरून दिसतें कीं शालिवाहन राजांचे अमदानींत महाराष्ट्रांत पैठण येथें इन्द्रमहोत्सव साजरा करण्याचा प्रघात होता. भाजें येथील अखेरच्या लेण्यांत ऐरावतावर आरूढ असलेला इन्द्र व त्याच्या मागें ध्वज धारण करणारा मानकरी असें शिल्प कोरलेलें (History of Indian & Indonesian Art : Smith : Pl xiv, fig 51) आहे. तें या प्रवेशीं संबंद्ध असण्याचा संभव आहे. शिवाय सरस्वतीकण्ठाभरणांत या गाथेला शक्रोत्सव (निर्णय : पृ. ६६८) असें शीर्षक दिलेलें आहे. म्हणून या उत्सवाबद्दल माहिती देतों.

इन्द्र हा विजयेच्छु वीरांचा संग्रामप्रवर्तक देव, आणि आर्यांच्या ध्वजाचा रक्षणकर्ता (ऋ. १०. १०३. ११); म्हणून सम्राटांनीं सामन्त व सैन्य यांसह दरसाल इन्द्रमहोत्सव साजरा करावयाचा प्रघात होता. महाभारतांत चेदि

देशाचा राजा वसु उपरिचर (आदिपर्वः अंशावतरणपर्वः अ. ६१ : १–२१) याची कथा आहे. उपरिचरानें उग्र तप केलें तेव्हां संतुष्ट होऊन इंद्रानें त्याला आर्तत्राणासाठीं वेळूचा दण्ड दिला. हें इन्द्राचें प्रतीक मानून त्यानें तो वर्ष-प्रतिपदेला वस्त्रावगुंठित करून मैदानांत उभारला व त्याची पूजा केली. वराह-मिहिरानें बृहत्संहितेंत (अ. ४३) सांगितलें आहे कीं विष्णूपासून प्राप्त झालेला ध्वज इंद्रानें वसुला दिला आणि ह्या ध्वजाच्या पूजेमुळें भरभराट होईल, राज्यांत अवर्षण पडणार नाहीं (कालिकापुराण) व प्रजा निरोगी होईल (वराहमिहीर) असा आशीर्वाद दिला. यानंतर सर्व राजे ध्वजपूजा करूं लागले. महाभारतांत हा उत्सव पाडव्याचे दिवशीं केलेला आहे. ब्राह्मणी आधारग्रंथांत याचा काल सामान्यतः भाद्रपद शुद्ध अष्टमी ते पौर्णिमा असा दिलेला आहे. शिलप्पदिकारम् या महाकाव्यामध्यें त्याची सुरवात चैत्री पौर्णि-मेला झालेली आहे. तेथें हा उत्सव अठ्ठावीस दिवसांचा आहे. पुरुहूत महोत्सव आश्विन शु. ९ ते १५ पर्यंत करावा असें जैन ठाणंगसुत्तांत सांगितलेलें आहे. या उत्सवाचें रूपांतर नवरात्रांत झालेलें आहे असें केवलानंद स्मारक ग्रंथांत श्री. कोपरकर सांगतात.

भाद्रपद शुद्ध अष्टमीला राजानें परिवारासह जंगलांत जाऊन एक उंच झाड पाडून त्याचा बावीस हात लांबीचा (देवीपुराण : अ. १२) सोट वाजत गाजत राजधानींत आणावयाचा आणि तो वस्त्रालंकारांनीं सुशोभित करून राज-द्वारीं चबुतऱ्यावर उभारावयाचा, तो डगमगूं नये म्हणून चोहोंबाजूंना ताण (मध्यमव्यायोग : १·४७) द्यावयाचे, खुद्द राजानें पूजादिविधिपूर्वक पांच दिवस उत्सव करावयाचा आणि पौर्णिमेला त्याचें विसर्जन करावयाचें, अशी या उत्स-वाची मांडणी होती. हा उत्सव गांवाबाहेर होत असे. उत्सवाचे दिवसांत काव्य-गायन, नाट्य, नृत्य इत्यादि करमणुकीचे कार्यक्रम सडासंमार्जन केलेल्या मैदाना-वर होत असत, असें उत्तराध्ययन सूत्रांत सांगितलें आहे. बृहत्कल्प भाष्यांत सांगितलें आहे कीं या उत्सवाचे वेळीं पांचशें कुलीन कुमारिका एकत्र जमून सौभाग्यासाठीं इंद्राला बळी अर्पण करीत. युरोपांत मे–पोल च्या समारंभांत असाच ध्वज उभारतात व त्या भोंवतालच्या मैदानांत सार्वजनिक व मिश्र असे नृत्यगीतादि कार्यक्रम होतात; तेथेंही स्थानिक व वयांत आलेल्या कुमा-

रिका घोळक्यांत मिसळतात आणि धिंगाणा घालतात. या साम्यावरून इंद्र महोत्सव हाही लैङ्गिक उत्सव असावा असा कांहीं संशोधकांनीं निष्कर्ष काढला आहे. इन्द्र हा पर्जन्याचा देव, म्हणून हा उत्सव पावसाळ्यांत करावा असें हरिवंशांत (२. १५. १९) सांगितलें आहे. या वैशिष्ट्यावरून हा समृद्धि (fertility) उत्सव असावा असा डॉ. मायर (Sexual Life in Ancient India : I : p. 288) यांनीं निष्कर्ष काढलेला आहे.

कालकाचार्य कथानकांत (हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रत : संपादक डॉ. नॉर्मन ब्राउन) इन्द्रध्वजमहोत्सवाचा उल्लेख आलेला आहे. उज्जयिनींत स्वतः आमंत्रून आणलेल्या (अधिक माहितीसाठीं पहा. : कालकाचार्य व विक्रमादित्य : प्रसाद : ऑक्टोबर : १९४७) शकांच्या अत्याचारांमुळें त्रस्त व प्रजेच्या अवहेलनेमुळें लज्जित झालेला कालकाचार्य पैठण येथें शालिवाहनांच्या आश्रयाला आला. त्या वेळीं तेथें भाद्रपद शुद्ध पंचमीला इन्द्रमहोत्सव होत असे. पर्युषण हा जैनांचा सर्वांत मोठा उत्सव हा उत्सव श्रावणाच्या शेवटच्या दिवसांत व भाद्रपदाच्या प्रारंभींच्या दिवसांत (ज्ञानकोश) पाळला जातो. एकाच तिथीला आलेले दोन्ही उत्सव आपल्याला समारंभपूर्वक साजरे करतां यावेत म्हणून पर्युषणोत्सव पुढें ढकलण्याबद्दल शालिवाहन राजानें आचार्याला विनंति केली असता अशी ढकलाढकल अपमानास्पद वाटल्यामुळें आचार्यानें पर्युषणाचा उत्सव चतुर्थीला ठरविला. यामुळें राजाला दोन्ही उत्सवांना हजर राहणें शक्य झालें. तेव्हां-पासून महाराष्ट्राला जैनांनीं श्रमणपूजालय हें नांव दिलें आणि येथें हा उत्सव भाद्रपद शुद्ध चतुर्थीला साजरा होऊं लागला.

वस्त्रालंकारादि साधनांनीं सुशोभित अशा ध्वजाचें आरोपण हें या उत्सवाचें वैशिष्ट्य मानलें तर आतां त्याचें रूपांतर गुढीपाडव्यांत झालेलें आहे. हा उत्सव वर्षप्रतिपदेला करावा असें महाभारतांत सांगितलेलें आहेही. अवर्षणा-पासून प्रजेचें रक्षण व्हावें म्हणून करण्यांत येणारा पर्जन्यदैवताचा उत्सव हें प्रधान लक्षण मानलें तर तो अशा वेळीं साजरा व्हावयाला हवा कीं जोंवर शेतांतील पिकांची तहान भागलेली नसते. कृषिपंचांगांत हा काळ भाद्रपदांत बसतो. पुढले पाऊस भरपूर व वेळेवर पडतील किंवा कसें, याची शेतकऱ्याला काळजी असते, त्याच काळांत विघ्नहर्त्याच्या पूजनाचें प्रयोजन असतें, हें

श्री. शर्मा (आर्योत्सव-प्रकाश : पृ. १८५) यांचें वचन उद्धृत करून श्री. अंडरहिल (The Hindu Religious Year : p. 48) सांगतात कीं भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून सुरू होणारा व अनंतचतुर्दशीला संपणारा गणेशोत्सव हा पूर्व-धान्यें (खरीप-कार्तिकी पिकें) पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचा वर्षोत्सव मानला पाहिजे. इंद्रमहोत्सवाशीं गणेशोत्सवाच्या तिथि जवळ जवळ जमतात; शिवाय त्याप्रमाणें येथेंही प्रतीकांचें विधिपूर्वक विसर्जन होतें. आश्विन शुद्ध प्रतिपदेला सुरू होणाऱ्या नवरात्राशीं इन्द्रमहोत्सवाचा संबंध जोडतां येईल असें वाटत नाहीं. विजयादशमीचे दिवशीं होणारें शमीपूजन हें वृक्षपूजेशीं आणि शस्त्रपूजन हें पराक्रमाशीं संबद्ध आहे एवढें मात्र खरें.

फाल्गुनोत्सव, मदनोत्सव व वसंतोत्सव : फाल्गुनोत्सव म्हणजे होळीचा सण. फाल्गुन पौर्णिमेला होळी होते, वद्य प्रतिपदेला धुळवड आणि वद्य पंचमीला रंगोत्सव होऊन शिमग्याचा सण संपतो. धुळवडीच्या दिवशीं अंत्यजाला स्पर्श करून स्नान करावें असें सांगितलेलें आहे. हेमाद्रीनें व्रत चिंतामणींत धुळवडीला भैरवोत्सव अशी संज्ञा दिली आहे. तो सांगतो, या दिवशीं लोक भैरवाची मूर्ति करतात व मिरवणूक काढून ती बुडवतात. लोक बेहोष होतात, लाज सोडतात व अश्लील गाणीं गात गांवभर भटकतात. वात्स्यायनानें होलिकोत्सवाचा उल्लेख (कामसूत्रः अधिकरण १ अध्याय ४·४२) केलेला आहे. पिचकारींत पळसाच्या फुलांच्या रंगाचें पाणी भरून तें आणि बुक्का एकामेकांच्या अंगावर फेंकणें, ही क्रीडा फाल्गुनी पौर्णिमेला करावी असें कामसूत्रांवरील टीकेंत यशोधर सांगतो. आतां ही क्रीडा वद्य पंचमीला करतात. वसंतोत्सव वसंत पंचमीला होतो. वात्स्यायनानें सुवसंतकोत्सवाचा उल्लेख केलेला आहे. यशोधर सांगतो, सुवसन्तोत्सवालाच मदनोत्सव असें नांव असून या उत्सवांत नृत्य, गीत व वाद्य यांचें प्राधान्य असतें. त्यानें या उत्सवाची तिथि माघ शुक्ल पंचमी अशी दिली आहे. ऋतूत्सव उर्फ वसन्तोत्सव या दिवशीं कामदेवाची पूजा करीत, असें शाकुन्तलांतील उल्लेखावरून दिसतें. वसंतांत स्त्रिया कुसुम्भरागारुणित दुकूलें परिधान करतात असा उल्लेख ऋतुसंहारांत (६·४) आलेला आहे. आतां या तिथीला श्रीपंचमी म्हणतात. या दिवशीं बंगाल्यांत सरस्वती पूजा होते. चैत्र शुद्ध पंचमीलाही श्रीपंचमी अशी संज्ञा

आहे. सिंहासनबत्तिशीच्या दाक्षिणात्य प्रतींत (हार्वर्ड सीरीजः संपादक डॉ. एड्गर्टनः पृ. १४५–६) ह्या उत्सवाची तिथि माघ शुद्ध सप्तमी दिलेली आहे. हा उत्सव वसंताचे सन्मानार्थ होतो; ऋतुदेवतेची पूजा होते; रात्रीं नाट्य, नृत्य, संगीत यांचे कार्यक्रम होतात आणि ब्रह्मवृंद व कलावन्त यांचा नजराण्यांनीं सत्कार करण्यांत येतो असेंही येथें विधान आहे. उत्तर हिंदुस्थानांत उपलब्ध झालेल्या प्रतींत हा उत्सव (पूर्वोक्तः पृ. ८०) चैत्रांत मांडलेला आहे. मदनोत्सव उर्फ अनंगपूजा हा उत्सव अर्वाचीन पंचांगांत चैत्र शुद्ध त्रयोदशीला मांडलेला असतो. वात्स्यायनानें मदनोत्सवाचा उल्लेख केलेला आहे. यशोधर सांगतो, या दिवशीं मदनाचा पुतळा उभारून त्याची पूजा करतात. रत्नावलींत श्री हर्षानें मदनमहोत्सवाचें वर्णन केलेलें आहे (मराठी भाषांतरः कर्ते श्री· सबनीसः अंक १ पृ. ५) : " वारुणीमुळें बेभान झालेल्या कामिनींनीं आपण होऊन करग्रहण केल्यामुळें आनंदानें नाचणाऱ्या या नागरिकांनीं एकमेकांवर पिचकाऱ्यांतील रंगानें चालविलेल्या माऱ्यामुळें या मदनमहोत्सवाला फारच मजा आली आहे......जिकडे तिकडे ओंजळींनीं फेंकलेल्या गुलालानें सर्व दिशा लालभडक होऊन गेल्या आहेत......क्रीडाचतुर पुरुषांनीं पाण्यानें भरलेल्या पिचकाऱ्या अंगावर उडविल्यामुळें मनोहर सीत्कार करणाऱ्या या वेश्यांगनांचे हे विलास तर पहा." आतां मदनमहोत्सव फक्त उत्तर हिंदुस्थानांत साजरा होतो, महाराष्ट्रांत होत नाहीं. येथें या तीनही उत्सवांचे विविध विधि फाल्गुनोत्सवांत समाविष्ट झालेले आहेत; म्हणून त्यांची चर्चा एकत्र केलेली आहे.

वेदांत सहाही ऋतूंचा उल्लेख एकत्र आलेला आहे तेथें वर्षारंभ वसंतापासून झालेला आहे. पूर्वफल्गुनी ज्या पूर्णिमेस येतात ती गत संवत्सराची शेवटची रात्र आणि उत्तरफल्गुनी ही आगामी संवत्सराची पहिली रात्र होय असें तैत्तिरीय ब्राह्मणांत सांगितलेलें (१·१·२·६–८; ३·१०·४·१) आहे. आतांची पौर्णिमेची रात्र व वद्य प्रतिपदेचा दिवस मिळून होणाऱ्या चोवीस तासांना त्या काळांत पूर्णिमा अशी संज्ञा होती. श्री. मोरेश्वर वासुदेव कर्वे (आर्यांचे सण : १ : शिनगा : पृ ४) सांगतात : " वर्षारंभ उत्तरायणारंभीं करावा असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे. हल्लीं उत्तरायण पौषांत सुरू होतें...सुमारें सहा हजार वर्षांपूर्वी उत्तरायण फाल्गुनी पुनवेस होत असे......फाल्गुनी पुनवेस सूर्य......

नक्षत्रचक्रांत दक्षिण दिशेच्या सीमेवर जाऊन उलटला म्हणून सीमग, सीमेप्रत आलेला दिसला......शिमग्याचा सण म्हणजे शिवेवर आलेल्या सूर्याचा सण. संस्कृत भाषेंतील अ मराठींत आ होतो. या नियमानें सीमग शब्द सीमगा झाला. संस्कृत स बद्दल मराठींत कधीं कधीं श होतो. या नियमानें सीमगाचें रूपांतर शीमगा झालें, नंतर शी ऱ्हस्व होऊन शिमगा शब्द प्रचारांत आला." उत्तरफल्गुनीवर आधान करावें असें तैत्तिरीय ब्राह्मणांत सांगितलें आहे. अग्निहोत्री यज्ञाग्नीचें आधान होमशाळेंत करीत आणि गांवकरी लौकिकाग्नीचें आधान शिंवेवर किंवा चवाठ्यावर करीत. उत्तरफल्गुनी नक्षत्राची देवता भग (तै. सं : ४.४.१०; भारतीय ज्योतिःशास्त्र : दीक्षित : पृ. ५५) ही आहे. भग हें आदित्याचें एक अभिधान असून (२.२७.१; ९.१४४.३) हें समृद्धीचें दैवत आहे, धान्योत्पादनाचें आणि प्रजोत्पादनाचेंही. पुढें भगदेवाचें शिश्नदेवाशीं समीकरण झालें. म्हणून या रात्रीं लौकिकाग्नीभोंवतीं जमलेले गांवकरी या देवतेच्या नांवानें जयकार करीत असत. लिंग हें सम्राट सूर्याचें प्रतीक आणि योनि हें सम्राज्ञी पृथ्वीचें; त्यांच्या सहकार्यामुळें समृद्धि निर्माण होते. म्हणून त्यांच्या नांवानें जयकार करण्यांत येतो.

होळीबद्दल अनेक दंतकथा प्रचलित आहेत. होलिका ऱ्या राक्षसीला लहान मुलें खाण्याची चटक होती. गांवकऱ्यांनीं तिला वेढलें, मारलें व जाळलें. याचें होळी हें प्रतीक. तिच्या निर्भर्त्सनेसाठीं गांवकरी बीभत्स अपशब्दांच्या घोषणा त्या दिवशीं सालोसाल करतात. होलिका ही हिरण्यकशिपूची कन्या. प्रल्हादाला मांडीवर घेऊन कपटानें जाळावें अशी पित्यानें तिला आज्ञा केली त्याप्रमाणें तिनें भावाला मांडीवर घेतलें, पण विष्णूनें भक्ताचें रक्षण केलें आणि तिचेंच भस्म केलें. होलिका ही संवताची बहीण. फाल्गुनी पौर्णिमेला संवताचा अंत होतो व त्याच्या चितेवर ती स्वतःला जाळून घेते. तारकासुराचा वध करण्यासाठीं शंकराला जागृत करण्याची कामगिरी देवांनीं कामदेवावर सोंपविली. त्यानें शंकराचा तपोभंग केला. शंकरानें रागानें डोळे उघडले तेव्हां मदनाचें भस्म झालें. हा प्रकार फाल्गुन पौर्णिमेला झाला. शिमग्यांत होणाऱ्या प्रकारांचें समर्थन करण्यासाठीं या व अशा लौकिक कथा निर्माण व प्रचलित केल्या गेल्या असाव्यात.

होळीसारखे उत्सव व या वेळीं होतात तसे अश्लील बीभत्स प्रकार देशो-देशीं होतात आणि ते याच सुमारास होतात. लिबर व लिबरा या रोमन देवतांचा उत्सव ता. १७ मार्च रोजीं होतो. मातीचीं प्रचंड लिंगें तयार करून शेतकरी लोक तीं मिरवणुकीनें नगरच्या बाजारांत आणीत व येथें स्त्रिया त्यांची पूजा करीत; कुलीन व प्रतिष्ठित स्त्रियाही व्हीनसच्या उत्सवांत नागरी स्त्रिया लिंगाची मिरवणूक काढीत आणि देवळांतल्या योनिसदृश, शाळुंकेंत त्याची प्रस्थापना करून त्याभोंवतीं फेर धरून नृत्यें करीत. फ्लोरालियाच्या उत्सवाच्या दिवशीं वेश्या भर रस्त्यांतून नागव्या हिंडत असत. वसंतांतलें वातावरण कामोत्तेजक असतें असें संस्कृत कवि वारंवार सांगतात. हें विधान कल्पनारम्य असलें तरी तें अतिरंजित असावें असें अर्वाचीनांना वाटतें. पशु-पक्ष्यांचे संभोग हंगामी असतात हें आपण पाहतों; पण प्रगतिशील मानव-जातीवर असे निर्बंध असतील अगर असावेत हें आपल्या व्यावहारिक दृष्टीला पटत नाहीं; कारण निसर्गाच्या प्रेरणांचें ग्रहण करण्याची आपली क्षमता दुर्बल झालेली आहे आणि संभोग हें जीवनांतील प्रधान व दैनिक कार्य मानण्याकडे आपली प्रवृत्ति झालेली आहे. सहकाराच्या मंजिऱ्यांचा सुगंध वातावरणांत दरवळूं लागला कीं जंगली जमातींतील स्त्रीपुरुषांच्या मनोवृत्ति उचंबळतात. मुंडा जमातींतील पुरुष भल्या पहांटेस शिकारीला निघतात व सायंकाळीं परततात. शिकारींत अपेशी झालेल्या पुरुषांवर जमातींतल्या स्त्रिया शेणमार करतात आणि यशस्वी शिकाऱ्यांचें स्वागत करतात. रात्रीं चांदण्यांत मेजवानी होते. जोडीला जंगली मद्य असतेंच. वातावरण धुंद झालें म्हणजे जंगी चर्मवाद्यें तालावर धडाडूं लागतात. त्यांच्या गर्जनांचा तुताऱ्या भेद करतात. मग संघगीतें व संघनृत्यें सुरू होतात. एका बाजूला पुरुष व दुसऱ्या बाजूला स्त्रिया; एकमेकांच्या कमरेभोंवती हात घालून, मागें पुढें व आजू-बाजूंना झुलत व डोलत. मध्येंच एकादी स्त्री बेभान होऊन आपली रांग सोडून रंगणांत येते, जणुं जमातीच्या पौरुषाला आव्हान देते आणि साभिनय नृत्य करूं लागते. इतक्यांत एकादा पुरुष तिचें अनुकरण करतो. तीं एकमेकांभोंवतीं गिरक्या घेऊं लागतात. मग रांगा मोडतात आणि सामूहिक द्वंद्वगीतें व द्वंद्वनृत्यें सुरूं होतात. या वेळीं गाण्यांत येतात तीं गाणीं कमालीचीं अश्लील असतात.

होळीसारख्या उत्सवांत होणारे बभित्स प्रकार आणि अश्वमेधांतील महिषी व मृताश्व प्रकरण यांचा कामप्रधान–मानसशास्त्र (Sexual Psychology) व मनःप्रधान समाजशास्त्र (Psycho–Sociolgy) यांच्या दृष्टीनें विचार करून अहिताग्नि श्री. राजवाडे (नासदीयसूक्तभाष्य : उत्तरार्ध : पृ. १६५०) निष्कर्ष काढतात कीं "अतिगंभीर प्रसंगीं ग्राम्य व अश्लील विनोद मनुष्याच्या नैसर्गिक वृत्तीला वाव देण्यासाठीं मुद्दाम योजिला आहे." प्रजाजननाचें हंगामी प्रमाण व वसंतांतले उत्सव यांचा तौलनिक अभ्यास करून डॉ. हॅव्हेलॉक एलिस सांगतात (Psychology of Sex : I. 123) कीं या ऋतूंत मानवाला निसर्गतःच प्रजोत्पादनार्थ संभोगाची प्रवृत्ति होते.

अर्थात्, होळीच्या उत्सवांत एका संवत्सराचा अंत व दुसऱ्याचा आरंभ समारंभपूर्वक जाहीर व साजरा करण्यांत येतो. कडाक्याची थंडी संपून उबदार वसंत सुरू झाला म्हणजे अशी परिस्थिति असेल तेथील रहिवाश्यांना किती आनंद होत असेल याची आपणां समशीतोष्ण भागांतील लोकांना कल्पनाही करतां येणार नाहीं. उत्सवार्थ अग्नि प्रज्वलित करण्याची परंपरा संस्कृतिपूर्व-कालीन आहे; या प्रथेचें ही प्रत्यंतर या उत्सवांत येतें. नैसर्गिक प्रेरणांमुळें उत्तेजित होणाऱ्या भावनांनाही या सणांत वाव आहे. संवेदनाक्षमता सूक्ष्मग्राही झाल्यामुळें आतां प्रतिष्ठितांना प्रचलित रिवाजांपैकीं कांहीं रुचत नाहींत हा भाग वेगळा.

फाल्गुनोत्सवांत कर्दभ–प्रसाधन निर्दोष आहे असा क. ३६९ या गाथेचा निर्वाळा आहे. एकमेकांच्या अंगावर चिखल उडवणें ही गरिबांची ग्राम्य करमणूक आणि अबीर, गुलाल उधळणें ही श्रीमंताची. त्या काळांत स्त्रियांवरही कर्दम–प्रयोग होत असे असें दिसतें. क. ५४४ या गाथेच्या नायिकेनें मदनो-त्सवार्थ मद्यप्राशन केलेलें आहे आणि क. ५४५ या गाथेच्या नायिकेनें कुसुम्बी कञ्चुकी धारण केलेली आहे. कंचुकीचा हा रंग मार्मिकांचीं अंतःकरणें आकर्षित करतो, कारण ती धारण करणारीच्या वृत्तीचा तो द्योतक असतो. आतांही पाहा, या ऋतूंत नगरी तरुणी स्वयंप्रेरणेनें गुलमोहरी लाल पातळें व कुसुम्बी चोळ्या परिधान करतात !

(४) कापूस व कापड, वस्त्रें व वेशभूषा :

कप्पास = कप्पाशी : क. ८०५; **तूल** = बीजरहित कपाशी : क. ६७९; **फलही** = कपाशीचें झुडूप : क. १६६, ३५९, ३६०; **फलिह** = कपाशीचें झुडूप : क. ५४९; **वेण्ट** = बोंड : क. ३५९, ३६०.

अंसुअ = अंशुकं (अंशुकं शुक्ल (श्लक्ष्ण) वस्त्रं स्याद्वस्त्रमोत्तररीययो : ॥ मेदिनी) क. ५२०, ९६५; **आणन्दवड** = आनंदपट : क. ४५७; **कञ्चुअ** = कांचोळी : क. ३९५, ५४५, ६२०, ६७२; **कञ्चुइ** = कें. ६२०; **कच्छाबन्ध** = कक्षाबन्ध = कांचा : क. ६८४; **कुप्पासं** = कोपरी; कोंपरापर्यंत बाह्या असलेली चोळी (कप्पासत्वर्धचोलक : ॥ हारावली) क. ७२३, ८०५; **गण्ठि** = गांठ : क. ३५१, ६४६; **छल्लि** = वल्कलें : क. ११५; **णवरङ्गअं** = नवें रंगवलेलें वस्त्र : क. २४१, ३२८, ४६१, **णिअंसण** = नेसण : कमरेखालीं नेसावयाचें वस्त्र : क. ३५१, ४६९; **दसिआ** = दशा : क. १८; **दुऊल** = दुकूल = तलम किंवा रेशमी कापड : क. ५६९; **पट्टंसुअ** = पट्टांशुक = रेशमी वस्त्र : क. ५२०; **पड, पडअ** = पटक, वस्त्र : क. १८, ३२९, ५२०; **पाइडि–पारिडी** = प्रावृति = वस्त्र : क. २३८; **पारअ** = प्रावरण : क. ७७२; **वडअ** = पटक : क. ३२९; **वत्थ** = वस्त्र : क. १६०, ६४६; **वत्थद्धन्त** = वस्त्रार्धान्त = पदर : क. १६०; **वेस** = वेष : क. ४४९; **साउली, साहुली** = वस्त्र, अंचल : क. २६९, ६०५; **सिअअं** = नेसण : क. ८७१; **सिचअ** = सिचय : क. ५०७, ७१८, ८९२; **सुत्त** = सूत : क. ६३; **सूई** : क. ३९४, ५०१, ७२०.

कपाशीचें मूलस्थान कोणतें? खुद्द वेदांत कापसाचा स्पष्ट उल्लेख नाहीं. आश्वलायन–श्रौत–सूत्रांत (६·४·४७) कापसाचा पहिला उल्लेख आढळतो. मोहेंजोदरो येथील उत्खननांत कापसाचे धागे व सूत कांतण्याच्या चात्या यांचा आढळ झाला (Marshall : Mohenjo Daro & the Iudus Civilization : I. p. 33) तेव्हांपासून हिंदुस्थान हेंच कापसाचें मूलस्थान, हा सिद्धांत संशोधकांना मान्य झाला. कापसाच्या बाबतींतलें युरोपियनांचें अज्ञान सांगण्यासारखें आहे. ख्रि. पू. पांचव्या शतकांत हिरोडोटसनें नमूद केलें आहे कीं हिंदुस्थानांतल्या एका जंगली झाडाला लोकरीचीं फळें येतात व येथील लोक त्यांच्या धाग्याचीं वस्त्रें विणतात. ख्रि. पू. ३५० चे सुमारास थिओ-

क्रेटसनें सांगितलें आहे कीं हिंदुस्थनांत कापसाच्या झुडपांची हारीनें लागवड करतात. अलेक्झँडरच्या स्वारीपासून युरोपियन बाजारपेठांत हिंदी कापडाची ख्याति झाली. हिंदुस्थानांतून निर्यात होणाऱ्या कापडाचा पहिला उल्लेख खिस्तोत्तर पहिल्या शतकांतल्या पेरिप्लसच्या ग्रंथांत आढळतो.

वैदिक वाङ्मयांतील उल्लेखांवरून दिसतें कीं तत्कालीन आर्यांचीं वस्त्रें मुख्यत्वेंकरून लोकरीचीं असत. सूचिसिद्ध वस्त्रांचे उल्लेख (२·३·२४; १०. १०७·८) आढळत असले तरी ते चर्म–वस्त्रांबद्दल आहेत. त्यांचीं नेहमींचीं वापरतीं वस्त्रें तशीं असावींत असें दिसत नाहीं. वेदकालीन आर्यांचा पूर्ण पोषाक चार वस्त्रांचा असे. (१) उष्णीष : हें वस्त्र फेंट्यासारखें किंवा पागोट्या-सारखें डोक्याला गुंडाळून व मानेजवळ गांठ मारून स्थिर करण्यांत येत असे. याचें धारण सामान्यतः ऐच्छिक व यज्ञासारख्या विशिष्ट प्रसंगीं आवश्यक असे. (२) अधिवास : हें उत्तरीय उपरण्यासारखें खांद्यावरून घेण्यांत येत असे. अधिवास ओघळल्यामुळें उषेचे स्तन उघडे पडल्याचा उल्लेख ऋग्वेदांत (१·९२·४) आढळतो. (३) नीवी हें मलवस्त्र, गुह्यांगें झांकण्यासाठीं काचासारखें किंवा लंगोटासारखें कमरेभोंवतीं बांधण्यांत येत असे. हें वस्त्र रुंद कांठळीसारखें (Sarkar : Some Aspects of the Earliest Social History of India : p. 63) असून त्याची गांठ नाभीजवळ मारून त्याचा धागेदार सोगा लोंबता सोडण्यांत येत असे. मुनींचें मलवस्त्र चर्माचें असे आणि सुस्थितींतल्यांचें मऊ, रंगीत व रुंद (अथर्व : ८.२.१६) असे. स्त्रियांच्या नीवीचा कांहीं भाग सावरीचा कापूस भरून लेपासारखा केलेला असे. नीवीची निवड ज्यानें त्यानें आपल्या हौसेप्रमाणें (Dr. Motichandra : Indian Costume from the Earliest Times : Bhartiya Vidya : Vol I. p. 36) करावयाची असे. (४) वस्त्र : यालाच परिधान, वसन, वास म्हटलेलें आहे. हें अधोवस्त्र, नीवीवरून धारण करण्यांत येत असे. त्याची रुंदी व पोत हीं तें नेसणाराच्या सामाजिक व सांपत्तिक दर्जावर अवलंबून असत.

महाभारतकालीन लोकही सामान्यतः अशींच वस्त्रें वापरीत. साधारणतः शिष्ट पुरुष दोन वस्त्रें वापरीत : उत्तरीय व अधिवास. युद्धप्रसंगीं क्षत्रिय लोक

शिरस्त्राणावर उष्णीष धारण करीत. अधिवास म्हणून क्षत्रिय मृगचर्में वापरीत आणि शूद्र लोक बैलांचीं किंवा बोकडांचीं कातडीं. त्यांवर सुचिसंस्कार होत असलेच पाहिजेत. क्षत्रिय हे शिकारी व शूद्र हे शेतकरी. ज्याला जें उपलब्ध व सोयीचें तें तो वापरी (Hopkins : Position of the Ruling Caste in Ancient India : p. 105). स्त्रियांचें नेसणें विकच्छ असे; त्यांच्या लुगड्याला पदर असे व त्या तो उत्तरीयाऐवजीं घरांतल्या घरांत खांद्यावरून घेत. त्या अंगांत चोळी घालीत नसत (वैद्य : महाभारत : उपसंहार : पृ. ३८४–५). दुःशासनानें द्रौपदीला द्यूतसभेंत ओढून आणलें तेव्हां ती एकवस्त्रा–पतितार्धवस्त्रा – अधोनीवी अशा अवस्थेंत होती. दुःशासनानें तिचें नेसतें वस्त्र फेडण्याचा प्रयत्न केला व त्या वेळीं दुर्योधनानें आपली डावी मांडी उघडी केली. यावरून त्या काळची वस्त्रधारणाची पद्धत स्पष्ट होते, असें श्री. वैद्य सांगतात. पण हें सारेंच प्रकरण प्रक्षिप्त आहे असें कांहीं संशोधकांचें अनुमान (Winternitz : History of Sanskrit Literature : I. p. 344) आहे.

असीरिया, इजिप्त, खाल्डिया, बाबिलोन इत्यादि मध्य आशियांतील व त्यांसमीपच्या राष्ट्रांशीं भारताचे निकट संबंध होते, या विषयीं अनेक पुरावे उपलब्ध आहेत. असुर संस्कृतीशीं झालेल्या या संपर्काचा आपल्या राहणीवर व संस्कृतीवर पुष्कळ परिणाम झालेला आहे; मात्र त्यांची व्याप्ति अंदाजण्यापुरता तपशील अजून मिळालेला नाहीं. महाभारत कालानंतर या संबंधांत कांहीं काळपर्यंत खंड पडलेला असावा. जातकादि प्राकृत व अर्थशास्त्रादि संस्कृत ग्रंथांतील उल्लेखांवरून आणि प्राचीन शिल्पकृत्यांवरून महाजनपदकालीन आणि मौर्य व सातवाहन कालीन लोकांच्या राहणीबद्दल बराच तपशील मिळूं शकतो. या ग्रंथांतील अस्सल भाग कोणता व प्रक्षिप्त कोणता, प्राचीन शिल्पकृत्यांतील आद्य कोणतीं व उत्तरकालीन कोणतीं, याची शहानिशा बव्हंशीं अनुमानावर अवलंबून असल्यामुळें त्यांवरून निघणाऱ्या निष्कर्षांत थोडीबहुत अनिश्चितता असणारच हें उघड आहे. अलेक्झँडरच्या स्वारीचा भारतावर सांस्कृतिक असा फारसा परिणाम झाला नाहीं. इकडच्या व तिकडच्या मालमसाल्यांची परस्परांनीं माहिती होऊन जल व स्थल मार्गांनीं होणाऱ्या व तोंवर मंदावलेल्या व्यापाराला फिरून ऊर्जितावस्था आली, इतकेंच. अशोकाच्या अमदानींत बौद्ध धर्मप्रसाराच्या निमित्तानें भारताचें

परदेशांशीं, विशेषतः मध्य आशियाशीं संघटन वाढलें. मौर्यांची सत्ता दुर्बल झाल्यानंतर परकीय आक्रमक बौद्ध धर्म स्वीकारून इकडे स्थायिक होऊं लागले; यांपैकीं कांहींचें निर्मूलन झालें आणि कांहीं भारतीय समाजांत विलीन होऊन गेले. त्यांच्या राहणीचा व रिवाजांचा आपल्यावर बराच परिणाम झालेला आहे.

मौर्य व सातवाहनकालीन शिल्पांवरून त्या काळांतल्या लोकांच्या वस्त्रांची तपशीलवार माहिती मिळते.

भरहूत व सांची येथील पुरुषांच्या शिरावर उष्णीष आहे; पैकीं कांहींची धाटणी साधी आहे व बांधणी घरगुती आहे; कांहींची रचना मुकुटासारखी संकीर्ण असून त्यांवर कोठें नक्षीचें, कोठें जडावाचें काम केलेलें आहे. त्यांची बांधणी धंदेवाईक पगडबंदांनीं केल्यासारखी दिसते. कार्ले येथील सातवाहन लेण्यांतील जवनिकेवरील मूर्तींचें उष्णीष अगदीं मराठी फेंट्यासारखें आहे. भाजें लेण्यांतील मूर्तींचें शिरस्त्राण संकीर्ण स्वरूपाचें आहे. परखम येथील यक्ष धोतर नेसला आहे व त्यानें छातीवर उपरणें घेतलें आहे. भरहूत येथील सर्व पुरुष धोतरें नेसतात. नागार्जुनिकोंडा येथील राजे उत्तरीय केव्हांही धारण करीत नाहींत. त्यांचा दर्जा ओळखण्याची हीच मुख्य खूण आहे. दरबारी पुरुष अंगांत घट्ट अंगरखा घालतात व पायांत पायजमा चढवतात किंवा धोतर नेसतात आणि निऱ्यांचा सोग्यासारखा पटका लोंबता सोडतात. येथील घोडेस्वार व मोतद्दार अंगरखा घालतात पण धोतर किंवा पायजमा वापरीत नाहींत. हीच त्यांचा दर्जा ओळखण्याची खूण (Naik : Studies in Indian Sculptures : p. 62). मराठी समाजाच्या वरिष्ठ व कनिष्ठ दर्जांच्या पोषाकांत नेमका हाच फरक आजही दिसतो. अजंठ्यांतले पुरुष रंगीत व आडव्या पट्ट्यांचीं अरुंद धोतरें लुंगीसारखीं नेसतात आणि कनिष्ठ दर्जाचे पुरुष लंगोट किंवा कमरबंद वापरतात. धोतरांची रुंदी वाढल्यानंतर तीं नेसण्याच्या विविध पद्धति प्रचारांत आल्या. धोतरें वापरणें गरीबांना परवडत नसावें असें दिसतें. भाजें व नागार्जुनीकोंडा येथें द्वारपालांच्या मूर्ति आहेत. त्यांचा पोषाक जवळजवळ सारखा आहे. मनगटापर्यंत बाह्या व गुडघ्याइतका लांब असलेला लेपाचा अंगरखा व तसाच पायजमा त्यांनीं धारण केलेला आहे. हे द्वारपाल शक असावेत असा संशोधकांचा कयास आहे. भरहूत येथें एक

मिहिरमूर्ति (Barua : Bharhut : Vol II : Pl. lxii : Fig 71) आहे. त्यानें अंगांत कोट घातला आहे. त्याची आघाडी गळ्याजवळ व कमरेवर बंदांनीं बांधलेली आहे. यावरून अनुमान होतें कीं भारतांत सूचिसिद्ध वस्त्रांचा वापर पूर्वीपासून होत असला तरी शकांच्या आक्रमणानंतर ही प्रथा सार्वत्रिक झाली असली पाहिजे. प्रथम एतद्देशीय दरबारांत व लष्करांत आणि नंतर शहरांत, अशा क्रमानें शिवलेल्या वस्त्रांचा वापर सुरू व प्रसृत झाला असला पाहिजे.

मौर्य व सातवाहन कालीन शिल्पांतील बहुतेक सर्व स्त्रिया उष्णीष व उत्तरीय धारण करतात. अजंठ्यांतील स्त्रिया उष्णीष वापरीत नाहींत. वेद काळापासून प्रचलित असलेली ही प्रथा दरम्यानच्या काळांत नष्ट झालेली दिसते. अभिजात संस्कृत वाङ्मयांत उष्णीषाचा उल्लेखही आढळत नाहीं. अजंठा येथील भित्तिचित्रांतील स्त्रियांची केशभूषा विविध प्रकारची आहे. केशपाशांत कुसरीचे व मौल्यवान् अलंकार गुंफलेले आहेत. मला वाटतें, केशभूषेच्या आणि अलंकार-प्रदर्शनाच्या हौसेमुळें स्त्रियांनीं बोजड उष्णीषाचा त्याग केला असावा. समाजाचा सांपत्तिक व स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारला असल्याचाही हा प्रकार द्योतक असावा असें वाटतें. उत्तरेंत उष्णीषाची जागा ओढणीनें घेतली; उष्णीष नष्ट झालें आणि उत्तरीय खांद्यावरून माथ्यावर चढलें. उत्तरीयांतून अवगुंठन उत्क्रांत झालें असावें. वासवदत्तेच्या अवगुंठनाला भासानें यवनिका ही संज्ञा (स्वप्नवासवदत्त : ६·१६) दिली आहे. संभवनीय आहे कीं आपण या वस्त्राची प्रथा ग्रीकांपासून घेतलेली आहे. दक्षिणेंत उष्णीष व उत्तरीय हीं दोन्ही नष्ट झालीं व त्यांची जागा नेसत्या वस्त्रांच्या पदरानें घेतली. उच्च वर्गीय स्त्रियांनीं मात्र उत्तर कालांत उत्तरीयाची व्याप्ति वाढवून त्याचा पडदा म्हणून उपयोग केलेला आहे. गुप्त व वाकाटक कालीन शिल्पांत व भित्तिचित्रांत वेगवेगळ्या धर्तीच्या ओढण्या दिसतात. कोठें त्या ढळूं नयेत म्हणून त्यांवर पट्टा बांधलेला असतो. ओढणीची ओढ एका प्रकारची आणि पदराचा नखरा वेगळ्या प्रकारचा. ओढणी सहसा ढळत नाहीं. शिष्टाचार म्हणून माथ्यावरून पदर घ्यावयाचा, पदन्यासाच्या ठेक्यांत तो सहेतुकपणें ढळूं द्यावयाचा आणि बिचकत्या आविर्भावानें पुन्हां

पुन्हां सांवरून घ्यावयाचा, हें महाराष्ट्रीय वेषभूषेचें वैशिष्ट्य बरेंचसें उत्तरकालीन आणि बहुधा सकच्छ वस्त्र-धारण पद्धतीनंतरचें असावें. मात्र या प्रथांचा प्रारंभ शककालाच्या सुरवातीच्या सुमारास बीजरूपानें झालेला असावा. भरहूत येथील स्त्रिया माथ्यावरून ओढणी घेतात (Barua : Bharhut : Pl. lxxiii) आणि पहिल्या शतकांतील गांधार हारिती (Grundwell : Buddhist Art in India : p. 104, fig 55) खांद्यावरून पदर घेते. अमरावती, भरहूत, सांची येथील वरिष्ठ वर्गांच्या स्त्रिया उत्तरीय क्वचितच वापरतात. या सर्वांचे स्तन विवस्त्र आहेत. या नियमाला अपवादही आहेत. भरहूत येथील चण्डा यक्षिणीनें आंखूड बाह्यांची कंचुकी धारण केलेली आहे. तिचीं अग्रें सूत्रानें बांधलेलीं आहेत. कालिदासाच्या काळांतील सर्व स्त्रिया कञ्चुकी धारण करतात. बौद्ध युगांतील स्त्रिया नीवी नेहमीं धारण करतात. श्री. नाईक (Studies in Nagarjunikonda Sculptures : p.56) यांनीं नीवीला लंगोटी हा प्रतिशब्द वापरलेला आहे. कधीं अरुंद रुमाल कमरेभोंवतीं गुंडाळून कांचा खोंवावा अशी ती दिसते, तर कधीं ती लांबलचक पट्टीसारखी असून लंगोटासारखी कसलेली दिसते. नीवीवरून वस्त्र व त्यावरून कमरबंद (Cunningham : Bhilsa Tope : Pl xvi) आणि मेखला धारण करावयाचा प्रघात होता. पुरुष धोतर नेसतात त्याच धर्तीनें स्त्रिया वस्त्र नेसत (Motichandra : Indian Costume from the Earliest Times : Bhartiya Vidya : Vol I. p.49). या काळांतील स्त्रियांचीं वस्त्रें साधारणत: तोकडीं आहेत, लांबीला व रुंदीलाही. त्यांचा घोळ फार तर गुडघ्यापर्यंत येतो. त्या नाभिदर्शन असभ्य मानीत नाहींत. अजंठ्याची राजकन्या माया नग्न आहे; मात्र ती अंतर्गृहांत उभी आहे; शिवाय तिनें इतके अलंकार धारण केलेले आहेत कीं त्यांमुळें तिच्या विवस्त्रावस्थेकडे लक्षच जात नाहीं. रस्त्यावरील मिरवणुकींत सामील झालेल्या दुसऱ्या एका राजकन्येनें कोणतेंही उत्तरीय धारण केलेलें नाहीं (Heringham : Ajanta : Pl xxiv). प्रसाधन या चित्रांतील राजकन्येनें नीवी व मेखला धारण केलेली आहे व तिच्या शेजारीं उभ्या असलेल्या श्यामल चामरचारिकेनें सकच्छ वस्त्र परिधान केलेलें आहे.

गाथासप्तशतींत कपाशीचे उल्लेख कप्पास, तूल, फलही व वेंट या शब्दात आलेले आहेत. त्याचप्रमाणें कपाशीची लागवड, राखण व वेंचणी या तीन्ही व्यापारांचे उल्लेख आलेले आहेत. निसर्गतः लालसर रंगाचा, लांब धाग्याचा व उच्च प्रतीचा कापूस आन्ध्र व बंगाल प्रांतांत फार पूर्वीपासून पिकविण्यांत येत आहे. गाथासप्तशतींतला कापूस मात्र पांढरा शुभ्र आहे; कारण त्याची तुलना धवल हास्याशीं (क्र. ३६०) व शुभ्र मेघांशीं (क्र. ६७९) केलेली आहे. कपाशीची पेरणी करावयाचे वेळीं नांगराची पूजा (क्र. १६५) होत असे. या पुण्याहमंगलाला घरधन्याच्या कुटुंबांतील सर्व माणसें हजर असत. हा विधि खुद्द घरधनिणीनें करावयाचा असे. घरच्या बायकांना: कपाशीच्या देखरेखीचें व राखणीचेंही काम करावें लागे; मालकीण उच्चकुलोत्पन्न असली तरी. क्र. ३६० या गाथेची नायिका आर्या आहे; कपाशीच्या शेतांत ती संकेतासाठीं गेली असावी असें संदर्भावरून दिसत नाहीं. राखणीसाठीं मोलाचीं माणसेंही ठेवीत असत. अशा कप्पासरक्खिकेचा उल्लेख महाजनक जातकांत (६.३३६) आलेला आहे. आडदांडपणा अंगीं असलेल्यांची निवड (क्र. ८०५) या कामासाठीं होत असावी. इकडे तिकडे हिंडतांना राखणदाराची नजर चुकवून कपाशीचीं बोंडें उचलण्याचा उद्योग करणाऱ्या मंडळींचा या काळांतही उपद्रव होत आहे. बोंडें वेंचण्यासाठीं घरचीं माणसें शेतावर जातात. या कामासाठीं मोलाचीं माणसेंही ठेवलेलीं आहेत. क्र. ३५९ या गाथेंत अशा एका तरुण मोलकरणीचा व तिचे चाळे टेहळणाऱ्या धनिणीचा उल्लेख आहे.

गाथासप्तशतींत रंगारी, विणकर व शिंपी यांचे उल्लेख नाहींत. पण त्यांनीं विणलेल्या, रंगविलेल्या व शिवलेल्या कापडांचे व कपड्यांचे अनेक उल्लेख आहेत. हीं वस्त्रें सुईनें शिवलेलीं आहेत. तलम सुताचा उल्लेख (क्र. ६३) आहे, पण हें सूत विणकरी नसून माळकरी आहे. सुईचे उल्लेख (क्र. ३९४, ५०१, ७२०) आहेत, पण ते सांकेतिक आहेत. सूतकताईचा उल्लेख नाहीं. रजक हाच रंगारी असें जातकांत (४.८१) आढळतें. त्यांचा सामाजिक दर्जा हलका मानण्यांत येत असे; त्याचप्रमाणें विणकाम करणारे तंतवाय व भरतकाम करणारे पेसकार यांचाही (१.३५६). जाळ्याभरव्या वस्त्रांचें विणकाम करणारे बव्हंशीं अनार्य किंवा वन्य असावेत. हें या गंडाचें कारण

असावें. अर्थशास्त्राच्या सूत्राध्यक्ष प्रकरणांत (अधिकरण २ अध्याय २२ प्रकरण ४०; इंग्रजी भाषांतर : डॉ. शामशास्त्री : पृ. १२५) कौटिल्य सांगतो : " विधवा, पंगु स्त्रिया, प्रव्रजिता, दंड भरण्यास असमर्थ असलेल्या स्त्रिया. वेश्यामाता आणि सेवानिवृत्त देवदासी यांच्याकडून सूत कातवून घ्यावें, सामाजिक किंवा धार्मिक निर्बंधांमुळें अगर शारीरिक व्यंगांमुळें ज्या स्त्रिया घराबाहेर पडत नाहींत अथवा ज्यांचे पति प्रवासाला गेलेले आहेत अशांना चरितार्थासाठीं व्यवसायाची जरूरी असेल तर सूत खात्यांतील मोलकरणींच्या करवीं कच्चा माल त्यांच्या घरीं पोंचवावा. धाग्याच्या पोताच्या प्रमाणांत त्यांना वेतन द्यावें." वेदकालापासून गुप्त कालापर्यंत सूतकताई हें काम स्त्रियांच्या हातीं होतें. या विधानाच्या मर्यादा येथें मिळतात. अनाथ व अन्य व्यवसायाला असमर्थ अशा स्त्रिया हें काम करीत. स्त्रीपुरुष घरोघर चरखे फिरवीत आहेत आणि गांवोगांव विणकरांचे हातमाग चाललेले आहेत. कापडाचे बाबतींत ग्रामसंस्था स्वयंपूर्ण आहेत, अशी परिस्थिति या काळांत तरी नव्हती, असें यावरून स्पष्ट दिसतें.

गाथासप्तशतींत मर्दानी वस्त्रांचे उल्लेख फार थोडे आलेले आहेत. ग्रामीण पुरुष फारशीं वस्त्रें धारण करीत नाहींत. शृंगाराचा परिपोष वस्त्रामुळें स्त्रियांचे ठायीं होतो तसा पुरुषांचे बाबतींत होत नाहीं हींच याचीं कारणें असावींत. कक्षाबंध कसलेल्या पटाईत मल्लाचें वर्णन क्र. ६८४ या गाथेंत केलेलें आहे. त्याच्या अवसानाचें वर्णन नामी आहे. नीवी हें मलवस्त्र नेहमीं धारण करावयाचें असल्यामुळें त्याचे बंध करकचून बांधतां येत नाहींत. म्हणून मल्ल-युद्धासाठीं कक्षाबंध वापरावयाचा. या संज्ञेवरूनच दिसतें कीं तो चड्डीसारखा किंवा जंधियासारखा मांड्यांवरून चढवावयाचा नसून लंगोटासारखा बांधावयाचा आहे. कक्षाबंधाचें हल्लींचें मराठी नांव काचा. हा साधारणपणें वीतभर रुंद व वावभर लांब असतो. कडदोरा व लंगोटी या दोहोंचीं कामें तो करतो. लंगोटाला असतात तसे याला पंख नसतात. खेडेगांवांतले हौशी मल्ल कुस्तीसाठीं मैदानांत उतरतांना अजूनही काचा कसतात. गाथासप्तशतींतील पटक ही संज्ञा नेसत्या वस्त्राची द्योतक आहे; मग तें स्त्रीनें धारण केलेलें असो

किंवा पुरुषानें. क्र. ३२९ मधील पटक निःसंशय मर्दानी आहे. क्र. १८ मधील उल्लेख मात्र संदिग्ध आहे.

गाथासप्तशतींत जनानी वस्त्रांचे अनेक उल्लेख आलेले आहेत. अंशुक, दुकूल, निवसन, पट, पटक, पट्टांशुक, वड, वस्त्र, साउली व सिचय हीं नांवें स्त्रियांच्या नेसत्या वस्त्रांची आणि कंचुक, कंचुकिका व कूर्पास हीं नांवें स्तनांशुकांचीं. इंपीरियल गॅझेटीयरच्या कूर्ग विभागांत (भाग ११ पृष्ठ २४) कुप्पास या संज्ञेचा अर्थ Long coat, open in front & reaching below the knees असा दिलेला आहे. सर्वच स्त्रिया नेहमीं डोक्यावरून पदर घेत असत किंवा सर्वदा स्तनांशुक वापरीत असत असें दिसत नाहीं.

अंशुकाचा उल्लेख दोनदां आला आहे. एकदां आकर्षक अडचण या नात्यानें पट्टांशुकांत व एकदां प्रसाद म्हणून देण्यांत आलेल्या रक्तांशुकांत. पटाहून पट्टांशुक भारी, हें क्र. ५२० मधील उल्लेखावरून स्पष्ट दिसतें. आपल्या नायिकांना हें उंची वस्त्र परवडत नाहींसें दिसतें. त्या वापरतात त्यांतलें सर्वांत तलम वस्त्र दुकूल; त्यांपैकीं एक इतक्या नाजूक पोताचें आहे कीं त्यांतून तिच्या स्तनांवरील नखक्षत दिसतें. खेडेगांवांत धडोती वाणच जास्त वापरला जाणार हें उघड आहे. णिअंसण, पटक, वत्थ व सिचय हीं वस्त्रें रोजच्या वापरांतलीं आहेत. आपल्या नायिकांना रंगीत वस्त्रें विशेष आवडतात. नवरङ्गक वस्त्रांचा उल्लेख तीनदां आला आहे. नवरङ्गक म्हणजे नवें व म्हणून टवटवीत रंग असलेलें वस्त्र. विटल्यामुळें पुन्हां रंगवलेलें असा याचा अर्थ असेल असें दिसत नाहीं. क्र. ४६१ मधील नवरङ्गक हें नेसतें वस्त्र आहे. वेबर सुचवितो त्याप्रमाणें हा उल्लेख कंचुकीचा नाहीं. क्र. २४१ या गाथेची नायिका हलिकस्नुषा असून नवें वस्त्र नेसल्यामुळें ती इतकी फुगली कीं रस्त्यांत मावेनाशी झाली. बिचारी अल्पसंतुष्ट होती. गांवढ्या गांवांत हीच फुशारकी. शिवाय कोऱ्या लुगड्याचा थोडासा बोंगा होतोच. सणावाराच्या दिवशीं वायनें देण्यासाठीं घरोघर हिंडावयाचें असल्यामुळें या वेळीं नवीं व रंगीत वस्त्रें नेसण्याचा प्रघात (क्र. ३२८) होता. या वस्त्रांचे रंग कोणते होते याचा खुलासा मिळत नाहीं; मात्र हे रंग भडक (क्र. ४६१) होते. पट या वस्त्राला निळा (क्र. ५२०) आणि अंशुक (क्र. ९६५) व दुकूल (क्र. ५६९) यांना लाल

रंग दिलेला आहे. हें आरक्त वस्त्र नववधूचें आहे. क्र. ५४५ मधील कंचुकीला कुसुम्बी व क्र. ६२० मधील कंचुकीला निळा रंग आहे. कुसुम्बी हा उत्सवाचा रंग आहे, विशेषतः मदनोत्सवाचा. हिंदुस्थान हें निळीचें मूलस्थान. म्हणूनच निळीला इंडिगो हें नांव आहे. येथें निळीचा उपयोग फार प्राचीन काळापासून केला जात आहे. हिंदुस्थानांतून निर्यात होणाऱ्या निळीचा उल्लेख प्लिनीनें (XXXV : 25 : 17) केलेला आहे. आजही खेड्यापाड्यांत मुख्यतः निळा व तांबडा हेच रंग स्त्रियांच्या वस्त्रांत दिसून येतात; आणि सुसंस्कृत समाजांतही. लग्नप्रसंगीं वधूवरांना लालभडक वस्त्रें (मृच्छ : १०.४४) नेसवीत; ऋतुसंहारांतल्या नववधूनें आरक्त कंचुकी (६·१९) धारण केलेली आहे. उर्वशीनें (विक्रमोर्वशीय : ५·३) व राधेनें (गीतगोविंद : निर्णय-सागर : पृ. ८१) अभिसरणासाठीं नीलांशुक धारण केलेलें आहे. हीं वस्त्रें केवढीं होतीं ? तीं कशीं नेसलीं जात ?

गाथासप्तशतींत उष्णीषाचा, तसाच उत्तरीयाचा उल्लेख नाहीं. समकालीन शिल्पांत हीं वस्त्रें आढळतात. येथें मात्र त्यांची जागा नेसत्या वस्त्राच्या पदरानें घेतलेली आहे. क्र. १६० व २६९ या गाथांत अनुक्रमें वस्त्रार्धान्त व साहुलि यांचे उल्लेख आलेले आहेत. कर्पूरमञ्जरीतील नायिकेचा पदर राजानें ओढून धरला, तेव्हां तिनें अंग घुसळलें, ती त्याच्या तावडींतून निसटली आणि "वरिल्ल" तेवढें राजाच्या हातीं राहिलें (अंक ३). हें निःसंशय सुटें उत्त-रीय आहे. क्र. १६० मधील नायकाची अशी बोळवण झालेली नाहीं; शिवाय येथील उल्लेख वस्त्रार्धान्त असा स्पष्ट आहे. यावरून हा पदर नेसत्या वस्त्राचाच असला पाहिजे असें ठरतें. क्र. २६९ मधील पदर माथ्यावरून घेतलेला आहे. गाथासप्तशतींतील नायिकांचीं वस्त्रें लांबीरुंदीला तोकडीं होतीं आणि त्यांचें वस्त्रधारण ढिलें व गलथान होतें. क्र. ५०७ व ६०५ या गाथांच्या नायिकांचीं वस्त्रें इतकीं तोकडीं कीं तीं वाऱ्यानें फडफडतांच त्यांच्या जघनांचें दर्शन होतें. अजंट्यांतील स्त्रियांचीं वस्त्रें अशींच तोकडीं आहेत. त्यांच्या जघनांचें दर्शन अतिपरिचित असल्यामुळें या अवयवांत विशेष पाहण्यासारखें कांहीं आहे असें कधींच वाटत नाहीं. गाथासप्तशतींत असे प्रसंग आवर्जून सांगितलेले आहेत. म्हणून ते अपवादात्मक असावेत असें दिसतें. क्र. २४१ मधील वस्त्र

मात्र लांबरुंद असावें असें दिसतें. कारण त्याचा बोंगा झालेला आहे व तें हलिकस्तुषेला दुष्प्राप्य असल्याचें तेथें सांगितलेलें आहे. क्र. १६२ या गाथेंतील नायिकेचें वस्त्रधारण इतकें गलथान कीं भिक्षेकऱ्याला नाभिदर्शन होतें. भरहूत व सांची येथील शिल्पांतलें वस्त्रधारण ह्याच पद्धतीचें आहे. तेथेंही नाभिदर्शन होतें. पण तेथें जो नियम तो येथें अपवाद आहे. येथें तिच्या शैथिल्यावर भावनोद्रेकाची सबब लादण्यांत आलेली आहे. गाथासप्तशतींत नीवीचा किंवा तत्सदृश वस्त्राचा उल्लेख आलेला नाहीं. सातवाहन कालीन शिल्पांत नीवी या वेदकालीन मलवस्त्राचा उपयोग स्त्रीपुरुषांनीं केलेला आढळतो. या काळांत विकच्छ व सकच्छ या दोन्ही परिधानपद्धति प्रचारांत होत्या. पेशावर संग्रहालयांतील हारीति (Handbook of Sculptures in the Peshawar Museum : Pl VII) आणि पहिल्या शतकांतील अझिलिसेस याच्या नाण्यावरील देवता (Catalogue of Coins in the Puniab Museum : Vol I : pl XIII. No. 334) यांचें वस्त्रधारण सकच्छ आहे. अशीं उदाहरणें अन्यत्र ही (Cunningham : Bharhut Tope : Pls : VIII, XIII, XLV; Fergusson : Tree and Serpent Worship : Pls XXV, XXXVII; Ars Asiatica : Vol XVI : Pls VI, XI XIV) आढळतात. नागार्जुनीकोंडा (Archeological Survey Reports : 1930-34 Pls : 39, 40) व अजंठा (Yazdani : History of the Deccan : Vol I. Part VIII : Fine Arts) येथील दासीच्या दर्जाच्या स्त्रियांचें वस्त्रधारण सकच्छ आहे आणि वरिष्ठ वर्गीयांचें विकच्छ. कालिदासानें नीवी ही संज्ञा जघनवासस् (कुमारसंभव : १·३८), वस्त्रधारणार्थ करकचलेली रशना (कुमारसंभव : ३·५७·६२) आणि वस्त्रग्रन्थि (कुमारसंभव : ८·४; मेघदूत : उत्तर : ५) या अर्थांनीं वापरली आहे. 'नीवीबन्धोच्छ्वसितशिथिलं ' या मेघदूतांतील श्लोकांतील नीवीचा अर्थ मल्लिनाथानें ' वसनग्रन्थि ' आणि स्थिरदेवानें ' न्यामविशेष ' असा दिलेला आहे. राजशेखरानें नीवी हा शब्द ' निऱ्यांची गुटिका ' (काव्यमीमांसा : ३·८) या अर्थानें वापरलेला आहे. गाथासप्तशतींतिल (क्र. ६४६) वत्थगण्ठि अशीच असली पाहिजे. क्र. ३५१ मधील नायक वस्त्राची गांठ शोधीत आहे; क्र. ७१८

मधील नायक मार्ग सांपडत नसल्यामुळें गोंधळून गेलेला आहे. हीं वस्त्रें सकच्छ असावीत असें वाटतें. निश्चित अनुमान करतां येत नाहीं. कारण वस्त्रग्रन्थि ही दोन्ही वस्त्रधारणपद्धतींत आवश्यक आहे. क्र. २८९ व ५०३ या गाथांत रजस्वलांची वस्त्रधारणपद्धति सांगितलेली आहे. त्यांवरून ही उलगडा होत नाहीं. फार तर त्या वरचा पदर कमरेभोंवतीं गुंडाळून घेत असत, एवढेंच अनुमान करतां येईल. दासी व नर्तकी यांचीं वस्त्रें सकच्छ व वरिष्ठ वर्गीयांचीं विकच्छ असावींत. यावरून अनुमान होतें कीं चपळ हालचालींना अडथळा होऊं नये म्हणून कनिष्ठ वर्गातील स्त्रियांनीं ही पद्धति सुरू केली; त्यांचीं वस्त्रें रुंदींत तोकडीं होतीं. नंतर सौकर्य व सौंदर्य यांचा प्रत्यय आल्यामुळें वरिष्ठ वर्गातील मर्मज्ञ स्त्रियांनींही (Heringham : Ajanta : Pls. II, X, XI, XIV, XXVIII) तिचा स्वीकार केला: यामुळें परिधानाची रुंदी वाढली. नेसत्या वस्त्रांची लांबी तोकडी असल्यामुळें सकच्छ परिधान पद्धतील प्रथम पदराची जोड नव्हती. कातकरी, वारली वगैरे वन्य आणि कोळी वगैरे किनारी जमातींतल्या स्त्रिया हल्लीं नेसतात तशी वस्त्रधारणपद्धति गाथासप्तशतीच्या काळांत प्रचलित असावी असें वाटतें. हीं वस्त्रें नितंबावर घट्ट बसतात. त्यांच्या अग्रांची गांठ ओटीपोटावर असते आणि वाऱ्याच्या झोताबरोबर वस्त्र फडफडलें कीं मांड्या उघड्या दिसतात.

खरें पाहिलें असतां उल्लेखांच्या संख्येच्या अनुरोधानें कञ्चुकीचा विषय प्रथम हातीं घ्यावयाचा; पण हें वस्त्र उत्तरीय, शिवाय उत्तरकालीन; म्हणून त्याची चर्चा अखेरीस घेतली आहे.

समकालीन शिल्पांतील अनेक स्त्रियांचे स्तन विवस्त्र असल्याचें आढळतें. विवस्त्र प्रतिकृतींचें दर्शन व प्रदर्शन प्राचीन भारतीयांना असभ्य किंवा अश्लील वाटत नसे (Fergusson : Tree and Serpent Worship : pp. 102-103). स्तन हें मातृत्वाचें प्रतीक असल्यामुळें त्यांच्या विवस्त्र प्रदर्शनांत शिष्टाचाराचा भंग होत नाहीं असा प्राचीन शिल्पकारांचा संकेत होता. (Altekar : Dress and Ornaments of Hindu Women : Journal of the Benares Hindu University: Vol. II : No. 3 : p. 408). तत्कालीन स्त्रिया विवस्त्र अवस्थेंत वावरत असाव्यात असें अनु-

मान आपल्याला त्यांवरून काढतां येणार नाहीं. या शिल्पांवरील वस्त्रें रंगांत दाखविलेलीं असावींत, असें त्यांचें समर्थन करावें तर अजंठ्याच्या चित्रपटांत फक्त नीवी धारण करून मिश्र समाजांत वावरणाऱ्या स्त्रिया दृष्टोत्पत्तीस येतात. गाथासप्तशतींतील सर्वच स्त्रिया आणि सर्वदा कञ्चुकी धारण करीत होत्या असें दिसत नाहीं. गलितयौवनांच्या उदरपतित व निराधार पयोधरांचा उल्लेख क्र. ६५२ या गाथेंत आहे. वृद्धा नारी अनिर्बन्धा! क्र. १४५, १५०, ६२४ व ८०७ या गाथांच्या नायिका तरुणी आहेत व त्यांचे स्तन विवस्त्र आहेत. घरांत-कामकाजांत, माजघरांत व अंतर्गृहांत कञ्चुकी वापरण्याचा प्रघात नसावा असें या उल्लेखांवरून वाटते. क्र. ३६९ मधील उल्लेख घराबाहेरचा असावा असें सकृद्दर्शनीं भासतें, पण तो तसा नसावा असा भोंवतालच्या परिस्थिती-वरून निष्कर्ष निघतो. क्र. ८५७ मधील उल्लेख मात्र निःसंशय घराबाहेरचा आहे. नेसत्या वस्त्राप्रमाणें तत्कालीन कंचुकी ही तोकडी असावी: कारण कृष्ण-मेघांतून चंद्रबिंब थोडेसें बाहेर पडावें, तशी नीलकञ्चुकींतून डोकावणारी स्तनाची कोर शोभत आहे असा उल्लेख क्र. ३९५ या गाथेंत आलेला आहे. पण शाकुन्तलांतील सूचनेप्रमाणें हा दोष नायिकेच्या वर्धिष्णु यौवनाचाही असणें संभवनीय आहे. स्त्रियांना उत्सवप्रसंगीं अलंकारानीं सजून मिरवण्याची हौस असते. क्र. ५४५ या गाथेची नायिका ग्रामतरुणी असून अलंकारांचे अभावामुळें खट्टू झालेली आहे. पण तिचे स्तन पुष्ट होते आणि त्यांवर कसलेली कञ्चुकी कुसुम्बी होती. कांहीं गुण सोन्याचा व कांहीं सवागीचा! हें यौवनाचें ठसठशीत आभरण अंगीं असल्यावर त्यावर आणखी अलंकार कशाला? नाहीं तर 'निन्दति कञ्चुककारं प्रायः शुष्कस्तनी नारी!' या वयांत अलंकारांची हौस असते हें खरें, पण त्यांची अडचणही (क्र. ४२९,९८८) याच वयांत विशेष जाणवते. या कञ्चुकीची कटाई कशी होती याचा खुलासा क्र. ६२० या गाथेंत मिळतो. नायिकेनें निळ्या गडद रंगाची कंचुकी धारण केलेली आहे. कवि सांगतो, या कञ्चुकीच्या आवरणांतून मोकळ्या राहिलेल्या दुबेटी फटीं-तून जणूं ती आपल्या यौवनाचा नमुना रसिकांना दाखवीत आहे. यावरून दिसतें कीं ही कञ्चुकी मराठी चोळीसारखी असावी. कारण, चोळीला असतात तसे पंख नसल्यामुळें कांचोळीला मध्यें फट नसते. गउडवहो या प्राकृत काव्यांत असाच उल्लेख आहे :

थण–मज्झ–च्छवि–तारं कुप्पासन्तरमणङ्गणासम्मि ।
उद्धंव लोयणं तिणयणस्स बन्दीकयं जाहिं ॥ ७५७ ॥

या कंचुकीचे बंद बांधल्यानंतर मध्यें मोकळया राहिलेल्या स्थलाला शंकराच्या तृतीय नेत्राची उपमा दिलेली आहे. तिच्या वक्षस्थलावर ठसठशीत तीळ होता कीं इंद्रनील जडवलेलें पदक रुळत होतें तें न कळे. या कंचुकींत व आपल्या चोळींत फरक इतकाच कीं हिच्या अग्रांना बंद आहेत आणि चोळीच्या पाल्यांच्या अग्रांनाच गांठ मारलेली असते. क्र. ६७२ मधील कंचुकी कुडत्या-सारखी शिवलेली असल्यामुळें ती डोक्यावरून काढावी घालावी लागते; म्हणूनच येथें ती काढतांना नायिकेच्या मुखचंद्राच्या सर्व कलांचें दर्शन झालेलें आहे.

कांचोळी, चोळी इत्यादि नांवानें ओळखलीं जाणारीं स्तनांशुकें वापरण्याची प्रथा आपण शकांपासून घेतलेली आहे असा कांहीं संशोधकांचा अभिप्राय आहे (The Vakataka Age : p. 153) बॅक्ट्रियांत या वस्त्राला अद्याप चोल हा शब्द प्रचारांत आहे (Moti Chandra : Indian Costume from the Eerliest Times : p. 44). स्कन्धावर सूक्ष्मग्रन्थि असलेल्या वल्कलांचा उल्लेख शाकुन्तलांत (१·१९) आलेला आहे. भरहूत (Cunningham : Bharhut Tope : fig XV) व सांची (Cataogue of the Museum Pl XXIII) येथील दासींच्या दर्जाच्या स्त्रियांनीं चोळया चढविलेल्या आहेत. अजंठा येथील दरबारी नर्तिकेनें लांब बाह्यांचें कुडतें घातलेलें आहे (Yazdani : Indiani Art of the Buddhist Period : Pl XVI). मालतीमाधवांतील रेशमी चोलक (६·२·८३–८५) झग्यासारखें लांब आहे. गाथासप्तशतींतील कञ्चुकी मात्र तंग आहे असें क्र. ५४५ मधील उल्लेखावरून दिसतें. स्तनांच्या उठावाच्या अनुरोधानें शिवलेली तटतटीत चोळी ही भारतीय स्त्रियांच्या वेषभूषेला महाराष्ट्राची देणगी आहे.

५ अलंकार ।

मर्दानी : **अवअंस** = अवतंस (जम्बूदल) = १८० ; **आहरण** = आभरण (श्री-सहोदर-रत्न) : ९८२ ; कङ्कण (वासुकि) : ६९ ; **कोत्थुह** = कौस्तुभ १५१, ९८२ ; **सेहर** = शेखर : १६.

जनानी = अवअंस (सिंहिपेहुण = मोरपीस) : १७३; **आंहरण (कुवलअ =):** ८२०; **ओमालिआ** = अवमालिका : १९४; **कण्ठिआ** = कण्ठिका (**पोम्मराअ** = पद्मराग : माणिक; **मरगअ** = मरकत : पाचू) : ७५; **कणअडोर** = सोन्याचा करगोटा : २११; **कण्णऊरउप्पल** = कर्णपूरोत्पल : १७६; **कण्णगअचूअमंजरि** = मोहोराची मंजिरी : ८२०; **कण्णरइअ कुवलअ** = कर्णरचित कुवलय : ३२३; **कण्णवअंस** = कर्णावतंस : ४३९; **कण्णाहरण** = ,कर्णाभरण (**इंदणील** = इंद्रनीळाचे डूल) : २०२; **कण्णुप्पल** = कर्णोत्पल : ७१९ ; **कुण्डल (कणअ** = कनक-) ३९८,४४६; **णेउर** = नूपुर : १८८; **तालवेण्ट** = तालवृन्त : ३९८; **धम्मिल्ल** =. गजरा घातलेला खोपा : ९९२; **पसाहण** = प्रसाधन (**गअमो-त्तिअरइअ** = गजमौक्तिकरचित) १७३; **मण्डण** = मण्डन : (**वेहव्व** = वैधव्य व **सोहग्ग** = सौभाग्य) : ६३३; **मेहल** = मेखला (**कसणमणि** = कृष्णमणि-मेखला) : ५७४; **मेहलिआ** = मेखलिका : ४६३ ; **मोहणपिच्छि** मोहन-पिच्छिका = मोरपीस : ५७२; **वलअ** = वलय : ७८०, ८१६, ९२२; **अविहवलक्खण** = अविधवालक्षण : ५३९; **जालवलअ** : जालवलय : ८० : **वलअसद्द** : वलयशब्द : २८३, ३९२, ६८३, ९५३; **वेहव्वमण्डण** = वैधव्यमण्डन : ६२३; **सिढिल वलअ** = शिथिलवलय : १३३, २०५, ४५३, ४९३, ७८० ; **सोहग्गअं** = सौभाग्यकं : ६३३ ; **हार** = ४२९,९८८, ९९० ; **हारलता** : ४४६.

वस्त्रांची लांबीरुंदी व त्यांसाठीं वापरण्यांत येणारा कच्चा माल, त्यांचा पोत व त्यांवरील जरतारी काम आणि त्यांवर होणारे सूचिसंस्कार यांवरून तीं वापरणाऱ्या व्यक्तींच्या व त्या वापरीत असलेल्या समाजाच्या सांपत्तिक व सांस्कृतिक स्थितीबद्दल अनुमानें काढतां येतात. हीं ज्या परिमाणांवरून काढण्यांत येतात तींच अलंकारांनाही लागू पडतात. अलंकार व त्यांची विविधता, त्यांसाठीं वापरण्यांत येणारे धातुरत्नादि पदार्थ आणि त्यांवरील कुसर इत्यादि साधनांवरून अनेक अनुमानें काढतां येतात.

भारतीयांची अलंकारांची आवड सुप्रसिद्ध आहे; गेल्या शतकांत तर ती कुप्रसिद्ध मानण्याइतकी सुशिक्षितांची मजल गेली होती. वैदिक व बौद्ध वाङ्मय आणि रामायण महाभारतादि आद्य आधार ग्रंथ यांत स्त्रीपुरुषांच्या

अनेक अलंकारांचे उल्लेख आलेले आहेत. त्यांतील अनेक संज्ञांचा आर्जा आपणांस स्पष्ट अर्थबोधही होत नाहीं. अलीकडे जागोजाग झालेल्या उत्खननांत कांचेचे, सुवर्णाचे व रत्नजडित असे अनेक अलंकार मिळालेले आहेत. शिवाय बौद्ध शिल्पांवरून तत्कालीन अलंकारांबद्दल स्पष्ट कल्पना होऊं शकते. नाट्यशास्त्रांत (२१ : १० – १२) प्रथम मालाभरणाचें विवरण करून नंतर अलंकारांबद्दल भरत सांगतो :

> चतुर्विधं तु विज्ञेयं देहस्याभरणं बुधै : ।
> आवेध्यं बन्धनीयं च प्रक्षेप्यारोप्यके तथा ।।

अलंकार चार प्रकारचे असतात : १ आवेध्य–शरीराच्या वेधावर धारण करावयाचे–कुण्डलादि; २ बन्धनीय–श्रोणिसूत्रादि; ३ प्रक्षेप्य–नूपुरादि; ४ आरोप्य–हेमसूत्रादि. अलंकारांच्या या सर्व जाती गाथासप्तशतींत आढळतात.

गाथासप्तशतींत आढळणारे मर्दानी अलंकार फक्त देवादिकांनीं धारण केलेले आहेत. क. १६ मधील मुकुट गगनानें धारण केलेला आहे. हा मुकुट रत्नखचित नसावा, शिरावर धारण केलेला शुभ्र पुष्पांचा गुच्छ असावा, असें संदर्भावरून दिसतें. अथर्ववेदांत (५·१३८·३) कुंभाकार शीर्षालंकाराचा उल्लेख आहे. कौस्तुभ (क. १५१) हें श्री-सहोदर-रत्न (क. ९८२) समुद्र-मंथनांतून प्राप्त झालें व तें विष्णूनें हृदयावर धारण केलें; त्याचें तेज सूर्यासमान आहे. वासुकीचें कंकण पशुपतीनें (क. ६९) धारण केलेलें आहे. वासुकि हा कश्यप व कद्रु यांचा पुत्र आणि सर्पांचा अधिपति; हा शंकराच्या शरीरावर असतो. क. १८० च्या हलिक नायकानें कानावर जांभळाची डिकशी ठेवलेली आहे. वस्तुतः हा अलंकार नाहीं, संकेत स्थानाची आलंकारिक सूचना आहे.

यावरून दिसतें कीं गाथासप्तशतीतले पुरुष ग्रामीण व साधेसुधे आहेत. सम-कालीन दक्षिणी शिल्पांतील पुरुषांनींही एवढेच अलंकार धारण केलेले आहेत; कार्ले, कोंडाणें व बेडसें येथील पुरुष-मूर्तींच्या अंगांवर एवढेच अलंकार आढळ-तात. उत्तरकालीन भित्तिचित्रांत, शिल्पांत व साहित्यांत मात्र विविध व प्रभूत मर्दानी अलंकार दिसतात.

पुरुषांच्यापेक्षां स्त्रियांच्या अलंकारांत अधिक महार्हता, रसिकता व विवि-धता दिसून येते. शरिराचा जो जो भाग अलंकारांनीं सजविण्याजोगा तो तो

गाथानायिकांनीं विविध आभरणांनीं अलंकृत केलेला आहे. अलंकार धारण करावयाचे ते केवळ पतीच्या प्रसन्नतेसाठीं, अशी तत्कालीन स्त्रियांची भावना होती; म्हणूनच प्रोषितपतिका अलंकार धारण करीत नाहींत, संकेताप्रमाणें प्रियकर आला नाहीं म्हणजे नायिकेला अलंकार धारण निश्फळ वाटतें आणि अवमानितेला अंगावरील अलंकार बळी देण्यासाठीं सजविलेल्या रेड्याच्या गळ्यांतील माळांसारखे वाटतात !

कडदोरा, कुण्डल व हार हे अलंकार सुवर्णाचे आहेत; पैकीं कांहीं कुण्डलें व हार रत्नखचित आहेत. क्र. ३०२ मधील डूल इन्द्रनीलाचे आहेत. क्र. ७५ मधील कण्ठिकेंत पाचू व माणकें जडविलेलीं आहेत. क्र. ८० मधील जालवलय सुवर्णाचेंच असलें पाहिजे. क्र. ९८८ व ९९० मधील हार सोन्यामोत्यांचे आहेत. क्र. १८८ मधील नूपुर रुप्याचे असावेत. क्र. १७३ मधील नायिकेच्या सवतींनीं धारण केलेल्या अलंकारांत गजगण्डस्थळांतील मोतीं जडविलेलीं आहेत. व्याधांना अशीं मोत्यें शिकारींत उपलब्ध होतात असा कविसंकेत आहे. जंगलांत मोतीं गुंजांच्या जोडीनें सांपडतात (क्र. ३१०) अशी सामान्य जनांची समजूत होती. तरीही गाथासप्तशतींत गुंजांनाच मोतीं म्हटलेलें आहे असें विधान करतां येणार नाहीं. षड्विंश ब्राह्मणांत (५·६) मोत्यांचा उल्लेख आहे. क्र. २ या गाथेंत मोत्यांच्या शिंपलीचा उल्लेख आहे. पाचूच्या सुईनें मोत्यांना वेध घेण्याच्या प्रथेचा उल्लेख क्र. ३९४ या गाथेंत आलेला आहे. अर्थात् गाथासप्तशतीच्या काळांत मोतीं व त्यांपासून सिद्ध केलेले अलंकार अस्तित्वांत होते हें निश्चित. पण त्यांच्या उपलब्धीचीं स्थानें सामान्य जनांना माहीत नव्हतीं. क्र. ५७४ मधील मेखला कृष्णमण्यांची आहे. विशिष्ट जातींच्या प्रस्तर खण्डांना घासून इष्ट तो मण्याचा आकार द्यावयाचा, नंतर त्यावर इष्ट वर्णाला अनुकूल अशी रासायनिक क्रिया करावयाची, अखेर ते भट्टींत भाजावयाचे व कसाला उतरतील ते मणि अलंकारांत वापरावयाचे अशी प्रथा त्या काळीं प्रचलित होती. वन्य जमातींतच नव्हे, नागरिकांतही. या मेखलेंतील मणि याच पद्धतीनें सिद्ध केलेले असावेत.

क्र. १७३ व ५७२ या गाथांच्या नायिकांनीं केशपाशांत आघाडीला मोहक मोरपीस खोंचलेलें आहे. क्र. ९९२ च्या नायिकेनें खोप्यावर गजरा घातला

आहे. क्र. १७६, ३२३ व ७१९ या गाथांच्या नायिकांनीं कानांवर छोटीं कमळें ठेवलेलीं आहेत; आणि कोणी आम्रमंजरी (क्र. ८२०) तर कोणी ताल-वृन्त (क्र. ३९८) धारण केलेले आहेत. यांतूनच शिरोभागीं धारण करावयाचे उत्तरकालीन अलंकार उत्क्रांत झालेले आहेत. सह्याद्रींतल्या वन्य जमाती असे अलंकार आजही धारण करतात.

कोंडाण्याच्या लेण्यांतील स्त्रियांनीं जवळजवळ स्कंधापर्यंत रुळणारें उष्णीष धारण केलेलें आहे. सबब येथें शीर्षालंकारांना वाव नाहीं. कार्ल्यांच्या लेण्यां-तील स्त्रियांनी चंद्रकोर व बिंदी यांसारखे शीर्षावतंस व वर्तुलाकार कुण्डलें धारण केलेलीं आहेत. झाली ती क्रान्ति दरम्यानच्या कालांत झालेली असावी. गाथासप्तशतींतील सुगंधित चिकुरभार (क्र. ५७२), शीर्षावतंस (क्र. १७३) व धम्मिल्ल (क्र. ९९२) हीं आभरणें या क्रान्तीचीं द्योतक आहेत. कालिदासानें उल्लेखिलेलीं (कुमारसंभवः १·४; मेघदूतः उत्तर; ११) मुक्ताजाल व रत्नजाल हीं शीर्षाभरणें आणखी उत्तरकालीन आहेत. या दोन्ही लेण्यांतील स्त्रियांनीं कण्ठिका, वलय, मेखला व नूपुर हे अलंकार धारण केलेले आहेत. त्यांनीं लमाणी धर्तीची वलयांची चवड चढविलेली आहे व त्यांचे नूपुर वाळ्यांच्या धर्तीचे आहेत. गाथासप्तशतींत आढळतात तसे शिखिपिच्छावतंस व धम्मिल्ल अजंट्याच्या भित्तिचित्रांत पहावयास मिळतात. येथील क्र. १ या लेण्यांतील पाठमोऱ्या स्त्रीनें अंबाड्यावर गजरा चढविलेला आहे आणि क्र. १० या लेण्यांतील स्त्रियांनीं सीमंतस्थानीं मोरपिसें लावलेलीं आहेत. कोणी केसांत अनेक अलंकार गुंफले आहेत, कोणीं बाजूबंद बांधले आहेत व कोणीं वलयांना घुंगुर लावले आहेत. हे अलंकार निःसंशय उत्तरकालीन आहेत.

कानांच्या पाळ्यांना वेध घेऊन त्यांत अलंकार अडकविण्याची प्रथा बरीच प्राचीन आहे. शरीरस्वास्थ्यासाठीं कानाच्या पाळीला वेध घेऊन त्यांत औषधी मुळी बसविण्याची योजना सुश्रुतांत सांगितलेली आहे. कर्णछिद्रें व कर्णालंकार यांचा दृष्टीवर चांगला परिणाम होतो हें आतां संशोधकांना मान्य होऊं लागलें आहे. क्र. ७२० या गाथेंत कर्णछिद्राचा उल्लेख आलेला आहे. मौर्य-सातवाहन–कालीन शिल्पांतील कुण्डलें जड व वर्तुळाकार आहेत; मग हा बोजडपणा शिल्पाचा असो किंवा अलंकारांचा. गाथासप्तशतींतील कर्णाभर

त्या मानानें नाजूक आहेत. * त्यांत रत्नेंही जडविलेलीं आहेत. कर्णाभरणांतील रत्नांच्या प्रभेच्या परावर्तनामुळें कपोलांना प्राप्त होणाऱ्या शोभेची कवींना व रसिकांना पूर्ण जाणीव होती.

मौर्य–सातवाहनकालीन मूर्तींच्या मनगटांवरील वलयें जाडजूड आहेत आणि त्यांची संख्याही मोठी आहे. तीं हलक्या वजनांचीं, भारी धातूंचीं व पोकळ असावींत. गाथासप्तशतींतील वलयें नाजूक व सैल आहेत. विरहांत तीं शिथिल होतात आणि अंगविक्षेपासरशीं सशब्द होतात. कंकणरव ही एक काव्य-कणिकाच आहे ! क. ४३८ मधील वलगें प्रेमप्रसंगांत पिचलीं आहेत. तीं कांचेचीच असलीं पाहिजेत. मौर्य–सातवाहनकालीन कांचेच्या रंगीबेरंगी बांगड्यांचे तुकडे उत्खननांत जागोजाग मिळालेले आहेत.

क. ८० मधील जालवलयाचा अर्थ गंगाधरानें 'केशसंमार्जिनी' – फणी असा दिलेला आहे. श्री. राजारामशास्त्री भागवतांनीं तो स्वीकारलेला आहे. पंडित मथुरानाथ शास्त्री यांनीं 'जालप्रधानं वलयम्'– करकङ्कण असा अर्थ दिला आहे. श्री. शिवराममूर्ति (Amaravati Sculptures : p. 112) यांनीही 'जाळीची बांगडी' असाच अर्थ घेतलेला आहे. मीं हाच अर्थ घेतलेला आहे. गाथेंतील संदर्भ आहे तो असा : नायिका न्हात आहे, न्हाण्याला बसण्यापूर्वी तिनें अंगाला हळद लावली होती, पाण्याबरोबर ती ओघळली व जालवलयांत अडकून बसली, तेव्हां तिनें एक किलची घेतली व बांगडींत अडकलेली हळद कोरून काढली. न्हाण्यापूर्वी हरिद्रा अंगाला लावतात, केसांना लावीत नाहींत. केसांना क्वचित प्रसंगीं उटणी लावतात, पण त्यांत हरिद्रा मिसळलेली नसते. सामान्यतः वरिष्ठ वर्गांतील स्त्रिया न्हातांना फणी घेऊन बसत नाहींत किंवा फणीचा उपयोग करीत नाहींत; बहुजनसमाजांतील स्त्रिया मात्र हातीं फणी असल्याशिवाय न्हात नाहींत. स्त्रिया न्हातांना सामान्यतः जाळीच्या बांगड्या काढून ठेवतात हें खरें; पण त्या तशाच राहिलेल्या असल्या तर त्यांच्या जाळींत दंडावरून ओघळलेल्या हरिद्रेचे अवशेष अडकून राहणार हें उघड आहे. बाणाच्या चाण्डालकन्येचें वलय रत्नखचित आहे. अडकलेला मळ काढण्यासाठीं रत्नखचित किंवा जाळीच्या बांगड्या वेळोवेळीं किलचीनें किंवा राठ केसांच्या वर्तिकेनें साफ कराव्या लागतात.

क्र. ४६३ मधील मेखलिका जघनांवर ओघळलेली आहे. कार्ल्यांच्या लेण्यांतील जवनिकेवरील स्त्रियांच्या मेखला अशाच आहेत. या मेखला गोल मण्यांच्या व पांच पदरी आहेत. वज्रटीकेचे सर एकामेकांपासून अलग होऊं नयेत म्हणून ते आंतल्या आंगच्या गादीला शिवलेले असतात. तशीच योजना मेखलेच्या सरांसाठीं केलेली असावी. मेखला आणखी खालीं ओघळूं नये म्हणून आघाडीच्या पदकांत गुंफलेले आणखी कांहीं सर कमरेवरून घेण्यांत येत असत, असें कार्ल्याच्या लेण्यांतील नृत्ययुग्मावरून स्पष्ट दिसतें. उत्तरकालांत या मेखला रत्नखचित व रुणझुणणाऱ्या झाल्या. क्र. २११ मधील नायिकेनें कनकडोर धारण केलेला आहे. नेसत्या वस्त्राची ग्रंथि, निऱ्यांचें आघाडीचें केळें किंवा कासोट्याची पट्टी कडदोऱ्याला फिरकी देऊन पक्की केलेली असते. संपन्न ग्रामीण तरुण व क्वचित् उनाड ग्रामीण नर्तिका असे कडदोरे हल्लींही धारण करतात.

६. आरोग्य

गाथासप्तशतींतील जनता सामान्यतः निरोगी आहे. जर=ज्वर (क्र. ५०, ५१, २५९, ८०८) आणि सलोहिय पित्त = रक्तपित्त (क्र. ५६२) या दोनच आजारांचें उल्लेख आलेले आहेत. ज्वरामुळें क्र. ५१ च्या नायिकेच्या अंगाला दुर्गंध येत आहे: तिला हा ज्वर अपचनामुळें, अमांशामुळें अगर जागरणामुळें आलेला आहे. मारखो तहान लागणें, अंगाची लाही होणें, अंगावर वारंवार कांटा उभा राहणें, अन्नावर वासना नसणें व जीव कासावीस होणें ही मुरलेल्या ज्वराचीं लक्षणें क्र. ८०८ या गाथेंत नमूद केलेली आहेत. वस्तुतः हीं लक्षणें कामज्वराची आहेत. क्र. २५९ मधील ज्वराचा उल्लेख आजाराचा द्योतक नसून लैङ्गिक सुखप्राप्तीच्या दृष्टीनें केलेला आहे. क्र. ६६७ मध्यें रातांधळ्याचा उल्लेख आहे. ही विकृति मोठी सोईस्कर आहे. विशेषतः प्रवासांत परगृहीं पथारी पसरणाऱ्या पाहुण्यांना सोईस्कर. कारण व्याधि आहे म्हटलें तर आहे, नाहीं म्हटलें तर नाहीं; रोगाचा पुरावा कांहीच नाहीं आणि त्यावर औषधही नाहीं; पण त्याचीं लक्षणें मात्र मोठीं अवलक्षणी! प्राचीन व मध्ययुगीन, प्राकृत व संस्कृत कवींनीं या लक्षणांवरून या विकृतीला संकेताचें स्वरूप दिलेलें आहे. रतिअंधिल याचा अर्थ कामांध असाही घेतां येईल. पाहुण्याचें लक्षण पाहून नायिकेनें व्याधीचें निदान केलें! रुग्णाचा समाचार हा शिष्टाचार

(क्र. ५०, ५१, ३१७) पाळला जात असे. गाथासप्तशतींत सर्प पुष्कळ आहेत. विषारी सर्पही आहेत. पण त्यांनीं कोणाला दंश केलेला नाहीं. क्र. २३७ च्या नायिकेला विंचू चावला आहे; दंडावर; दरवाजाच्या बाहीला टेकून बिचारी कोणाची तरी वाट पहात होती. तेवढ्यांत या दुष्टानें दावा साधला ! कीं कंगोऱ्यांत विंचू आहे हें पाहून तिनें संधि साधली ? दोन्ही हात झटकणें हें मात्र ढोंग आहे.

गाथासप्तशतींत वैद्य (क्र. २३७, ३६३, ६००, ८०८) आहेत. सामान्यतः रुग्णांना वैद्याकडे (क्र. २३७) नेतात. दरिद्री गांवांत (क्र. ६००) वैद्य नसावेत असें दिसतें. औषधांपैकीं (क्र. २७०, ३१७, ३३६, ४५८, ५५०, ८४१) संजीवनौषधि (क्र. ३३६) सांकेतिक आहे आणि जखमेवरील पट्टी (क्र. ४५८) सूचित आहे. जखमेवर मलम आणि रुसव्यावर मदिरा हीं औषधें सर्वांना माहीत होतीं. क्र. ३१७ मधील उल्लेखावरून दिसतें कीं रुग्णाला काढा गरम करून देत असत आणि पिण्याला तापवून गार केलेलें पाणी (क्र. ५३) देत असत. क्र. ८४१ मधील रसायन कामोत्तेजक असावें असें वाटतें. कारण त्यामुळें चित्त अस्वस्थ झालेलें आहे.

जाती व जातीयता :

जात म्हणजे जन्मसिद्ध गट; वर्ण, वास्तव्य व व्यवसाय आणि श्रुति, स्मृति व संस्कृति यांशीं संबद्ध. जातीयता म्हणजे एतद्विषयक अभिनिवेश व अनेक स्वरूपांत व्यक्त होणारी श्रेष्ठ कनिष्ठ भावना.

समाजाचें अस्तित्व व स्वास्थ्य सहजीवनावर अवलंबून असल्यामुळें या भावना सामान्यतः सुप्तावस्थेंत असतात. स्पर्धेमुळें सहजीवनाचा तोल ढळतो तेव्हां त्या व्यक्त होतात.

सामान्यतः लोकवाङ्मयांत असे विषय उल्लेखिले किंवा चर्चिले जात नाहींत. अधून मधून अस्पष्ट व ओझरते उल्लेख होतात; अभावितपणें कुचाळीसाठीं किंवा वेदना व्यक्त करण्यासाठीं.

वैदिक वाङ्मयांत चातुर्वर्ण्यसिद्धान्त आहे; आणि स्पर्धाजन्य श्रेष्ठकनिष्ठ भाव ही. पण समाजाचें जातींत वर्गीकरण झालेलें नाहीं. पुढें वसाहतींचें क्षेत्र विस्तृत

झालें; पाखंडांची स्पर्धा जाणवूं लागली; परक्यांचीं आक्रमणें आलीं व हिंदी धर्माचा स्वीकार करून स्थिरावलीं. यामुळें समाजाचें स्वरूप विराट् व संकीर्ण झालें आणि विविध समस्या निर्माण झाल्या. अशा परिस्थितींत व तिच्या अनुरोधानें स्मृतिकारांनीं अनेक योजना आंखल्या. मूलतः त्या संकलनात्मक होत्या, पण विकृत परिस्थितीमुळें त्यांचें पर्यवसान विघटनेंत झालें. मूलभूत चातुर्वर्ण्य सिद्धान्तांतून संकर-सिद्धान्त निर्माण झाला. मूलतः हा सिद्धान्तही भिन्न व मिश्र जातीयांना चार्तुवर्ण्यांत व आर्य संस्कृतीच्या कक्षेंत समाविष्ट करण्यासाठींच प्रतिपादन करण्यांत आलेला असावा. परंतु परिस्थितीच्या प्रादुर्भावामुळें, संकराच्या संभाव्य परिणामांच्या धास्तीमुळें आणि पोटभरू भिक्षुकांच्या हेकटपणामुळें जातींच्या मर्यादा अलंघ्य झाल्या आणि वर्गी-करणाचें पर्यवसान विभक्तीकरणांत झालें.

पुरातत्त्वभूषण श्री. राजवाडे यानीं राधामाधवविलासचंपूच्या प्रस्तावनेंत पाणिनि (शकपूर्व सुमारें १०००) व पतंजलि (शकपूर्व सुमारें २००) यांच्या काळांतली सामाजिक परिस्थिति विस्तारानें वर्णिली आहे. ती येथें कारणापुरती व संक्षेपानें देतों.

पाणिनीच्या काळीं चार वर्ण होते, परंतु ते पक्के जाति झाले नव्हते. षट्-कर्माधिकारी ब्राह्मण हे राजांचे पुरोहित असत; प्रसंगविशेषीं ते राजांना पदच्युत किंवा पदाधिष्ठित करीत. सर्वच ब्राह्मण कुलशीलवान् , विद्वान् किंवा अग्निकर्मरत नसत. क्षत्रिय हा सामान्य वाचक शब्द असून राजन्य हा अभि-षिक्तवंश्य क्षत्रियांचा वाचक असे. क्षत्रियांचा एकच धंदा, देशसंरक्षण करण्या-साठीं लढण्याचा. पुरोहिताचें जें प्रवराध्यायप्रसिद्ध गोत्र तेंच क्षत्रियाचें असे. कृषि, पाशुपाल्य व वाणिज्य हे त्रिकर्माधिकारी वैश्यांचे धंदे. शूद्र केवळ उच्च प्रकारचे पशु गणले जात. शूद्र दोन प्रकारचे असत. अनिरवसित, म्हणजे आंत येण्याचे निःशेष बंद न केलेले, चातुर्वर्ण्यांत अंशतः समाविष्ट केलेले, समाजाच्या कमीजास्त उपयोगी पडणारे; उदाः सुतार, लोहार वगैरे; निरवसित, आंत येण्याचे निःशेष बंद केलेले, समाजाच्या उपयोगी न पडणारे; उदाः चंडाल, निषाद वगैरे. वंश दोन प्रकारचे असत. मातृवंश व पितृवंश; पैकीं मातृवंशपद्धति कुत्सित मानली जाऊं लागली होती. अनार्य व अब्राह्मण स्त्रियांन

आर्य व ब्राह्मणें करून घेण्याची चाल पाणिनीय कालाच्या पूर्वी केव्हां तरी अस्तित्वांत होती. सपत्नीकत्वाची चाल होती. शूद्र वर्णांतील स्त्रीला इतर वर्ण भार्या करीत. ब्राह्मण स्त्रीला क्षत्रिय व वैश्य भार्या करीत. वर्णबाह्य भार्यांना पत्नी हें सन्मान्य पद मिळत नसे. पत्नीला यज्ञकर्मांत पतीच्या बरोबरीनें सहाधिकार असे. वर्गावर्गातील संबंध गौण समजला जाऊं लागला होता, पण संकरजाति स्वतंत्रपणें अस्तित्वांत आल्या नव्हत्या. सामान्यतः चातुर्वर्णिक समाज ब्राह्मणांचा अनुयायी होता. पाणिनि व पतंजलि यांच्या दरम्यानच्या काळांत सामाजिक परिस्थितींत ठळक फेरफार झाले; बौद्ध, जैन वगैरे सनातनधर्मद्वेष्ट्या लोकांचा समाजांत सुळसुळाट झाला. क्षत्रियवैश्यांपैकीं कांहीं बुद्धजिनानुयायी बनले आणि कांहीं यज्ञादि वैदिक क्रियांचा लोप झाल्यामुळें वृषल, म्हणजे शूद्रसम बनले. क्रियाकर्मांतर व धर्मधर्मांतर या बाबतींत जें परिवर्तन झालें त्याचीं मुळें स्त्रिया व शूद्र यांच्याशीं ब्राह्मणक्षत्रियवैश्यादि त्रैवर्णिकांचें शेंकडों वर्षे जें वर्तन घडत येत होतें त्यांत गुरफटलेलीं आहेत. अनार्यांचा समूळ विध्वंस अशक्य आहे हें आर्यांच्या प्रत्ययास आलें. कांहीं अनार्य आर्यांच्या उपयोगी पडतात व आर्यधर्माविषयीं आदर बाळगतात हें निदर्शनास आल्यावर आर्यांनीं शूद्राला वर्णव्यवस्थेंत नियतस्थान दिलें, याहून जास्त लगट राजरोस करूं दिली नाहीं. त्रैवर्णिक स्त्रीकडे त्यानें डोळे वर करून पाहिलेलेंही खपत नसे. कालांतरानें या दुराभावांत फरक पडला. तोंड वैश्यद्वारां पडलें. घरींदारीं, शेतवाडींत, हाटबाजारांत सर्व व्यवहार शूद्र साहाय्यानें होई. अर्थात् शूद्रांतील नरमाद्यांचा वैश्यगृहांतील स्त्रीपुरुषांशी एकान्तीं लोकान्तीं संबंध पडे आणि अधर्म्य शरीरसंबंध होई. ब्राह्मण क्षत्रिय समाजांत हा चोरटा व्यवहार थट्टेचा विषय होऊन बसला होता. अश्वमेधाची प्रक्रिया चालू असतां क्षत्ता म्हणतो. शूद्रीण वैश्याशीं चोरून रत होते, तेव्हां तिचें समाधान म्हणून होत नाहीं; यावर पालागली म्हणते, शूद्र पुरुष वैश्य स्त्रीशीं रममाण होतो तेव्हां त्याची तरी तृप्ति कोठें होते? कालांतरानें या असद्व्यवहाराचा फैलाव क्षत्रियांत व ब्राह्मणांतहि पसरला. हें पाहून तत्कालीन प्रशासकांनीं त्रैवर्णिकांना शूद्रस्त्रियांशीं विवाह करण्याची परवानगी दिली. पाणिनी काळापर्यंत त्यांचीं अपत्यें पितृजातीय समजत. यामुळें पितृसवर्ण शुक्र व मातृसवर्ण कृष्ण असे दोन

रंगाचे ब्राह्मण दिसूं लागले. कृष्ण वर्णीयांचा कैवारी वैशंपायन आणि शुक्लवर्णी यांचा पुरस्कर्ता याज्ञवल्क्य या मामेभाच्यांची स्पर्धा हें ब्राह्मणांतील या दोन वर्णांच्या वैमनस्याचें व स्पर्धेचें प्रतीक आहे. हें भांडण पाणिनीपूर्वी मुळींच घडलें असावें. पुढें जैन बौद्धांनीं चातुर्वर्ण्यव्यवस्था मोडून सर्वांची एकजात व एकसमता करण्याचा उपदेश व उद्योग आरंभला, यज्ञयागांना दुष्ट ठरविलें, शूद्रादि लोकांना न समजणाऱ्या संस्कृत भाषेला काट दिला आणि समजणाऱ्या प्राकृत भाषांचा पुरस्कार केला आणि शुद्ध त्रैवर्णिकांची व सामान्य प्राकृत जनतेची ताटातूट करून टाकली. बहिष्कारामुळें बौद्धांच्या संख्येंत भर पडूं लागली. म्हणून त्रैवर्णिकांनीं निष्कासनाचा मार्ग न धरतां शूद्रनियमनाचा उपाय पत्करला. आणि शूद्रस्त्रीजन्य अपत्यें पितृसवर्ण न समजतां मातृसवर्ण मानावींत असा कायदा केला. पण कमीपणा येतो म्हणून मातृवर्णही त्यांना आपल्यांत सामील करून घेईना. म्हणून स्वतंत्र जाति निर्माण झाल्या. साम्राज्य-सत्ता शूद्रवर्णी नंदांच्या हातीं गेली तेव्हां ब्राह्मणसंस्कृतीची दैना झाली. वृषल मौर्यांच्या अमदानीत बौद्ध धर्माला राजसत्तेचा पाठिंबा मिळाला. शुंग, काण्वायन व शातवाहन या घराण्यांच्या राजवटींत ब्राह्मणधर्मानें डोकें वर काढलें व गुप्तांच्या कारकीर्दीत बौद्ध धर्मावर पूर्ण विजय मिळविला. यामुळें संस्कृत भाषा व यज्ञयाग ह्यांची समाजांत पुन्हां स्थापना झाली.

विख्यात जर्मन प्राच्यपंडित श्री. रिचर्ड फिक् यांच्या Die Sociale Gliederung im Nordostlichen Indien zu Buddhas Zeit या ग्रंथाचें मराठी भाषांतर "बुद्धकालीन भारतीय समाज" श्री. कालेलकर यांनीं केलेलें आहे. त्यांतून प्रस्तुत विषयापुरती माहिती संक्षेपानें देतों.

पूर्व भारत ही जैन व बौद्ध धर्मांची जन्मभूमि. या भागांतील बहुजनसमाज वैदिक संस्कृतीच्या निकट सहवासांत कधींच आला नाहीं. या प्रदेशांतील क्षत्रिय अधिपति हे मूळचे अनार्य असावेत. चातुर्वर्ण्यसिद्धान्त हा स्वयंसिद्ध असल्याचें पालि धर्मग्रंथकारांना व जातकांच्या लेखकांना मान्य आहे. त्यांचा विरोध आहे तो केवळ जन्मावरून ब्राह्मणांनीं समाजाचे नेते म्हणून मिरवण्याला. ब्राह्मणांचें स्थान श्रमणांनीं घेतलें इतकेंच.* क्षत्रिय हे राजसत्तेचे प्रतिनिधि. बौद्ध संघटनेंत त्यांना अग्रस्थान मिळालें. यामुळें क्षत्रिय हे ब्राह्मणांशीं उद्धट-

घणानें वागूं लागेल. खुद्द बुद्धानें वैस्स व सुद्द जातींत कधींही जन्म घेतलेला नाहीं, सर्वोच्च अशा क्षत्रिय किंवा ब्राह्मण जातींतच जन्म घेतलेला आहे. बुद्धकाळांत प्रतिष्ठित मध्यम वर्ग अस्तित्वांत आला व वैश्यांना विशेष महत्त्व प्राप्त झालें, त्यांची संपन्नता वृद्धिंगत झाली व समाजांतलें स्थानही उंचावलें. धर्मशास्त्रांतील चातुर्वर्ण्य व वर्णसंकरामुळें उत्पन्न होणाऱ्या जाती यांबद्दल जातकांत कांहींच उल्लेख नाहीं. व्यापारी व कारागीर, हल्के धंदे करणारे लोक व अनार्य मानववंश हे मात्र गुणविशेषांमुळें जातींच्या मदरांत येण्यासारखे आहेत.

या विवेचनाच्या अनुरोधानें गाथासप्तशतींतील वर्ग व वर्ण विषयक उल्लेखांची पाहणी करावयाची आहे.

गाथासप्तशतींत आर्य नाहींत. आर्य म्हणजे शिष्ट, विशिष्ट प्रकारानें यजन करणारे लोक. बहुजनसमाजाशीं व ग्रामीण जीवनाशीं त्यांचा संबंध क्वचितच येणार. शिवाय या काळांत त्यांचें माहात्म्य नष्टप्राय झालेलें होतें. गाथासप्तशतींत आर्य नसले तरी आर्या मात्र अनेक आहेत.

अज्जा–आर्या : क. ७९, १५०, १७०, १७२, १९८, २४९, ३६०, ३७९, ३९५: ५७२, ६८३, ७९७, ८३२, ८५२. ही संज्ञा अनेक अर्थांनीं व ढिलाईनें वापरलेली आहे.

क. १७२ मधील अज्जा ही ग्राम किंवा ग्रामीण देवता आहे. क. ७९, २४९, ३६०, ३७९, ५७२, ७९७ व ८५२ या गाथांमधील अज्जा या शब्दाचा अर्थ कांहीं टीकाकारांनीं आढ्या – उच्च व संपन्न कुलोत्पन्ना असा दिलेला आहे. यांपैकीं क. ७९, २४९, ३६० व ३७९ या गाथांतील आर्यांचीं लक्षणें या अर्थाला साजेशीं आहेत. क. ३७९ मधील आर्येला असती, तरुणी इत्यादि पाठभेद भिन्न हस्तलिखितांत दिलेले आहेत. हिलाच असती कां म्हणावयाचें याचा मात्र खुलासा होत नाहीं. क. २३७, ५७२, ६८७, व ७९७ मधील अज्जा या फक्त पाठभेदांत आलेल्या आहे. स्वीकृत पाठांत त्यांना अनुक्रमें बाला, मुग्धा, वधू व विलासिनी म्हटलेलें आहे. क. १७० व १८९ मधील आर्या या पतिव्रता आहेत. आणि पाठभेदांतील आर्या वगळल्या असतां क. १९८, २४९, ३६०, ३७९ व ८५२ मधील आर्या या असती आहेत.

क. ७९, १५० ३६० व ३७९ या गाथांतील आर्या नायिकांना त्यांच्या

वरिष्ठ दर्जाची जाणीव आहे किंवा त्यांचा दर्जा गाथाकवींना अभिप्रेत आहे असें दिसतें. क्र. ७९ या गाथेंतील आर्येला अनेक सवती आहेत. या सवती सणासुदीच्या दिवशीं सुगंधी जलानें न्हाऊन व वस्त्रालंकारांनीं नटून सज्ज झाल्या आहेत, पण आर्येनें–श्रेष्ठ किंवा धर्मपत्नीनें मात्र स्नानाविषयीं अनादर दाखविलेला आहे. या वृत्तीचीं अनेक कारणें संभवतात. या आर्येला आपल्या वरिष्ठ दर्जाची जाणीव आहे आणि ती तिनें संयमानें, पण स्पष्टपणें व्यक्त केलेली आहे. ही आर्या गलितयौवना असेल व या सवती बहुधा बहुजनसमाजांतील असतील. त्यांच्या यौवनावर लुब्ध होऊन आसक्त आर्यानें त्यांशीं प्रतिलोम विवाह केले असतील आणि त्यांचें साहचर्य आर्या नाईलाजानें सहन करीत असेल. किंवा हा सण शिष्टसंमत नसल्यामुळें कनिष्ठ वर्गांत रूढ असलेल्या त्या दिवशींच्या रिवाजापासून ती अलिप्त राहिली असेल. किंवा तरुण सवतींच्या नाचरेपणाचा तिला निःशब्द निषेध करावयाचा असेल. किंवा या सवती पतीशीं सवर्ण असून ही एकटी उच्च वर्णाची असल्यामुळें प्राप्त परिस्थितीबद्दल तिला खंत वाटत असेल; कोणताहि पर्याय स्वीकारला तरी त्याला आर्येचें हें ना तें वैशिष्ट्य अभिप्रेत असल्याचें स्पष्ट दिसतें. क्र. ११० मधील आर्येचे नेत्र निळे आहेत. निळे डोळे हे थंड पठारावरून आलेल्या व वंशशास्त्रान्वयें वरिष्ठ दर्जाच्या लोकांचें एक वैशिष्ट्य मानण्यांत येतें. बहुजनसमाजांतील लोकांचे डोळे काळे किंवा अन्यवर्णमिश्रित काळसर असतात. म्हणून निळ्या डोळ्यांची अपूर्वाई वाटते. नील नेत्र हे अनेक अन्य गाथांतही सौंदर्यलक्षण म्हणून नमूद केलेले आहे; पण निळा बुबुळें असलेल्या अन्य नायिकांना आर्या म्हटलेलें नाहीं. क्र. ३६० या गाथेतील आर्या नायिकेचा हालिकानें नुक्ताच उपभोग घेतलेला आहे. त्याचा अडाणी आवेग व तिचें सुसंस्कृत सौकुमार्य हीं वैशिष्ट्यें श्रेष्ठ-कनिष्ठ भावानें या गाथेला अभिप्रेत आहेत असें दिसतें. क्र. ३७९ या गाथेंतील घरंदाज आर्येला रात्री मुक्कामाला आलेल्या अपरिचित व सामान्य पथिकाबद्दल तिरस्कार वाटला, पण या वृत्तीबद्दल तिला पुढें पश्चात्ताप झालेला आहे.

या आर्यांचे अंगीं आपल्या दर्जाबद्दल अभिमान आहे, पण दर्प नाहीं. द्विजांपैकीं किंवा त्रैवर्णिकांपैकीं त्या कोणत्या वर्णाच्या आहेत याबद्दल अनुमान करण्याला कांहीं साधन नाहीं.

आहिर–अभीर, आभीर : क्र. ८०५ : हा उल्लेख उत्तरार्धांतला आणि

एकच एक असला तरी त्यावरून व इतिहासावरूनही गाथासप्तशतीच्या काळांत महाराष्ट्रांत त्यांचा नुक्ताच प्रवेश होऊं लागलेला असावा असें अनुमान करतां येतें. सिंध (पतंजलि), राजस्तान व सौराष्ट्र (महाभारत), माळवा (क्षत्रप) व महाराष्ट्र (सातवाहन) या मार्गानें व त्या त्या काळांत त्यांचें आक्रमक परिभ्रमण झालेलें आहे. अभीर हे एतद्देशीय कीं परदेशी ? श्री. स्मिथ (Early History of India ; p. 290) सांगतात कीं ते परदेशी आहेत. आणि श्री. कनकसभे (Tamil Land 1800 Years Ago : p. 57.) सांगतात कीं ते एतद्देशीय आहेत. कसे ही असोत, महाराष्ट्रांतलें त्यांचें आगमन अल्प प्रमाणांत शकांच्या आगेमागें, म्हणजे शकपूर्व पहिल्या किंवा शकोत्तर पहिल्या शतकांत झालेलें आहे. मौर्य व क्षत्रपांचे राजवटींत हे त्यांचे सैन्यांत होते. त्यांनीं तिसऱ्या शतकांत सातवाहनांचा महाराष्ट्रांत पाडाव केला. सातवाहनोत्तर कालांत ते वाकाटकांचे माण्डलिक झाले आणि कदम्बांनीं त्यांचा उच्छेद केला अडदांडपणाबद्दल ते पूर्वीपासून प्रसिद्ध आहेत. ज्यांनीं अर्जुनाचा काफिला लुटला ते काय रानावनांत एकाकी अबलेचा विनयभंग करण्याला डरणार ? भाषेंत मुजोरी व कृतींत बळजोरी यांशिवाय सहनशील समाजांतही नवागतांचा निभाव लागत नाहीं. क. ८०५ या गाथेंतील अहीराची वृत्ति अशीच आहे. शक आले तसे गेले किंवा नामशेष झाले. अल्पसंख्य असल्यामुळें बहुजनसमाजांत सामावून गेले. गाथासप्तशतींतल्या लोकगीतांत त्यांचा उल्लेख आढळत नाहीं. त्या अर्थी ते खेड्यापाड्यापर्यंत पोचले नसावेत. अहीर मात्र गोपाल असल्यामुळें खेड्यांपर्यंत पोंचले. त्यांच्या व यादवांच्या साहचर्यामुळें व परिभ्रमणामुळें बहुजनसमाजांत प्रसृत झालेल्या कृष्णकथांचा परामर्श या पूर्वीच घेतलेला आहे. अहीर व यादव हे आरंभीं मुख्यत्वेंकरून गोदावरीच्या परिसरांत, उत्तर भागांत, मोठ्या संख्येंत स्थायिक झाले. आजही त्यांची वस्ती व छाप या भागावर, येथील भाषेवर आहे. या भागांतील ब्राह्मणांपैकीं बहुसंख्य माध्यंदिन शाखीय आहेत. त्यांपैकीं ज्यांनीं अभीरांचें पौरोहित्य पत्करलें त्यांना अभीर ब्राह्मण हें अभिधान प्राप्त (खान्देश वऱ्हाडांतील माध्यंदिन शाखा प्रकरण : श्री. शंकर गोपाळ जोशी : पृ. ६५) झालें. स्मृतिकारांनीं जातींच्या कोष्टकांत अभीरांचा समावेश केला तेव्हां त्यांना स्थान दिलें तें असें : ब्राह्मण पुरुष × वैश्य स्त्री. = अंबष्ठ; ब्राह्मण पुरुष × अंबष्ठ स्त्री = अभीर. हें समीकरण

बनावट आहे हें उघड आहे. तरीही संकरसंकेतांत यांचें स्थान बरेंच उच्च दर्जाचें आहे.

खाडिअ : खट्टिअ : क्र. ६८० : (दे. ना. २. ७०) = खाटिक : या उल्लेखाला जातीयतेचा गंध नाहीं, पण या काळांत जातीय समजला जाण्याइतका हा धंदा विशिष्ट वर्गाच्या हातीं होता.

गोप : क्र. ६३७; **गोवी** : क्र. ११२ (व्रजवधू), ११४, १२८, ६५५, ६९०, ६९१. (कलमगोपी), ७२६ (**पिंडार**). हे उल्लेख जातीचे द्योतक असावेत असें दिसत नाहीं. असलेच तर ते अहीरांचे असावेत. पाइअसद्दमहण्णवांत या शब्दांचे दिलेले अर्थ आहेत ते असे. गोव = गौओं का रक्षक, ग्वाला; गोवी = (दे. ना : २-९६) कन्या, कुमारी, बाला, लडकी; आणि गोपाङ्गना अहीरीन. अहीर हे अडदांड, कष्टाळू, निर्भय व सशक्त म्हणून आज ही प्रसिद्ध आहेत. म्हणूनच क्र. ८०५ मध्यें त्यांजकडे कपाशीच्या राखणीचें काम दिलेलें आहे. आणि क्र. ६९० व ६९१ मध्यें गोपीकडे भातशेतींतलीं कष्टाचीं कामें. ही मंडळी रोजंदारीवर काम करणारी दिसतात. क्र. ६३७ मधील गोप हा गोदोहनांत कुशल आहे. येथें त्यांचें हस्तकौशल्य आणि पर्यायानें लैङ्गिक उपचारचातुर्य वर्णिलेलें आहे. पटाईत गवळी गोदोहनासाठीं घरोघर जात असत असेंही यावरून दिसतें. गाथांतील गोपींचे अंगीं असलेलें कामकलानैपुण्य व लालित्य मोहविणारें आहे. क्र. ११२ व ११४ मधील गोपी कृष्णाभोंवतीं घोटाळत आहेत. क्र. ११४ मधील गोपीचें नर्तननैपुण्य व त्यांपैकीं एकीचें चुंबनचातुर्य वर्णिलेलें आहे. स्त्रियांची अझूनही प्रचलित असलेली गरबा, फेर यांसारखीं संघनृत्यें ही भारताच्या संस्कृतिला गोपींची देणगी आहे. क्र. १२८ मधील गोपी हृदय विद्ध करणारीं विरहगीतें गात आहेत. क्र. ६९० मधील गोपींचें पाऊल तिरपें पडलेलें आहे; नखऱ्यामुळं असो किंवा चिखलामुळें असो, तिरपें असो किंवा वांकडें असो, आठवण ठेवण्याजोगें, एवढें खास. रांगड्या बहुजनसमाजांत हीं लक्षणें उठून दिसतात. म्हणूनच त्यांचें लालित्य काव्यबद्ध झालेलें आहे. क्र. ७२६ मधील पिंडार, पेंडार हाही गवळीच आहे. देशीनाममालेंत पिंडार याचा अर्थ ' गोपाल, महिषपाल ' असा दिलेला आहे. सरस्वतीकण्ठाभरणांत पिंडार याला प्रतिशब्द ' अहीर ' असा दिलेला आहे. कृष्णाच्या संवगड्यांत पेंद्या नेहमीं आढळतो. हें व्यक्तिनाम पिंडार, पेंडार यांवरून तर

निघालेलें नसेल ! क्र. ७२६ मधील पिंडार हा स्वतः गोपालन करणारा आहे. या गाथेंतील न्याहारी आणणाऱ्या त्याच्या कारभारणीच्या उल्लेखावरून दिसतें कीं त्याची गोशाळा त्याच्या राहत्या घरापासून बरीच दूर असावी. पाठभेदावरून दिसतें कीं कुरणांतील गोठ्यांत पतिपत्नींनीं जोडीनें काम करण्याचा रिवाज होता. गोष्ठ या शब्दाचा गायरान असाही अर्थ (ऐ. ब्रा. ३.१८.१४; वा. सं : ३.२१) आहे.

चण्डाल : क्र. २२७, ८०४. क्र. २२७ मधील पानकुटीचा अर्थ कांहीं टीकाकारांनीं चण्डालकुटी असा दिला आहे आणि कांहींनीं पानकुटी. क्र. ८०४ मध्यें चण्डालाच्या हातीं मैना लागलेली आहे. अथर्व वेदांत चण्डाल ही जमात मागासलेली आहे आणि वाजसनेयि संहितेत अस्पृश्य मानलेली आहे. चण्डाल हा संकरज जातिविशेष शूद्र पुरुष व ब्राह्मण स्त्री यांपासून निपजलेला: म्हणून ब्राह्मणांना असह्य आणि ब्राह्मणी वर्चस्व असलेल्या समाजांतून बहिष्कृत. मनु (१०·५०-५५) सांगतो : चाण्डालांनी ग्रामाबाहेर रहावें. दिवसा राजाच्या परवानगीने व चिन्हांनीं युक्त होऊन ग्रामांत कामकाजानिमित्त यावें आणि रात्रीं ग्रामांत येऊं किंवा राहूं नये. दारू गाळणें व विकणें आणि पांखरें पकडून तीं विकणें हे चण्डालांचे व्यवसाय. हे व्यवसाय निषिद्ध किंवा निर्दय: म्हणून बहुजनसमाजांतही ते तिरस्कृत. जातकांतही चाण्डालांची अवस्था अशीच आहे: अधमता व हीनता यांची द्योतक म्हणून ही संज्ञा जातकांत अनेकदां योजलेली आहे. श्री. फिक् (पूर्वोक्त : पृ. ५८) सांगतात. "हीन जातीयांना पब्बज्जा स्वीकारण्याचा अधिकार असला व जातकांमध्यें चण्डाल पब्बजितांचा उल्लेख असला तरी त्यांचा आर्यांशीं संबंध येऊं न देण्याबद्दल जे निर्बंध घालण्यांत आले होते त्यांमुळें आध्यात्मिक उन्नतीला ते पारखे झाले होते." चण्डाल या अनार्य जातीबद्दलच्या वरिष्ठ वर्गाच्या भावना बुद्धपूर्वकालीन आहेत आणि ब्राह्मण क्षत्रियांनीं घालून दिलेल्या मर्यादा बौद्धांनीही उल्लंघिल्या नाहींत.

चण्डिल : क्र. २९१, ४१७ : देशीनाममालेंत (३. २) याचा अर्थ न्हावी असा दिलेला आहे. क्र. २९१ मधील उल्लेख व्यावसायिक असून क्र. ४१७ मधील उल्लेख जातीयतेचा द्योतक आहे. न्हाव्याचा धंदा सकृद्दर्शनी ओंगळ असल्यामुळें तो करणाऱ्या लोकांचें सामाजिक स्थान हीन मानण्यांत येई. सिगाल जातकांत नहापितपुत्ताची कथा आहे. एका न्हाव्याच्या मुलाचें

लिच्छवि राजकन्येवर प्रेम बसलें. तो पित्याला म्हणाला, राजकन्या मला पत्नी मिळाली नाहीं तर मी जगणार नाहीं. यावर बाप म्हणाला, तूं न्हाव्याचा मुलगा, हीन जातीचा आहेस, लिच्छवि राजकन्या उच्च जातीची क्षत्रियकन्या आहे, म्हणून अशक्य गोष्ट मिळविण्याची आकांक्षा धरूं नकोस.

नापितपुत्रानें थोडा दम धरला असता अगर व्यवहार संभाळला असता तर त्याची आकांक्षा नव्हे, आसक्ति तरी तृप्त झाली असती. याचें प्रात्यक्षिक क्र. ४१७ या गाथेंत आढळतें. बायकाबायकांचें भांडण चाललें आहे. एक दुसरीला व तिच्या मैत्रिणींना छिनाल म्हणते. तेंच दुसरी म्हणते, काय, आम्ही छिनाल ? तूं मोठी पतिव्रता, आमच्या पासून दूर रहा, नाहींतर आमच्या संसर्गामुळें तुझ्या कुळाला बट्टा लागायचा. पण हें पहा, आम्ही छिनाल आहोंत पण आम्ही उत्तम नायकावर तरी आसक्त आहोंत. तुझ्याप्रमाणें आमची वागणूक एकाद्या वेश्येसारखी नाहीं किंवा आम्ही न्हाव्याकडेही जात नाहीं!

नापिताच्या व्यवसायाची वैशिष्ट्यें विचारांत घेऊन वात्स्यायनानें त्याची गणना नायकाच्या व्यवसायप्राप्त मित्रांत व दूतांत (१. ६. ३७.) केलेली आहे; आणि त्याच्या पत्नीची दूतींत. सुसंपन्न व सुसंस्कृत नागरी स्त्रीपुरुषांची सजावट त्यांच्या कारागिरीवर अवलंबून असते. या व्यवसायासाठीं दुकान मांडण्याची प्रथा नसल्यामुळें त्यांना गिऱ्हाइकांच्या घरोघर जावें लागे; त्यांशीं गप्पागोष्टी छाटण्याची व लगट करण्याची संधि मिळे; म्हणून त्यांना दौत्य करावयास सवड मिळे. या वरून दिसतें कीं वात्स्यायनाच्या काळांत त्यांचा सामाजिक दर्जा बराच उंचावला होता. अशीच परिस्थिति अलीकडे पुन्हां निर्माण होऊं लागली आहे. यामुळें इतर गंडांबरोबर हाही नष्ट होणार अशीं चिन्हें दिसत आहेत.

दास : क्र ९१. डॉ. केतकर (बुद्धपूर्व जग : पृ. ३८) सांगतात कीं आर्य व दस्यु हा भेद यजनविषयक असून आर्यांचा कृष्णवर्णीयांशीं संबंध येण्यापूर्वीचा आहे. ऋग्वेदांत कृष्णवर्णीयांना दास म्हटलेलें (१. १३०. ८; ९. ४.१.). आहे आणि जित दासांच्या कांहीं पुढाऱ्यांनीं आर्य जेत्यांबरोबर समेट केल्याचें नमूद आहे. सद्वर्तनी व सुसंपन्न दासांना आर्यत्व संपादन शक्य (६.२२. १०) होतें. प्राचीन युरपियन व मध्य एशियाटिक आणि मध्ययुगीन ख्रिश्चन व इस्लामी देशांच्या इतिहासांत दिसतें तें गुलामीचें रौद्र व करुण

स्वरूप भारतांत आढळत नाहीं. लढाईंत कैद, दरबारांत किंवा न्यायालयांत शिक्षा, दारिद्र्य आणि कर्ज फेडण्याचें असामर्थ्य हीं दास्याचीं कारणें बौद्ध वाङ्मयांत नमूद आहेत (थेरीगाथा; ४४४ : विनय : १. ७२.). सैनिकांप्रमाणें दरवडेखोरही पकडलेल्या स्त्रीपुरुषांना दास म्हणून विकीत असत. गाथासप्तशतींतील क्र. ५४, ५५, ११८ व ५२७ या गाथांतील बन्दिनी याच सदरांत पडतात. हे दास धन्यांच्या घरांत कुटुंबीयांप्रमाणें (सिरिकालकण्णि जातक) रहात, धन्याचा विश्वास संपादन (नंद जातक) करीत; धन्याचा दासींशीं (कटाहक जातक) आणि दासांचा श्रेष्ठींच्या कन्येशीं (चुल्ल सेट्ठि जातक) प्रेमसंबंध जमल्याचीं ही अनेक उदाहरणें आढळतात. शाक्य राजपुत्र महनाम, याची दासी नगमुंदा, यांची कन्या वासवखत्तिया हिला शाक्यकुलोत्पन्ना मानण्यास लिच्छवी जमातीनें नकार दिलेला आहे आणि दासांना भिक्षुसंघांत घेण्याला मनाई केलेली आहे. ब्राह्मण व क्षत्रिय यांनाही दास्यांत पडावें लागे. (वेस्सन्तर जातक). मात्र आर्य दास्याला पात्र नाहींत अशी अर्थशास्त्राची ग्वाही (नत्वेवार्यस्य दासभावः । ३. १३. ६५.) आहे. दास्य, मग तें कोणत्याही अवगुंठनाखालीं असो, शक्य तोंवर नष्ट, कमींत कमी सह्य करण्याकडे कौटिल्याचा कल आहे. गाथासप्तशतींतील दास हा सामाजिक किंवा आर्थिक अवस्थेचा द्योतक नाहीं. ' तत्पर नोकर ', ' मालकिणीची मर्जी संपादन करण्यांत कुशल ' या अर्थानें तो या गाथेंत आलेला आहे.

पुलिंद : क्र. ११६, ३१०: **पुलिंदी** : क्र. ६३४ : ऐतरेय ब्राह्मणांत (७.१८) पुलिंदांचा उल्लेख आन्ध्र, पुण्ड्र, शबर व मूतिब यांच्या जोडानें आलेला आहे. हे विश्वामित्राचे पुत्र, त्याच्या शापामुळें बहिष्कृत होऊन दक्षिणापथांत आलेले. महाभारतांत (१२. २०७. ४२) पुलिंद दक्षिणापथांत मांडलेले आहेत. मत्स्य (११४. ४६. ८) मार्कण्डेय (५७. ४५. ८.) व वायु (४५. १२६) पुराणांत त्यांना दक्षिणापथांत आणि अभीर, आन्ध्र, दण्डक, कुंतल, विन्ध्य व वैदर्भ यांच्या सान्निध्यांत मांडलेलें आहे. त्यांचीं राज्यें विन्ध्याच्या परिसरांत असल्याचें कथासरित्सागरांत (४. २२.) सांगितलेले आहे. टॉलेमीनें त्यांना नर्मदेच्या किनाऱ्यावर मांडलें आहे; त्याच्या कथनावरून दिसतें कीं हे लोक कंदमुळें व कच्चें मांस यांवर निर्वाह (Tribes of Ancient India : Dr Law : p 175.) करीत. गाथासप्तशतींतले पुलिंद हे विन्ध्य पर्वताचे

(क्र. ११६) रहिवासी आहेत. ते कुंजरमृगयासक्त व वन्य असून नागरी व्यवहाराविषयीं इतके अजाण आहेत कीं त्यांना मोत्यांपेक्षां गुंजा (क्र. ६१०) अधिक आकर्षक वाटतात.

भोइअ = भोगिक : क्र. ५५६; भोइणि : क्र. ६०३, ७३२, ७७०. गंगाधरानें क्र. ५२६ या गाथेंतील भोइअ या शब्दाचा अर्थ पडिक्खक = प्रतीक्षक या पाठाच्या अनुरोधानें 'भोगिको भोगासक्त:' असा दिलेला आहे आणि पडिक्खर = प्रतिखर = असहिष्णु या पाठाच्या अनुरोधाने 'भोक्ता ग्रामाधिकारी.' सरस्वतीकण्ठाभरणांत (पृ. ६७० क्र. ३१९) भोइआ याला प्रतिशब्द भोगिको असा दिलेला आहे. क्र. ६०३ या गाथेंतील भोइणि या शब्दाचा अर्थ गंगाधरानें "ग्रामव्यापारिक स्त्री' असा सांगितला आहे व पण्डित मथुरानाथांनी तो स्वीकारला आहे. अन्य टीकाकारांनी क्र. ७३२ व ७७० मधील भोइणीचा अर्थ 'ग्रामप्रधानहिला' असा दिलेला आहे आणि क्र. ७३२ मधील भोइणीचा 'ग्रामव्यापारमहिला.' असाही. देशीनाममालेंत व पाइअसद्दमहण्णवांत भोइ व भोइअ यांचे अर्थ ग्रामाध्यक्ष, ग्राम का मुखिया, भोगासक्त, विलासी असे दिले आहेत; आणि भोइणीचा अर्थ ग्रामाध्यक्षाची पत्नी. पाइअसद्दमहण्णवांत भोइ व भोइया या शब्दांचे अर्थ भार्या, स्त्री, वेश्या असे दिलेले आहेत. गाथासप्तशतींतील तन्ही भोइणी असती आहेत. क्र. ६०३ व ७३२ मधील भोइणी या श्रीमंतिणी आहेत. या भोइणी क्षत्रिया असोत किंवा वैश्या. त्यांच्या नादीं लागलेले पुरुष मात्र बहुजनसमाजांतले आहेत. या उल्लेखांपैकीं क्र. ५५६ शिवाय इतरांना वर्ग भावना अभिप्रेत आहे असें वाटतें.

या भोगिकांचा समन्वय कोणाशीं करावयाचा? भोज या प्राचीन जमातीशीं? कीं भोगिक या गुप्तकालीन लेखनाधिकाऱ्यांशीं? डॉ. केतकर यांच्या अनुमानानुसार (प्राचीन महाराष्ट्र : प्रकरण ४१) भोइ या जमातीशीं? प्राकृत कोशानुसार क्षत्रिय मुखियाशीं कीं कांहीं टीकाकारांच्या अनुरोधानें वैश्य व्यापाऱ्यांशीं?

भोजांचा पहिला उल्लेख ऋग्वेदांत (३. ५३. ७.) आढळतो. येथें त्यांना पंजाबांत मांडलेलें आहे. ऐतरेय ब्राह्मणांत (८. १२. १४. १७.) त्यांना दाक्षिणात्य म्हटलेलें आहे. आतां त्यांनी विस्तीर्ण प्रदेश व्यापलेला आहे आणि भौज्य राज्यपद्धति (Hindu Polity : Dr. Jayaswal p: 36.) उत्क्रांत

केलेली आहे. महाभारतांतले भोज यादववंशीय असून ते विदर्भात मांडलेले आहेत. दण्डकारण्य या अभिधानाला अभिप्रेत असलेला दण्डक्य हा भोज होता असें अर्थशास्त्रांत सांगितलेलें आहे. अशोक व खारवेल यांच्या शिलालेखांतील भोजांचे उल्लेख 'स्थानिक व वंशपरंपरागत राज्यकर्ते' या अर्थानें आलेले आहेत. डॉ. रामकृष्ण भांडारकरांनीं या भोजांना वऱ्हाडी ठरविलेलें आहे. सातवाहन साम्राज्यांतील भोजांचे शिलालेख कोंकणांत, महाड व कुडा येथील लेण्यांत मिळालेले आहेत. येथें त्यांना भोज व महाभोज आणि त्यांच्या स्त्रियांना भोजिकी व महाभोजी म्हटलेलें आहे. भोजांचा महारांबरोबर संबंध आल्यामुळें महाभोज हें राष्ट्रनाम सिद्ध झालें असावें असें डॉ. केतकरांचें (प्राचीन महाराष्ट्र : पृ. ३३४) अनुमान आहे. मात्र याला पुरावा असा कांहींही नाहीं. क्षत्रप व महाक्षत्रप, तसेंच भोज व महाभोज. नाहींतर भारताचा विस्तार महाभारतांत झाला तोही याच कारणामुळें, असें ही अनुमान करतां येईल. भोई या मत्स्योपजीवी (Poona Gazetteer: I. p. 387.) जमातीशीं समन्वय करण्यासाठीं भोज हे आरंभीं मत्स्योत्पादक होते व पुढें ते कुणब्यांत समाविष्ट झाले असें त्यांनीं गृहीत धरलें आहे. आणि कृषिकर्म करणाऱ्या भोयांपैकीं जे देवपुजारीपण करणारे ते भोजक ब्राह्मण झाले असेही निष्कर्ष त्यांनीं काढले आहेत; त्यांनाही कांहीं पुरावा नाहीं.

ग्रामणी हा गांवचा पाटील, प्रजेचा प्रतिनिधि: भोजक हा राजघराण्याशीं किंवा राज्यकारभाराशीं संबंध असलेला करमाफ इनामदार, राज्यकर्त्यांचा प्रतिनिधि; गृहपति हा सरकारी कर देण्यास पात्र असा जमीनदार, प्रतिष्ठितांचा प्रतिनिधि; असें मानलें तर गांवगाड्यांतलीं त्यांचीं स्थानें निश्चित होतात. गाथासप्तशतीच्या काळांत गांवोगांवीं सरंजामदारांचें अस्तित्व जितकें असंभाव्य तितकेंच किराण्या व्यापाऱ्यांचें संभाव्य: म्हणूनच भोइणीचा अर्थ मी वाणीण असा घेतला आहे.

वाणिअअ = वाणिजक : क्र. ९८५ : वणि, वाणि, वाणिअ, वाणिअय यांचा अर्थ पाइअसद्दमहण्णवांत बनिया, बनियाका लडका, वैश्य, व्यापारी असा दिलेला आहे. हा वाणी फक्त वृत्तीनें वैश्य आहे. वर्णानें वैश्य असलेला व्यापारी व्याघ्रचर्म, हस्तिदंत अशा वस्तूंचा व्यापार करील हें निदान त्या काळांत तरी संभवत नाहीं: अमलाच तर तो लंपट आहे, मालखरेदी ही नुसती सबब आहे.

आणि केवळ व्याधाची सुंदर सून दृष्टीस पडावी म्हणून तो तिच्या झोंपडी-भोंवती घोंटाळत आहे. या गाथेला जात किंवा जातीयता अभिप्रेत नाहीं.

विज्जाहरि = विद्याधरी : क. ८४६ : विद्याधर हे दिवसां स्मशानांत, एका पायावर उभे राहून सूर्यतपस्या करतात आणि रात्रीं स्त्रियांचें अपहरण करून त्यांचा उपभोग घेतात, असा उल्लेख धजविहेठ जातकांत आढळतो. जैन ग्रंथांत आणि बृहत्कथेंत त्यांना विशेष महत्त्व दिलेलें आहे. त्यांना देवयोनींत घातलें आहे व अद्भुत शक्ति दिल्या आहेत. विद्याधर हे विन्ध्य पर्वताच्या परिसरांत स्थायिक झालेले इराणी असावेत असें डॉ. केतकरांचें अनुमान (प्राचीन महाराष्ट्र : प्रकरण २७) आहे. या गाथेंतल्या विद्याधरीला अंतरिक्षांतून गमन करण्याची शक्ति आहे. सामान्य स्त्रियांप्रमाणें विद्याधरी वेणी घालीत नाहींत, भुरभुरते केंस मोकळे सोडतात असें या उल्लेखावरून दिसतें. अजंठ्याच्या गुंफेंतील विद्याधरीचें चित्र तुलनेसाठीं पाहण्यासारखें आहे.

वाह = व्याध : क. १२२, ६०१, ६१८, ६२९, ६६३; **वाही** = **व्याधी** = व्याधवधू, व्याधस्त्री : क. ११९, १२०, १२१, १७३, ५९७, ७३६, ७८८. गाथासप्तशतींत, किंवा अन्यत्रही, व्याध ही संज्ञा जात या अर्थानें आलेली नाहीं. व्याध म्हणजे शिकारी: वन्य शिकारी, शिकारीवर उपजीविका चालविणारे; म्हणून रानांत वस्त्या करून राहणार. त्यांच्या झोपड्यांचे गट असलेले दिसत नाहींत (क. १२१, ९४५). हे व्याध धनुष्यबाणानें शिकार करतात. धनुष्यबाण हें त्यांचें व पुलिंदांचें (क. ११६) आयुध. कांहीं शिकारी असे समर्थ (क. ६३०) कीं ते एका बाणांत हत्तीला लोळवीत. अस्वल (क. ७३६). गज (क. १२१, १७३, ७३६, ९४५), गवा (क. ७३६), गेंडा (क. ७३६) मग (क. ६०१, ६१८, ६२९), शरभ (क. ७३६) व शार्दूल (क. ७३६, ९४५.) या व्याध व हिंस्र पशूंची हे शिकार करतात; हत्तींची त्यांच्या गंडस्थळांतील मोत्यांसाठीं (क. १७३) व हस्तिदंतासाठीं आणि व्याघ्रांची त्यांच्या चर्मासाठीं (क. ९४५). चितळ हरणाची हत्या करणें हें दूषण आहे असें त्यांच्या स्त्रियाही (क. ६२९) मानतात. एकाद्या शिकाऱ्याचा रानाला असा दरारा असे कीं त्याच्या धास्तीनें हिंस्र श्वापदें त्याच्या वस्तीच्या आसपास फिरकत नसत; पण तो मेला (क. १२१) किंवा त्याची बायको वयांत आली (क. ७३६) म्हणजे या श्वापदांना जणूं अभय मिळतें. जात्या पिढीनें येत्या

पिढीला नांवें ठेवावयाची ही सनातन प्रथा गाथासप्तशतींत धनुष्य-संकेताच्या रूपांत (क्र. ११९, १२०, १२२, ६३०, ६३३) सशब्द झालेली आहे. नव्या बायकोच्या नादानें व्याध दुबळा होतो, त्याला धनुष्य पेलत नाहीं, यांतच ता धन्यता मानते. पण संसार तर चालला पाहिजे. म्हणून त्याची बायको त छिलून हलकें (क्र. ११९, १२०) करते: किंवा यांत बेइज्जत आहे हें जाणून तोच तें एकान्तांत छिलतो (क्र. ६६३) किंवा न पेलणारें धनुष्य व बाणांचा भारा खांद्यावर टाकून शिकारीसाठीं म्हणून तो जंगलांत जातो, पण शिकार मात्र करूं शकत नाहीं (क्र. ६३०). त्याचें हें दौबल्य पाहून भविष्याच्या काळजीनें त्याची आई रडते (क्र. ६६३); पण तिच्या अजाण नवतरुण्या सुनेला चिंता कशी ती माहीत नाहीं. आपण तासलेल्या धनुष्याच्या छिलप्या आभाळांत वातचक्रावर उडालेल्या दिसल्या कीं जणूं आपल्या सौभाग्याचा ध्वजच फडकत आहे (क्र. १२०) असें तिला वाटतें. तिच्या ठायीं व्यवहारज्ञानाचा अभाव तर इतका कीं सवतींनीं धारण केलेल्या मोत्यांच्या अलंकारांचें मूल्य तिला समजत नाहीं आणि स्वतः धारण केलेल्या मोरपिसांच्या तुऱ्याच्या तोऱ्यांतच ती मिरवते ! प्रत्यक्ष व्यवहारांत व्याध व हिंसा यांचें आहे तेवढेच व्याध व अहिंसा यांचें साहचर्य प्रचारकथांत व गीतांत आढळून येतें. त्यांवरून त्यांचें बुद्धोत्तरकालीनत्व सिद्ध होतें. महाभारतांतील अर्जुन-विषाद व रामायणांतील क्रौंचवध हे प्रसंग या सदरांत पडण्याजोगे आहेत. गाथासप्तशतींतील क्र. ६०१, ६१८ व ५९४ या गाथा निःसंशय बुद्धप्रणीत अहिंसेच्या सिद्धान्तानें प्रेरित आहेत. या गाथा कृत्रिम व प्रचारकी थाटाच्या नाहात. प्रियकर व प्रेयसी यांच्या परस्परांवरील अकृत्रिम प्रीतीमुळें त्या निःसंशय विशेष हृदयंगम व हृदयद्रावक वाटतात.

ज्ञातीयता, एतद्विषयक श्रेष्ठ कनिष्ठ भावना आणि सामाजिक परिस्थिति :

गाथासप्तशतीचें संपादन झालें तेव्हां दक्षिणापथांत आर्यांच्या वसाहती प्रस्थापित व स्थिर होऊन अनेक शतकें लोटलीं होतीं. आतां उत्तरेप्रमाणें दक्षिणेंतही आर्य व अनार्य यांचा संघर्ष शमला होता. झाडांवर बसून कच्चें मांस खाणाऱ्या अनार्य राक्षसांची आठवण आतां केवळ श्लेषजन्य उपमेपुरती (क्र. ३११)

राहिली होती. आर्य या संज्ञेतला दर्प नष्टप्राय झाला होता आणि दरारा क्षत्रियांमध्यें केंद्रित झाला होता. मात्र आर्यांविषयीं व त्यांच्या आचारांविषयीं सर्वांना आदर वाटत होता; आर्य हे आपल्यापेक्षां वरिष्ठ आहेत अशी सामान्य जनांना जाणीव होती.

म्हणूनच एतद्देशीयांनीं ग्रामदेवतेला अज्जा हें अभिधान दिलेलें आहे.

आर्य स्त्रियांना आपल्या दर्जाची जाणीव आहे. सामान्य व्यवहारांत ही प्रत्ययाला येईल इतकी ती त्यांच्या वृत्तींत मुरलेली (क. ७९) आहे.

सामान्यतः स्त्री ही तिच्या वैशिष्ट्यामुळें व्यासपीठावर अधिष्ठित असलेली व्यक्ति आहे, देव्हाऱ्यांत प्रस्थापित असलेली देवता आहे· अशी समाजांतील सर्वसाधारण लोकांची समजूत असते. वर्गभावना जागृत असते तेथें आणि ती सुप्तावस्थेंत असली तरी उच्च वर्णाय स्त्रियांबद्दल कनिष्ठ वर्गीयांमध्यें ही भावना विशेष प्रबळ असते. श्री. हेन्री शांपाली यांनीं White Women, Coloured Men या विषयाचें सोदाहरण विवेचन केलेलें आहे तें जिज्ञासूंनीं अवश्य पहावें. वर्गभावना असते, म्हणूनच सामान्य जनांना वरिष्ठ वर्गांतल्या स्त्रिया विशेष आकर्षक वाटतात. मग ती ग्रामणीची दुहिता (क. ५९२) असो किंवा गृहपतीची स्नुषा (क. २५४) असो, तरुण भोइणि (क. ६०३) किंवा वयस्क शेटाणी (क. ७७०) असो आणि तिचा उपभोग घेणारा हालिक (क. ३६०) किंवा चरक चालविणारा मजूर (क. ५५४) अगर राखणदार अहीर (क. ८०५) असो. अंगीं गुणवैशिष्ट्यें आहेत अशी ज्यांची ख्याति त्या वरिष्ठ वर्गांतील स्त्रियांना त्यांच्या तथाकथित व्यासपीठावरून खालीं ओढून त्यांचा उपभोग घेणें, सुरतसंग्रामांत आपलें सामर्थ्य त्यांच्या अनुभवास आणून देऊन त्यांचें तोंवरचें प्रतिष्ठित जीवन किती शुष्क होतें हें त्यांच्या प्रत्ययास आणून देणें आणि नंतर त्यांच्याबद्दल समव्यसनिकांच्या समुदायांत चवाठ्यावर चर्चा (क. ७७०) करणें, हीच आपल्या पौरुषाची कृतार्थता, अशी अनेकांची इच्छा व कल्पना असते; पण एकादे वेळा गाडें उलटतें आणि त्याच्या दिखाऊ पौरुषाला कुचकामी म्हणून दूषण (क. ५५४) देण्यांत येतें ! आणि पूर्वी त्याला चटक लावण्यासाठीं प्रहेणक (क. ६०३) देणारी आतां त्याला गूळ-खोबरें देण्यालाही राजी नसते. अशीच आसक्ति कनिष्ठ वर्गांतील स्त्रियांना वरिष्ठ वर्गातील पुरुषांबद्दल (क. ६०८) वाटते.

असें आहे तरी एवढें खरें कीं एकादा दुसरा हालिक आर्येशीं (क्र. ३६०) किंवा कुलबालेशीं (क्र. ९७०) लगट करीत असला तरी तिचा दर्जा व तिच्या बांधवांचा दरारा यांच्या धास्तीनें त्या वेळींही त्याच्या जिवाची धाकधुक होत असतेच.

गाथासप्तशतीचें संपादन झालें त्या वेळीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र, या वर्गांत समाजाचें वर्गीकरण होऊन अनेक शतकें लोटलीं होतीं. पण या वर्गांचा वा वर्णांचा येथें मागमूसही आढळत नाहीं. येथें वर्णक्रम आहे. पण तो केवळ भित्तिचित्रांत (क्र. ६१२, ७३२), सामाजिक जीवनांत नव्हे !

आर्य संस्कृतीचा मूलाधार मानलेल्या यज्ञसंस्थेची येथें हेटाळणी (क्र. २२७) केलेली आहे. येथें ब्राह्मणांचा दर्जा इतका खालावलेला आहे कीं जे धार्मिक व परलोकव्यसनिक ते खेड्यांपाड्यांतल्या उडग्या बायकांच्या उपहासाला पात्र झालेले आहेत. आणि हें कोणाच्या राज्यांत ? नाणे घाटांतील शिलालेखाच्या पुराव्यानें ज्यांचा यज्ञपुरस्कार शाबीत होतो त्या सातवाहनांच्या राज्यांत, नाशिकच्या पाण्डवलेण्यांतील गोतमी बलश्रीच्या शिलालेखाच्या पुराव्यानें ज्यांचें एकब्राह्मण्य सिद्ध होतें त्या सातवाहनाच्या राज्यांत. हा सारा बौद्धांच्या प्रचाराचा परिणाम हें उघड आहे. गाथासप्तशतींत बौद्धांचा व त्यांच्या आद्य तत्त्वांचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. शिवाय हा राजकीय पारतंत्र्याचाही परिणाम असणें शक्य आहे. या काळांत महाराष्ट्रावर क्षहरात क्षत्रपांची सत्ता होती. आपल्या सत्तेच्या पुरस्कारार्थ त्यांनीही ब्राह्मणांना दानें दिलेलीं आहेत. पण तीं तेजस्वी ब्राह्मणांना दिलेलीं नाहींत, पोटार्थी भिक्षुकांना दिलेली आहेत. ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकांत नांव घेण्याजोगा एकही आचार्य महाराष्ट्रांत निपजला नाहीं. अंतर्यामीं संजीवनीचें स्फुरण असलेल्या शुक्राचार्यांची जागा लाळघोट्या शुष्काचार्यांनीं बळकावली म्हणजे असेंच व्हावयाचें !

गाथासप्तशतींतील ग्रामणी हा ग्रामाच्या संरक्षणाबद्दल जबाबदार असल्यामुळें क्षत्रिय आणि मालदार असल्यामुळें गृहपति हा वैश्य असणें शक्य आहे. प्रो. फिक् (पूर्वोक्त : पृ. २०३) सांगतात. "वैश्य या शब्दाशीं पूर्ण समानार्थक असलेला आणि विशिष्ट वर्गसूचक असा गृहपति हा शब्द पालि वाङ्मयांत सर्वत्र आढळतो. व्युत्पत्तिशास्त्रदृष्ट्या याचा अर्थ गृहस्थ किंवा कुटुंबाचा मुख्य असा असला तरी सर्वसाधारणपणें हा शब्द जमीनदार किंवा उच्चजातीय

धनाढ्य व्यापारी यांच्याबद्दलही वापरण्यांत येतो. राजवंशीय क्षत्रियांनंतर ताबडतोब येणारा हा सुखवस्तु मध्यमवर्ग...क्षत्रियांप्रमाणेंच या गृहपतींना स्वतःच्या श्रेष्ठत्वाचा व आर्यत्वाचा इतका तीव्र अभिमान होता कीं त्यामुळें स्वतःहून हीन दर्जाच्या लोकांशीं समतेच्या नात्यानें वागणें त्यांना शक्य नव्हतें. स्वजातीबद्दल तीव्र अभिमान व परजातीयांशीं विवाहाची बंदी यामुळें गृहपतींचा एक स्वतंत्र वर्ग बनला होता. कान्हेरी (ल्यूडर्स क्र. १००३) व कुडा (ल्यूडर्स क्र. १०७३) येथील शिलालेखांतील गृहपति ही संज्ञा सेठि या अर्थानें आलेली आहे. गृहपति हे वैश्य असावेत असें डॉ. जयस्वाल यांचेंही मत आहे. पण गाथासप्तशतींतील गृहपति वैश्य किंवा व्यापारी दिसत नाहींत. डॉ. फिक् यांच्या अखेरच्या विधानाचा क्र. ६०० या गाथेंतील गृहपतिसुता व तिचा हालिकनन्दन पति या जोडप्याशीं समन्वय केला असतां गृहपति हा सामान्य हालिक वर्गाशीं नात्यानें संबद्ध असल्यामुळें त्याच वर्गांतून आर्थिक, राजकीय व सामाजिक दृष्ट्या वरिष्ठ वर्गात प्रविष्ट झाला असलेला दिसतो. सामान्य बहुजनांचा पाठिंबा असल्यामुळेंच त्यांच्या नांवाचा व तरवारीचा दरवडेखोरांना दरारा वाटतो.

गाथासप्तशतींत पुलिंद व व्याध या वन्य जमातींबद्दल तिरस्कार किंवा विद्वेष प्रदर्शित झालेला नाहीं· नागरी किंवा ग्रामीण जनतेशीं त्यांचा फारसा संबंध येतच नाहीं. लगट करणाऱ्या लंपट अहीराबद्दल तरुणीनें केलेल्या तक्रारींत जातीयतेची तीव्रता नाहीं. चंडालाचा उल्लेख विवाद्य आहे. निरवसित शूद्र असल्यामुळें तो गांवाबाहेर राहतो व कलालाचा निषिद्ध धंदा करतो हें खरें, पण येथे प्रकट झालेला तिरस्कार त्याच्याबद्दल नसून यज्ञसंस्थेबद्दल आहे. निर्दयता या गुणविशेषाच्या अनुरोधानें खाटकाचा उल्लेख आलेला आहे. तिरस्कार स्पष्टपणें व्यक्त झाला आहे तो फक्त चांदिलाबद्दल. वात्स्यायनानें नापिताला नायकाच्या परिवारात दिलेलें स्थान उत्तरकालीन असावें. आणि गाथासप्तशतींतला समाज नापितावर अवलंबून राहण्याइतका सुसंस्कृत झाला नव्हता असें या उल्लेखावरून दिसतें. हे सर्व उल्लेख स्मृतींचें अखेरचें गुप्तकालीन संस्करण होण्याच्या पूर्वींचे आहेत. अस्थिसंचय व सीतायज्ञ हे धार्मिक विधि गाथासप्तशतींतल्या स्त्रियांनीं केलेले आहेत: गुप्तकालीन स्मृतिकारांनीं त्यांचे धार्मिक हक्क हिरावून घेण्यापूर्वींची ही परिस्थिति आहे हें उघड आहे.

जातीयतेची भावना ऐहिक वा धार्मिक सत्ता व स्थानिक वा प्रादेशिक संस्था

यांच्या अनुरोधानें सामान्यतः आक्रमक किंवा आक्रंदक स्वरूपांत प्रकट होते. तसा प्रकार गाथासप्तशतींत प्रत्ययाला येत नाहीं. यावरून निष्कर्ष निघतो कीं समाजाचें थोडेंबहुत वर्गीकरण झालेलें असलें तरी तें तोंवर बोंचक झालेलें नव्हतें.

आचार :

गाथासप्तशतींतील कौटुम्बिक व धार्मिक आचार त्या त्या प्रकरणांत सांगितलेले; आहारविहारादि आचार चालू प्रकरणांत ज्या त्या शीर्षकाखालीं सांगितले; आतां सामान्य आचार सांगतों.

गाथासप्तशतींतल्या पुरुषांचे केंस लांब (क्र. १०८, १८८) आहेत. ऋग्वेदांत (५. १७३. ६) व अजंठ्याच्या चित्रपटांतही असे उल्लेख आढळतात व दृश्यें दिसतात. लांबसडक केंस हें स्त्रियांच्या सौंदर्याचें लक्षण (क्र. ५६६, ५७२) मानण्यांत येई. स्त्रिया केंसांचा अंबाडा (क्र. २७३, २९१, ५५०) बांधतात.

गाथासप्तशतींतील समाजाला आभिजात्य (क्र. ३८, २६५, २६६, ९३९) व कुलीनत्व यांची जाणीव आहे. आभिजात्यामुळें पुरुष पराधीन (क्र. २६५) असतात. बाहेरची ओढ असली तरी त्याजवर कुटुंबाचा दाब इतका असतो कीं सायंकाळीं घरीं येऊन पादप्रक्षालन (क्र. १३०) केलें कीं पुन्हां चक्कर टाकायला बाहेर पडूं शकत नाहीं. अकुलीन (क्र. २५३), कृपण (क्र. ६८, ८३), दुःशिक्षित (क्र. ५६, ९१, २७४, ७३२, ८७२), नकली धार्मिक (क्र. ६०८), पळपुटे (क्र. ६३१) व क्षुद्र शिकारी (क्र. ६२९) यांबद्दल गाथांनीं तिरस्कार व्यक्त केलेला आहे. दाक्षिण्य (क्र. ८५, ९३८), परोपकार (क्र. ९७२, ९९५, १००६), शिष्टाचार (क्र. ५०, ५१, ३१७, ६१४, ७५४) व शौर्य (क्र. ५२८) यांची प्रशंसा केलेली आहे. खांद्यावरून मिरवून गुणीजनांचा (क्र. १९१) व नगारे वाजवून विजयी मल्लाचा (क्र. ६८५) सत्कार केलेला आहे; नालायक व निरक्षरांचा समाजाकडून गौरव होत असलेला पाहून त्याबद्दल नापसंती (क्र. १९१) व्यक्त केलेली आहे. उदार (क्र. २३०) व रसिक (क्र. ७३३) यांच्या वांट्याला आलेल्या दारिद्र्याबद्दल दैवाला दोष दिला आहे.

गाथासप्तशतींतल्या अनेक गाथा स्त्रियांनीं लिहिलेल्या आहेत. (अन्ध्रलक्ष्मी : क्र. १७६, २२८, २६३, ४७५, ४७६, ५०५, ५२५, ५८२; कव्जरंगी उर्फ कुरंगी : क्र. ६१८, ८९४; गुणमुग्धा : क्र. ४७४; ग्रामकुट्टिका : क्र. ८८, १२८, ३०५; झेज्झा : क्र. ५८४; नाथा : क्र. ४१; प्रहता : क्र. ८६; पृथिवी : क्र. ८६; पेष्टा; क्र. ४४४; मृगाङ्कलक्ष्मी : क्र. ४२६; रेखा : क्र. ४६२, ५०६; रेहा : क्र. १६३; रेवती : क्र. ८७; रेवा : क्र. ८७, ९०; रोहा : क्र. ४१; वोहा : क्र. ६२०; शशिप्रभा : क्र. ३०४; सिरिसत्ता : क्र. ५४६; हस्तिनी : क्र. ७५७). यांपैकीं कांहीं नांवें एकाच लेखिकेचीं असणें शक्य आहे. अनेक सामान्य स्त्रियाही सुशिक्षित आहेत; त्या पतीशीं पत्रव्यवहार (क्र. २४४, ५७१, ८२४, ८२७, ८३५) करतात. ज्या अशिक्षित आहेत त्या पतीच्या प्रवासाचे दिवस मोजण्यासाठीं भिंतीवर रेघा काढतात किंवा काढलेल्या पुसतात (क्र. १७०, २०६, २०८, ८६१) अगर विरहाचे दिवस हातापायांच्या बोटांनीं (क्र. ३०७) मोजतात. दहांनी व वीसांनीं गणना करण्याच्या पद्धति बोटांच्या संख्येवर आधारलेल्या असाव्यात.

माहेरीं श्रीमंती व सासरीं दारिद्र्य असलें तरी कुलवधू सासरच्या आभिजात्याचा अभिमान (क्र. ३८) बाळगते. एकांतीं ती पतीला आज्ञा देत असली (क्र. २३) तरी अन्यत्र ती त्याची अवज्ञा करीत नाहीं. कुलवधूचा पति वृद्ध असला तरी तो तिला प्रिय (क्र. २९३) असतो; पति उदासीन असला तरी ती त्याला आदरानें (क्र. २६६) वागवते आणि केवळ औपचारिक दाक्षिण्यांत समाधान (क्र. ८५, ३५३) मानते. प्रियकराचा निषेध करावयाचाच झाला तर तोही ती मर्यादा राखून (क्र. ५१३, ७०९) करते. पातिव्रत्य हेंच स्त्रियांचें भूषण आणि लज्जा हेंच कुलस्त्रियांचें प्रसाधन (क्र. ८६०) होय. कुलीन विरहिणींचा विभ्रम त्यांच्या पतीबरोबर प्रवासी (क्र. २७४, ८६५) होतो. कुलस्त्रीनें वामकुक्षी (क्र. ६५, ६६) करूं नये; प्रियकराच्या चारित्र्याची चर्चा (क्र. ६७७) करूं नये : गुरुजन, पति व सासू यांविषयीं आदर (क्र. ४९३) बाळगावा. परिचय असला तरी स्त्रीनें पुरुषाकडे त्याच्या पत्नीची चहाडी करूं नये (क्र. ७५४), पुरुषाशीं रस्त्यांत बोलूं नये (क्र. ५१४, ७५४). दृष्टिक्षेपाला मात्र मनाई नाहीं असा एक उल्लेख आढळतो आणि अन्यत्र (क्र. ७१५)

मात्र परिचित पुरुष स्त्रीकडून औपचारिक अभिवादनाची अपेक्षा करतो. कुलस्त्रियांचा अपमान करावयास कोणी धजत नाहीं (क्र. ९७०). त्यांना उपसर्ग देणाराला शासन (क्र. १३८) करण्यांत येतें; हें खरें, पण आभिजात्यामुळेंच विट त्यांचा फायदा (क्र. ९३९) घेऊं शकतात.

गाथासप्तशतींतल्या स्त्रिया निर्भय व स्वतंत्र दिसतात. ओसाड रस्त्यानें त्या एकट्या हिंडतात (क्र. १०७, १९३, ८७१, ९५५) आणि चरितार्थाचे व्यवसाय निःसंकोचपणें (क्र. ४९, ५९८, ८१५) करतात, गीतें गातात (क्र. १२८, ८३७) आणि सामूहिक नृत्यें (क्र. ११४) करतात. इतकेंच नव्हे, उघड्यावर परसांत (क्र. ६८३) किंवा नदीवर (क्र. २४६) अर्धनग्न (क्र. १२५) स्नान करतात. प्राचीन काळांत नग्नता आजच्या इतकी गर्ह्य मानण्यांत येत नसे. समाजाच्या मनावर हा संस्कार मुसलमानांच्या आगमनानंतर झालेला आहे असें कांहीं संशोधकांचें (Tree and Serpent Worship : p. 102) म्हणणें आहे.

गाथासप्तशतीनें वाचकांसमोर कांहीं आदर्श मांडले आहेत; घरकाम (क्र.२३), स्वयंपाक (क्र. १३) इत्यादि गृहकृत्यें आनंदानें करते ती सुगृहिणी. सहनशीलपणें कुटुंबाची विघटना होऊं देत नाहीं (क्र. ५९) व विनयानें वागून संसार सुखाचा करते (क्र. ८६०) ती सुमहिला. सुखदुःखांत सहभागी असतो तो आदर्श पति (क्र. ९९) आणि भावजयीकडे मान वर करून पहात नाहीं तो आदर्श दीर (क्र. ३५). संकटांत त्याग करीत नाहीं (क्र. ३७) व नेहमीं सन्मुख (क्र. २१७) असतो मित्र. धीर सोडीत नाहीं (क्र. ९७२) व संतापत नाहीं (क्र. २५०) तो सुजन आणि सुजन हेच (क्र. ९४) देशाचे अलंकार.

नग्निकांनींही उघड्यावर नागवें हिंडूं नये (क्र. ७३५) व घरांत उकडत असलें तरी मुलींनीं अंगणांत झोपूं नये (क्र. ७२८) असें गाथाकवि सांगतात. या गाथांना भोळ्या समजुतीचा आधार व व्यङ्ग्य अर्थ असला तरी हा आचार सामान्य असावा. प्रोषितपतिकेनें स्वतःचें व दरिद्री शेजारणीचेंही शील (क्र. ३६) सांभाळावें, रात्रीं सावधपणें जागावें (क्र. ३३६), प्रवासी मुक्कामाला आलाच तर त्याला पथारीला अंगणांत जागा (क्र. ३७९) द्यावी असें गाथाकर्त्यांनीं सांगितलें व सुचविलें आहे. पाहुण्या (क्र. ७३१, ९५७) व

पाहुणे (क्र. २५४, ३७९, ७३१, ८०१, ९५७) यांचें घरोघर स्वागत होत आहे. शिष्टाचार (क्र. ५१४, ७५४,), शेजारधर्म व कुलपृच्छा (क्र. ५०, ५१, ३१७) यांची समाजाला जाणीव आहे. संकटसमयीं परस्परांशीं सहकार्य (क्र. २२९) आणि शरणागताला अभय (क्र. २९७) हीं गृहस्थांचीं व गृहिणींचीं कर्तव्यें मानलेलीं आहेत. उनाड स्त्रीपुरुषांनाही जनवादाची (क्र. ५७, २०१, ५०१) कदर आहे.

१० निष्कर्ष :

गाथासप्तशतींतील समाजाची वृत्ति अल्पसंतुष्ट, आनंदी, काटक, सहकारी व साधीभोळी आहे.

गाथासप्तशतींतील सामाजिक जीवनांत प्राचीन कालीन सहजता पदोपदीं प्रत्ययास येते; गुप्तकालीन सभ्यता व समृद्धि आणि स्मृतिकालीन दृढता व संकीर्णता येथें कोठेंही आढळत नाहीत. येथें जातीय किंवा धार्मिक अभिनिवेश अगर अवहेलना आढळत नाही. येथें सहजीवन आहे, संघर्ष नाही. बौद्धांच्या अशोककालीन व जैनांच्या खारवेलकालीन उठावणीच्या ओहोटी-नंतरची आणि गुप्तकालीन ब्राह्मणी उठावणीच्या भरती पूर्वीची परिस्थिति येथें प्रदर्शित झालेली आहे.

गाथासप्तशतींतील समाजाचा आहार साधा आहे. सामान्यतः ग्रामीण जनता गोपालक, शाकाहारी व शेतकरी आहे आणि वन्य जमाती शिकारी व मांसाहारी आहेत. वेदकालांत विहित असलेलें महिष – मांस (५.२९.७-८; ६.१७.११) अद्याप निषिद्ध झालेलें नाही. अहिंसेचा ओझरता उल्लेख केवळ अद्भुतरम्य स्वरूपांत झालेला आहे. तांदूळ हें या समाजाचें मुख्य अन्न आहे. पक्वान्नेंही तांदळाचीं किंवा मुख्यत्वेंकरून तांदूळ पैदा होतो त्या प्रदेशांत पिकणाऱ्या पदार्थांचीं आहेत; मात्र त्यांत नारळाचें साहचर्य आढळत नाही. त्याचप्रमाणें मासे व मीठ यांचा तुटवडा दिसतो. या प्रमाणां-वरून वाटतें कीं हे लोक समुद्रकांठच्या प्रदेशांतले रहिवासी नसावेत, ते सह्या-द्रीच्या घाटमाथ्याच्या लगतच्या प्रदेशांतले व मावळातले रहिवासी असावेत. हे लोक करतात ती शिकार या भागांत मुबलक आढळते, विशेषतः विन्ध्याच्या सान्निध्यांत. या समाजांतले लोक मद्यांचें सेवन करतात; त्यांना सोम

माहीत नाहीं, तरी कोणी इंद्रासारखे झिंगलेले दिसत नाहींत. या मद्यपानांत अपूर्वाई नाहीं, निषिद्धताही नाहीं. हीं मद्यें घरगुती बनावटीचीं आहेत. श्रीमंतांचीं मद्यें सुगंधित आहेत आणि त्यांना मुरलेल्या मद्यांच्या माधुरीची जाणीव आहे. येथें आढळतात तीं मद्यें मुख्यत्वेंकरून ऊंस, तांदूळ व मोहाचीं फुलें यांपासून सिद्ध झालेलीं आहेत. हा कच्चा मालही वर निर्दिष्ट केलेल्या प्रदेशांत मुबलक मिळतो. चांडाल चालवीत असलेल्या पानकुटीच्या उल्लेखावरून दिसतें कीं त्यांना निःसारणाची प्रक्रिया नुकतीच अवगत झालेली असावी.

गाथासप्तशतींतला समाज हा साध्या व सामान्य जनांचा बहुजनसमाज आहे हें त्यांच्या विहारांवरून ही दिसून येतें. या लोकांचे घरगुती व मैदानी खेळ आणि सार्वजनिक उत्सव बिनखर्ची आहेत. सारवलेल्या अंगणांत किंवा माजघरांत सोंगटया व फुगड्या होतात. ग्रामांगणांत जत्रा भरतात आणि मैदानांत खांदलेल्या हौद्यांत कुस्त्या खेळल्या जातात; आणि गांवालगतच्या तळयांत जलक्रीडा. संस्कृत-प्राकृत संघर्षाबद्दल विख्यात असलेली सातवाहनाची जलक्रीडा मात्र अंतःपुरांतील बांधीव तलावांत झालेली असावी. फाल्गुनोत्सव हा त्यांचा मुख्य उत्सव. त्यांतही त्यांची वृत्ति दिसून येते. या उत्सवाला उत्तरकालांत आलेलें श्रीमंती व संकीर्ण स्वरूप येथें दिसत नाहीं. बहुजनसमाजाचें आरोग्य चांगलें दिसतें. अशोकाच्या लेखांत उल्लेखिलेल्या आरोग्य संस्था मात्र येथें कोठें दिसत नाहीत. एका सोटाला चार रंगीबेरंगी वस्त्रें गुंडाळून तो चावडीसमोर उभारला कीं इंद्रध्वजमहोत्सवाची तयारी झाली ! जेजुरीला काठ्यांचा उत्सव असतो, त्यासाठीं संगमनेरापासून अशा शृंगारलेल्या काठ्या वाजत गाजत येतात. ही प्रथा ध्वजपूजेशीं संबद्ध आहे कीं काय ?

गाथासप्तशतींतल्या समाजाचीं वस्त्रें साधीं आहेत. स्त्री-पुरुषांचीं वस्त्रें सामान्यतः कापसाच्या धाग्याचीं आहेत. समकालीन शिल्पांत आढळणाऱ्या उत्तरीय व उष्णीष ह्या वस्त्रांचा बहुजनसमाजांत वापर असलेला दिसत नाहीं. सामान्यतः हे लोक वापरतात तीं वस्त्रें जाडीभरडीं, घडोतीं व तोकडीं आहेत. श्रीमंत स्त्रिया मात्र झिरझिरीत वस्त्रें वापरतात. त्यांचें वस्त्रधारण विकच्छ होतें कीं सकच्छ, याबाबत स्पष्ट उल्लेख आढळत नाहीं. नेसत्या वस्त्राच्या आंतून त्या नीवी धारण करीत असाव्यात असें वाटतें. स्त्रिया डोक्यावरून

पदर घेत असाव्यात. त्या केशपाशांत अलंकार व फुलें माळतात, आघाडीला मोरपिसें खोंचतात. त्या अर्थी त्यांच्या माथ्यावरला पदर वेळोवेळीं ढळत असावा किंवा त्याची फारशी मातबरी नसावीसें दिसतें. गाथासप्तशतीच्या काळांतही मराठी धर्तीची चोळी वापरांत असलेली दिसते. गाथासप्तशतीची रचना झाली त्या भागांत कापशी बरीच पिकत असावी. चरखा व हातमाग गांवोगांव चालत असते तर त्यांचा उल्लेख झाल्यावांचून न राहता.

गाथासप्तशतीच्या काळांतल्या समाजाची साधी राहणी त्या लोकांच्या अलंकारांवरून प्रत्ययास येते. गुप्तवाकाटककालीन अलंकारांची विपुलता व विविधता तत्कालीन भित्तिचित्रांत, शिल्पांत व साहित्यांत दिसून येते. तशी परिस्थिति येथें आढळत नाहीं. सातवाहन कालांत विविध अलंकार उत्क्रांतच झाले नव्हते असेंही म्हणतां येत नाहीं. येथें श्रीमंत स्त्रिया तेवढ्या थोडेबहुत अलंकार वापरतात; त्यांत क्वचित् रत्नेंही जडविलेलीं आहेत. पण तीं सार्वत्रिक सुसंपन्नतेचीं द्योतक असावींत असें दिसत नाहीं. पानें व फुलें हेच सामान्य जनांचे अलंकार आहेत.

गाथासप्तशतींत वर्ण आहेत, पण वर्णाभिनिवेश नाहीं; व्यवसायजन्य जाति आहेत, पण जातीयता नाहीं. वरिष्ठ वर्गांना दर्प नाहीं, सामान्यांना हीनगंड नाहीं. आर्यांगी व क्षत्रियवैश्य स्त्रीपुरुषांशीं लगट करण्याची हलिक स्त्रीपुरुषांना हौस आहे; ती केवळ कुतूहलजन्य आहे. तींत आक्रमक जातीयतेचा आविष्कार दिसत नाहीं. परचक्र व तज्जन्य अगर सामान्य संकर यांच्या निवारणाची जाति संस्था ही एक सामाजिक योजना आहे; मग हें चक्र राजकीय असो, किंवा आर्थिक, धार्मिक अगर सांस्कृतिक असो; ही संस्था समाजाच्या आक्रमकतेची किंवा प्रतिकारितेची द्योतक नाहीं, पराभूततेची द्योतक आहे. परचक्राविरुद्ध होणाऱ्या उठावणीचें प्रत्यक्ष किंवा प्रोत्साहक नेतृत्व स्वीकारणाऱ्या व्यक्तींना व वर्गांना प्रथम छळ सोसावा लागतो, क्रान्ति यशस्वी झाली म्हणजे प्रभुत्व प्राप्त होतें आणि युगप्रवृत्तीच्या अनुरोधानें समाजाची पुनर्घटना होते. नेत्यांच्या नाकर्तेपणामुळें आणि त्यांच्या वर्गाच्या प्रतिसराङ्मुखतेमुळें अशा व्यवस्थेचें अश्मीभवन होतें आणि ती समाजाला असह्य होते. मग पुन्हां क्रान्ति होते; कारण समाजाचें चैतन्य हें

सत्त्व चिरजावी आहे. अशा क्रान्तींच्या अनुरोधानें व्यक्तींना व वर्गांना, जातींना व जमातींना श्रेष्ठ-कनिष्ठता प्राप्त होते. गाथासप्तशतींतला समाज ग्रामीण आहे. येथील खेड्यापाड्यांत ब्राह्मणांची वस्ती दिसत नाहीं; त्यांचें नांव ही निघत नाहीं; त्यांचें तथाकथित सांस्कृतिक प्रभुत्व व सामाजिक नेतृत्व नष्टप्राय झालेलें दिसतें. बौद्धही हतप्रभ झालेले दिसतात. समाज जिवट ग्रामसंस्थांच्या जिवावर जगत असलेला दिसतो. ही परिस्थिति पारतंत्र्यजन्य असावी, राज्य संस्थांच्या विस्कळितपणाची द्योतक असावी असें अनुमान होतें. गाथासप्तशतींतल्या समाजाचा आचारांचा वारसा शिष्ट समाजाला साजेसा आहे; थोडीबहुत भ्रष्टता दिसते तिचा संदर्भ वरील परिस्थितीशींच लावला पाहिजे.

पहिल्या सातकर्णीनें यज्ञसंस्थेचा पुनरुद्धार केला; नंतर वैदिक धर्माचा परागति झाली. गोतमीपुत्र सातकर्णीनें क्षहरात क्षत्रपांचा उच्छेद करून चातुर्वर्ण्याची पुनः स्थापना केली. त्या दरम्यानच्या काळांतली ही परिस्थिति आहे, असें या साधनांवरून अनुमान होतें.

१५. गाथासप्तशतींतील आर्थिक जीवन

१ आर्थिक जीवन

गाथासप्तशतींतला मराठा समाज वन्य व ग्रामीण आहे. मळईच्या सुसंपन्न प्रदेशांत स्थायिक झालेला नाहीं किंवा औद्योगिक व व्यापारी केंद्रांशीं संबद्ध नाहीं. जसा देश तसे लोक, जसा देश तसे व्यवसाय.

गाथासप्तशतींतील या विषयाशीं संबद्ध अशा उल्लेखांचा संदर्भ समजण्या-साठीं प्रथम तत्कालीन आर्थिक परिस्थितीचें सिंहावलोकन केलें पाहिजे.

त्या काळांत कऱ्हाड, जुन्नर, नगर, नाशिक, पैठण व वैजयंती (वनवासी) हीं शहरें भरभराटींत होतीं. अजंठ्याच्या घाटांतून जाणाऱ्या हमरस्त्यानें पैठणची पेठ उत्तर हिंदुस्थानांतील उज्जयिनी आदि बाजारपेठांशीं जोडलेली होती. पाण्डवलेण्यांवरून जाणाऱ्या मार्गानें गावधन व नाशिक हीं ठाण्यां सोपाऱ्याशीं आणि नाणेघाटामें जुन्नर व कोंकण घाटानें कार्लें कल्याणशीं संबद्ध होतें. भडोच, सोपारा, कल्याण व चोल हीं बंदरें भरभराटींत होतीं. जयगड, दाभोळ, बाणकोट, राजापूर व विजयदुर्ग या बंदरांतूनही परदेशांशीं

व्यापार चालू होता. रुपें, पोटिन व तांबें या धातूंचीं नाणीं अंतर्गत व्यवहारांत चालत होतीं. व्यापारी व कारागीर यांचे संघ होते आणि त्यांचेकडे सुपूर्त केलेल्या ठेवींवर ते दरसाल दर शेंकडा नऊ ते बारा टक्के व्याज देत असत. समकालीन शिलालेखांत पुढील कारागीर उल्लेखिले आहेत : आवेसणि (Artisans), ओदयंत्रिक (Fabricators of hydraulic-engines), कढिचक (Brick-layers), कमार (Iron-workers), कासाकार (Braziers), कुलरिक (Potters), कोलिक (Weavers), गंधिक (Perfumers), गोलिक (Herdsmen), चम्मकार (Leather-workers), तिलपिशक (Oil-pressers), तेसकार (Polishers) धम्मिक (Corn-dealers), मणिकार (Jewellers), मालाकार (Florists), मीठिक (Stone-polishers), लेखक (Writers), लोहवाणिय (Iron-mongers), वढकि (Carpenters), सुवर्णकार (Goldsmiths), सेलवढकि (Stone-masons), हालिक (Agriculturists). यांपैकीं ओदयंत्रिक, कासाकार, कुलरिक, कोलिक, तिलपिशक, तेसकार व धाम्मिक यांच्या श्रेणींचा ही या शिलालेखांत उल्लेख आलेला आहे. हे उद्योगधंदे सामान्यत: व्यापारी शहरांतच चालत असले पाहिजेत. शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशीं व व्यवसायांशीं संबद्ध असतील तेवढेच व्यवसाय खेड्यापाड्यांत चालणार व गाथासप्तशतींत उल्लेखिले जाणार हें उघड आहे. गाथासप्तशतीला संपन्नता व दारिद्य या दोहोंचीही चांगली जाणीव आहे.

संपादकाला त्याच्या पूर्वजांच्या व त्यांच्या समकालीनांच्या संपन्नतेच्या स्मृति असल्याच पाहिजेत. नंद व अशोक आणि नाणेघाटांतील देवकुलांतील शिलालेखांत ज्याच्या यज्ञांतील महादानांचा उल्लेख केलेला आहे तो सातकर्णी यांच्या अपरंपार संपत्तीची व दानशूरतेची आठवण त्याला असलाच पाहिजे. विपन्नोद्धारांत ज्याचें कर्तृत्व शंकराच्या तोडीचें त्या शालिवाहनाचें स्मरण (क्र. ४६७) त्यानें वंदनपूर्वक केलेलें आहे. कुशल संवाहकाला लक्ष मुद्रा बक्षीस देणाऱ्या विक्रमादित्याचा उल्लेख (क्र. ४६४) केलेला आहे आणि चार गाथांना दशकोटि मुद्रा मानधन देऊन (क्र. ९९९) दातृत्व व रसिकता या गुणांत त्यानें पूर्वोल्लेखितांवर कडी केलेली आहे.

हटकून नसली तरी सामान्यतः कार्य करणाऱ्या पुरुषाला लक्ष्मी प्राप्त (क. ४२) होतेच. प्रत्यक्ष हाती असतें तेंच (क. २५१) धन आणि तेंच वैभवाचें सार (क. २१२). क. ६०९ मधील गोधनाचा उल्लेख दर्शवितो कीं आतां वेदकालाहून अनेक अन्य धनें उपलब्ध झालेलीं आहेत. शेतकऱ्याची समृद्धि क. ६८९ मध्यें वर्णिलेली आहे. धनप्राप्तीनें सज्जनांना गर्व होत नाहीं (क. १८०) ते आंधळे धन्य कीं ज्यांना दुष्टांच्या समृद्धीचें दर्शन होत नाहीं (क. ६९५). नीचांनाच अशा समृद्धीचा फायदा मिळतो (क. २४८). कृपणाची संपत्ति जणूं नागफणेवरील मणि: निरुपयोगी (क. ९७०) व निष्फळ (क. १३६), स्वतःला व इतरांनाही. संपत्ति पुरून ठेवण्याची प्रथा आणि निधान (क. ३१८, ३७३, ५०७, ५७१, ५७६) व निक्षेप (क. ३५८) यांबाबतच्या परंपरा तेव्हांही प्रचलित होत्या. संपत्ति कळशांत गुप्त जागीं पुरून ठेवण्यांत येत असे. कधीं मालकाला त्या स्थळाचें विस्मरण (क. ३१८) होई आणि मग ती कोणा भाग्यवंताला प्राप्त (क. ५०७, ५७१) होई. भूमिगत संपत्तीचें रक्षण सर्प करीत असल्याचा समजूत (क. ५७६) तेव्हांही प्रचलित होती. आतांप्रमाणेच तेव्हांही ठेवी बुडविणारे दुर्निक्षेपक (दुनाले!) सावकार (क. १५४) समाजांत उजळ माथ्यानें वावरत होते. वडिलांनीं कर्ज करावीत व तीं मुलांनीं फेडावीत ही व्यवहारपद्धति (क. ११३) तेव्हांही चालू होती.

गाथासप्तशतीत दारिद्र्याचे (क. १८, ३६, ३८, ७६, ८३, १३४, १६१, १९५, २८४, २९०, २९३, ३२०, ३२१, ३६३, ४७२, ५१५, ५५०, ६१०, ६७१, ७३३) अनेक उल्लेख आहेत. संपत्तीचा दिमाख व खलांची समृद्धि गाथासप्तशतीला खुपते: त्यांहून अधिक सलतें कुलीन व सुजन यांचें दारिद्र्य. दारिद्र्याची विचक्षण गुणग्राहकता (क. ६७१) या गाथेंत मध्ययुगीन कृत्रिम शैलींत प्रशंसिली आहे. दानशील रसिकता व दारिद्र्य यांचें (क. २३०) या गाथेंतील साहचर्य चारुदत्ताचें चित्र चित्तासमोर उभें करतें. सज्जनांना संपत्तीवांचून स्वजनमध्यवास (क. ३६३) आणि कलावंतांना मित्राची संगत ही असह्य (क. ७३३) वाटतात, अपमानापेक्षां मान अधिक अपमानकारक (क. ३२०) वाटतो. पुरुषांनाच नव्हे स्त्रियांनाही दारिद्र्य बोंचतें. माहेरीं श्रीमंती व सासरी दारिद्र्य असलेल्या गृहिणीला आभिजात्यामुळें विपन्नावस्था सोसते पण माहेरच्या माणसांचा डामडौल सहा-

वारांहो सहन (क. ३८) होत नाहीं. उदरचिंतेनें मुख काळवंडतें (क. ८३); पोट मनुष्याला लोंचट (क. १३४) करतें, उसनवारी (क. १९६) करायला लावतें, भिंधी भोक मागायला (क. १६१, १९५, ५५३) लावतें. क २९० व ४७२ मधील डोहाळे लागलेल्या वधूची स्थिति सहृदयाला पीळ पाडणारी आहे.

खरेदी करावयाच्या मालाचा नमुना (क. ६२०) पाहणें, त्याचें मूल्य (क. ६९८) विचारणें, महाग (क. १६८) कीं सवंग (क. २८७) तें ठरविणें, तराजूनें तोलून (क. १९१) किंवा मापानें मोजून (क. १५२) माल घेणें, रोखीनें (क. ६८) किंवा वस्तुविनिमयानें (क. २३८) मूल्य देणें ही व्यवहारपद्धति प्रचलित असलेली दिसून येते. घाऊक व व्यापारी व्यवहारांचा उल्लेख कोठेंही आलेला नाहीं लोकगीतांत त्यांचा आढळ होणें शक्यही नाही.

भारत हा आतांप्रमाणेंच तेव्हांही कृषिप्रधान देश होता. शेतकरी व शेतींत पदा होणारे पदार्थ याच्या उल्लेखांच्या संख्येवरून गाथासप्तशतीच्या काळांतही अशीच परिस्थिति असल्याचें दिसून येतें.

२. शेत, शेती व शेतकरी :

गाथासप्तशतींत शेत जमीनीला छित्त (क. ९) व छेत्त (क. १६८, १६९, ५६३, ५९१) = क्षेत्र या संज्ञा योजलेल्या आहेत. समकालीन शिलालेखांत खेत ही संज्ञा आढळते. क्षेत्र म्हणजे लागवडीखालची, लागवडीला आणण्याजोगी किंवा मुद्दाम पड ठेवलेली जमीन. शेतांना सीमादर्शक किंवा जलविरोधक बांध (क. १६८) आहेत आणि बाऱ्यांना कुंपणें (क. ९६, ५६३, ६३५) आहेत. हीं शेतें ग्रामसीमेला भिडलेलीं (क. ४०२) आहेत. काळीची मर्यादा दर्शविण्यासाठीं ग्रामसीमेवर तणपुरिस–तृणपुरुष (क. ७४५) बुजगावण्या-सारखा उभा केलेला आहे. लागवडीला लायक असलेल्या जमीनीपलीकडे कुरणें असत व त्यांपलीकडे अरण्यें. वेदकाळांत जमीनीचें क्षेत्रफळ मोजून त्यांची क्षेत्रांत विभागणी करण्यांत येत असे (१·११०·५) आणि त्यांवर शेतकऱ्यांचा मालकी हक्क (८·९१·५–६) असे. सातवाहनकालांत जमीनमोजणीसाठीं निवतण = निवर्तन हें मेज (Nasik Gazetteer : Pandu Lena Inscr : No 4) वापरांत होतें. ४ हात = १ दण्ड, १० दण्ड = १ रज्जु आणि

३ × ३ रज्जु = १.चौरस निवर्तन असा तपशील कौटिल्यानें अर्थशास्त्रांत (Shamsastry. P. 118) दिलेला आहे. महाराष्ट्र शब्दकोशांत दिला आहे तो अर्थ असा : १. गुजरार्थेतील चार बिघे जमीनीचें परिमाण. २. दहा हात लांबीच्या वीस काठ्यांचें माप; औरस चौरस ४००० हात. ३. औरस चौरस तीनशें हात. जमीनीवर शेतकऱ्याचा मालकी हक्क असे आणि शेत-जमीनीवर कर घेण्याचा किंवा करमाफी करण्याचा सरकारला अधिकार असे हेंही त्या लेखावरून दिसून येतें.

जमीन नांगरण्यासाठीं हल (क. ३२४, ६९०, ७८९) व लङ्गल (क. १६५) वापरलेले आहेत. हल हा हलका नांगर हलक्या जमीनीसाठीं वापरण्यांत येत असावा आणि लङ्गल हा मोठा व वजनदार असून तो भारी जमीनीसाठीं वापरण्यांत येत असावा. क. ६९० मधील हल भात शेतांत फिरलेला आहे. क. ३२४ मधील हल चिखलांत चाललेला आहे, त्याचा फाळ वारंवार आणि ओढून काढावा लागत आहे; अशी नांगरट फक्त भातशेतींत संभवते. क. ७८९ मधील 'कठिण-खर-वीर' अशी खडकाळ जमीन प्रथमच नांगरण्याकरतां हल वापरलेला आहे. खर = कठोर (दे. ना. २·७८) = खडकाळ आणि विर = भांगणें (हेम : ४·१०६) यांवरून तर करवीर हें ग्रामनाम सिद्ध झालेलें नसेल ? भातजमीनीसाठीं वापरण्यांत येणारा हलका नांगर मावळांतले शेतकरी हल्लींही खांद्यावरून घरांतून शेताकडे वाहून नेतांना दिसतात. क. १६५ मधील लङ्गल कपाशीच्या शेतांत उभा आहे. कपाशीला कसदार जमीनींत खोल नांगरट करावी लागते. या दोन्ही जातींच्या नांगरांना लोखंडी फाळ बसविलेले आहेत; तसें नसतें तर क. ७८९ मधील खडकाळ जमीन नांगरतांना ठिणग्या उडाल्या नसत्या. नांगराला जुंपलेलीं जनावरें जुंवाला जोत्त = योक्त्र = कासऱ्यानें बांधलेलीं असत आणि त्यांना अवहासिणी–वेसणी घातलेल्या (क. ६९२) असत. नांगर ओढण्यासाठीं बैल व रेडे या दोहोंचा उपयोग होत असावा; प्रत्यक्ष उल्लेख मात्र आलेला नाहीं; तरीही क. २३८ व ६९३ मधील उल्लेखांवरून बैलांबद्दल निश्चित अनुमान करतां येतें. सामान्यतः नांगराला दोन बैल (Jataka: II: 165, 300) जुंपीत असत. नांगरटीपूर्वीं नांगराची पूजा करीत असत. क. ३५८ या गाथेंत प्रत्यक्ष पेरणीचा एकमेव उल्लेख आलेला आहे. हल्लींप्रमाणेंच तेव्हांही

मुठीनें बीं पेरीत असत. नांगरणी व पेरणी हीं मेहनतीचीं कामें पुरुषांनीं केलेलीं आहेत आणि शेत राखणीचें (क्र. ६९०, ६९१, ८१५, १००६) आणि न्याहारी (उवहारिआ, पाउहारी) पोंचवण्याचें (क्र. ६९२, ७२६) अशीं कमी मेहनतीचीं कामें मोलाच्या व घरच्या स्त्रियांनीं केलेलीं आहेत.

गाथासप्तशतींतील पिकें मुख्यत्वेंकरून पावसाळी आहेत. क्र. ५६७ मधील साळीचें शेत पाण्यानें भरलेलें आहे आणि क्र. ६९० मधील शालिक्षेत्रांतून तर पावसाळी पाण्याचा प्रवाह वाहलेला आहे. अशीं दृश्यें आजही मावळांत दिसतात. पावसाळी पाण्यावर पिकणाऱ्या जमीनीला केतु आणि विहीरीच्या पाण्यावरल्या जमीनीला सेतु अशा संज्ञा योजलेल्या आढळतात. पाण्याच्या भरपूर पुरवठ्यावांचून उंसाचें पीक निघणें शक्य नाहीं; मग हें पाणी कालव्याचें असो किंवा विहिरीचें. क्र. ४९० या गाथेंत रहट्टघडि—रहाट-गाडग्याचा उल्लेख आहे. या यंत्राला इंग्रजींत पर्शियन व्हील, इराणी चाक अशी संज्ञा आहे. भूमिगत जलप्रवाहांचा व जलाशयांचा शेतीसाठीं उपयोग करण्याच्या अनेक योजना इराणांत वापरांत आहेत. त्या अर्वाचीन आहेत असें गृहीत धरून गाथासप्तशतीचा काळ अलीकडे ओढण्याचा कांहीं संशोधकांचा प्रयत्न आहे. तो योग्य नाहीं. ऋग्वेदांत (१०·१०१·५–६) रहाटगाडग्याचा उल्लेख आहे. श्री. चित्रावशास्त्री यांच्या भाषांतरावरून त्यांबद्दल स्पष्ट कल्पना होत नाहीं; शिवाय या सूक्तांत एतद्विषयक संज्ञा प्रत्यक्ष आलेली नाहीं. वाद्यांनीं परस्परांनीं बांधलेलीं भांडीं आणि विहिरींतून ओढलेल्या पाण्याचा अखंड प्रवाह यांचा समन्वय अशा यंत्राचें अस्तित्व मानल्याशिवाय होऊं शकत नाहीं. अर्थात् हें यंत्र अर्वाचीन किंवा परकी आहे असें मानण्याचें कांहींच कारण नाहीं.

हलिअ = **हलिक** (क्र. ३१७, ३६०, ५६७, ६९३); हलिक-पुत्र (क्र: ८४, १८०, ३७३, ४५८, ६००, ६०३, ७४५, ८५९); हलिक-पुत्रि (क्र. ३८८, ८५७, ८५८); हलिक-स्नुषा (क्र: १०७, २४१, ९५३).

हल धारण करतो तो हलिक; नांगऱ्या; शेतकरी. हातां पळी पोथी धारण करतात म्हणून स्वतःला वरिष्ठ म्हणवून घेणाऱ्या कांहीं जमाती हातीं हल धारण करणाऱ्यांना हलके गणतात. ही वृत्ति हानिकारक आहे: सांस्कृतिकच

नव्हे, व्यावहारिक दृष्ट्याही. वस्तुतः हरी हा हलांचा पुढारी. रलयोरभेदः या नियमानुसारही. हल हें प्रतीक धारण करण्यांत हलधर बलरामाला कमीपणा वाटला नाहीं: हातीं हल घेऊन जमीनीचें कर्षण करण्यांत संकर्षणालाही हलकेपणा वाटला नाहीं.

गाथासप्तशतींतला हालिक अडाणी (क्र. १८०) आहे, अल्पसंतुष्ट (क्र.३१७) आहे, त्याचें मनगट बळकट (क्र. ७८९) आहे आणि तो कष्टाळू (क्र. ३२४) आहे; तो नांगरतो (क्र. ३२४),पेरतो (क्र. ३५८), राखतो (क्र. ९५२),कापणी करतो (क्र. ८-९), मळणी करतो (क्र. ६८८). हालिकांपैकीं बरेच पामर (१६९,२३८,३५८,६८९,६९२) आहेत. क्र. ८४ मधील हालिक सधन असावा. क्र. २३८ मधील हालिक इतका दरिद्री कीं बैल खरेदीसाठीं त्याला पांघरुणें विकावीं लागतात. हालिकाचें आपल्या शेतावर पोटच्या पोराएवढें प्रेम (क्र. ५६७) असतें. हालिकांची कामासक्ति अनेक गाथांत वर्णिलेली आहे: विशेषतः त्याला आर्य स्त्रियांबद्दल वाटणारें आकर्षण (क्र. ८४) आणि त्यामुळें आर्यांच्या रोषाची धास्ती (क्र. ३६०). हालिकांच्या स्त्रिया दुग्धसमुद्रांतून निघालेल्या लक्ष्मीसारख्या (क्र. ३८८) सुंदर आहेत: त्यांचे स्तन पुष्ट (क्र. ८५७) आहेत, एवढेंच नव्हे, एरंडाच्या पानांएवढे विस्तीर्ण (क्र.२५७) आहेत. देशींत एरंडाला पंचंगुलि (दे. ना. ६·१७) अशी संज्ञा आहे, ती मोठी अन्वर्थक आहे. हालिक स्त्रिया इतक्या अल्पसंतुष्ट आहेत कीं त्यांना नवें वस्त्र मिळालें (क्र. २४१) कीं अस्मान ठेंगणें वाटतें: आणि पतीची मर्जी सांभाळण्याविषयीं इतक्या तत्पर व एवढ्या सहनशील कीं त्या त्याच्यासाठीं स्वतः दौत्य करावयासही माघार घेणार (क्र. ८८) नाहींत. हालिक पुरुषांना आर्य स्त्रियांबद्दल वाटतें तसें आकर्षण हालिक स्त्रियांना गृहपति-पुत्रांबद्दल (क्र. १०७) वाटतें. क्र. ४५८ व ८५६ या गाथांत लैङ्गिक विकृतींचे उल्लेख आलेले आहेत.

हालिकाचा जीवनक्रम कष्टाचा. सकाळीं शेतावर फेरी (क्र. ६९३) टाकावी, दिवसभर दमछाक होईपर्यंत चिखलांत-पावसांत नांगरट (क्र. ३२४) करावी आणि घरीं जावें तर रात्रीं इकडे शेत उंदरांनीं कुरतडावें (क्र. ७६३) किंवा रेड्यांनीं तुडवावें (क्र ५४९). रात्रीं उबदार, जवानीनें तटतटलेल्या, सांवळ्या राणीला कवेंत घेऊन झोंपावें आणि विधुर असल्यास घरींच उदासवाणें बसून

रहावें (क्र. ३७३) किंवा काम नसलें तरी शेतांतच **वस्ती** (क्र. १६९) करावी. आनंद काय तो एकदांच- खळयावर पांढऱ्या शुभ्र तांदळाची रास पडेल (क्र. ६८९) तेव्हां !

गाथासप्तशतींत पुढील पिकाचे उल्लेख आलेले आहेत; ऊंस (**इच्छु, उच्छु, पुंडइच्छु**; क्र. ५४१, ५५४, ७३४, ७६९. ७७०); कपाशी (**कप्पास, तूल, फलही, फलिहः** क्र. १६५, ३५९, ३६० ५४९. ६७९, ८०५); **कोहाळा** (क्र. ७६२, ७९६), चणे (**चणअः** क्र.५५७); तांदूळ (**कलमः** क्र. ६९०, ६९१: **व्रीहिः** क्र. ९, ५६७, ५६८, ६८९, ६९०, ७८२ १००३); **तिल** (क्र. ८. ६९२, ७३३): तूर (**तुवरीः** क्र. ३५८); मोहरी (**राइआः** क्र. ११९); **यव** (क्र. ४०२) **वालुङ्की** (क्र. १०) आणि शण (क्र. ९). आणि गवतांपैकीं तृण (**तणः** क्र. ७७, ३७९, ३९४, ५२६); **पलाल** (क्र. १०९, ३३०): व **सिप्पिर** (३३०)

या उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें कीं गाथासप्तशती निर्माण झाली त्या प्रदेशाचें तांदूळ हेंच मुख्य अन्न व पीक आहे. आणि जीं तृणें उल्लेखिलेलीं आहेत तींही भातशेतीच्याच भागांतलीं आहेत. छप्पर, बिछाना व शेकोटी या तीन्ही कार्यांसाठीं भाताच्याच पेंढ्यांचा उपयोग होऊं शकतो. मात्र येथें नारळीची झाडें नाहींत आणि क्र. ७८२ मधील साळीच्या शेताचा उल्लेख विन्ध्याच्या साहचर्यांत आलेला आहे. गाथासप्तशतीच्या निर्मितीची स्थलनिश्चिति करतांना हे आणि कपाशीचेही उल्लेख विचारांत घेतले पाहिजेत.

येथें तांदळाच्या तीन जातींचे उल्लेख आलेले आहेत. त्याच्या ओळखीबद्दल मतभेद आहेत. सामान्यतः कलम म्हणजे कोळंबा, सालि म्हणजे गरवी आणि व्रीहि म्हणजे हळवी. गरवीचें पीक सुमारें सहा महिन्यांत तयार होतें. क्र. ५६८ मधील साळीचें पीक हिवाळ्यांतलें दंव पडलें तरी तयार झालेलें नाहीं. क्र. ६८९ मधील साळीचा तांदूळ शरद् ऋतूंत तयार झालेला आहे. हळवीचें पीक सामान्यतः तीन ते साडे चार महिन्यांत तयार होतें आणि कोठें साठ दिवसांत. ऋग्वेदांत तांदुळाचा उल्लेख नाहीं आणि व्रीहि हा प्रथम अथर्वांत (**बुद्धपूर्व** जगः पृ. २९५) आढळतो. गोदावरीच्या परिसरांत पडलेल्या दुष्काळांत गौतमानें जलद वाढणारी तांदळाची जात लावली, ती हीच तर

नसेल ! तांदळांच्या शेतांत पाणी तुंबविण्यासाठीं उतारावर बांध घालणें, घिरिटावर भात भरडणें आणि उखळांत मुसळानें तांदूळ कांडणें, या पद्धति तेव्हांही प्रचारांत होत्या असें क्र. ५६७, ५६८, व ७९४ या गाथांवरून दिसतें. खळ्यावरली नव्या तांदळाची पांढरी शुभ्र रास आणि शरद् ऋतूंतील कांटेरी चांदणें यांची क्र. ६८९ मधील तुलना नवकाव्यांतली असावी असें वाटण्याइतकी अकल्पित आहे. वैदिक वाङ्मयांत क्षेत्रें व मुलें यांचा उल्लेख एकाच भावनेनें केलेला आढळतो (बद्धपूर्वजगः पृ. १७८), तसा उल्लेख क्र. ५६७ या गाथेंतही आढळतो.

भारतीयांना ऊंस अथर्व कालापासून (१·३४·५; १२·२·५४) माहीत आहे. क्र. ७३४ या गाथेंत उंसाच्या पुण्ड्या जातीचा उल्लेख आहे. ही जात मूळची परकी (Watt. Commercial Products of India : P. 936) असली तरी ती अनेक शतकांपासून हिंदुस्थानांत स्थायिक झालेली आहे. पुण्ड्याच्या जातींपैकीं पुणेरी, बनारसी व सहराणपुरी या विशेष विख्यात आहेत. या उंसाची उत्तमांगनेशीं तुलना केलेली आहे; वाळली सुकली तरी तिची गोडी कमी होत नाहीं म्हणूनच पुण्ड्याची लागवड लोकवस्तीच्या आसमंतांत आणि साखर कारखान्यांच्या आसपास करण्यांत येते.

गाथासप्तशतींत कपाशीचे सहा उल्लेख आलेले आहेत. एकादाच उल्लेख असता तर अपवाद म्हणून किंवा ग्रामीण जीवनाच्या आर्थिक स्वयंपूर्णतेचें लक्षण म्हणून वासलात लावतां आली असती. सहजीं उडवतां येण्यासारखे हे उल्लेख उपरे नाहींत. गंभीर नागरपूजेपासून बोंडांच्या छिचोर हास्यापर्यंत त्यांची व्याप्ति आहे. तांदूळ व कापूस शेजारीं पिकत नाहींत. त्यांच्या दरम्यान कोरडवाहू रुंद पट्टा असतो. तांदळी प्रदेशांत पडतो तेवढ्या पावसांत कपाशी कुजून जाईल आणि कपाशी पिकते त्या भागांतल्या उष्णतेनें तांदूळ कोळपून जाईल. शिवाय या जमीनींचा कसही वेगळा असतो. म्हणून गाथासप्तशतीच्या निर्मितीसाठीं सह्य व विन्ध्य यांच्या परिसरांतील निसर्गतः भिन्न अशा प्रदेशांतील कर्त्यांचें सहकार्य झालें असलें पाहिजे असें निश्चितपण सांगतां येतें.

तांदळापेक्षां कपाशीचें पीक मौल्यवान हें तत्कालीनांनाही मान्य होतें असें स्पष्ट दिसतें. तांदळाच्या शेतांत चोरून चरणाऱ्या पोळाला घरधन्याचीच धास्ती

(क्र. ९५२) आणि कपाशीच्या शेतांत रेडा घुसला तर त्याला हुसकायला घरदार धांव (क्र. ५४९) घेतें तांदळाच्या पिकाची राखण घरच्या पोरी (क्र. १००३) व मोलाच्या बाया (क्र. ६९०, ६९१) करतात तर कपाशीची राखण करण्यासाठीं अडदांड अहीरांची योजना करण्यांत (क्र. ८०५) येते ! पिकल्या तांदळाची रास उघड्या खळ्यावर घालण्यांत येते (६८९) तर कपाशीचीं बोंडें वेंचण्याचें काम चालू असतांना खुद्द गृहपतिसुता (क्र. ३५९) हजर राहते !

कपाशीच्या खालोखाल तिळाचे उल्लेख आलेले आहेत. तीळ जितके उपयुक्त तितकेच पवित्र. अथर्व वेदांत तिळाचे अनेक उल्लेख (१२·८·३;१२·२·५४) आलेले आहेत. तीळ व तांदूळ हीं पिकें एकमेकांच्या साहचर्यांत वाढतात. इतर पिकांपैकीं मोहरीचा उल्लेख गोदावरीच्या साहचर्यांत आलेला आहे एवढाच मुद्दा लक्षांत घेण्याजोगा आहे.

३ शिकार :

शिकार हा गाथासप्तशतींतील वन्यांचा चरितार्थाचा व्यवसाय आहे. रघुवंश व शाकुन्तल, कादंबरी व हर्षचरित इत्यादि उत्तरकालीन ग्रंथांत शिकार ही वरिष्ठ व संपन्न वर्गाची क्रीडा झालेली आहे. हें साहित्य कृत्रिम, बहुजनसमाजविन्मुख व वरिष्ठ वर्गाधिष्ठित झालें असल्याचें यावरून निःसंदिग्धपणें दिसून येतें.

गाथासप्तशतींतले व्याध करतात ती शिकार व्याघ्रादि हिंस्र श्वापदांची (क्र. ९४५), हत्तींची (क्र. १२१, ६३०) व हरणांची (क्र. ६०१, ६१८, ६२९, ९४५,). पुलिंदाचा उल्लेख कुंजरमृगयासक्त (क्र. ११६) म्हणून आलेला आहे. व्याघ्रांची व हरिणांची शिकार होते ती त्यांच्या चर्मासाठीं आणि हत्तींची त्यांच्या दांतांसाठीं. हरणाचें मांस हें मांसोत्तम म्हणून प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे. मिरवणुकींत किंवा लढाईंत डंका धारण करण्यासाठीं हत्ती पकडण्यांत येत (क्र. ९९३) असत. प्राचीन भारतीय युद्धपद्धतींत हत्तींचें स्थान आघाडीचें व महत्त्वाचें होतें. सांप्रदायिक विधीसाठीं मृगाजिनें व यज्ञप्रसंगीं प्रमुख कर्त्यासाठीं व्याघ्राजिनें वापरण्याची प्रथा वेदकालापासून प्रचलित आहे. अशीं चर्में विक्रीकरतां खरेदी करण्यासाठीं फेरीवाले वाणी व्याधांच्या घरोघर

(क. ९४५) जात असत. दांतांसाठीं हत्तींची शिकार होत असल्याचे अनेक उल्लेख जातकांत (१·३२०) आढळतात. आरशांचे दांडे, बांगड्या, फण्या इत्यादि वस्तु बनविण्यासाठीं हस्तिदंताचा वापर झालेला तेथें व समकालीन शिल्पांत आढळतो.

पुलिंद व व्याध शिकारीसाठीं धनुष्यबाण हेंच आयुध वापरतात. पित्याचें धनुष्य वारशानें पुत्राकडे (क. ६६३) येत असे. एकेका व्याधाचा रानांत असा दरारा असे (क. १२१) कीं त्याच्या हयातींत त्याच्या वस्तीच्या आसपास फिरकण्यासही हत्ती धजत नसत. क. ६३० मधील व्याध असा जबरदस्त होता कीं तो एका बाणांत हत्तीला लोळवी; पण लग्नानंतर बायकोच्या नादानें तो इतका बावचळला कीं आतां त्याला पूर्वीचें धनुष्यही पेलेनासें झालें; हीच व्याधवधूंची फुशारकी. आपल्यावरील आसक्तीमुळें दुर्बल झालेल्या पतीचें धनुष्य त्याला पेलावें म्हणून तें हलकें करण्यासाठीं त्या तें उघड्यावर छिलून आपलें सौभाग्य प्रकट (क. ११९, १२०, १२२) करतात. कानापर्यंत धनुष्याची दोरी ओढून (क. ५९४) बाण सोडला कीं जणूं वीज कडाडल्यासारखा शिंजिनीचा घोष (क. ५४, ५५) होई. चितळ हरणाची शिकार करणें हें कर्तृत्वांत कमीपणाचें लक्षण होय असें व्याधस्त्रियाही (क. ६२९) मानीत असत.

धनुष्य (क. ११६, ११९, १२०, १२२, १७५, ४२८, ४७३, ५०४, ५८४, ६०१, ६१८, ६६३, ७०७, ८०२, ९८६); बाण (क. १०१, २१०, ३२५, ३२६, ३८१, ४२४, ४४१, ५०४, ६०१, ६३०, ९४६, ९८२, ९९४), भल्ल (क. ५८६, ५९४) आणि शिञ्जिनी (क. ५४, ५५, २७७, ४२४, ५९४, ६०१).

शस्त्रास्त्रांपैकीं हा एवढाच विषय येथें घेतों. कारण गाथासप्तशतींत धनुष्यबाण हें आयुध मुख्यत्वेंकरून व्याधांनी व तेंही शिकारीसाठींच वापरलेलें आहे पहा. क. १७७, ४७३ व ९८६ हीं धनुष्यें मदनाचीं व क. ५८४ व ७०७ हीं इंद्राचीं : क. ५०४ हें धनुष्य भृकुटीचें आणि क. ८०२ हें चंद्राचें; आणि बाणांपैकीं क. १०१, २१०, ३२५, ३२६, ३८१, ४२४, ४४१, ९४६, ९८२ व ९९४ हे शर मदनाचे व क. ५०४ मधील अर्धचंद्राकृति बाण दृष्टीचा

क्र. ५४ व ५५ मधील शिंजिनीघोष, बन्दिनीच्या प्रियकराच्या टणत्काराच्या. उपमा व संकेत वगळले म्हणजे राहतात ते धनुष्यबाण व्याधपुलिंदांचें.

धनुष्य हें वेदकालीन आर्यांचें मुख्य शस्त्र. ऋग्वेदांतलें (१०. २७. २२) धनुष्य लांकडाचें असून त्याची दोरी स्नायूंची आहे. महाभारतकाळांत कार्मुक (४. ३८. १३.) या लांकडाचें धनुष्य बनवीत असत. कौटिल्यानें (शाम-शास्त्री : पृ. ११९) धनुष्याचे कार्मुक, कोदण्ड, द्रूण व धनु हे प्रकार दिलेले असून ते अनुक्रमें ताल, बांबू, दारु व शृंग यांपासून बनविलेले असत असें नमूद केलेलें आहे. पुढें धातूंची निर्मिति वाढली व त्यांचा उपयोग अस्त्रांसाठीं होऊं लागला. धनुष्यासाठीं शिंग व लोखंड यांचा जोडीनें उपयोग करावा असें अग्निपुराणांत (२४९. ५–१०) सांगितलेलें आहे. तरी हेरोडोटसच्या (७. ६६) काळापर्यंत मुख्यत्वेंकरून बांबूंचींच धनुष्यें वापरांत होतीं. जोड वांकणारीं धनुष्यें बरींच उत्तरकालीन असावींत. महाभारतांतलीं धनुष्यें (१. २२५. ८–९; ६. १००. १३) रंगविलेलीं आहेत. त्यांवर सुवर्णाकृति व रत्नें जडविलेलीं आहेत. धनुष्यें तीं वापरणाराच्या उंचीच्या व शक्तीच्या मानानें लहान मोठीं असत. सामान्यतः त्यांची लांबी तालमात्र असावी असें महाभारतांत सांगितलेलें आहे. याहून मोठीं धनुष्यें शक्तीच्या (क्र. ६६३) किंवा निशाणाच्या स्पर्धेसाठीं वापरण्यांत येत असत. शिञ्जिनी म्हणजे धनुष्याची दोरी. वेदकाळांत ही दोरी बैलाचें कातडें किंवा स्नायू यांची असे. मूर्व, तृण, शण, बांबूची साल वा स्नायु यांपासून धनुष्याची शिञ्जिनी सिद्ध करावी असें कौटिल्यानें (पूर्वोक्त) सांगितलेलें आहे. शिञ्जिनीच्या प्रत्येक टोंकाला फांस असे; पैकीं एक फांस धनुष्याच्या वरल्या आर्त्नी संज्ञक टोंकाशीं असलेल्या खांचेंत नेहमीं गुंतविलेला असे; धनुष्य वापरण्याच्या वेळींच दुसरा फांस खालच्या खांचेंत बसविण्यांत येत असे; नाहीं तर धनुष्याच्या कमानीची शक्ति नष्ट व्हावयाची. धनुष्य वापरण्याच्या वेगवेगळ्या संज्ञा वाजसनेयी संहितेंत दिलेल्या आहेत. आतन् = धनुष्यावर दोरी चढविणें; प्रतिज्ञा = बाण लावणें; आयम् = धनुष्य वांकवणें आणि अस् = बाण सोडणें. बाण जोडून शिञ्जिनी ताणून, नेम धरण्याला संधान ही संज्ञा इतरत्र दिलेली आहे. धनुष्याचा मध्यभाग

व बाणाचें अग्र आणि लक्ष्य हीं उघड्या डोळ्याच्या पातळींत येतील एवढें धनुष्य उचलून संधान साधावयाचें. महाभारतांतले योद्धे धनुष्य उभें धरतात आणि होमरचे योद्धे तें आडवें धरतात. गुडघ्यावर बसून किंवा अंतराळांतील संधान साधावयाचें असेल तेव्हां धनुष्य आडवेंच धरावें लागतें. आपले योद्धे धनुष्याची दोरी कानापर्यंत (क. ५९४) ओढतात व त्याचे छातीपर्यंत; आपले योद्धे दोरी उजव्या हातानें ओढतात, एकटा अर्जुन मात्र सव्यसाची होता. ऋग्वेदांत, अथर्ववेदांत व पुराणांत बाणांचे द्योतक असे अनेक शब्द दिलेले आहेत. भल्ल (क. ५९४) हाही बाणच आहे असें हॉपकिन्सचें (Position of the Ruling Caste in India : p. 273) म्हणणें आहे. अर्धचंद्राकृति बाण हा भीमाचा विशेष आवडता. क. ५८५ मधील हस्तभल्ल हा मात्र भाला असावा. वेदकालीन बाण वेताचे असत; त्यांचीं फळें शिंगाचीं, तांब्याचीं अगर पंचधातूंचीं असत; तीं ज्वालेसारखीं अणकुचीदार असत. ऋग्वेदांत व अथर्व वेदांत आलाक्ता व दिग्ध या विषारी बाणांचा उल्लेख आलेला आहे. अशा विषारी बाणांचा वापर धर्मयुद्धांत करावयाचा नाहीं असा सक्त नियम होता. अनार्यांचे जमाव व हिंस्र श्वापदें यांसाठीं त्यांचा उपयोग होत असावा. कौटिल्यानें नाराच या लोखंडी बाणाचा उल्लेख केलेला आहे. बाणाची लांबी रथाच्या आंखाएवढी (म. भा. ७·१६६·१८) म्हणजे वावभर असे. मध्ययुगांत बाणांची लांबी अडीच ते तीन फूट (Egerton : Hand-Book of Indian Arms) असे. बाणाच्या आघाडीचें शल्य व पिछाडीचीं पिसें हीं कांड्याला तांतीनें बांधलेलीं असत. बाणांचा भाता (काण्डकरण्डअः क. ६३०) पाठीवर असे. त्यांत दहा ते वीस बाण असत. ऋग्वेदांतील धनुष्यांच्या दोऱ्या (१०·२७·२२) स्नायूंच्या आहेत. महाभारतांतल्या मूर्व तृणाच्या अगर लतेच्या आहेत; अग्निपुराणांत कातड्याच्या दोऱ्यांची शिफारस केलेली आहे. क. ५४ व ५५ या गाथांत शिञ्जिनींच्या टणत्काराचा उल्लेख आलेला आहे. अश्रूंनीं ओलावल्यामुळें पीळ उकलून शिञ्जिनी निरुपयोगी होत असावी असें क. ६०१ मधील उल्लेखावरून दिसतें. रणधुमाळींत धनुष्यें मोडतात व दोऱ्या तुटतात आणि बाण संपतात; म्हणून त्यांचा सांठा जवळ बाळगावा लागत असला पाहिजे. धनुर्धरांनीं सोडलेल्या बाणांनीं आकाश भरून गेल्याचीं वर्णनें

आढळतात; पण त्या मानानें हानि झालेली दिसत नाहीं. म्हणून या अस्त्राचा कार्यक्षमता कमी लेखण्याकडे पाश्चात्य संशोधकांचा कल आहे.

फांसेपारधी पाश लावून पांखरें पकडीत, असें क्र. १३८ व २०५ मधील उल्लेखांवरून दिसते. ऋग्वेदांतही या पद्धतीचा उल्लेख (३·४'५·१) आढळतो. क्र. ७८३ मध्यें हत्ती पकडण्यासाठीं पाश लावलेला आहे. हत्तींचा आटोपशीर कळप आटोक्यांत आलेला पाहून शिकारी टोळ्या जंगलाला दोहींकडून आग लावतात आणि भेदरलेल्या हत्तींना पकडतात. या पद्धतीचा उल्लेख क्र. ७८४ या गाथेंत आढळतो. हत्तींच्या हालचाली चालू असतील अशा प्रदेशांत खड्डे खणावयाचे, ते काटक्यांनीं भरून त्यांवर गवत व माती पसरून भोंवतालच्या जमिनीसारखें करावयाचे आणि एकट्यादुकट्या हत्तीला फसवून त्यांत आणून अडकवावयाचे. ही पद्धत क्र. ७८५ या गाथेंत दिसून येते. येथे हत्तीला फसविण्यासाठीं खड्ड्यांत कृत्रिम हत्तीण उभी केलेली आहे. हत्तीचें घ्राणेंद्रिय फार तीक्ष्ण असतें; त्या मानानें त्याची दृष्टि मंदच असते. तशांत ते माजाला आले म्हणजे स्वतःच्या मदाच्या गंधानें ते जणूं अंध होतात आणि सोंडेनें जमीनीचा ठाव घेण्याचा नेहमीचा सराव विसरून बेभानपणें खड्ड्यांतल्या हत्तिणीकडे धांव घेतात आणि बंधनांत पडतात. ही पद्धत म्हैसूर राज्यांत गेल्या शतकापर्यंत चालू होती व अतिदक्षिणेकडे अजूनसुद्धां चालू आहे. म्हैसूर गॅझेटीयर (Vol I: p. 126–7) मध्यें श्री. सी. आर. नारायणराव सांगतात : " Pits were artfully disposed along routes frequented by wild elephants or near about the pools and trees which they love to visit, and being lightly covered over by a net-work of bamboos, leaves and earth, were steedily overgrown with grass after the early showers, so as to remove all causes for suspicion. ...The animals usually so cautious, saw nothing to rouse their suspicion and precipitated themselves into the pits ...... When the captive elephants fairly completely filled the pits, there was no space in which

to throw fodder and there was absolutly no means of watering them and the period which elapsed between the fall and the rescue was usually one of starvation for them. After noosing the captive with the help of the Kumkies (or tame elephants), the pits wich by now would be slightly enlarged by the struggles of the captive beasts, were filled in with twigs, leaves and other rubbish, with the result that the animals elevated themselves automatically. This method which on account of the cruelty involved, is very rarely resorted to in Mysore at the present day still flourishes in South India & Malabar." शिकारीच्या या पद्धतीचे उल्लेख गाथासप्तशतीच्या उत्तरभागांतले असले तरी त्या मात्र उत्तरकालीन नाहीत. खड्ड्यांत (५·७४·४) व सांपळ्यांत (१०·२८·१०) अडकवून सिंहाची शिकार केल्याचे उल्लेख ऋग्वेदांतही आढळतात.

व्यवसाय :

गाथासप्तशतीत अनेक व्यवसायांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उल्लेख आलेले आहेत: उदाहरणार्थ, चंदिलाचा प्रत्यक्ष उल्लेख आलेला आहे आणि प्रमाण-सूत्रावरून (क्र. १५३) अरकसाचा व्यवसाय अप्रत्यक्षपणे सूचित केलेला आहे. या व्यवसायांपैकी कांहीं वन्य आहेत व कांहीं नागरी; कांहीं स्वतंत्र व कांहीं गांवगाड्याशीं संबद्ध; कांहीं स्थायिक व कांहीं फिरस्ते. सामान्यतः सारेच व्यवसाय बहुजनसमाजाचे आहेत, त्यांनी केलेले व त्यांच्यासाठीं केलेले. सुशिक्षितांचे व सुसंस्कृतांचे व्यवसाय अपवादात्मक आहेत यांपैकी कांहीं व्यवसायांचा येथे तात्पुरता निर्देश करतों.

पशुपक्ष्यांची पारध हा वन्य जमातीचा चरितार्थाचा प्रमुख व्यवसाय. चर्म, अस्थि, स्नायु, दांत, शिंग, पित्त, चरबी व मांस इत्यादि पदार्थांचा व्यापार या जमाती करीत असत.

सुवर्णसिद्ध अलंकार: त्यांत जडविण्यासाठीं नील (क्र. ३०२), पाम्मराअ (पद्मराग = माणिक : क्र. ७५), मणि (क्र. ८०७, ९७०, ९७६) व मरगअ (हेम : १·१८२ : मरकत = पन्ना : क्र. ४·७५) इत्यादि स्थलोद्भव आणि प्रवाल (क्र. ६७८) व मोतीं (क्र. ६६९, ९९८) इत्यादि जलोद्भव मौल्यवान् रत्नें; अंकुश (क्र. ९९३), करवत (क्र. १५३), खड्ग (क्र. ७८७), चिलखत (क्र. ९९७), तरवार (क्र. ७८७, ९९७), नांगराचा फाळ (क्र. ६१०, ७८९), बाणांची अग्रें, मेख व शूल (क्र. ६४), शृंखला (क्र. ७८०), सुई (क्र. ३९४, ७२०) इत्यादि लोह (= लोखंड क्र.९९७)-सिद्ध. कलश (क्र. १३९, १४३, ४५६, ५७६, ८३१), पात्र (क्र. २४०) या ताम्रसिद्ध: घंटा (क्र. १०२, १७२) इत्यादि कंस (कांसें : पाणिनि: ६·३·१६८: ५·१·२५) – सिद्ध; धातुरंग (क्र. ६६८), हरिताल (क्र. ९) इत्यादि धातुसिद्ध प्रसाधन-साहित्य: हे नित्योपयोगी, व्यवसायोपयोगी व युद्धोपयोगी वस्तूंचे उल्लेख निःसंदिग्धपणें सिद्ध करतात कीं गाथासप्तशतीच्या काळांत धातूंच्या व रत्नांच्या खाणी अस्तित्वांत असल्याच पाहिजेत; निर्मितीच्या किंवा लगतच्या प्रदेशात. आणि इषुकार, तांबट, मणिकार, लोहार, शिकल्कार सोनार वगैरे व्यवसाय ही. या धातूंच्या खाणी व हे व्यवसाय भारतांत वेदकालापासून चालू आहेत. सूचि जातुकांत सुई तयार करणाऱ्या कम्माराचा उल्लेख आहे. ही सुई अशी सूक्ष्म कीं ती पाण्यावर तरंगते व अशी तीक्ष्ण कीं गेरणीचा भेद करते (जातक : ३·२८१). चिलखत व तरवार हे उल्लेख गाथासप्तशतीच्या उत्तर भागांत आलेले आहेत; ते उत्तरकालीन मानले पाहिजेत. सातवाहनकालीन बाणांचीं अग्रें पुष्कळ मिळालेलीं (Excavations at Brahmapuri : 1945-6 : Dr Sankalia & Dr Dikshit: p. 121) आहेत. स्थायिक किंवा फिरस्त्या (जातक : ३·२८१) अयकारांनीं तीं बनविलेलीं असावींत. क्र. ११९ मध्यें सोनाराच्या तागडीचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. आणि क्र. ६२९ मध्यें कसोटीवर रत्न घांसणाऱ्या अडाणी जवाहिऱ्याचा गाथासप्तशतींत उल्लेखिलेलीं मरकतभाजन व शंखशुक्ति आदि पूजापत्रें या मणिकारांनींच तयार केलेलीं आहेत. हिंदुस्थानांत जागोजाग झालेल्या उत्खननांत प्राचीन व रंगीबेरंगी असे कांचेचे व दगडी मणि मिळालेले (Etched Beads in

India : Dr Dikshit) आहेत. मण्यांवर रंग चढविण्यासाठीं त्यांवर रासायनिक क्रिया करून ते भट्टीत भाजण्यांत येत असत. गाथासप्तशतींत उल्लेखिले आहेत तसे काळे मणि ब्रह्मपुरीच्या उत्खननांत मिळालेले आहेत. कांचेच्या बांगड्या (क. १३३, २८३, ५८९, ६८३) व चषक (क. ७१०, ९११) या उल्लेखांवरून कांचकार व कासार यांचे धंदे सूचित होतात. ग्राम-स्त्रिया कांशाच्याही बांगड्या वापरीत; म्हणून बांगड्यांचा व्यवसाय करणारांना कासार हें नांव मिळालेलें असावें. बांगड्या भरण्याचे काम कासारणी करतात असा स्पष्ट उल्लेख क. ५३९ या गाथेंत आलेला आहे. त्यांचा हा व्यवसाय फिरस्ता असला पाहिजे. ब्रह्मपुरीच्या उत्खननांत निळसर रंगाच्या सात-वाहनकालीन बांगड्या मिळालेल्या आहेत; त्या रोमन असाव्यात असा डॉ. दीक्षित यांचा अंदाज (पूर्वोक्तः पृ. ११७) आहे. मद्य मांचविण्यासाठीं व पिण्यासाठीं वापरावयाची उंची भांडीं हीं सातवाहन कालांत रोममधून आयात होत असत. क २०४ या गाथेंत आरशाचा उल्लेख आहे. प्राचीन भारतांतील आरसे धातूचे असावेत. मिलिंदपन्हो (४·१·६०) मध्यें तसा उल्लेख आहे. प्राचीन-ग्रीक व रोमन लोक असेच आरसे वापरीत असत. दंतकारांनीं केलेल्या हस्तिदंती मुठी आरशांना बसवीत असा जातकांत (V : No 531 : p. 138) उल्लेख आढळतो. गाथासप्तशतीला समकालीन असलेल्या मथुरा व सांची येथील शिल्पांत हातीं आरसा घेतलेल्या यक्षींच्या मूर्ति आढळतात. अजंठ्यांतही असा प्रसंग रंगविलेला आहे. क. १३८ व ९४५ मधील फांसे दंतकारांनीं तयार केलेले हस्तिदंती असणे शक्य आहे. घिरीट (क. ७९४), चट्टुक व करङ्क हीं भिक्षापात्रें (क. १६२), चरक (क. ५७४, ७६९, ७७०), नांगर (क १६५, ६९०, ६९२, ७८९), प्रमाणसूत्र (क १५३), मुसळ (क ५०१), रहाटगाडगें (क. ४९०), सांगड्या (क. १३८) इत्यादि काष्ठसिद्ध वस्तूंवरुन अरेकस व सुतार यांचें अस्तित्व सिद्ध होतें. क १७, ३४ व १६५ मध्यें रथांचे उल्लेख आलेले आहेत आणि क ७४० मध्ये जहाजाचा. रथकारांचा व्यवसाय नागरी आणि जहाजें तयार करणारांचा धंदा समुद्रकिनारी असला पाहिजे. या स्थलचर व जलचर वाहनांचे उल्लेख ऋग्वेदापासून आढळतात. वेदकालीन नौका अश्वत्थाच्या (१·१३५·८; १०·९७·५), बुंधा पोखरुन केलेल्या असत.

सातवाहनकालीन लेण्यांच्या मांडणीवरून तेव्हांच्या घरांच्या उभारणीची कल्पना करतां येते. सुतार व गवंडी यांचें सहकार्य असल्यावांचून घरांची किंवा देवळांचीं कामें होणें शक्य नाहीं. कार्ल्यांच्या लेण्यांतल्या छताच्या लांकडी कमानी व स्तूपावरील लांकडी छत्र हीं कामें सातवाहनकालीन सुतारांनीं केलेलीं असावींत असा संशोधकांचा अंदाज आहे. त्यांवरून त्यांच्या कौशल्याची कल्पना करतां येते. क्र. २७२ या गाथेंत पाषाणरेखेचा उल्लेख आहे. तो सेलवढकींच्या—पाषाणावर कोरीव काम करणारे—कार्याला अनुलक्षून असावा. क्र. ६९८ मध्यें कोंबडा आरवून प्रवाशांना सांगत आहे कीं जागे व्हा, मुक्काम हलवा, ओझ्याचीं जनावरें हांका. ही सूचना निःसंशय लमाणांना अनुलक्षून आहे. क्र. ७४० मधील डोलकाठी व कावळा यांचे साहचर्य स्पष्ट केलें पाहिजे. समुद्रांतून प्रवास करणाऱ्या नौकेची दिशा निश्चित करण्यासाठीं प्राचीन नावाडी कोणती यांत्रिक साधनें वापरीत याचा तलास लागलेला नाहीं; पण भर समुद्रांत अंदाज अशक्य असतां जमीन जवळपास आहे किंवा कसें हें निश्चित करण्यासाठी ते जहाजावर दिशाकाक (जातक . क्र. ३·२६७) पाळीत आणि हे शिकवलेले कावळे जातील त्या दिशेला जमीन असली पाहिजे असें अनुमान (Social & Rural Economy of Nothern India : Bose. p. 299) करीत; ऋग्वेदकालीन, फिनिशियन व बाबीलोनियन नावाडी ही याच युक्तीचा उपयोग करीत. सूतकतारी, रंगारी व विणकर यांचे धंदे भरभराटींत असले पाहिजेत; त्यांचा प्रत्यक्ष उल्लेख मात्र येथें आढळत नाहीं. या वस्त्रांच्या रंगांवरून (कुसुम्बी क्र. ३०८, ३२८, ४६१, ५४५; नीळः क्र. ३९५, ६९०) दिसतें कीं हे रंगारी स्थानिक वनस्पतिजन्य रंग वापरीत. कुड (क्र. २२९), कुंभ (क्र. ६५४), घट (क्र. २६०), रहाट हाडगे (क्र. ४९०) इत्यादि मृत्तिकापात्रांच्या उल्लेखांवरून कुंभारांचा धंदा भरभराटात असला पाहिजे असें अनुमान होतें. क्र. ४३३ व ६९२ मध्ये कासाऱ्यांचे उल्लेख आहेत आणि क्र. ५५७ मध्यें सुपाचा, बुरूड व दोर वळणारे यांचे व्यवसाय त्यांवरून सूचित होतात. हे तीन ही व्यवसाय आतांप्रमाणेच तेव्हां ही स्थानिक स्वरूपाचे असले पाहिजेत. दुंदुभि (क्र. ९६०), पटह (क्र. २९, ६८५) व मृदंग (क्र, २५३) या वाद्यांचीं भांडीं मातीचीं, लांकडी अगर धातूचीं असावींत. त्यांना लागणारें कमावलेलें

पातळ कातडें पुरविणारे बन्य चांभर तत्कालोन समाजांत असले पाहिजेत. क्र. १३३, १३५, ५४७, ८३० या गाथांत तेलवातीवर उजळणाऱ्या दिव्यांचे उल्लेख आलेले आहेत. त्यांवरून तेल्यांचा व्यवसाय सिद्ध होतो. तिलपिशकांच्या श्रेणींचे उल्लेख समकालीन शिलालेखांत आलेले आहेत. गौळवाडे गांवाबाहेर असले (क्र. ७२६) तरी धार काढण्यासाठीं गवळी घरोघर (क्र. ४६२, ६३७) जात असावेत असें दिसतें. क्र. ५७६ मध्ये हंस-क्षीर संकेत आलेला आहे. तेव्हांही गवळी लोक दुधांत पाणी घालीत असत असा निष्कर्ष. यावरून काढावयाचा कीं काय? क्र. २२७ मध्यें कलालाचा अप्रत्यक्ष उल्लेख आहे; क्र. २९१ व ४१७ मध्यें न्हाव्यांचा आणि क्र. ६८० मध्यें खाटकाचा असे प्रत्यक्ष उल्लेख आलेले आहेत. वस्तऱ्यानें हजामत करण्याची प्रथा कमीत कमी तैत्तिरीय ब्राह्मणाइतकी (१·५·६) पुरातन आहे. यज्ञांमध्यें, देवांना हविर्भाग म्हणून अर्पण केल्या जाणाऱ्या पशूंना मारण्याचें व मोलण्याचें काम करणाऱ्या शमित्यांमधून यज्ञ-संस्थेच्या अपकर्षाच्या काळांत खाटकांचा व्यवसाय उत्क्रांत झाला असला पाहिजे

गाथासप्तशतींत दास हा शब्द एकदांच (क्र. ९१) व तोही नतपर सेवक या अर्थानें आलेला आहे. दास्य (Slavery) या पाश्चात्य संज्ञेनें जें क्रौर्य सूचित होतें तें जातककथांत कधीं कधीं प्रत्ययास येत असलें तरी त्यांच्या मानानें यांची व उत्तरकालीन हीन जातीयांची ही जीवनपध्दति मानवतेशीं अधिक सुसंगत होती; म्हणूनच भारतात दास्य अस्तित्वांत नसल्याचा निर्वाळा मेगॅस्थेनिसनें दिलेला आहे. क्र. ६२८, ६६७, ७६१, ८३२ या गाथांत परिजन हा शब्द आश्रित किंवा घरगुती नोकर या अर्थानें आलेला आहे. यांपैकीं कांहीं गडी आहेत व कांहीं बाया असाव्यात. हे लोक धन्याच्या कुटुंबाशीं समरस झालेले आहेत. शेतकामासाठीं, विशेषतः, हंगामाच्या दिवसांत मोलानें माणसें लावण्यांत येत असावींत. नांगरटीसाठीं (क्र. ६९२), राखणीसाठीं (क्र. ६९०, ६९१, ८०५, ८१५, ९६२), कापणीसाठीं (क्र. ८, ९) व कपाशीचीं बोंडें वेंचण्यासाठीं (क्र. ३५९). यांपैकीं क्र. ६९०, ६९१, ८१५ व १००३ मधील उल्लेख कलमगोपींचे आहेत. क्र. ८९ मधील गाई वळणाऱ्या बल्लवी या घरच्या आहेत कीं मोलाच्या, हें निश्चित करतां येत नाही. क्र. ५५४,

७६९ व ७७० या गाथांत चरकांचे उल्लेख व चरक्यांचे उद्गार आलेले आहेत. आजूबाजूला बैल दिसत नाहीत; त्या अर्थी हे हातचरक असावेत. हा चरक उभा होता कीं आडवा आणि त्याला दांत्यांचीं चक्रें होतीं किंवा कसें हें निश्चित सांगतां येणार नाहीं. भरपूर रस निघेल असें हें यंत्र असलें पाहिजे हें मात्र निश्चित. व्यवहारभाष्यांत जंतसालेचा उल्लेख आहे (१०·४८·४) त्यावरून वाटतें कीं उंसाची लागवड होणाऱ्या प्रदेशांत चरक चालविण्याचा हंगामी धंदा चांगल्या प्रमाणांत चालत असावा. असे चरक चालविणें हें काम विशेष मेहनतीचें व भरपूर मोबदल्याचें असावें. धनी व कामगार यांच्या काम व मोबदला यांबाबत विशेष अपेक्षा आहेत; कामगार धिप्पाड असावा आणि त्याच्या अंगीं बळ, तितकेंच कौशल्य असावें अशी मालकिणीची व मालकीण मढळ व सरस असावी अशी कामगाराची! उंसाच्या रसापासून गूळ तयार व्हावयाचा आहे आणि कामगाराला मेहनतीचा मोबदला गुळाच्या रूपांत मिळावयाचा आहे. मजुरांच्या विशिष्टीभवनाचा हा गाथासप्तशतींतला एकमेव उल्लेख आहे. या गाथांतले गुळव्यांचे उद्गार बारा गांवांचें पाणी प्यालेल्या उनाड हमालांच्या तोंडीं खासगी बैठकींत येतील असेच आहेत. गाथासप्तशतींत पामर (क्र. १६४, १६९, २३८, ३२४, ३३१, ३५८, ६९१, ६९४) हा शब्द अडाणी (क्र. १६४), छोटा शेतकरी (क्र. १६९, २३८, ३५८), दरिद्री (क्र. ३३१) बेकार आणि मजूर (क्र. ३२४, ६९१, ६९४) या अर्थांनीं आलेला आहे. क्र. २३८ मधील पामरानें पांघरुणें विकून बैल खरेदी घेतले आहेत आणि क्र. ३५८ मधील तूर पेरणारा पामर पीक हातीं येण्याची अपेक्षा बाळगीत आहे, त्या अर्थी ते छोटे शेतकरी असले पाहिजेत. क्र. ६९२ मधील नांगऱ्याला त्याचा व्यवसाय अवगत नाहीं, तरी तो कांहीं अंतस्थ हेतूनें कामावर राहिला आहे, त्या अर्थी त्याचा तात्पुरता पेशा अंगावर किंवा रोजंदारीवर काम घेणाऱ्या मजुराचाच असला पाहिजे. या सर्व कामकऱ्यांना मिळणारा मोबदला व तो पुरेसा असे किंवा कसें याबद्दल अनुमान करावयास कांहींच साधन नाहीं. शेतमजुराला पोटाला पुरेसाही मोबदला मिळत नाहीं असा उल्लेख सालिकेदार आतकांत आढळतो. आपण ज्या शेतांत काम केलें तेथें भरपूर पीक आलेलें पाहून

क्र. ६९१ मधील पामर आनंदित झालेला आहे, त्या अर्थी त्याला पिकांतला वांटा मिळावयाचा असावा असें वाटतें.

गाथासप्तशतींत स्त्रियांच्या व्यवसायांचे अनेक उल्लेख आलेले आहेत: कलमगोपी (क्र. ६९०, ६९१), कासारीण (क्र. ५३९), गवळण (क्र. ७२६), पाउहारी (क्र. ६९२), बल्लवी (क्र. ८९), माळीण (क्र. ५९६, ५९८) आणि प्रपापालिका (क्र. ४९, १६१) या काम करून पोट भरणाऱ्या: या व्यवसायांना जरूर तेवढे कौशल्य व व्यवहार-ज्ञान त्यांचे ठायीं आहे; आणि नखराही! आणि दूती, कुंटीण व वेश्या या देहविक्रयाशीं संबद्ध असणाऱ्या त्यांचे विवेचन अन्यत्र केलेले आहे. कोठें कलमगोपींची पावले तिरपीं (क्र. ६९०) पडतात आणि तीं जमीनीवर, त्याचप्रमाणे सहकाऱ्याच्या चित्तावर ठसा उमटवतात: आणि कोठें माहितगार माणसेंही मार्ग चुकल्याचा आविर्भाव आणून मांडवावर उभ्या असलेल्या गोफणवालीशीं (क्र. ८९५) रस्ता विचारण्याच्या निमित्तानें लगट करतात. कोठें पाउहारीशीं—न्याहारी आणणाऱ्या स्त्रीशीं, मग ती धन्याच्या कुटुंबांतली असो किंवा त्याच्याकडली मोलकरीण असो. शेतांत संकेत ठरवून तिचा प्रियकर तिच्या धन्याकडे मजूर (क्र. ६९२) म्हणून राबण्याला तयार होतो. फुलांच्या विक्रीसाठीं गाळयावर बसलेली माळीण गिऱ्हाइकांना गुंगवण्यासाठीं गेंदाबरोबर स्वतःच्या भरदार लावण्याचे दर्शन घडविते. अशा ठिकाणीं मिळतो तो माल निवडक असला तरी त्या मानाने ही जरा महागच पडतो ' पाणपोई ही प्रवाशांची निर्जल प्रदेशांतली सोय वेदकालापासून प्रचलित आहे. ऋग्वेदांत प्रपा हा शब्द वाळवंटातला झरा या अर्थानें आलेला आहे. पाणपोई धर्मार्थ असते किंवा अल्पमोली. पाणपोईवर प्रपापालिका असणें असंभाव्य वाटतें: पण ही पाणपोई हमरस्त्यावरली असली पाहिजे, यावरूनच दिसते कीं ती थोडीशी आडबाजूला असली तरी आजूबाजूला सोबत असली पाहिजे. चरितार्थासाठीं स्त्रीने परगृहीं किंवा चवाठ्यावर मिश्र समाजांत चालणाऱ्या व्यवसासायाचा स्वीकार केला म्हणजे ती व्यभिचाराकडे प्रवृत्त होते, हा अद्‌भुतरम्य संकेत कीं अनुभवजन्य सिद्धान्त?

क्र. ९ या गाथेंत नटीचा व क्र. २५९ या गाथेंत नर्तिकेचा, असे उल्लेख

आलेले आहेत. नटीनें मुलाला हरितालानें प्रसाधन लावलेलें आहे. नर्तिकेचा उल्लेख रंगभूमीच्या साहचर्यांत आलेला आहे. यांपैकी नटी ही हौशी आहे कीं धंदेवाईक याचा खुलासा होत नाहीं. नर्तिका ही मात्र सांकेतिक व धंदेवाईक असावी असें वाटतें. येथें सांगितलेलें तिचें वैशिष्ट्य कामशास्त्रोक्त आहे. नट व नर्तक यांच्या स्त्रियांना व्यभिचार निषिद्ध नाहीं असें रामायणांत सांगितलेलें (२·८३·१५ आहे) आहे. गवई व गायिका, नट व नटी, नर्तक व नर्तिका गटानें गांवोगांव हिंडून चरितार्थ चालवांत. त्यांचे कार्यक्रम सामान्यतः शहरांतून किंवा ग्रामीण जत्रांतून होत असावेत. तालपुताच्या नाटकमंडळींत पांचशें नटी होत्या आणि ही मंडळी खेड्यांत, नगरांत व राजधानींत कार्यक्रम करीत असे, असा उल्लेख थेरी गाथेंत (क्र.१०९० टीका) आलेला आहे.

गाथासप्तशतींत ज्योतिषविषयक अनेक उल्लेख आलेले आहेत. क्र. ४३५ मध्यें त्रिकोणाकृतीत उडणाऱ्या बलाकापङ्क्तीचा होराशास्त्रज्ञानें काढलेल्या रेखांशीं समन्वय केलेला आहे. फलज्योतिषी काढतात तशा कुंडलीच्या या रेषा आहेत हें उघड आहे. क्र. ६७२ मध्ये चंद्रतिथीचा उल्लेख आहे; क्र. ३१९ व ७९८ मध्यें राहूचा आणि क्र.२६१ मध्यें वार व विट्ठि (विष्टि) यांचा. क्र.३८६ मधील ग्रहबाधेचा उल्लेख आणि अन्यत्र आढळणाऱ्या अयन, ऋतु, मास, मुहूर्त इत्यादि संज्ञा ह्या ज्योतिष विषयाशीं अप्रत्यक्षपणें संबद्ध आहेत.

मुख्यत्वेंकरून श्री. शंकर बालकृष्ण दीक्षित यांच्या भारतीय ज्योतिःशास्त्रां-तून व अन्य आधार ग्रंथांतून संकलित केलेली एतद्विषयक माहिती येथें देतों. वर्ष शब्दाचा सांप्रत जो अर्थ आपण समजतों त्या अर्थी वर्ष शब्द ऋग्यजुः-संहितांत आला नाहीं. शतपथ ब्राह्मणांत (२·२·३) आला आहे. वेदकालीं महिने चांद्र होते आणि वर्ष सौर होतें. शतपथब्राह्मणांत (२·१·३) अयन म्हणजे कोणता काल हें स्पष्ट केलेलें आहे. वैदिक वाङ्मयांत ऋतुविषयक कल्पना स्पष्ट नाहींत: तैत्तिरीय ब्राह्मणांत एका जागीं पांच ऋतु आहेत व अन्यत्र सहा. वसंत हा त्यांतला मुख्य आहे. चैत्रादि संज्ञा संहिताब्राह्मणकालीं प्रचारांत नव्हत्या. कौषीतकी, शतपथ आणि पंचविंश या ब्राह्मणांत चैत्रादि संज्ञा आहेत व ते भाग शकापूर्वी २००० आणि १५०० यांच्या मधल्या काळचे आहेत.

वारांची सात नांवें वेदांत कोठेंही नाहीत. दिवसाचे मुहूर्तसंज्ञक १५ विभाग आणि तसेच रात्रीचे १५ विभाग तैत्तिरीयब्राह्मणांत (३·१०·९) सांगितलेले आहेत. सूर्याला ग्रहण लागते. म्हणजे आसुर स्वर्भानु नमानें सूर्याला आच्छादितो, असें ऋग्वेदांत (५·४०) वचन आहे: आच्छादितो म्हणजे गिळतो ही कल्पना उत्तरकालीन आहे. श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांना ऋग्वेदाच्या भाषांतरांत स्वर्भानूचा राहूशी समन्वय केलेला आहे. ग्रहांचे ज्ञान वैदिक काळी होतें. शतपथ ब्राह्मणांत जादूसारखा परिणाम करणारी शक्ति या अर्थाने (बुद्धपूर्व जग: पृ. १९६) योजलेला आहे. अथर्ववेदज्योतिषांत मेषादि राशि नाहीत, पण वारांचीं नांवें आहेत : आदित्यः सोमो भौमश्च तथा बुधबृहस्पती ॥ भार्गवः शनैश्चरश्चैव एते सप्त दिनाधिपाः ॥ ९३ ॥ महाभारतांत (उद्योगपर्व अध्याय १४३:९) अंगारक म्हणजे मंगळ असा उल्लेख आलेला आहे. याज्ञवल्क्यस्मृतीतही मंगळवाराचा उल्लेख आहे. अहोरात्राचे होरा नांवाचे २४ विभाग करतात. होरा म्हणजे अहोरात्र यांतील पहिलें व शेवटचे अक्षर काढून टाकून राहणारा शब्द असें वराहमिहिरानें सांगितले आहे. खाल्डियाच्या लोकांत होरा हा कालविभाग फार प्राचीन काळापासून प्रचारांत होता व सात वार आमच्या हल्लींच्याप्रमाणें होते. त्यांना राशि व वार इ. स. पूर्वी ३८०० पूर्वीच माहीत होते. ते त्या लोकांकडून शक पूर्व १५०० नंतर, श. पू. १००० चे सुमारास आमच्या देशांत आले. कुंडली मांडून भविष्य वर्तविण्याची प्रथा थोडीशी उत्तरकालीन असावी. ताऱ्यांवरून भविष्य वर्तविण्याची बाबीलोनी प्रथा अलेक्झंडरच्या स्वारीनंतर भारतांत आली व चवथ्या शतकाच्या सुमारास सार्वत्रिक झाली. शिलालेखांतला वाराचा पहिला उल्लेख इ. स. ४८४ च्या एरण येथील बुधगुप्ताच्या लेखांत (Fleet · Gupta Inscriptions · p. 88) आढळतो. त्या अर्थी गाथासप्तशतीच्या काळांत या संज्ञा असणें संभवनीय आहे. महामहोपाध्याय श्री. काणे (केवलानंद स्मारक ग्रंथ : पृ. १७) सांगतात की वारांची आपलेकडील नांवें इसवी सनापूर्वी फार तर चार पांचशें वर्षांहून प्राचीन नसावीत. अर्थात् या उल्लेखांवरून गाथासप्तशतीचा काळ अलीकडे ओढण्याचा कांहीं संशोधकांचा प्रयत्न आहे तो टिकण्यासारखा नाहीं असें या विवेचनावरून दिसून येईल.

गाथासप्तशतींत आलेले वैद्य व व्याधि यांचे उल्लेख पूर्वी आरोग्य परिच्छेदांत

नमूद केले आहेत. क्र. २३७ मधील वैद्य वेषधारी आहे कीं व्यभिचारी आहे याचा खुलासा होत नाहीं; तो मांत्रिक असावा असें वाटतें. खेडे गांवांत वैद्य नसती आणि ही परिस्थिति नागरी राहणीला चटावलेल्यांना असह्य (क्र. ६००) वाटते. गाथांतले वैद्य रुग्णांना औषधें (क्र. २७०), काढे (क्र. ३१७), मलमें (क्र. ४५८) व रसायनें (क्र. ८४१) देतात आणि जखमांवर शुभ्र पट्ट्या (क्र. ४५८) लावतात.

आयुर्वेदाचा मूळ आरंभ मंत्रतंत्रांतून (वेदविद्या : पृ. ५६) झालेला आहे. रोग बरे करण्यासाठीं व विषांचा प्रतिकार करण्यासाठीं वगैरे योजावयाचे मंत्र ऋग्वेदांत आहेत. अथर्ववेदांत तर वशीकरण, सपत्नीनिवारण इत्यादि मंत्र आहेत. वेदकालीन वैद्य औषधांबरोबर मंत्रतंत्राचा उपयोग करीत. वैद्याचा धंदा यजुर्वेदांत तुच्छ मानलेला आहे. अभिचार विद्येचा जैन, बौद्ध व ब्राह्मण ग्रंथांतही निषेध केलेला आहे. तरी प्राचीन वाङ्मयांत या तीन्ही धर्मांचे मांत्रिक व वैद्य आढळतात: खरे व लटके, स्वार्थासाठीं किंवा धर्मासाठीं संपादित विद्यांचा उपयोग करणारे. खेडेगांवांत ज्योतिष व वैद्यक यांचा कुडबुडा समन्वय झालेला दिसतो. म्हणूनच पोटभरू व लटके ज्योतिषी (मनु : ३·१६२), वैद्य (म. भा.: ५·३८·४) व सामुद्रिक (म. भा.: १३·९०·७) यांचा जागोजाग निषेध केलेला आढळतो.

गाथासप्तशतींत चित्रकार (क्र. २१७·६१२·६४१·६५६·७३२) व मूर्तिकार (क्र. ८५८) यांचे उल्लेख आलेले आहेत.

सातवाहन कालांत चित्रकला व मूर्तिकला परिणत स्थितीप्रत पोंचलेली होती हें सह्याद्रींतील तत्कालीन लेण्यांवरून प्रत्ययास येतें. या लेण्यांतील मूर्ति प्रमाण-बद्ध आहेत आणि आरंभीं त्या रंगीत होत्या हें निश्चित. भाजाच्या चैत्यांतील स्तंभांवरलीं रंगीत चित्रें त्यांवर केलेल्या रासायनिक क्रियेमुळें अलीकडेच प्रकट झालेलीं आहेत. पृष्ठभागावर प्रथम तुसाचा गिलावा करावयाचा, त्यावर अंड्याच्या टरफला इतक्या जाडीचा, रंगाचा भंग होणार नाहीं असा टिकाऊ लेप चढवावयाचा (चुल्लवग्ग : ६·१७·१: मिलिंद : ३३१), या क्रियेनें स्थान-विशुद्धि (ठाणविसुद्धी : क्र. ७३२) झाल्यानंतर त्यावर वर्तिकांनीं (वट्टी : क्र.

६५६) प्रथम (क्र. ६१२) रेखाचित्र काढावयाचे आणि नंतर रंगसंगतीच्या अनुरोधाने त्यांत रंग भरावयाचे. अशी या चित्रकारांची पद्धति होती. अशी चित्रे घराच्या भिंतीवर (क्र. २१७-७३२) व फलकांवरही (क्र. ६५६) काढीत असत. इतका हुबेहूब कीं चित्रांतला लाडू खरा समजून त्यावर एकदा अडाणी (क्र. ६४१) हात मारावयाचा ! उत्तमरामचरित (१·३९), प्रतिमा (३), प्रतिज्ञा यौगन्धरायण (३·१), मालतीमाधव (१·३३. ९–१०), मालविकाग्निमित्र (२ २), मृच्छकटिक (४·१), शाकुन्तल (६·१३·१४), स्वप्नवासवदत्त (६·१३) या नाटकात चित्र व मूर्ति कलाचे ठळक उल्लेख आलेले आहेत उत्कण्ठा-विनोदन हें आलिख्याचे प्रयोजन होय असे वचन मालती-माधवात आहे. प्रतिज्ञेतील रंगात भित्तिचित्रयुक्त लेख, यथार्थदशा आहे. स्वप्नवासवदत्तेतील वासवदत्तेची प्रतिमा ओळख पटण्याइतकी यथार्थ आहे. चित्र कितीही यथार्थ असले तरी मूर्तीच्या मानानें प्रतिकृतींत काति विसंवाद असतोच असे विधान मालविकाग्निमित्रांत आहे. प्रतिमानाटकातील मूर्ति पाषाणाच्या आहेत, तरी त्या क्रियामधुर आहेत, भावपूर्ण आहेत. त्रिविक्रमाच्या नलचम्पूंत शलाकालेख्याचा उल्लेख आहे. शलाकेच्या सूच्यग्राने पृष्ठभागावर रेखाचित्रें काढण्यात येत आणि खारीच्या केसाच्या झुपक्यासारख्या वर्तिकेने तीं रंगविण्यात येत. गद्यचिंतामणींत व नाट्यशास्त्रांत (२·८८–९०) भित्तिचित्रांचे उल्लेख आहेत. गुप्तकालीन विष्णुधर्मोत्तर पुराणात चित्रकलेला एक संपूर्ण अध्याय दिलेला आहे. या उल्लेखांवरून तत्कालीन कलाप्रवाहाची दिशा अजमावतां येते.

चरितार्थासाठी सरकारी नोकरीवर अवलंबून असणाऱ्याचा विचार अन्यत्र केलेला आहे.

गाथासप्तशतींत व्यापारी व सावकार यांचे अनेक उल्लेख आलेले आहेत. भरभराटीच्या काळांत संचित संपत्ति सुरक्षिततेसाठीं अगर व्याजासाठी सावकाराकडे किंवा औद्योगिक अगर नागरिक श्रेणीकडे ठेव (णिक्खेव = निक्षेप : क्र. १९४) म्हणून ठेवण्यात येते. मंदीच्या दिवसांत ठेवीदाराची फेडीची मागणी सावकार पुरी करूं शकत नाहींत. असुरक्षिततेच्या काळांत संपत्ति भूमिगत (णिहाण : निधान . क्र. ३१८, ३७३, ५०७, ५७५) होते. याचींही उदाहरणें गाथासप्तशतींत आलेलीं आहेत. क्र. १९१ मध्यें तुलेचा उल्लेख

आहे. ती निरक्षर असते म्हणून जें हलकें तें उचलून धरते. तुळेचा उल्लेख वाजसनेयि संहितेंत व शतपथ ब्राह्मणांत आलेला आहे. क्र. २३८ मध्यें पांचकणें विकून बैल खरेदी केल्याचा उल्लेख आहे. वेदकालांत बैल हें मूल्यमापनाचें साधन (वेदविद्या : पृ. २५) होतें: तें आतां केवळ उत्पादन साहित्य झालेलें आहे. क्र. १५२ या गाथेंत धान्य मोजण्याच्या मापाचा उल्लेख आहे. आणि क्र. ८०६ मध्यें खारि या द्रवमापनाचा. श्री. बोस (पूर्वोक्त : पृ. २७७) यांनीं अनेक प्रमाणांवरून खारि म्हणजे १२८ शेर असें ठोकळ मानानें ठरविलें आहे.

गाथासप्तशतींत दारिद्र्य आहे, भिकारी आहे पण बेकारी दिसत नाहीं. क्र. १६२ व ५६३ या गाथांमध्यें भिक्षेकरी आहेत; पण पहिला भिकारी वेषधारी आहे व दुसरा धार्मिक आहे, मग तो भिक्षु असो अगर भिक्षुक. हें परान्नपुष्टीचें द्योतक आहे, बेकारीचें नव्हे. चोर व दरोडेखोर हे खरे बेकार. ते पुष्कळ दिसतात.

निष्कर्ष :

गाथासप्तशतीच्या काळांत आतांप्रमाणेंच भारत हा शेतकीप्रधान देश होता. आतांप्रमाणेंच त्या काळांत ही नगरें व बंदरें होतीं आणि उद्योगधंदे व व्यापार भरभराटींत होता.

हल्लींच्या अर्थयुगांत हीं पिकांची लागवड नैसर्गिक परिस्थितीच्या अनुरोधानें व जास्तींत जास्त नफा मिळविण्याचे दृष्टीनें करण्यांत येते; स्वयंपूर्णतेच्या नव्हे. व्यावहारिक दृष्टीनें शेतकी करणारांची दृष्टि आतांप्रमाणेंच तेव्हांही उत्पन्नावरच केंद्रित असली पाहिजे. ऊंस व कपाशी यांची पैदास हाच निष्कर्ष निर्दिष्ट करते. अन्य व्यावसायिकांवर अवलंबून असल्यामुळें अशा व्यापारी पिकांचें उत्पादन भांडवलवाले शेतकरीच करीत असले पाहिजेत.

आमची प्राचीन ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होती असा सामान्य समज आहे, तो खरा नाहीं. सर्वस्वी स्वयंपूर्ण अशी समाजघटना संभवतच नाहीं. उत्पादन व विनिमय साधनांच्या अनुषंगानें समाजाची आर्थिक घटना उत्क्रांत होत असते: सहकार्य व स्पर्धा यांमुळेंच सहजीवन शक्य होतें.

गाथासप्तशतींतल्या समाजाच्या नैमित्तिक व व्यावसायिक गरजा भागविणारे कारागीर फिरस्ते, तसेच स्थायिक होते. व्यवसायाला कायमचा वाव असेल

अशा मोठ्या गांवांत ते स्थायिक असत. पावसाळा संपला कीं फिरस्ते कारागीर सहकुटुंब व गटानें भ्रमंतीला निघत. अद्यापही अनेक धंदेवाईक याच मार्गाचा अवलंब करतात.

आमच्या ग्रामीण स्वयंपूर्णतेची कल्पना अलुतेदार व बलुतेदार या संस्थेवर आधारलेली आहे. बलुतेदार बारा असून त्यांचे तीन वळ असतात: (१) लोहार, सुतार, महार व मांग; पैकीं महाराला इतरांपेक्षां दुप्पट मुशाहिरा मिळतो. (२) कुंभार, चांभार, परीट, न्हावी; (३) भट, मुलाणी, गुरव, कोळी. कोठें त्यांचे वळ बदलण्यांत येतात आणि कोठें पाटील, कुलकर्णी, चौधरी, पोतदार व देशपांडे यांचाही बलुतेदारांत समावेश करण्यांत येतो. तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कळवन्त, डवरी, ठाकूर, घडशी, तराळ, सोनार व चौगुला हे बारा अलुतेदार. ही व्यवस्था संकलित माहितीवर आधारलेली आहे. अलुतेदार व बलुतेदार यांचा संपूर्ण संच आजवर कोणत्याही गांवांत आढळलेला नाहीं. स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेची ही योजना व्यवहारांत अशक्यप्राय आहे. या मंडळींपैकीं लोहार, सुतार, कुंभार, चांभार, न्हावी, तेली, साळी, माळी, कळवन्त, परीट (रंगारी), सोनार इत्यादि व्यावसायिक गाथासप्तशतींत आढळतात. पण प्रत्येक गांवांत त्यांचा संच होता किंवा त्यांना द्यावयाचा मोबदला बलुतेदारीप्रमाणें पाचुदांच्या प्रमाणांत ठरलेला होता असें दिसत नाहीं.

या व्यवसायामध्यें श्रमविभाजन (Division of labour), स्थानिकीभवन (Localization), यंत्रीकरण (Mechanization), विशिष्टीकरण (Specialisation) कितपत झालें होतें हें अजमावण्यास साधन नाहीं. तत्कालीन अर्थव्यवस्था येथवर आली नव्हती. जंगलांतली झाडें तोडण्यापासून इमारतीची उभारणी होईपर्यंतची सर्व कामें सुतारांनी केल्याचा उल्लेख जातकांत (II. 18) आलेला आहे. सुतारांनीं जंगलांत कापलेले ओंडके वाहतुकीसाठीं प्रवाहांत सोडण्यांत येत असावेत असें क्र. १०५ मधील उल्लेखावरून दिसते. चरक, रहाटगाडगें व हातमाग एवढींच व्यावसायिक यंत्रें त्यावेळीं उपलब्ध असलेलीं दिसतात. क्र. ४३६ मधील दोरखंडांच्या उल्लेखावरून यारीचें अस्तित्व संभवतें. पाण्डवलेण्यांतील एका लेखांत ओदयंत्राचा उल्लेख आहे. हें यंत्र

पाण्याच्या शक्तीवर चालत असे असें उघड दिसतें; पण त्याबद्दल जास्त खुलासा मिळत नाहीं. डोंगरांतून व नदीकिनाऱ्यांवरून धावडांनीं व झारेकऱ्यांनीं नागरी लोहारांना व सोनारांना लोखंड व सोनें आणून द्यावयाचें आणि यांनीं भट्ट्या लावून त्यापासून उपयुक्त वस्तु व मौल्यवान् अलंकार घडवावयाचे एवढेंच विभाजन त्या काळांत चालू असावें. क्र. २११ मधील अग्निपानीय व्रताचा उल्लेख सोनारी भट्टीचा द्योतक आहे.

लेण्यांतील शिलालेखांत व्यावसायिकांच्या श्रेणींचे उल्लेख आढळतात. उदाहरणार्थ : गोवर्धन येथें कोलिकश्रेणी–विणकरसंघ–होती; नाशिक येथें तेली व कुंभार यांच्या श्रेणी होत्या. पाणिनीनें ही श्रेणींचा उल्लेख (२·१· ५९ : केलेला आहे. श्रेष्ठी हा नागरी श्रेणीचा अध्यक्ष; ज्येष्ठ हा व्यवसायिकांचा आणि भोजक हा (Social & Rural Economy in Northern India) Bose : p. 261) ग्रामीण अर्थधुरीण. कल्याण, चौल, सुपारा येथून व्यापारी जलमार्गानें मालाची आयात निर्यात करीत. खुष्की वाहतूक लमाण करीत; क्र.७८० या गाथेंत जहाजी व क्र. ६९८ या गाथेंत लमाणी वाहतुकीची सूचना आहे. बंदरीं व व्यापारी मागणी व पुरवठा यांच्या अनुरोधानें स्थानिक व्यापारी खरेदी व विक्री करीत आणि कारागीर निर्मिती करीत. मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊं शकेल असे आणि भोगसाहित्य (Luxury Goods) निर्मितीचे व्यवसाय शहरांत चालत व संघटित होत.

वैदिकांची समाजव्यवस्था धर्मकारणावर आधारलेली होती; त्यांनीं ब्राह्मणांना अग्रस्थान दिलें. अर्थव्यवहार उत्क्रांत होण्याइतका त्या काळीं समाज स्थिर वा उत्क्रांत झाला नव्हता. यज्ञसंस्था हें या युगाचें वैशिष्ट्य आहे. राजकारण व अर्थकारण यांवर बौद्धांची समाजव्यवस्था आधारलेली होती. त्यांनीं क्षत्रियांना अग्रस्थान दिलें आणि वैश्यांना स्वातंत्र्य दिलें. यामुळे अशोकासारखे राजकीय व अनाथपिंडकासारखे आर्थिक सम्राट् संभवले. अहिंसाप्रधान धर्मराज्याचा अशोकानें केलेला पुरस्कार केंद्रीय राजकीय व आर्थिक सत्तासंवर्धनाला पोषक झाला अशोकाच्या काळांत व्यापाराचा ओघ वायव्य सरहद्दीवरील घाटांतून वहात

होता. सागरी व्यापारामुळें या काळांत भडोच व सुपारा या बंदरांना आंतर-राष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें होतें. अशोकानंतर मौर्य साम्राज्य कोलमडलें आणि वायव्य सरहद्दीपलीकडील भागांतल्या राजकीय उलाढालींमुळें खुष्कीचा व्यापार मंदावला. यामुळें पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांचें महत्त्व वाढलें. ही समृद्धि स्थिर करण्यासाठीं सातवाहनांनीं नाणे घाट खोदविला आणि यज्ञनगर जुन्नर-वरून व्यापाराला मार्ग मोकळा करून दिला. सातवाहनांनीं संघटित केलेल्या अर्थव्यवस्थेंत ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकांत शकांच्या आक्रमणामुळें व्यत्यय आला. याच काळांत गाथासप्तशतीचें संपादन झालेलें आहे; यामुळें आणि हीं ग्रामीण लोकगीतें असल्यामुळें या घटनेचे आर्थिक परिणाम येथें व्यक्त झालेले नाहींत.

चौल, कल्याण, सुपारा व भडोच हीं सातवाहनांचीं पश्चिम किनाऱ्यावरील मोठीं भरभराटलेलीं बंदरें; पैकीं भडोच येथें क्षहरात क्षत्रपांनीं आपल्या सत्तेचें केंद्र स्थापन केलें. नर्मदेच्या अस्थिर प्रवाहामुळें भडोच बंदर धोक्याचें झालें. तरी तेथील सागरी व्यापाराला धोका येऊं नये म्हणून शकांनीं अनेक तजविजा केल्या; एवढेंच नव्हे, त्यांनीं सातवाहनांचें कल्याण बंदर काबीज केलें आणि इकडे येणारीं जहाजें ते जबरदस्तीनें भडोचला ओढून नेऊं लागले. या काळांतला सागरी व्यापार सौराष्ट्र, कच्छ, इराण, अरबस्तान, असा कांठा-कांठानें चालत असे. यामुळें या व्यापारावर अरबांची छाप होती. पहिल्या शतकांत हिप्पालसनें मोसमी वाऱ्यांचा शोध लावला. यामुळें हिंदुस्थानशीं युरोपियन व्यापार अलेक्झांड्रियावरून जहाजांतून नाइलमधून सुमारें पावणे तीनशें मैलांवरील कोप्टर्स पर्यंत, तेथून उंटांवरून सुमारें दोनशें मैलांवर असलेल्या सिनाइ द्वीपकल्पाच्या मुखाजवळील जफातीन बेटांनजीकच्या आफ्रिकन किनाऱ्यांपर्यंत आणि तेथून पुन्हां जहाजांतून लाल समुद्रांतून सोकोत्रा बेटाला वळसा घालून भर समुद्रांतून थेट कल्याण किंवा भडोच अगर मलबार किनाऱ्याकडे, असा वाहूं लागला. या व्यापारावर रोमची छाप होती. या व्यापारामुळें देशाची समृद्धि झाली; तिचें प्रत्यंतर गोतमीपुत्र सातकर्णी वासिष्ठीपुत्र पुळुमावि यांच्या अमदानींत पहावयास सांपडतें.

१६ गाथासप्तशतींतील राजकीय जीवन आणि ऐतिहासिक उल्लेख

गाथासप्तशतींतील गाथा हीं लोकगीतें आहेत. अशा गीतांचे अनेक प्रकार संभवतातः पोवाडा व लावणी हें पहिलें वर्गीकरण. पोवाडे दोन प्रकारचे असतातः प्राचीन पौराणिक व्यक्तींचे आणि अर्वाचीन ऐतिहासिक व्यक्तींचे. वैदिक वाङ्मयांतील पोवाड्यांना ओल्डेनबर्गनें आख्यानसूक्त ही संज्ञा दिलेली आहे. उदाः ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांतील यमयमी (१०·१०) आख्यान आणि उर्वशी पुरुरवा (१०·९५) आख्यान. अशीं आख्यानें यज्ञप्रसंगीं सांगण्यांत येत. लावण्या दोन प्रकारच्या असतात : कथागीत व भावगीत. ह्या कथागीतांतील कथानक केवळ काल्पनिक असतें. आख्यानसूक्तांत ज्यांचें कर्तृत्व सांगितलेलें असतें त्या व्यक्तींना सर्वमान्य सांकेतिक व्यक्तिमत्त्व प्राप्त झालेलें असतें. पोवाडे प्रोत्साहनार्थ गाण्यांत येतात आणि लावण्या मनोरंजनार्थ. गाथासप्तशतींतील गाथा हीं भावगीतें आहेत, म्हणून त्यांत ऐतिहासिक किंवा राजकीय उल्लेख अपेक्षिणें व्यर्थ आहे. भावगीतांत असे उल्लेख आलेच तर ते उपमांच्या किंवा दंतकथांच्या स्वरूपांत येतात; त्यांचा अर्थ संदर्भावरून लावला पाहिजे व निघणारीं अनुमानें सावधगिरीनें स्वीकारलीं पाहिजेत.

(१) ऐतिहासिक उल्लेख :

अशा प्रकारें प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें उल्लेखिलेल्या पौराणिक अगर ऐतिहासिक व्यक्तींची माहिती कालानुक्रमानें सांगतों.

क्र. ८८६ या गाथेंत पराशराचा उल्लेख आहे. याची संकलित माहिती प्राचीन चरित्रकोशांत दिलेली आहे. शक्ति हा वसिष्ठ अरुंधती यांचा ज्येष्ठ पुत्र. ऋग्वेदांतील कांहीं मंत्रांचा हा द्रष्टा आहे. सौदासाच्या यज्ञांत शक्तीनें विश्वामित्राचा पराजय केला. म्हणून पुढें त्यानें किंवा त्याच्या नोकरांनीं याला जाळून मारलें. पुराणांत सांगितलें आहे कीं कल्माषपादानें वसिष्ठाचे शंभर पुत्र भक्षिले त्यांत यालाही भक्षण केलें. हा मेला तेव्हां याची पत्नी अदृश्यंती गरोदर होती. पराशर हा तिचा पुत्र-ऋग्वेदांतील कांहीं सूक्तें याच्या नांवावर आहेत. यानें मत्स्यगंधेच्या अंगाचा दुर्गंध घालविला व तिच्या अंगाचा सुगंध एक योजनपर्यंत

दरवळेल अशी योजना केली. याच्यापासून तिला वेदव्यास द्वैपायन हा मुलगा झाला. पराशर हा सकलशास्त्रपारंगत व पुराणवक्ता होता. यानें मैत्रेयाला विष्णु व भागवत हीं पुराणें सांगितलीं. याच्या ज्योतिषशास्त्रावरलि ग्रंथांतील वचनांवरून याचा काळ खि. पू. तेरावें अगर चवदावें शतक असावा. याच्या नांवावर खालील ग्रंथ प्रसिद्ध आहेतः होराशास्त्र; धर्मसंहिता; नीतिशास्त्र; वास्तुशास्त्र, वैद्यकशास्त्र. याची स्मृति कलियुगाला प्रमाण आहे. अनेक प्राचीन व मध्ययुगीन पुराणकारांनीं व स्मृतिकारांनीं याच्या वचनांचा आधार घेतला आहे. गाथेंतील संदर्भ कालमहिम्याला अनुलक्षून आहे. तारुण्यांत मत्स्यगंधेवर अनुरक्त झालेला पराशर पुढें स्मृतिकार झाला; भावगीतांचें गुंजन करणारा कवि शुष्क स्मृति वचनांचें विवेचन करूं लागला.

क्र. ४१७ या गाथेंतील धिक्काराला ऐतिहासिक पार्श्वभूमि असावी असा माझा कयास आहे.

दंतकथेनुसार शालिवाहन राजा जारज होता. त्याची माता ब्राह्मणी, कुमारी किंवा विधवा होती. प्रतिष्ठान येथील नागहृद सरोवरावर किंवा गोदावरीच्या डोहावर ती पाणी आणावयास गेली असतां नागराज शेषानें तिचा उपभोग घेतला व या विवाहबाह्य संबंधापासून शालिवाहानाचा जन्म झाला. ही दंतकथा सर्वतोमुखीं असल्यामुळें कोठें सातवाहन ही संज्ञा जारज संततीला अनुलक्षून योजण्यांत (नेपालका इतिहासः मिश्रः पृ. ७८) येई. खि. पू. चवथ्या शतकांत मगध देशावर शिशुनाग घराण्याचें राज्य होतें. महानन्दिन् हा या घराण्यांतील शेवटचा राजा. कर्टियस् या समकालीन लेखकानें याच्याबद्दलची एक दंतकथा नमूद (The Invasion of India by Alexander: Mc Crindle: p. 122) करून ठेवली आहे. राजाच्या परिचर्येसाठीं अगदीं अंतःपुरांत प्रविष्ट होण्याची संधि असलेल्या एका देखण्या, धूर्त व महत्त्वाकांक्षी न्हाव्यानें याच्या राणीशीं संधान बांधलें, अनेक असंतुष्टांच्या पाठबळानें कट करून राजाचा विश्वासघातानें खून करविला आणि सर्वसत्ताधारी होऊन राजपुत्रांचा व राजकुलाचा उच्छेद केल्यानंतर त्यांनीं आपल्या पोटचा पोरगा गादीवर बसविला. पुराणांनीं याचें नांव महापद्मनन्द असें दिलें आहे व त्याला शूद्रगर्भोद्भव म्हटलें आहे. जैन परिशिष्ट पर्वांत सांगितलें आहे कीं नन्द हा एका गणिकेला

न्हाव्यापासून झालेला मुलगा. नंदांचें साम्राज्य कुंतल प्रदेशापर्यंत (Dynasties of the Kanarese Districts : Fleet : p. 284) पसरलेलें होतें. नन्दांच्या कलिंगावरील प्रभुत्वाचा उल्लेख खारवेलाच्या हाथीगुंफा शिलालेखांत आढळतो. म्हणजे गाथासप्तशतीचें संकलन झालें त्या भागांत जारज सातवाहन व नापितोभ्दव नन्द यांच्या दंतकथा प्रचलित होत्या. एकादें राजघराणें नष्ट होऊन अनेक शतकें लोटलीं तरी ऋणानुबंधामुळें त्याचे पक्षपाती अवशिष्ट राहतातच. या दोन घराण्यांतील श्रेष्ठ कनिष्ठ भावाची चर्चा त्यांच्या त्यांच्या पक्षपात्यांमध्यें जातीय अभिनिवेशानें व छिद्रान्वेषी भावनेनें, पाणवठ्यावर किंवा चवाठ्यावर झालेली या गाथेला अभिप्रेत असावी असें अनुमान होतें.

क्र. ३ या गाथेंत आणि प्रत्येक शतकाच्या अखेरीस असलेल्या प्रशस्तिगाथेंत गाथासप्तशतीचा संपादक कविवत्सल हाल याचा उल्लेख आलेला आहे; आणि क्र. ४६७ व ९९९ या गाथांत सालाहण नरेंद्राचा. त्याचप्रमाणें क्र. ४६४ या गाथेंत विक्रमादित्याचा. क्र.९९९ मधील सालाहण हा हाल सातवाहनच असला पाहिजे. कारण क्र. ३ प्रमाणें येथें ही त्यानें गाथासप्तशतीसाठीं गाथाकवींना मानधन दिलेलें आहे. शिवाय सालाहण व हाल हीं नांवें एकाच व्यक्तीचीं आहेत असें देशीनाममालेंत (८·६६) सांगितलेलें आहे. क्र. ४६७ मधील सालाहण उर्फ शालिवाहन हा आपन्न कुलांचा उध्दारकर्ता आहे. क्र. ४६४ मधील विक्रमादित्य हा गुणज्ञ व उदार आहे.

प्रथम सातवाहन उर्फ **शालिवाहन या घराण्याचा इतिहास** सांगतों.

सातवाहन हा महाराष्ट्राचा पहिला ऐतिहासिक व भारताचें सम्राट्पद संपादन करणारा महावंश होय. राज्यकर्ते, राज्यकाल व राज्यविस्तार आणि मुद्रा, शिलालेख व स्थापत्य या बाबतींत त्याचें प्राचीन भारतांतील स्थान अग्रगण्य आहे. धार्मिक सहिष्णुता, राजकीय स्वातंत्र्य व प्राकृत-पुरस्कार या महाराष्ट्र-संस्कृतीच्या प्रधान वैशिष्ट्यांची प्रस्थापना त्यांनींच केली. हिंदुस्थानांत ज्या दोन कालगणना पद्धति प्रामुख्यानें व सातत्यानें चालू आहेत त्यांपैकीं शक संज्ञक पद्धतीचें जनकत्व त्यांचेंच आहे.

चेतकुलोत्पन्न महामेघवाहन खारवेल यांच्या नेतृत्वाखालीं महाराष्ट्र व कलिंग देश स्वतंत्र झाले. अशोकाचे उत्तराधिकारी कर्तृत्वशून्य व प्रतिकार पराङ्मुख निघाले. शेवटचा मौर्य राजा बृहद्रथ याचा वध करून पुष्यमित्र शुंगानें मौर्य साम्राज्य निकालांत काढलें व शुंग साम्राज्य प्रस्थापित केलें.

सातवाहन वंशात तीस राजे होऊन गेले. वेगवेगळ्या आधारग्रंथांत ही संख्या कमी दाखविलेली आहे. सामान्यतः सर्व संशोधकांना मान्य अशी या राजांची अनुक्रमापुरती वंशावळ आणि समकालीन उल्लेख व इतिहास यांवरून मी अनुमानानें बसविलेला त्यांचा काळ याचें कोष्टक येथें देतों. अनुमानित काळ हा पुराणांतील राज्यकाळावरून बसविलेला आहे.

मगधसम्राट् पुष्यमित्र शुंग, प्रथम महाराष्ट्राधिपति व नंतर दक्षिणापथपति श्री सातकर्णी सातवाहन, कलिंग सम्राट् महामेघवाहन खारवेल आणि सिंध-पंजाबचा ग्रीक अधिपति मीनॅंडर हे समकालीन व प्रतिस्पर्धी. पुष्यमित्र व सातकर्णी हे ब्राह्मण व यज्ञसंस्कृतीचे पुरस्कर्ते; मीनॅंडर हा परावर्तित बौद्ध आणि खारवेल हा जैन. बौद्ध व जैन राजांनीं एकसमयावच्छेदेंकरून वैदिक संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांविरुद्ध उठावणी केल्यामुळें त्यांच्या सामन्याला कांहीं संशोधक धर्मयुद्धाचें स्वरूप देतात. पहिला सामना खि. पू. १७१ च्या सुमारास खारवेल व सातकर्णी यांच्या दरम्यान झाला. खारवेलानें महाराष्ट्रावर दोन स्वाऱ्या केल्या, प्रथम सातवाहनाच्या मूषिकनगरीचा नाश केला व नंतर त्यांच्या राष्ट्रिक-भोजक सामन्तांचा पराभव केला. मूषिकनगरी म्हणजे उंदीर-गांव असा डॉ. यदुनाथ सरकार यांचा अंदाज आहे. मला वाटतें, ही नगरी मुशी नदीच्या खोऱ्यांत शोधली पाहिजे. तीनशें वर्षांपूर्वी नन्दांनीं कलिंगांतून राजगृहीं नेलेल्या जिन-मूर्ति परत मिळविण्याच्या निमित्तानें त्यानें मगधावर दोन स्वाऱ्या केल्या; पहिल्या वेळीं पुष्यमित्रानें बचावासाठीं मथुरेपर्यंत माघार घेतली आणि दुसऱ्या वेळीं त्याचा पराभव झाला. बौध्द साहित्यांत मिलिंद या नांवानें विख्यात असलेल्या मीनॅंडरनें गंगा-यमुना दुआब व सौराष्ट्र हे प्रदेश काबीज केले आणि त्याचीं सैन्यें उज्जयिनीकडे व पाटलीपुत्राकडे वळलीं. या प्रचंड चिमट्याच्या चढाईमुळें भारताचें स्वातंत्र्य धोक्यांत आलें.

क्रमांक	नांव	राज्यारोहणकाल		टीप :
		श्री. बखले	माझें अनुमान	
१	सिमुक	ख्रि. पू. २२०	ख्रि. पू. २२०	याची प्रतिमा नाणेघाटांत आहे. महाराष्ट्राचा पहिला स्वातंत्र्य संस्थापक.
२	कृष्ण	,, १९७	,, १९७	याचे राजवटींतला लेख पांडवलेण्यांत आहे.
३	श्री सातकर्णा (१)	,, १७९	,, १७९	याची प्रतिमा व यज्ञलेख नाणेघाटांत आहे. पुष्यमित्र शुंग, खारवेल व मीनँडर यांचा समकालीन. राणी नायनिका. सांची तोरणावरील लेख याचे राजवटींतील असावा. दक्षिणापथपति. माळवा धर्तांचीं नाणीं
४	पूर्णोत्संग	,, १६९	,, १५१	यानें शुंगाचा पूर्ण उच्छेद केला असावा.
५	स्कन्धस्तम्भि	,, १५१	,, १३३	
६	सातकर्णी (२)	,, १३३	,, ११५	यानें मालवगणाचें नेतृत्व पत्करून शकांचा पराभव केला असावा. सांची तोरण लेख. नाणीं
७	लम्बोदर	,, १०४	,, ५९	
८	आपीलक	,, ८६	,, ४१	याचें नाणें मध्य प्रांतांत मिळालें आहे.
९	मेघस्वाति	,, ७४	,, २९	स्वाति नांव धारण करणारा वंश वेगळाच, असें कांहींचें मत.
१०	स्वाति	,, ५६	,, ११	
११	स्कन्दस्वाति	,, ४५	इ. स. १	

क्रमांक	नांव	राज्यारोहणकाल		टीप :
		श्री. बखले	माझें अनुमान	
१२	मृगेंद्र स्वातिकर्ण	,, ३९	,, ८	
१३	कुंतल स्वानिकर्ण	,, ३७	,, ११	याचा उल्लेख वात्स्यायनाच्या कामसूत्रांत आलेला आहे.
१४	स्वातिवर्ण	,, २९	,, १९	
१५	पुलोमावि (१)	,, २८	,, १९	
१६	अरिष्टकर्ण	,, ४	,, ४३	
१७	हाल	ई. स. २१	,, ४३	गाथासप्तशतीचा संपादक.
१८	मंतलक	,, २६	,, ४४	
१९	पुरींद्रसेन	,, ३१	,, ४९	
२०	सुंदर सातकर्णि	,, ४२	,, ५३	
२१	चकोर सातकर्णा	,, ४३	,, ५३	स्मिथ याचा समन्वय वासिष्ठीपुत्र विळिवायकुराशीं करतो.
२२	शिवस्वाति	,, ४३	,, ५३	
२३	गोतमीपुत्र सातकर्णा	,, ६०	,, ७६	यानें क्षहरात क्षत्रपांचा उच्छेद केला व शकस्थापना केली. नाशिक येथें लेख. जोगळटेंबीचा मुद्रानिधी.
२४	वासिष्ठीपुत्र पुलोमावि	,, ८५	,, ९१	कार्लें, नाशिक, अमरावती, कान्हेरी येथें लेख. नौका चिन्हांकित मुद्रा.
२४	अ सातकर्णा	,, ११३-१२७	,, ११९	तऱ्हाळा नाणीं.

क्रमांक	नांव	राज्यारोहणकाल श्री. बखले	मार्फे अनुमान	टीप
२५	शिवश्री	,,११३-१२६	,, १४८	अमरावती शिलालेख : नाणी.
२६	शिवस्कंद	,,११३-१२६	,, १५८	तऱ्हाळा नाणी.
२७	यज्ञश्री सातकर्णी	,, १२७	,, १६५	नाशिक, कान्हेरी, कार्ले, चिन्नगंजम येथें लेख. क्षत्रप धर्तीचें एक नाणें; सातवाहन धर्तीचीं अनेक नाणीं.
२८	विजय	,, १५६	,, १७४	तऱ्हाळा नाणी.
२९	चंद्रश्री	,, १६२	,, २००	कोडवोलु शिलालेख, नाणी
३०	पुलोमावि (३)	,,१७२-१८०	,,२१०-२१८	तऱ्हाळा नाणी. म्याकदोनी शिलालेख.

या परचक्राच्या प्रतिकारार्थ शुंगसातवाहनांनीं आपलीं सामर्थ्यें एकत्रित केलीं आणि मीनँडरचा पराभव (खि. पू. १५३) केला.

या विजयाच्या उत्सवार्थ आणि सार्वभौमत्वाचें निदर्शक म्हणून पुष्यमित्र व सातकर्णी यांनीं पतंजलीच्या प्रेरणेनें अश्वमेधादि यज्ञ केले. नाणे घाटांतील सातवाहनांच्या देवकुलांतील देवी नायनिकेचा लेख * याला साक्ष आहे. हा घाट व ही गुंफा पाहिलीं असतां खात्री पटते कीं हीं दोन्ही कामें समकालीन असलीं पाहिजेत. भारतांतला हा पहिला यज्ञलेख आहे. या लेखांत सातकर्णीला अप्रतिहतचक्र व दक्षिणापथपति म्हटलेलें आहे. यज्ञ प्रसंगीं केलेल्या दानांचा उल्लेख या लेखांत आलेला आहे. अशोकाच्या धर्मराज्यामुळें व बौद्धांच्या प्रचारामुळें ब्राह्मणांची अवस्था केंविलवाणी झाली होती. या आपन्नांना आश्रय आणि दानें देऊन सातकर्णीनें त्यांचा उद्धार केला. यावरून वाटतें कीं क्र. ४६७ मधील सालाहण तो हाच असला पाहिजे. शिवाय या काळांत महाराष्ट्रांत भागवत धर्म प्रस्थापित झाला होता आणि धार्मिक सहिष्णुता बाणली होती असें ही या लेखावरून प्रत्ययास येतें. मीनडरच्या आक्रमणाला महाभाष्य आणि पुष्यमित्राच्या पराक्रमाला मालविकाग्निमित्र साक्षी आहेत.

या विजयानंतर कांहीं काळपर्यंत माळव्यावर सातवाहन व शुंग या दोन्ही घराण्यांची सत्ता असावी असें दिसतें; उज्जयिनी येथें सातवाहनांची आणि विदिशा येथें शुंगांची. पहिल्या सातकर्णीची माळवा धर्तीचीं नाणीं मिळतात याचें हेंच कारण असलें पाहिजे. माळव्यांतल्या अनेक गणांच्या राजांच्या नाण्यांवर उज्जयिनी चिन्ह आढळतें. हे सातवाहनांचे मांडलिक असावेत असें माझें अनुमान आहे.

क्र. ४७१ या गाथेंत ऐतिहासिक घटना सूचित असावी असें अनुमान टीकेंत व्यक्त केलें आहे. दाक्षिणात्य राजाच्या शत्रूंनीं उत्तरेकडे पलायन केलें असा संदर्भ आहे. हा राजा कोण आणि त्याचे हे शत्रु कोण ? नन्द, चंद्रगुप्त व अशोक मौर्य, विक्रमादित्य, महाक्षत्रप रुद्रदामन्, समुद्रगुप्त व हर्षवर्धन या उत्तर हिंदुस्थानी राजांनीं दक्षिणेवर आक्रमण केल्याचा इतिहास अगर दंतकथा आहेत; पैकीं पलायन असें फक्त विक्रमादित्यानें केलें. कालक्रमानुरोधानें या गाथेंतील सूचित घटनेशीं या कोणाचा ही समन्वय होत नाहीं.

मीनँडरविरुद्ध झालेल्या उठावणीत पुष्यमित्र शुंग व सातकर्णी सातवाहन हे सहकारी होते. या स्वातंत्र्य युद्धानंतर लवकरच हे दोघेही दिवंगत झाले. त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांमध्यें स्नेहभाव दिसत नाहीं. पुष्यमित्रानंतर त्याचा पुत्र अग्निमित्र हा राज्यावर आला. कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकाचा हा नायक. यज्ञसेन व माधवसेन हे भाऊ भाऊ व विदर्भ सत्तेबाबत प्रतिस्पर्धी. अग्निमित्रानें विदर्भावर स्वारी केली व राज्य या दोघांमध्यें वांटून दिलें असा कथाभाग या नाटकांत आलेला आहे. खारवेलाच्या लेखांत कृष्णवेणेचा उल्लेख आहे. श्री. बखले आणि अनेक अन्य संशोधक (E. I : XX. p. 83) या नदीची ओळख कृष्णेशीं पटवितात आणि श्री. मिराशी व अनेक अन्य संशोधक हे वेनगंगेला मिळणाऱ्या कन्हान नदीशीं. या आणि अनेक अन्य प्रमाणांवरून दिसतें, कीं खारवेलाच्या काळापासून विदर्भावर सातवाहनांची सत्ता होती. अर्थात् यज्ञसेन व माधवसेन हे सातवाहनांचे मांडलिक असले पाहिजेत आणि अग्निमित्राच्या आक्रमणामुळें शुंग—सातवाहनांमध्यें संघर्ष निर्माण झाला असला पाहिजे. राजांच्या अल्पकालीन कारकीर्दी हें क्रान्ति-कालाचें लक्षण आहे. पुष्यमित्राच्या उत्तराधिकाऱ्यांमध्यें तें दिसून येतें. शुंगांच्या उच्छेदाचें श्रेय पुराणांनीं काण्वांना दिलें आहे. कांहीं आधुनिक संशोधक (Shivarammurti : Amaravati Sculptures : p. 11) हें श्रेय पूर्णोत्संगाला (पूर्णम् उन्क्रान्त : शुंगान्) देतात. मला हें मत ग्राह्य वाटतें. सातवाहनांच्या नौबती झडूं लागतांच शुंगांचीं सैन्यें नर्मदापार झालीं असलीं पाहिजेत.

दुसरा सातकर्णी हा सहावा सातवाहन राजा. यानें छप्पन वर्षें राज्य केलें. सातवाहन राजांत याची कारकीर्द सर्वांत मोठी. ‘ रणो सातकणिस ’ असा लेख असलेलीं नाणीं तीं याचीं असें डॉ. रॅप्सन यांचें अनुमान आहे. यांपैकीं कांहीं नाणीं उज्जेन धर्तीचीं वर्तुलाकार आहेत व कांहीं एरण धर्तीचीं चौकोनी आहेत; कांहीं नाण्यांवर झेंप घेणाऱ्या सिंहाची आकृति आहे आणि कांहीं-वर सोंड उभारलेल्या हत्तीची. हीं दोन्ही प्रतीकें अन्वर्थक आहेत. सांची स्तूपाच्या दक्षिण तोरणावर सातकर्णीच्या कारागिरांचा पुढारी वासिष्ठीपुत्र आनंद याचा दानलेख आहे. कालकाचार्य कथानकांत उज्जयिनी येथील

शकांचा उच्छेद करणाऱ्या सातवाहनाचा उल्लेख आहे. या व अन्य पुराव्या-वरून समन्वयानें ऐतिहासिक घटना निश्चित होतात, त्या अशा :

जैन आचार्य कालक हा धर्मप्रसारार्थ उज्जयिनीस आला असतां त्याची रूपवती बहीण सरस्वती हिला तेथील राजा गर्दभिल्ल उर्फ गंधर्वसेन यानें अंत:पुरांत ओढलें. तिची सुटका करण्याचे सर्व प्रयत्न विफल झाल्यानंतर आचार्यानें उज्जनिवर स्वारी करण्यासाठीं शकांना आमंत्रून आणलें. या वेळीं वायव्य सरहद्दीवर यवनांचीं राज्यें होतीं व मध्य आशियांतील कुषाण टोळ्या शकांचा उच्छेद करण्यास उद्युक्त झाल्या होत्या. त्यांना टाळून शक टोळ्या बोलन घाटांतून हिंदुस्थानांत घुसल्या होत्या. ख्रि. पू. पहिल्या शतकाच्या पहिल्या चतुष्टकांत शक सिंध–पंजाबांत स्थायिक झाले होते. आचार्याच्या पुरस्कारामुळें त्यांना स्वारीच्या खर्चासाठीं अलोट संपत्ति आणि सौराष्ट्र-गुजरातेंतील स्थानिक राज्यकर्त्यांचें सहकार्य मिळालें. आचार्याला उज्जयिनीचा भेद माहीत होता. त्याचा फायदा मिळाल्यामुळें शकांनीं गर्दभिल्लाचा पाडाव करून उज्जयिनी काबीज केली. सरस्वतीची सुटका झाली, पण ठरल्याप्रमाणें शक परत जाईनात. ते तेथेंच रमले व प्रजेवर अत्याचार करूं लागले. त्यांच्या पाठिंब्यानें फुशार-लेल्या आचार्याचा आतां अपमान उपहास होऊं लागला. म्हणून तो पैठणला सातवाहनांच्या आश्रयाला आला; कारण शकांना विरोध करण्याला समर्थ अशी ही एकच सत्ता त्या काळांत अस्तित्वांत होती. शिवाय सातवाहनांचा माळव्याशीं पूर्वापार संबंध असल्यामुळें शकांविरुद्ध त्यांची सहानुभूति संपादन करणें शक्य होतें. आचार्यानें उज्जयिनीची परिस्थिति सातकर्णीला समजावून दिली. नंतर जुने लागेबांधे उजळून सातकर्णीनें माळव्यावर स्वारी केली उज्जयिनी जिंकली आणि मालवगणांच्या मदतीनें शकांना पिटाळून लावलें.

ख्रि. पू. पहिल्या शतकांत उज्जयिनींतून शकांचें उच्चाटन केल्याचें श्रेय परंपरेनें विक्रमादित्याला दिलें आहे. याचें ऐतिहासिकत्व अत्यंत संशयास्पद आहे. याचा एकही शिलालेख किंवा नाणें आजवर मिळालेलें नाहीं; किंवा कोणा समकालीनाच्या लेखांत त्याचा उल्लेख आलेला नाहीं. या काळांत माळव्यांत मालवगणाचीं नाणीं मिळालेलीं आहेत. उज्जयिनींत होणारे अपशकुन राज्यक्रांतीचे द्योतक आहेत असें भविष्य ज्योतिष्यांनीं वर्तविल्यावरून आणि

ज्याची आई अडीच वर्षांची असेल त्याच्या हातून तुला मृत्यु येईल असेंही त्यांजकडून सांगण्यांत आल्यावरून विक्रमानें वेताळाला संभाव्य शत्रूचा शोध करावयास पाठविलें. शालिवाहन हा असा बालक वेताळाला पैठण येथें आढळला. लगेच त्यानें विक्रमाला वर्दी दिली. शत्रूचा उठावणीपूर्वीच निःपात करण्याचें ठरवून विक्रमानें पैठणवर स्वारी केली. शालिवाहनानें आपल्या [illegible]तले मातीचे हत्ती, घोडे व सैनिक शेषाच्या कृपेनें सजीव केले आणि त्यांनिशीं विक्रमाशीं युद्ध केलें. या युद्धांत विक्रमाचा पराभव झाला व त्याच्या सैन्यानें उत्तरेकडे पळ काढला. शालिवाहनानें विक्रमाचा पाठलाग केला, त्याला गांठलें आणि सोडग्यानें बदडून ठार केलें. शेवटीं विक्रमाचें सैन्य नर्मदापार झालें आणि पाठलाग करणारें शालिवाहनाचें सैन्य नर्दातून वाहून गेलें. या विक्रम-शालिवाहन कथा वेताळ पंचविशी व सिंहासनबत्तिशी या लोककथासंग्रहांत थोड्याबहुत फरकानें आलेल्या आहेत. हे कथासंग्रह निःसंशय उत्तरकालीन आहेत. गर्दभिल्ल विक्रमादित्याची परंपरा ब्राह्मणी आहे असें म्हणावें तर पुराणांतील वंशावळींत त्याचा उल्लेख नाहीं. गर्दभिल्ल व शक यांचा उल्लेख आहे. तरीही ही परंपरा जैन आहे असें म्हणावें तर खुद्द कालकाचार्य कथानकांत सांगितलें आहे कीं शकोच्छेदक विक्रमादित्य हा प्रतिष्ठानहून उज्जयिनीस आला होता. मग हें सोंग साजरें करण्यासाठीं गृहीत धरावयाचें कीं शकांकडून गर्दभिल्ल मारला गेल्यानंतर त्याचा पुत्र विक्रमादित्य हा पैठणला सातवाहनांच्या आश्रयाला आला असला पाहिजे! अडीच वर्षांच्या आईचा मुलगा म्हणजे ज्यानें नुकतेंच राज्य स्थापन केलेलें आहे असा शालिवाहन राजा होय, असा डॉ. जयस्वालांचा अभिप्राय आहे. सिमुक हा सातवाहन कुलाच्या राज्यकर्तृत्वाचा संस्थापक, याबद्दल सर्वांचें एकमत आहे. ज्या व्यक्तीवरून या कुलाला सातवाहन हें नांव प्राप्त झालें तो याच्याही पूर्वी होऊन गेला असला पाहिजे हें आहे. कारण सिमुकाला कोणी-ही शालिवाहन म्हणून संबोधिलेलें नाहीं. राजा सातवाहन असें नांव असलेलें एक तांब्याचें चौकोनी नाणें माझ्या संग्रहीं आहे. अक्षर घाटणीवरून तें पहिल्या सातकर्णीच्या ही पूर्वीचें असावें असें संशोधकांचें अनुमान आहे. डॉ. जयस्वाल यांचें अनुमान स्वीकारलें तर सातवाहन राज्यसंस्थापक शालि-

वाहनाला खि. पू. तिसऱ्या शतकाच्या द्वितीयार्धात मांडलें पाहिजे. त्या काळाशीं जुळेल असा विक्रम परंपरेंत एकही तपशील नाहीं. पहिल्या शतकांत गोतमीपुत्रानें क्षहरातांचा निःपात केला; चवथ्या शतकाच्या अखेरच्या चतुष्टकांत दुसऱ्या चंद्रगुप्तानें क्षत्रपांचा उच्छेद केला आणि पांचव्या शतकाच्या अखेरच्या चतुष्टकांत यशोधर्म्यानें हूणांचा. या चंद्रगुप्तानेंच प्रथम विक्रमादित्य हें बिरुद धारण केलें. खि. पू. पहिल्या शतकांतील विक्रमादित्याच्या कथा अर्थातच यानंतर निर्माण झाल्या असल्या पाहिजेत.

मग क्र. ४६४ मधील विक्रमादित्याच्या उल्लेखाची संगति कशी लावावयाची? चंद्रगुप्त विक्रमादित्यानंतर विक्रमकथा अस्तित्वांत आल्या असें मानलें तर गाथासप्तशतीचें संपादन पांचव्या शतकांत झालें असलें पाहिजे असें मानावें लागतें. अशी आपत्ति टाळण्यासाठीं डॉ. अळतेकर (Vikrama Volume: Riddle of Vikrama Era : p. 9) सांगतात कीं हा उल्लेख प्रक्षिप्त उत्तरकालीन असला पाहिजे. या कोड्याला अशी बगल देण्याचें कांहींच कारण नाहीं. ऐतिहासिक विक्रमादित्यांव्यतिरिक्त परंपरेला आणखी दोन विक्रमादित्य माहीत आहेत: एक कालकाचार्य कथानकांतला वीर विक्रम, शकांचा उच्छेदक आणि प्रतिष्ठानचा राजा, ज्याचा समन्वय दुसऱ्या सातकर्णीशीं होऊं शकतो; आणि उत्तरकालीन सिंहासनबत्तिशीचा नायक उदार विक्रम. गाथासप्तशतीला गर्दभिल्ल कुलांतला वीर विक्रम माहीत नाहीं. लोककथांतला उदार विक्रम माहीत आहे. जो सर्वस्वी काल्पनिक आहे, लोककथांव्यतिरिक्त ज्याला अस्तित्व नाहीं. ग्रंथ उत्तर कालीन असला तरी सिंहासनबत्तिशीनें ग्रथित केलेल्या कथा प्राचीन काळापासून चालत आलेल्या आहेत. त्यांचें मूळ जातकांहून किंवा कमींत कमी त्यांच्या इतकें प्राचीन असावें असें वाटतें.

आठवा सातवाहन राजा आपीलक याचें तांब्याचें मोठें वर्तुलाकार नाणें मध्यप्रांतांत मिळालें आहे. या नंतर सातवाहन सत्तेला उतरती कळा लागलेली दिसते. राजांचे राज्यकाल अल्प आहेत; त्यांचे शिलालेख आढळलेले नाहीत व नाणीं मिळालेलीं नाहींत. फक्त पहिला पुलोमावि व शिवस्वाति यांनींच बरींच वर्षे राज्य केलेलें आहे. तेरावा सातवाहन राजा कुंतल सातकर्णी याचा उल्लेख

वात्स्यायनाच्या कामसूत्रांत लैङ्गिक विकृतीच्या अनुषंगानें आलेला आहे: "कर्तर्या कुन्तलः शातकर्णिः शातवाहनो महादेवीं मलयवतीं जघान।" या उल्लेखावरून अनुमान करण्यांत आलें आहे कीं याचा जन्म कुंतलांत झाला. असेंही अनुमान होतें कीं याच्या काळांत सातवाहन सत्ता कृष्णाकांठच्या खोऱ्यांत मात्र अस्तित्वांत असावी. सतरावा सातवाहन राजा हाल हा गाथासप्तशतीचा संपादक. याची सत्ता मावळांत व सह्याद्रि पर्वतालगत गोदावरीच्या परिसरांत मात्र होती.

उज्जयिनीच्या पराभवानंतर तेथील शकांनीं उत्तरेकडे पलायन केलें. दरम्यान मोविस व अझेस या शक नेत्यांनीं पंजाब व गंगायमुना दुआब या भागांत प्रभुत्व मिळविलें होतें. तक्षशिला, पुष्कलावती व मथुरा येथें त्यांचीं मुख्य ठाणीं होतीं. मथुरा येथील क्षहरात क्षत्रपांपैकीं भूमक यानें सौराष्ट्रांत क्षत्रपसत्ता प्रस्थापित केली. त्याचा उत्तराधिकारी नहपान यानें माळवा, राजस्तान, सौराष्ट्र, लाट व उत्तर महाराष्ट्र या भागांत आपली सत्ता प्रस्थापित केली. नाशिक, जुन्नर व कार्लें येथें त्याचे लेख आहेत. खि. पू. पहिल्या शतकाच्या चवथ्या चतुष्कांत स्वाति हें उपनाव धारण करणाऱ्या सातवाहनांच्या काळांत क्षहरातांचा महाराष्ट्रांत प्रवेश झाला असावा. स्वाति हें आदि, मध्य किंवा अंत्य नांव धारण करणारांविषयीं पुराणांचे उल्लेख एकमुखी नाहींत. क्षत्रपांच्या आक्रमणामुळे हे राजे देशोधडीला लागले असावेत किंवा दुहींत मारले गेले असावेत. क्षहरातांचीं शिल्पकृत्यें व धर्मकृत्यें यांवरून त्यांची संपन्नता व राजकीय धोरण प्रत्ययास येतात. मीनंडरनें फक्त बौध्दांना आश्रय दिल्यामुळें त्याला ब्राह्मण-क्षत्रियांचें सहकार्य किंवा सहानुभूति हीं मिळालीं नाहींत. क्षहरातांनीं बहुजन-समाजासाठीं अन्नछत्रें घातलीं, धर्मशाळा बांधल्या, नद्यांवर घाट बांधले व घरमनरी सुरू केल्या; हजारों ब्राह्मणांना भोजनें घातलीं व दानें दिलीं. पहिल्या सातकर्णीनें यज्ञांत दानें दिलीं तीं प्रत्यक्ष प्रक्रियेंत भाग घेणाऱ्या ब्राह्मणांनाच दिलीं असलीं पाहिजेत हें उघड आहे; पण त्यानें दानग्रहण करणाऱ्या वर्गांचा उल्लेख केलेला नाहीं. क्षहरातानीं असा उलेख केला. कारण ते स्वतः देशाला परके होते व विशिष्ट वर्गाला संतुष्ट ठेवण्याला उत्सुक होते. नहपानाच्या मुलीचें नांव दक्षमित्रा व जांवयाचें ऋषभदत्त. नहपानाच्या नाण्यांवरील लेख त्याच्या प्रजेला

परकी असलेल्या खरोष्ठी व ग्रीक आणि परिचित अशा देशी ब्राह्मी लिपींत आहेत. यावरून दिसतें कीं क्षहरात हे प्रजेशीं समरस होण्यास उत्सुक दिसले तरी आपलें व्यक्तिमत्व अबाधित राखण्याविषयीं दक्ष होते.

या पारतंत्र्यावर्त काळांत सातवाहन राजांनीं सह्याद्रीच्या जंगलांत किंवा कर्नाटकांत आश्रय घेतलेला असावा. या काळांत महाराष्ट्रांतील बंदरांचा व्यापार प्रयत्नपूर्वक उध्वस्त करण्यांत आला. कल्याण बंदरांत मालाची चढउतर करावयास आलेलीं जहाजें यवनांनीं सैनिकांच्या बंदोबस्तांत भडोचला हांकून नेण्याची प्रथा पेरिप्लसनें नमूद केलेली आहे.

बावीसावा सातवाहन राजा शिवस्वाति याला भागवत पुराणांत अरिंदम म्हटलेलें आहे. यावरून यानें क्षहरातांविरुद्ध उठावणी आरंभिली असावी. याची राणी महादेवी गोतमी. हिच्या सारखी भाग्यवती आजवर भारतांत झाली नाहीं. राजर्षि शिवस्वाति हा तिचा पति, शककर्ता गोतमीपुत्र सातकर्णी हा यांचा पुत्र आणि महाराज वासिष्ठीपुत्र पुळुमावि हा नातू. तिचा लेख पाण्डवलेण्यांतील क. ३ या गुंफेंत आहे. त्यांतील काहीं विधानें येथें देतों : ती स्वतः सत्यवचनदानक्षमाहिंसानिरत, तपोदमनियमोपवासतत्पर अशी होती. तिनें पुत्राचें माहात्म्य वर्णन केलें आहे तें असें : एकशूर, एकब्राह्मण, एकधनुर्धर; सातवाहनकुलयशप्रतिष्ठापनकर; क्षत्रियदर्पमानदमन; शकयवनपल्हवनिषूदन; त्रिसमुद्रपीततोयवाहन; द्विजवरकुटुम्बविवर्धन; विनिवर्तित चातुर्वर्ण्यसंकर. नाशिक जिल्ह्यांत सिन्नर तालुक्यांत जोगळटेम्बी येथें नहपानाच्या तेरा हजार रौप्यमुद्रांचा निधि आढळून आला. त्यांपकीं दोन तृतीयांश नाण्यावर गोतमीपुत्राच्या नावाचे व सातवाहनांच्या मुद्राचिन्हांचे ठसे ठोकण्यांत आलेले आहेत. क्षहरातांचा निःपात केल्याचें द्योतक म्हणून हें पुनर्मुद्रण करण्यांत आले असले पाहिजे. सातवाहन व नहपानाचे उत्तराधिकारी क्षहरात क्षत्रप यांचा निर्णायक संघर्ष कार्ले, जुन्नर व नाशिक ह्या सह्याद्रीलगतच्या भागांत झाला असला पाहिजे. या संघर्षांत गोतमीपुत्र विजयी झाला, म्हणूनच मी त्याला शालिवाहन शककर्ता म्हणतों.

गोतमीपुत्रानंतर त्याचा पुत्र वासिष्ठीपुत्र पुळुमावि हा राज्यावर आला. महाराष्ट्रांत कार्ले व नाशिक आणि आन्ध्रांत अमरावती व धरणीकोट येथें याचे

लेख मिळालेले आहेत. याची नाणी महाराष्ट्रांत व आन्ध्रांत मिळाली आहेत. कारोमांडल किनाऱ्यालगतच्या प्रदेशांत मिळालेल्या याच्या नाण्यांवर डोलकाठी असलेल्या जहाजाची प्रतिमा आढळते.

गोतमी बलश्रीच्या लेखांत गोतमीपुत्राच्या अवन्तिविजयाचा उल्लेख आहे. ई. स. ७८ पासून उज्जयिनीस महाक्षत्रप चष्टण याच्या घराण्याची सत्ता सुरू झाली. या घराण्याचे राज्य अवन्तिसाराष्ट्र भागांत ई. स. ३९५ पर्यंत टिकलें. चष्टण हा कुषाणांचा क्षत्रप असावा. क्षहरातांशी गोतमीपुत्राचा महाराष्ट्रांत संग्राम सुरू असतां त्यांत ढिलाई आणण्याकरितां किंवा त्याचा फायदा घेऊन चष्टणानें हें आक्रमण केलें असावें. या घराण्यांतला दुसरा राजा जयदामन् हा फक्त क्षत्रप होता. या घराण्यांतला तिसरा महाक्षत्रप रुद्रदामन् याचे लेख अंधौ व जुनागड येथें मिळालेले आहेत. या लेखांवर अनुक्रमें ५२ व ७२ असे वर्षांक आहेत. दक्षिणापथपति सातकर्णी याचा आपण दोनदा पराभव केला. पण तो नजीकचा नातेवाईक असल्यामुळें त्याचा समूळ नाश मात्र केला नाहीं असें जुनागड लेखांत त्याचें विधान आहे. या लेखाचा काळ ७२ + ७८ = ई. स. १३० असा संकेतानुसार ठरतो. कान्हेरीच्या लेण्यांतील एका संस्कृत लेखांत वासिष्ठीपुत्र सातकर्णाची राणी कार्दमकुलोत्पन्न महाक्षत्रप रुद्र याची कन्या होती, असा उल्लेख आढळतो. या उल्लेखांवरून अनुमान होते कीं क्र. २४ अ–सातकर्णी यानें जयदामन याचा पराभव केला असावा आणि समेटादाखल जयदाम्यानें आपली नात व रुद्रदाम्याची कन्या शिवश्रीला दिली असावी. पुढे महाक्षत्रप रुद्रदाम्यानें शिवश्रीचा पराभव केला असावा.

सत्ताविसावा सातवाहन राजा यज्ञश्री सातकर्णी याचे लेख कान्हेरी, नाशिक व चिन्नगंजम येथें मिळाले आहेत. सोपारा येथील स्तूपांतील करंडकांत यज्ञश्रीचें क्षत्रप धर्तीचें नाणें मिळालेलें आहे. अशी नाणीं गुजरातसौराष्ट्रांतही मिळालेली आहेत. यावरून अनुमान करण्यांत आलें आहे कीं हे प्रदेश यज्ञश्रीनें क्षत्रपांपासून जिंकून घेतले असले पाहिजेत. याची नाणीं तऱ्हाळा निधींत मिळालेली आहेत. एकोणतिसावा राजा चंद्रश्री याचा लेख पूर्व गोदावरी जिल्ह्यांत कोडवलि येथें मिळालेला आहे आणि तिसावा राजा पुळुमावि याचा लेख

बेळारी जिल्ह्यांत अशोनी तालुक्यांत म्याकदोनी या खेड्यांत मिळालेला आहे. यावरून यज्ञश्रीनंतर सातवाहन सत्तेचा ऱ्हास व स्थलांतर प्रत्ययास येतें.

सातवाहन सत्तेचा अस्त कसा झाला याबद्दल कांहींही माहिती उपलब्ध नाहीं. महाराष्ट्रांत सातवाहनांनंतर अभीरांनी राज्य केले. शिवदत्त अभीराचा पुत्र माढरीपुत्र ईश्वरसेन यानें उत्तर महाराष्ट्रांत, नाशिक खानदेश भागांत, सातवाहन सत्तेचें उच्चाटन केलें असावें. याचा लेख पाण्डवलेण्यांत आहे. आन्ध्रांत सातवाहनांनंतर इक्ष्वाकु घराण्याचें राज्य आलें. वासिष्ठीपुत्र शांतमूल हा या राजघराण्याचा मूळ पुरुष. राज्यप्राप्तीनंतर त्यानें अश्वमेध, वाजपेय इत्यादि यज्ञ केले. यावरून सातवाहनांशीं संघर्ष होऊन त्यांत याचा जय झाला असावा. वनवासी येथील चुटु हे सातवाहनांचे सामन्त. ते ही स्वतंत्रपणें राज्य करूं लागले. वऱ्हाडांत वाकाटक हे सातवाहनांचे सामन्त होते. सातवाहन दुर्बळ झालेले पाहून विन्ध्यशक्ति वाकाटक स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. या उत्तराधिकारी घराण्यांपैकीं वाकाटक तेवढे पुढें विशेष प्रसिद्धीला आले आणि महाराष्ट्र संस्कृतीचा आणखी विकास करते झाले.

(२) राज्यव्यवस्था :

देश (क्र. ९४) व जन्मभूमि (क्र. ३८०) या संज्ञा गाथासप्तशतींत आलेल्या आहेत. मात्र गाथासप्तशतीला त्या राजकीय संदर्भात अवगत नाहींत. सुजन हा देशाचा अलंकार आहे आणि स्नेह्यांसोबतयांच्या साहचर्यामुळें जन्म भूमीचें दर्शन प्रिय वाटतें, अशा भावना या गाथांत व्यक्त झालेल्या आहेत हे दोन्ही उल्लेख उदासवाणे आहेत आणि क्र. १६ मधील अंतर्सीमेच्या दर्शनानें उचंबळणाऱ्या भावनांशीं तोलून पाहण्यासारखे आहेत. क्र. ९८९ मध्यें एकच्छत्त भुअणरज्जाचा उल्लेख आहे. पण हें एक राज्य मदनाचें आहे.

राजा : **णराहिव** = नराधिप : क्र. ३६४; **पुहवीस** = पृथ्वीश : क्र. ७७४; **महाराओ** = महाराव : क्र. ८१४; **राअ** = राज : क्र. ३९६.

क्र. ३६४ मधील राजस्तुति ही मध्ययुगीन तोंडपुजेपणाला साजेशी आहे. क्र. ४९५ मधील उद्गार वैतालिकाचे आहेत असें मध्ययुगीन गंगाधरानें सांगितलेंही आहे. क्र. ३९६ मध्यें राजद्रोहाची कुजबूज आणि क्र. ९९३ मध्यें

राजनिष्ठेची घोषणा आहे. हा राजद्रोह तत्कालीन परक्या राजकर्त्यांविरुद्ध असणें संभाव्य आहे; क्र. ५९६ मधील घटनेशीं तुलना केली असतां हें अनुमान विशेष संभाव्य वाटतें आणि स्वदेशी राज्याच्या शत्रूंची अवस्था किती करुणास्पद होते हें दिसून येतें. रणरस व रणदुंदुभि (क्र. ९६०) व जयलक्ष्मी (क्र. ९७१, ९७७) आणि राजाच्या शत्रूंची शरणागति (क्र. ४७१, ९७४) व पलायन यांचीं वर्णनें पाहण्यासारखीं आहेत. क्र. ७७४ या गाथेंत पृथ्वीशाच्या कृत्रिम स्वागतोत्सवाची तुलना वसंतोत्सवाच्या उत्स्फूर्त उत्साहाशीं केलेली आहे. क्र. ८१४ मधील महाराव हा उघडपणें उत्तरकालीन आहे आणि हत्तींना त्याचा आश्रय आहे यांतच त्याचा आहे तो मोठेपणा आहे. मेगॅस्थेनिस सांगतो कीं हत्ती बाळगण्याचा हक्क फक्त राजांना होता: साहजिक आहे, दुसऱ्या कोणाला हत्ती पोसवणार ? आणि राज्याचें माहात्म्य जाहीर करणारा डंका (ढक्का : क्र. ५२६) धारण करण्याचें सामर्थ्य त्याच्याच अंगीं असतें. गुप्त बातम्या सांगण्यासाठीं प्रभूच्या कानाला लागणाऱ्या हेरांचा उल्लेख क्र. ८१७ या गाथेंत आलेला आहे.

कांहीं सातवाहन राजे मातृकुलाचीं नांवें धारण करीत असले तरी त्यांचा राज्यावर येण्याचा अनुक्रम पित्यामागून पुत्र असाच असल्याचें शिलालेखांतील व पुराणांतील उल्लेखांवरून ठरत आहे. श्री. चट्टोपाध्याय (Satakarni Succession & Marriage Rules : J. R. A. S : V : 1939 : p 317) यांनीं हा अनुक्रम मातृप्रधान प्रथेनें होत असावा असें अनुमान केलें आहे. पण तें संशोधकांना मान्य झालें नाहीं. वारस वयांत आलेला नसला तर तोंवर त्याचा चुलता राज्यकारभार चालवी. राजा हा शांततेच्या काळांत समाजाचा व धर्माचा आणि युद्धांत सेनेचा अग्रणी असे. धर्मशास्त्रांना संमत असतील तेवढेच कर तो वसूल करी. महाभोज व महारठी हे त्यांचे नातेवाईक व सामन्त आणि भोजक व रठिक हे त्यांचे स्थानिक सरंजामदार. वासिष्ठीपुत्र स्वामी श्री पुळुमावि ह्याच्या लेखांत महासेनापति या पदाचा पहिला उल्लेख आढळतो. देशाची विभागणी आहारांत केलेली होती; उदा: गोवर्धनाहार, मामालाहार; यांचें क्षेत्र अर्वाचीन जिल्ह्यांएवढें असावें; त्यांवर अमच-अमात्य हे अधिकारी असत. राजाज्ञा साक्षर करण्याची व त्यांच्या

अंमलबजावणीची जबाबदारी या अधिकाऱ्यांवर असे. बौद्धांच्या धार्मिक संस्थांचा कारभार महामात्र संज्ञक श्रमणाच्या हातीं असे. हे सर्व अधिकारी नागरी असल्यामुळें त्यांपैकीं एकाही अधिकाऱ्याचा उल्लेख गाथासप्तशतींत आलेला नाहीं.

गाम = ग्राम हा आहाराखालचा देशविभाग; त्यावर गामिक, गामणि = ग्रामिक, ग्रामणि याचा अधिकार असे.

गामणि : क्र. ४४९, ४६९, ६३१; गामणि – **उत्त** = पुत्र : क्र. ३१; – **णन्दण** = नन्दन : क्र. ३०, ६०८, ६२८; – **धूआ** = दुहिता : क्र. ३७०, ४१०, ५९२; पल्लीपति : क्र. ६३२, पाटला : क्र. ४६८, ४६९.

वैदिक ग्रामणि हा ग्रामीणांचा नेता. परचक्र व स्थानिक आक्रमण यांपासून ग्रामाचें संरक्षण करण्याची जबाबदारी त्याच्यावर असे. यावरून लष्करी नेतृत्व ही त्याच्याकडेच असावे असे दिसतें. शतपथ ब्राह्मणांत त्याचा समावेश राज्यकर्तारामध्ये (३·४·१·७; १३·२·९·१८) केलेला आहे. हा राजसत्तेचा प्रतिनिधि तसाच जनसत्तेचाही. राज्यारोहणाचे निमित्तानें होणाऱ्या यज्ञसमारंभांत जनतेचा प्रतिनिधि या नात्यानें तो हजर असे व अशा प्रसंगी त्याचा मान सन्मान करण्यांत येत असे (डॉ. जयस्वाल : Hindu Polity : p. 202). यजुर्वेदाच्या मैत्रायणी संहितेंत वैश्य (२·६·५; ४·३·८) आणि शांखायन श्रौत सूत्रांत सूत (१६·१·६) ग्रामणीचा उल्लेख आहे. यांवरून हे पद ज्ञातिनिष्ठ नसावें असें वाटते. सेणिय बिंबिसारानें प्रत्येक गांवाचा एक अशा ऐंशीं हजार ग्रामणींची सभा भरविल्याचा उल्लेख महावग्गांत (S. B. E : XVII. p. 1) आणि ग्रामणींनीं राजाची निवडणूक केल्याचा उल्लेख चुल्ल सोम जातकांत (J. : V. 97) आलेला आहे. ग्रामणी हा राजानें नेमलेला असे किंवा प्रजेनें निवडलेला असे याबद्दल आधारग्रंथांत व संशोधकांत एकमत नाहीं. अर्थशास्त्रांत (V. III) त्याचा समावेश पगारी नोकरांत केलेला नाहीं; यावरून तो लोकनियुक्त असावा आणि तो आपलें काम ग्रामवृद्धांच्या सल्ल्यानें करीत असावा असा डॉ. रॉय चौधरी यांचा अंदाज (Political History of Ancient India : p. 240) आहे. ग्रामणीपद प्रारंभीं निवडणुकीनें प्राप्त होत असावें अगर ग्रामाची वसाहत करणाऱ्या कुलाचा प्रतिनिधि

म्हणून हें पद एकाद्या घराण्यांत वंशपरंपरेनें चालत असावें. मध्यवर्ती सरकारचें सामर्थ्य वाढूं लागलें तेव्हां सत्ताधाऱ्यांच्या जमातींतून त्यांची नेमणूक करण्याची प्रथा सुरू (डॉ. भटनागर : J. R. A. S : 1934 : p. 348) झाली असावी. स्थानिक न्यायदानाचें काम त्याच्याकडेच असावें असें अर्थशास्त्रावरून दिसतें. मृच्छकटिकांतील नागरी न्यायाधीशाला "अधिकरणभोजक" म्हटलेलें (निर्णयसागर : शास्त्री व परब : अंक ९ : पृ : २०२) आहे. अंदाधुंदीच्या व परचक्रांच्या काळांत भारतांतील प्रजा व्यक्तिमत्त्वासह तगविण्याचें श्रेय ग्रामवृद्धांच्या सल्ल्यानें चालणाऱ्या ग्रामणीच्या नेतृत्वाखालीं संघटित झालेल्या ग्रामसंस्थांनाच दिलें पाहिजे.

गाथासप्तशतीच्या ग्रामणीचा दर्जा स्थानिक राज्यकर्त्यासारखा असावा असें त्याच्या पल्लीपति (क्र ६३२) या अभिधानावरून दिसतें. या काळांत अंदाधुंदी असावी, सार्वजनिक सुरक्षितता धोक्यांत असावी असें दिसतें. क्र. ५४ व ५५ या गाथांच्या नायिका सरकारी तुरुंगांत असून त्यावर हल्ला चढवून पति आपल्याला सोडवून नेईल अशी त्यांची अपेक्षा आहे. क्र. ५२७ च्या नायिकेला चोर पळवून नेत आहेत, तिचीही अशीच अपेक्षा आहे. क्र. ५८ चा नायक दरवडेखोराच्या पाठलागाला किंवा परचक्रनिवारणाच्या मोहिमेवर गेलेला आहे असे टीकाकारांचें अनुमान आहे. क्र. ११८, ५२७, ५७६, ६९८ व ७८७ या गाथांत चोरांचे उल्लेख आहेत. त्यांच्या धास्तीनें नागरिकांना जागरणे (क्र. ३३९) करावीं लागत आहेत. गृहपतीच्या दराऱ्यानें क्र. ७८७ मधील चोरांची पांगापांग झालेली आहे. क्र. ६२८ व ६३१ मधील उल्लेख परचक्राचे असावेत. क्र. ३१ मधील ग्रामणीपुत्राची छाती जखमांच्या व्रणांनी खडबडीत झालेली आहे. क्र. ६२८ मध्यें पाटलाच्या पुत्रानें आपल्या वस्तीचें रक्षण मोठ्या शिताफीनें केलेलें आहे. क्र. ६३१ मधील ग्रामणि आसन्नमरण असला तरी गांवकऱ्यांनीं प्रतिकार टाळून सुरक्षिततेसाठीं जंगलांत पळ काढण्याची भाषा ऐकण्यासही तयार नाहीं. ग्रामणीचा हुद्दा आनुवंशिक असावा. क्र. ६२८ मधील ग्रामणीपुत्र वयानें लहान असला तरी पित्यापाठीमागून ग्रामरक्षणाची जबाबदारी त्याच्यावर आलेली आहे. क्र. ६३१ मधील ग्रामणि आपले नांव सांभाळ-

ण्याविषयीं पुत्राला उपदेश करीत आहे. गृहपतिपुत्र व गृहपति दुहिता यां प्रमाणें ग्रामणीनंदन (क्र. ३०, ६०८) व ग्रामणीदुहिता (क्र. ४१०) यांजवर ग्रामतरुणींची व ग्रामतरुणांची आसक्त नजर आहे; आणि पाटलिणींवरही (क्र. ४६८-४६९). क्र. ५९२ मधील ग्रामणीदुहिता इतकी सुंदर कीं तिच्याकडे पाहतांना गांवकरी पापण्या मिटण्याचें विसरतात; क्र. ४१० मधील ग्रामणीदुहिता बाळपणांत एवढी उन्मादक का हीं तरुणपणीं अनर्थ करील अशी जाणत्यांना धास्ती वाटते. आणि ग्रामणीनन्दन ! तो तर गांवकन्यांच्या गळ्यांतला ताईत आणि ग्रामतरुणाचा प्यार ! त्यानें बायकोच्या कह्यांत राहूं नये आणि संधि सांपडेल तेव्हां आपल्याबरोबर रमावें (क्र. ३०) अशी या सुंदरीची अपेक्षा ! पाटलिणींशी सामान्यानें संधान बांधण्यांतला धोका क्र. ४६८ व ४६९ या गाथांत व्यक्त झालेला आहे. आर्यांच्या बाबतींत पूर्वी सांगितलें तें येथेंही लागू पडतें. असेंही असावें कीं बहुजनसमाजाच्या मानानें ग्रामणींचा वंश अधिक शुद्ध असल्यामुळे त्यांचें शारीरिक सौष्ठव वरिष्ठ दर्जाचें असावें. आधुनिक पाटील व देशमुख यांच्या घराण्यांतही हें निदर्शनास येतें.

पाटील या शब्दाची व्युत्पत्ति महाराष्ट्र-शब्दकोशांत पट्टकील अशी दिलेली आहे. पट्ट, पट्टक म्हणजे ग्राम; जमिनीचा तुकडा किंवा इनामी सनद; कुळांची यादी. हे तपशील नोंदून सांभाळण्याची जबाबदारी पाटलावर असे. गाथासप्तशतीच्या काळांत ही संज्ञा प्रचलित होऊं लागली असावी असें क्र. ४६८ व ४६९ या गाथांतील 'पाटलाच्या अंगणांत पाटलीचें झाड' या श्लेषावरून अनुमान होतें.

क्र. ५५६ या गाथेंत तित्तिल असा पहारेकऱ्याचा उल्लेख आलेला आहे. याला छायेंत कोणी दोःसाधिक आणि कोणी चिंतापर हे प्रतिशब्द दिले आहेत. पाइयसद्दमहण्णवांत तत्तिल व तित्तिल या शब्दांचे अर्थ अनुक्रमें तत्पर व द्वारपाल असे दिलेले आहेत. आपटे कोशांत दोःसाधिक याचा अर्थ door-keeper, porter असा आहे. हे अर्थ विचारांत घेऊन मीं तित्तिल हा पाठ स्वीकारला आहे. गांवांतील उडाणटप्पू स्त्री-पुरुषांवर याची नजर आहे.

न्यायदानाचें काम करणाऱ्या अधिकाऱ्याला मृच्छकटिकांत (निर्णयसागर :

शास्त्री व परब : पृ २०२) अधिकरण – भोजक म्हटलेलें आहे. क्र. ५४ व ५५, या गाथांतील उल्लेखांवरून वाटतें कीं स्त्रियांसाठीं वेगळा तुरुंग असावा. क्र. ४२५, ५५५ व ७८३ या गाथांत बन्धनाचा उल्लेख आहे आणि क्र. ७८० मध्यें शृंखलेचा. बन्धनाचे बाबतीत गुन्हेगारी पहात, कुल विचारांत घेतलें जात नसे (क्र. ७८३). गुन्हेगारांना सुळावर चढवीत असें क्र. ६४, ५३६ व ५६३ या गाथांवरून दिसतें. क्र. ५३६ या गाथेंतील चोराला स्मशानांतील झाडावर फांशीं दिलेलें आहे. स्त्रीचें अपहरण करणाराला न्यायालयांत नेण्याऐवजा गांवकरी परस्पर बदडून काढीत (क्र. ३३१) असावेत.

क्र. २९ या गाथेंतील उल्लेखावरून दिसतें कीं गुन्हेगाराला सुळावर देण्यासाठीं चालविलें असतांना वाटेंत त्याच्या गुन्हेगारीच्या घोषणा करण्यांत येत असत. मृच्छकटिकाच्या दहाव्या अंकांत या प्रथेचा तपशील आढळतो. चारुदत्ताच्या गळ्यांत लालभडक करवीर पुष्पांची माळ घातलेली आहे, अंगाला रक्तचंदनाची उटी लावलेली आहे; बळी देण्यासाठीं चालविलेल्या पशूप्रमाणें चाण्डाल त्याला रस्त्यांतून मिरवीत नेत आहेत, चौकाचौकांत थांबून ते त्याच्या गुन्ह्याची व त्याला झालेल्या शिक्षेची घोषणा करीत आहेत आणि प्रजेला बजावीत आहेत कीं कोणी असा गुन्हा केला तर त्याचा दर्जा विचारांत न घेतां त्याला अशीच कडक शिक्षा देण्यांत येईल. चारुदत्तावरील आरोपांच्या घोषणेची योजना शूद्रकानें नाट्यवस्तूच्या परिपोषासाठीं हेतुपुरः-सर केलेली आहे; कारण ही घोषणा कानीं आली नसती तर कोणाला कोणत्या गुन्ह्यासाठीं वधस्तंभाकडे नेण्यांत येत आहे याचा उलगडा वसंत-सेनेला झाला नसता आणि ऐन वेळा प्रकट होऊन तिला चारुदत्ताचे प्राण वांचवितां आले नसते. गुन्ह्याच्या अशा घोषणेचा संकेत शूद्रकाच्या काळांत प्रचलित होता हें निश्चित. नायाधम्मकहा (२ : p. ५३) आणि समराइच्चकहा (पृ. ४९०-१) या प्राकृत ग्रंथांत अशा घोषणांचा उल्लेख आलेला आहे. मृच्छकटिकाचा काळ अनिश्चित असला तरी त्याची गणना संस्कृतांतील आद्य नाटकांत करण्यांत येते; कांही संशोधक तर सिमुक या आद्य सातवाहन नृपाचा शूद्रकाशीं समन्वय करतात. या वादाच्या तपशिलांत शिरणें अप्रस्तुत आहे; एवढें मात्र खरें कीं गाथासप्तशतीला अगदीं जवळ असलेल्या या

नाटकांत या प्रथेचा ठळक उल्लेख आलेला आहे. कौटिल्याने खुनाला फांशीची शिक्षा सांगितली आहे आणि (अर्थशास्त्र : पृ २१९, इंग्रजी भाषांतर : पृ २४७) गुन्हेगाराला चोरखण्डांनीं गिरफदार करून चाण्डालांकरवीं त्याची रस्त्यांतून धिंड काढावी असें सांगितलें आहे. घोषणेचा उल्लेख केलेला नाहीं; यावरून ही प्रथा गुप्त कालांत लुप्त झालेली असावी असें अनुमान होतें.

निष्कर्ष :

गाथासप्तशतींत संकलित केलेल्या गाथा हीं ग्रामीण भावगीतें असल्यामुळे त्यांत ऐतिहासिक असे उल्लेख फारसे आढळत नाहीत; दंतकथा व लोककथा मात्र पुष्कळ आढळतात.

नन्द व सातवाहन या वंशाच्या उत्पत्तीच्या कुटाळ कथा बहुजनसमाजाला माहीत आहेत. भांडणें होतात, विशेषतः स्त्रियांचीं. तेव्हां अंतर्यामांतलें संचित विष उफाळून प्रकट होतें.

पशुपति व सूर्य हीं शालिवाहनांचीं दैवतें आहेत. आपन्नांचा पशुपतितुल्य उद्धारकर्ता शालिवाहन हा पहिला सातकर्णी असावा. शंकर-पार्वती विमानांतून प्रवास करीत असतां एकाद्या आपन्नाची अवस्था पार्वतीच्या दृष्टीस पडते व तिच्या प्रेरणेने तो त्याचा उद्धार करतो. अशा अनेक कथा लोकवाङ्मयांत आढळतात. गाथासप्तशतीच्या काळांतही अशा कथा प्रचलित होत्या. म्हणूनच शंकराशी आपन्नोद्धारक शालिवाहनाची तुलना करण्यांत आलेली असावी. उत्तरेकडे पलायन करणारे दाक्षिणात्य राजाचे शत्रु हे बहुधा शुंग असावेत.

भारताला विक्रमाच्या दोन परंपरा अवगत आहेत: वीर विक्रमाची व उदार विक्रमाची. गाथासप्तशतीला वीर विक्रम माहीत नाहीं. आणि विश्वसनीय इतिहासालाही. गर्दभिल्ल कुलोत्पन्न वीर विक्रमाचें कर्तृत्वच नव्हे, त्याचें अस्तित्वही संशयास्पद आहे. ब्राह्मणी विक्रम हा उत्तरकालीन असून त्याची ओळख चंद्रगुप्त विक्रमादित्याशी पटते. जैन विक्रम हा प्रतिष्ठानचा राजा असून त्याची ओळख दुसऱ्या सातकर्णीशीं पटते. उदयनाचें धैर्य व औदार्य यांविषयीं प्रचलित असलेल्या अनेक गोष्टी लोककथांत आढळतात. त्यांपैकीं कांहीं

विक्रमाच्या अंगीं लावलेल्या दिसतात. लोकवाङ्मयांत असा प्रकार वारंवार आढळतो.

गाथासप्तशतींत दरबारी व वरिष्ठ अधिकारी मंडळांचे उल्लेख आढळत नाहींत, ग्रामणींचे उल्लेख मात्र बहुत आढळतात. ग्रामव्यवस्था आणि ग्रामीणांचें संरक्षण हीं त्यांच्याच हातीं आहेत. केंद्रसत्ता दुर्बळ असावी आणि अंदाधुंदीची परिस्थिति असावी, ग्रामव्यवस्थेशीं व ग्रामीण जनतेशीं केंद्र-सत्तेचा विशेष संबंध नसावा असें यावरून अनुमान होतें. ही परिस्थिति निःसंशय गुप्तपूर्वकालीन आहे.

१७ गाथासप्तशतींतील लैङ्गिक जीवन :

गाथासप्तशतींतील भावगीतें हीं प्राधान्यें करून प्रेमगीतें आहेत आणि त्यांतील कांहींचा अभिप्राय लैङ्गिक आहे; तरी ही टीकाकारांनीं व साहित्य-शास्त्रज्ञांनीं त्यांवर लादले आहेत ते अर्थ कामकोविदांनाही पटण्यासारखे नाहींत; सबब टीकाकारांच्या अर्थाच्या अनुरोधानें तत्कालीन लैङ्गिक जीवनाचें विवेचन करणें अशक्यप्राय आहे. भारतांतील सामान्य वाचकालाही कामशास्त्रांतील सिद्धान्तांची स्थूल माहिती असते. हें गृहीत धरून हें प्रकरण लिहिलें आहे. कोणाच्या लैङ्गिकतेच्या कल्पना अवास्तव असतात, तर कोणाच्या सभ्यतेच्या भावना विकृत असतात. शक्य तोंवर या दोन्ही मर्यादा सांभाळून या विषयाची चर्चा केलेली आहे. शिवाय गाथासप्तशतीच्या या आवृत्तीच्या उत्तरार्धातील उल्लेखांचें विवेचन विशेष केलेलें नाहीं; कारण हा भाग प्रक्षिप्त तसाच उत्तरकालीनही आहे.

गाथासप्तशतीच्या काळांत प्रतिष्ठित पण्डितही कामशास्त्राचें अध्ययन व अध्यापन आणि तत्त्वांचा व तंत्राचा उहापोह (क्र. २) करीत असलेले दिसतात; इतक्या रुक्षपणें कां हा काथ्याकूट ऐकणाऱ्या विदग्धांना विषयाची शिसारी यावी. साहजिक आहे; कारण या विद्वानांची वृत्ति व ज्ञान हीं जीवन-विन्मुख असतात; कारण या लब्धप्रतिष्ठितांना आपसांत होणारी कामशास्त्राची चर्चा चालते, पण बहुजनसमाजाला रुचणाऱ्या शृंगारिक प्राकृत गाथा मात्र मानवत नाहींत! कामशास्त्राच्या अध्ययनानें जीवनाचें रसग्रहण करण्याची शक्ति

जो विदग्धता ती संवर्धित होते असें सांगण्यांत येतें; पण ही प्रतिक्रिया सर्वत्र प्रत्ययास येते असें मात्र नाहीं. दुर्विदग्ध पण्डितानें शास्त्रोक्त मार्गानें शिरीषा-सारख्या नाजूक नायिकेचा चुरगळा केल्याचा प्रसंग क्र. ५६ या गाथेंत आलेला आहे.

ज्ञानप्राप्तीसाठीं शास्त्रांचें अध्ययन करावेंच लागतें. कामतंत्र मात्र कोणीं कोणाला शिकवावें लागत नाहीं; कारण कामोद्भव अंतः प्रेरणांच्या नैसर्गिक उन्मेषावर अवलंबून असतो. म्हणूनच वात्स्यायनानें सांगितलें आहे: 'अचिन्त्यशक्ति-र्भगवाननङ्गः।' कोणीं कांहीं न शिकवितां क्र. ८१९ च्या चिमुरड्या नायिकेला सारें कांहीं माहीत आहे. सीत्कृत (यूनोः प्रहरणाज्जाता पीडा व्यति-कृतं भवेत्। गलादिजातो यः शब्दः विशेषत्ताद्धि सीत्कृतम्॥ रतिरत्न-प्रदीपिका). सीत्कार हा पूरक आणि सुस्कारा हा रेचक; सीत्कारांत पक्ष्यांच्या विरुतांचें अनुकरण असतें (कामसूत्रम्: २. ७. ८). मणित (मणितं रतिकूजितं), मुखवेप, हस्तकंप आणि धारण केलेल्या अलंकारांचें शिञ्जित हे नखरे क्र. ३९२ या गाथेच्या नायिकेला कांटेरी कुसुम्भानें शिकविलेले आहेत! क्र. ६६१ च्या नायिकेचे विलास निसर्गप्रेरित होते. पण ते पाहून ती बहुशिक्षिता असावी असा नायकाला संशय आल्यावांचून राहिला नाहीं! म्हणूनच वात्स्या-यनानें सांगितलें आहे कीं सुशिक्षितांच्या स्वप्नांतही येणार नाहींत असे भाव सुरतव्यवहारांत प्रत्ययास येतात.

समाजाच्या धारणेला इष्ट, तसेंच अनिष्ट, लैङ्गिक आचार गाथासप्तशतीच्या काळांत प्रचलित होते. समाज तोंवर स्मृतिकारांच्या कह्यांत आलेला दिसत नाहीं.

पौर्णिमेच्या रात्रीं उघड्या अंगणांत झोंपणाऱ्या मुलींना राहू झपाटतो (क्र. ७९८) अशी भोळ्यांची समजूत होती. चांदण्यांत चित्तवृत्ति उत्तेजित होतात व प्रक्षोभक स्वप्नें पडतात. आजूबाजूचीं विलासी दृश्यें दिसतात व आपल्या बेभान शरिरावर शेजाऱ्यांची नजर लागण्याचा संभव असतो; हें या निर्बंधाचें व्यावहारिक व शास्त्रशुद्ध कारण; राहूची धास्ती ही असमंजसांच्या समाधानासाठीं सबब. मुलींनीं रस्त्यांतून नागवें हिंडूं नये (क्र. ७३५) हा शिष्ट समाजाचा आचार आणि तो मुलांना ही लागू आहे; पण येथें याला

जें कारण दिलेलें आहे तें विकृत मनोवृत्तीचें द्योतक आहे; हें खरें असलें तरी तें अगदींच अकल्पित आहे असें म्हणतां येणार नाहीं. मुलींना कामशास्त्राचें घरगुती शिक्षण दिलें जात होतें किंवा कसें याबद्दल अनुमान करण्यास साधन नाहीं; एवढें मात्र खरें कीं सुरतक्षमतेला पोषक असे उत्फुल्लिकेसारखे (क. १९६) व्यायाम त्यांजकडून घरोघरीं करवून घेण्यांत येत असत. पुरुषांना प्रसन्न करण्याचे मार्ग कुमारिकांना सराईत मैत्रिणींच्या सहवासांत अवगत होत असा-वेत असें (क. ३३८) दिसते. मन्मथोद्दीपनासाठीं नायकानें नायिकेला अश्लील समस्या व ग्राम्य गाथा ऐकवाव्यात असे वात्स्यायनानें (२. १०. ६) व जय-मङ्गलेंत यशोधरानें सांगितले आहे. याचा प्रत्यय क. २ व ८०९ या गाथांवरून येतो. गाथासप्तशतींत अविदांतल्या अनेक कथा सारांश रूपांत आलेल्या आहेत. अशा गोष्टी स्त्रीपुरुषांनी परस्परांना सांगण्याची प्रथा असावी असें त्यांवरून अनुमान होतें. गेल्या पिढींतल्या कुमारिका प्रसंगानुरूप ओंव्या उखाणे पाठ करून ठेवीत; या प्रथेचें मूळ किती खोल आहे हें या उल्लेखांवरून दिसून येतें. गाथासप्तशतींत बालविवाहाचा एकही उल्लेख नाहीं. सर्वत्र प्रौढ विवाह प्रचलित आहेत. यामुळें कुमारिकांच्या चित्तांत वैवाहिक जीवनाबद्दलच्या अपेक्षा (क. २९८) निर्माण झाल्या आहेत. सुखी जीवनासाठीं मनाजोगता जोडीदार निवडण्याबद्दल कुमार व कुमारिका उत्सुक (क. ६५०) आहेत; अनुरूप नायकाचे अभावीं क. ९९१ ची कुमारिका नायिका उंडारली आहे. क. ४५७ व ६४३ या गाथांच्या कुमारिका नायिकांनी तर विवाहापूर्वी लैङ्गिक अनुभव घेतलेले आहेत. क. ९६ या गाथेंतला उल्लेख फसलेल्या कुमा-रींचा असावा. विवाह प्रौढपणीं होत असले तरी ते विवाहपूर्व अनुनयावर आधारित होते असें दिसत नाहीं; निदान तसा स्पष्ट उल्लेख कोठेंही आलेला नाहीं. क. ६४२ या गाथेची नायिका मंगलाष्टकांत उच्चारलें जाणारें पतीचें गोत्र ऐकण्यास उत्सुक आहे; क. ६४५ ची नायिका पतीच्या डोळयाला डोळाही भिडवीत नाहीं. यावरून त्यांचा परस्परांशीं पूर्व परिचय नसावा असें अनुमान होतें. चतुर्थीमंगलानंतर वधूवरांची एकशय्या होत असे. आनन्दपट हें याचें प्रात्यक्षिक.

आनन्दपट

वधूच्या मैत्रिणी आनन्दपट मिरवीत आहेत आणि तिच्या कौमार्यातील प्रियकर हें दृश्य पाहून चकित झाला आहे, असा प्रसंग क. ४५७ या गाथेंत वर्णिलेला आहे. हा पट कृत्रिम आहे असें कवीनें स्पष्ट सांगितलेलें आहे.

गंगाधरानें टीकेंत आनन्दपटाचा अर्थ सांगितला आहे. "आनन्दपट: प्रथमपुष्पवतीवस्त्रम् । प्रथमरजोदर्शने जाते तद्वस्त्रं बन्धुभिर्लोकेषु प्रदर्श्यत इति देशविशेषे आचारः । जारसंबंधदृष्टशोणितया अस्थानं संभ्रमदर्शनेन जारस्य हास इति बोध्यम् ।" साधारण देव सांगतो : आणन्दवड हा शब्द देशी असून कृत्रिम म्हणजे "सुरतायासाज्जातक्षतजम् दृष्ट्वा रजस्वलेऽयम् इति कृत्वा कृत्रिमम् ।" हा आचार दक्षिण देशांत प्रचलित होता असें आणखी एक टीकाकार (वेबर : पृ १९४) सांगतो. आनन्दपट म्हणजे ऋतुप्राप्तीच्या रक्तानें डागळलेलें वस्त्र कीं प्रथम संभोगाचे वेळीं झालेल्या रक्तपातामुळें आरक्त झालेलें वस्त्र ? गाथासप्तशतीच्या काळांत विवाहाचे वेळीं वधूवर सामान्यतः प्रौढ वयाचे असत, रजोदर्शनापूर्वी कन्यांचे विवाह करावेत ही प्रथा बरीच उत्तर कालीन आहे, हें आपण पाहिलें. विवाहानंतरच्या पहिल्या रजोदर्शनाचे वेळीं आनन्दपट मिरविण्यांत कांहीं मुद्दा दिसत नाहीं. शिवाय तें तसें असतें तर वधूचा पूर्वाश्रमीचा प्रियकर तें पाहून एवढा चकित झाला नसता. म्हणून अनुमान होतें कीं हा आनन्दपट हें संभोगवस्त्रच असावें.

स्पेन, रशिया, अरबस्तान, तुर्कस्तान, दक्षिण अमेरिका वगैरे देशांत प्राचीन काळीं आनन्दपटाच्या मिरवणुकीसारखे रिवाज (Sexual Life in Ancient India : Dr. Myer : Vol I : p. 43) प्रचलित होते. मोरक्को देशांत गर्भाधानाचे रात्रीं वधूवरांना शयनमंदिरांत सोडल्यावर समारंभासाठीं जमलेले पाहुणे बाहेर दिवाणखान्यांत बसून राहतात; प्रथम संभोगाचे वेळीं झालेल्या रक्तस्रावानें भिजलेलें वस्त्र नवऱ्यानें दासीच्या हातीं दिलें कीं ती तें फडकावीत दिवाणखान्यांत येते आणि तें कुटुंबीयांनीं व पाहुण्यांनीं पाहिल्यानंतर मेजवानी सुरू होते; दुर्दैवानें असें होऊं शकलें नाहीं तर वधूला तिच्या पितृगृहीं अपमानपूर्वक पाठविण्यांत येतें आणि पाहुण्यांना

उपाशीं पोटीं घरोघर जावें लागतें (Curiosa Sexualis p. 14). ज्यू तर अशा वधूला दगडधोंड्यांनीं चेंचून ठार करीत. चीनमध्यें आनन्दपटाचें वस्त्र रेशमी व शुभ्र असे आणि त्यावर अपेक्षित चिन्ह आढळलें नाहीं तर वधूला आत्महत्या करावी लागते !

समाजनियंत्रक वरिष्ठ वर्गासाठीं कांहीं प्रथा हेतुपुरःसर निर्माण करतात, अनुकरणानें व अहेतुकपणें त्या समाजांत प्रचलित होतात; मूळ हेतु नष्टप्राय होतो आणि रिवाजांचा जाच मात्र काचूं लागतो: मग त्यांतून निसटण्या-साठीं पळवाटा निघतात आणि पोसवलेली प्रथा कालांतरानें नष्ट होते. या न्यायानें आनंदपटाची गरमोयीची प्रथा नष्ट झालेली आहे.

वर दिलेल्या संदर्भात डॉ. मायर यांनीं ब्रान्तोमची गोष्ट दिली आहे. आपण अक्षत आहोंत असें सिद्ध करण्यासाठीं या कथेंतील नायिकेनें रक्तरसाची पुरचुंडी बरोबर बाळगण्याची खबरदारी घेतली होती. पतीची अशा प्रकारें फसवणूक करणाऱ्या स्त्रीला कौटिल्यानें दोनशें पणांचा दण्ड सांगितलेला आहे असें डॉ. मायर सांगतात. मूळ संदर्भ अर्थशास्त्राच्या कन्या प्रकरणांत आलेला आहे तो असा :

कन्यामन्यां दर्शयित्वाऽन्यां प्रयच्छतश्शत्यो दण्डस्तुल्यायां: हीनायां द्विगुण: । प्रकर्मण्यकुमार्याश्चतुष्पञ्चाशतो दण्ड: । शुल्कव्ययकर्मणि च प्रतिदद्यात् । अव-स्थाय तज्जातं पश्चात्कृता द्विगुणं दद्यात् । अन्यशोणितोपधाने द्विशतो दण्ड: । मिथ्याभिशंसिनश्च । पुंस:शुल्कव्ययकर्मणि जीयेत् ।

डॉ. शामशास्त्री यांनीं या परिच्छेदाचें भाषांतर दिलेलें आहे. (Artha-śāstra : p. 259) तें असें.

"If a person substitutes in marriage another maiden for the one he has before shown, he shall if the substitute is of the same rank, be fined 100 paṇas, and 200 paṇas if she is of a lower rank. The substitute maiden shall be fined 54 paṇas, while the offender shall also be compelled to return both the nuptial fee & the

amount of expenditure (incurred by the bridegroom). When a man refuses to give in marriage a particular maiden as agreed upon, he shall pay double the above fine. When a man substitutes in marriage a maiden of different blood or is found to have bestowed false praises (on her quality), he shall not only pay a fine of 200 paṇas & return the nuptial fee, but also make good the expenditure. "

या परिच्छेदाचें डॉ. मायर यांनीं केलेलें भाषांतर पहा :

" A wife having intercourse with her husband before puberty shall be fined 54 paṇas & also repay the Sulka & the amount of expenditure. If her immaturity is proved by the blood caused by the intercourse she shall pay double the fine. If another woman's blood is substituted for her own, she shall pay 200 paṇas. A man uttering a lie under such circumstances shall be equally fined. He shall also lose his Sulka & the amount of expenditure. "

या दोन्ही भाषांतरांची मूळ परिच्छेदाशीं तुलना केली असतां डॉ. मायर यांचा या बाबतींतला अभिप्राय पटण्यासारखा नसल्याचें दिसून येईल.

गाथासप्तशतींतील वरील गाथा उद्धृत करून डॉ. मायर सांगतात कीं आनन्दपटाची मिरवणूक गर्भाधानाच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं काढण्यांत येत असे. या गाथेंतील पटावरील चिन्हें कृत्रिम आहेत असें ही त्यांनीं सांगितलेलें आहे. नायिकेनें कोणती युक्ति योजली असेल ? उत्तर एक, रीति अनेक. ही चाल बंद झाली, बरें झालें, कृत्रिमता टळली, अब्रू बचावली.

वधूवरांचा परस्परांशीं परिचय व्हावा म्हणून दोहद क्रीडेचा अवलंब करण्यांत येत असे.

दोहद :

(अशोक : क्र. ४·४०५; कुरबक : क्र. ६; डोहाळे : क्र. १५,२९०,४७२)

भारतीय साहित्यांतील विख्यात दोहद संकेताच्या विविध स्वरूपांचें विवेचन श्री. ब्लूमफील्ड (J. A. O. S : XL : pp. 1–24) यांनीं केलेलें आहे. गाथासप्तशतींत ही संज्ञा तीन अर्थात आलेली आहे : १) ऋतुतृप्तीची इच्छा; (२) डोहाळे; (३) उद्यानक्रीडा. ऋतुप्राप्तीनंतर स्त्री संभोगाला योग्य व गर्भधारणेला सिद्ध होते. प्रजाजनन हें तिचें नियोजित कार्य असल्यामुळें तिला ऋतुकाळांत संभोगेच्छा तृप्त करून घेण्याची नैसर्गिक प्रेरणा होते. या सूचित अर्थानें ही संज्ञा क्र. ६ या गाथेत आलेली आहे. दोहद म्हणजे डोहाळे, या अर्थानें ही संज्ञा क्र १५,२९० व ४७२ या गाथांत आलेली आहे. गर्भधारिणाना विशेष वस्तूबद्दल वासना किंवा विद्वेष वाटतो. डोहाळतुलीच्या इच्छा या भावी संततीच्या प्रवृत्तीच्या द्योतक असतात असें सामान्यतः मानण्यांत येतें. या इच्छेला आधार, थोडीशी अतृप्त हौस आणि बराचसा अल्लड नखरा: या अनुमानाला आधार, थोडासा पोक्त अनुभव आणि बरीचशी गूढरम्य कल्पना. सामान्यतः पहिलटकरणीचे डोहाळे कौटुंबिक परिस्थितीच्या अनुरोधानें पुरविण्यांत येतात. म्हणूनच क्र. २९० व ४७२ या गाथांच्या नायिकांनीं आपल्या इच्छा सशब्द केल्या नाहीत. उद्यानक्रीडा या अर्थानें ही संज्ञा क्र. ४,६ व ४०५ या गाथांत आलेली आहे. दोहद म्हणजे स्त्रियांच्या प्रत्यक्ष स्पर्शामुळें किंवा त्यांचे द्वारां करविलेल्या उपचारांमुळें वृक्ष किंवा लता (J. I. S. O. A : III : 110–124) फळांफुलांनी समृद्ध करविणें.

> स्त्रीणां स्पर्शात् प्रियंगुः विकसति बकुलः सीधुगण्डूषसेकात्
> पादाघातादशोकस्तिलककुरबको वीक्षणालिङ्गनाभ्याम्
> मन्दारो नर्मवाक्यात्पटु मृदु हसनाच्चम्पको वक्त्रवातात्
> चूतो गीतान्नमेरुर्विकसति च पुरोनर्तनात्कर्णिकारः ॥

वृक्षलतांना फळाफुलांचा बहर येण्यासाठीं स्त्रियांनीं कोणते उपचार करावेत : प्रियङ्गुला स्पर्श करावा, मुखांत मदिरा घेऊन तिची चूळ बकुळावर टाकावी, अशोकाला लताप्रहार करावा. तिलकाकडे दृष्टिक्षेप टाकावा, कुर

बकाला आलिंगन द्यावें, मन्दाराशीं मृदु भाषण करावें, चम्पकाला हास्य ऐकवावें, आम्राला फुंकर घालावा, नमेरूला गायन ऐकवावें आणि कर्णिकारासमोर नृत्य करावें. प्राकृत संस्कृत कवींइतक्याच तत्कालीन तरुणी, हे वृक्ष व लता धन्य! कल्पना करा, यौवनानें मुसमुसलेली युवती, उद्यानांत कांडेला येत आहे: या ऋतूंत या व त्या ऋतूंत त्या, वृक्षलतांच्या अंतर्यामीच्या इच्छा ती पुरवीत आहे. एकदां ती प्रियकराबरोबर वनभोजनासाठीं आली. त्यांनीं बकुळाखालीं बैठक मांडली; पण फुलें मात्र ढळेनात. बकुळाची खोड तिला माहीत होती. त्या दिवशीचें मद्य जरा कडकच होतें, तिनें त्याच्या खोडावर चूळ टाकली. तों काय आश्चर्य! मद्याचा रंग व मंद सुगंध बकुळीच्या फुलाच्या नाजुक पाकळ्यापाकळ्यांनीं धारण केला: आणि मद्यपानानंतर त्यांनीं परस्परांकडे पाहिलें तेव्हां तीच छटा त्यांच्या नेत्रांतही प्रकट झालेली दिसली. एकदां ती उद्यानांत आली, तेव्हां तिनें पायांत पैंजण घातले होते व तळव्यांना अळिता लावला होता. पावसाळ्याच्या प्रारंभीं नभांत मेघांचा गडगडाट चालला होता. तो ऐकून अशोक फुलतो असें तिनें ऐकलें होतें. पण येथे पहावें तर हा शुंभ आपला संस्कृतिसंरक्षकासारखा उभा. तेव्हां चिडून त्याला डाव्या लाथेनें ठोकरला. तों काय आश्चर्य! अशोकावर अळित्याच्या रंगाच्या शेकडों फुलांचे झुपके एकाएकीं डंवरले: जणूं निसर्गाचें लालित्य तेथें प्रकट झाले. तेव्हां तिला याही संकेताचा प्रत्यय आला!

संस्कृत साहित्यांत व मध्ययुगीन शिल्पांत दोहदांचे अनेक उल्लेख आढळतात. मेघदूतांत (२·२८) अशोक व बकुल आणि ऋतुसंहारांत (४·१०) प्रियङ्गु दोहद आढळतात. भुवनेश्वर येथील राजाराणी मंदिरांत अशोक-दोहदाची मूर्ति (Ideals of Indian Art : Havell : Pl. XII) कोरलेली आहे.

दोहद संकेत निर्माण करणारे कवि अधिक रसिक, कीं हे उपचार करवून घेणाऱ्या वृक्षलता अधिक भाग्यवान्? संकेतानुसार दोहद विधि करणाऱ्या स्त्रिया तरुण, सुंदर व विदग्ध असल्या पाहिजेत, नाहींतर बिचाऱ्या वृक्षलतांवर कठिण प्रसंग ओढवता! संकेतानुसार तिलकाची संस्कारक्षमता विशेष दिसते. कुरबक दोहद कवींना कसा मानवला कोण जाणे! कोरांटीचे कांटे पाहिले म्हणजे हा दोहद कीं हें दिव्य असा प्रश्न पडतो. कीं कोणा कुरूप वा पाषाण

हृदयी स्त्रीच्या आलिंगनाची आपत्ति टाळण्यासाठीं कोरांटीला एकाएकीं कांटे फुटले! बिचाऱ्या भारतीय स्त्रिया, पुरुषांच्या प्रेरणेनुसार व त्यांच्या सुखा-समाधानासाठीं त्या दिव्येही करतात, मग दोहदांची काय कथा? दोहद हा संकेत अद्वितीय आहे आणि पूर्णतया भारतीय आहे: आणि, मला वाटतें, आमच्या प्राचीन कवींनीं कल्पिलेल्या सर्व संकेतांत अत्यंत रमणीय आहे. वृक्षलतांची संस्कारक्षमता डॉ. जगदीशचंद्रांनीं अलीकडेच सप्रयोग सिद्ध करून दाखविलेली आहे: जणूं हाच सिद्धांत आमच्या प्राचीन कवींनी अंतर्ज्ञानानें अपेक्षिला होता!

रजस्वला :—

रजोधर्म या स्त्रीजीवनांतील नैसर्गिक अवस्थेबद्दल गाथासप्तशतीत अनेक उल्लेख आलेले आहेत.

(आलिंगन : क्र. ५२८: आसक्ति : क्र. २२,९४३; एकशय्या : ५२९; चुंबन : क्र. २२,५१९: दर्शन : क्र. ४८०: पुप्फवइ : पुष्पवती : क्र. ४८०, ४८१, ५२८, ५२९, ९४३, ९४४: वर्णघृत : क्र. २२, २८९, ५१९, ५२८: वस्त्रें : क्र. २८९, ५०३, ९४३: स्पर्श : क्र. ४८१, ५२९, ९४४)

स्त्री ही पुरुषाची दासी कीं स्वामिनी? धर्मधारिणी कीं अधर्मप्रेरिणी? कोण जाणे! जशी दृष्टि तसा निर्णय. सनातनी व सुधारक सारखेच, दोघेही तिला दास्यांत ठेवतात; एक, सामान्यतः समान हक्क अमान्य करून व दुसरा ते मान्य करून, पण तिला तिच्या नैसर्गिक वैशिष्ट्यांना अनुरूप अशा सवलती नाकारून! प्राचीन भारतीयांनी स्त्रीला 'संसारहेतु' अशी संज्ञा दिलेली आहे आणि ती अगदीं यथार्थ आहे. गृहस्थाच्या दृष्टीनें व संन्याशाच्या ही. ऋतुप्राप्ति ही स्त्रीजीवनाच्या नैसर्गिक प्रवृत्तीची आणि मानवी जीवनाच्या चिरंतनत्वाची पहिली घोषणा! बाल्याचा उपसंहार, भोगक्षम यौवनाची प्रस्तावना! स्त्रीजीवनांतली पहिली क्रान्ति, उत्क्रान्तीच्या तालबद्धतेचा पहिला प्रत्यय!

ऋतुप्राप्तीनंतर स्त्रियांना ठराविक मुदतीनंतर रजोदर्शन होऊं लागतें. ही मुदत ज्या त्या देशांतील नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असते. उदाहरणार्थ,

एस्किमो स्त्रिया वर्षांतून दोन किंवा तीन वेळांच* रजस्वला होतात. रजोदर्शनाचा आरंभ व अंत नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असतात. रजोदर्शन कां होतें ? शास्त्रज्ञांना याची मीमांसा अद्याप लागलेली नाहीं. कोणी सांगतात, प्रथम गर्भाशयाच्या सिद्धतेमुळें, पुढें गर्भाशयाच्या आकुंचनामुळें: जणूं गर्भधारणेसाठीं निसर्गानें करून ठेवलेली सिद्धता विफल झाल्यामुळें: जणूं हा एक लटका गर्भपातच ! हे सिद्धान्त केवळ कल्पनारूप मानावे लागतात. ऋतुप्राप्तीमुळें स्त्री संभोगाला योग्य होते. आसक्ति व तृप्ति हे अंतःकरणाचे गुणधर्म, त्याचप्रमाणें शरीराचेंही; संभोग हें त्यांचें माध्यम: सुख हें संभोगाचें तात्कालिक आणि संतति हें अंतिम फल. म्हणूनच प्राचीन व प्रामाणिक भारतीयांनी ऋतुप्राप्ति हा उत्सवक्षण (क्र. २४) व ऋतुतृप्ति हें वैवाहिक कर्तव्य म्हणून नेमस्त केलली होतीं. संभोगाची इच्छा ही वर्तमानकाळांत व्यक्त होणारी भविष्याची प्रेरणा, असें धर्मशास्त्रकार मानतात: प्रजाजननाचें अनुष्ठान या दृष्टीनें ते संभोगाकडे पाहतात. ऋतुप्राप्तीमुळें संभोगाची इच्छा निर्माण होते आणि ऋतुकालांतील अतृप्तीमुळें किंवा संयमाच्या अतिरेकामुळें ऋतु व्यर्थ होतो: अतृप्तीमुळें अधर्माचरण घडतें आणि प्रसंगविशेषीं वर्णसंकराचा ही धोका निर्माण होतो; म्हणून ऋतु व्यर्थ होणार नाहीं अगर आड मार्गाला लागणार नाहीं अशी उपवधूंच्या पित्यांनीं खबरदारी घ्यावी अशी धर्मशास्त्रकारांची आज्ञा आहे. रजोधर्माचा काल संपल्यानंतर बारा ते सोळा दिवसांच्या अवधीला ऋतुसमय अशी संज्ञा आहे. या मुदतीत गर्भधारणा सहज होते व स्त्री पुरुषांचा संभोग होणें इष्ट असतें असें प्राचीन भारतीयांचे मत आहे. पाश्चात्य संशोधकांनाही हें तत्त्व मान्य आहे. याज्ञवल्क्य स्मृतींतील पुढील उल्लेख पहा: षोडशर्तुनिशाः स्त्रीणां तस्मिन्युग्मासु संविशेत् । ब्रह्मचार्येव पर्वाण्याद्याश्च तस्त्रश्च वर्जयेत् ॥ ३·७९॥ या काळांत पतिपत्नींनीं ऋतुपूर्ति केलीच पाहिजे. हा गृहस्थाचा धर्म आहे व पत्नीचा हक्क आहे. या कर्तव्यांत व्यत्यय आणणाऱ्या पुरुषाला रामायणांत दुरात्मा म्हटलेलें आहे. महाभारतांत (१३·२२१·११) तर सांगतलेलें आहे कीं या काळांत पत्नीशीं गमन केल्यानें पतीचें ब्रह्मचर्य नष्ट होत नाहीं !

हा जसा धर्म त्याचप्रमाणें रजस्वलेशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार करणें हा अधर्म. तैत्तिरीय संहितेंत (२·५·१·२–७) पुढील वृत्तांत आढळतो :

इंद्रानें वृत्राची हत्या केली. ब्रह्महत्येच्या पातकाचा भार त्याला सहन होईना, म्हणून त्याचा चतुर्थांश त्यानें स्त्री जातीवर लादला. तेव्हांपासून स्त्रियांच्या मासिक धर्माची सुरुवात झाली. बृहत्कल्पभाष्य या जैन ग्रंथांत ही कथा वेगळ्या स्वरूपांत दिलेली आहे. इंद्रानें उडंकाच्या पत्नीशीं व्यभिचार केला. हें समजतांच उडंकानें शाप देऊन ब्रह्महत्येचें पातक त्याच्या मस्तकावर लादलें. त्याच्या भारापासून इंद्राला मुक्त करण्यासाठीं देवांनीं ब्रह्महत्येचे चार भाग केले आणि यांपैकीं एक भाग त्यांनीं स्त्रीवर लादला. स्त्रियांनीं हें लफडें लावून घेतलें, पण मोबदल्यांत इंद्रापासून एक वरही मिळविला : ऋतुकालांत प्रजोत्पादनार्थ संभोगाचा हक्क हाच तो वर ! स्त्रियांना संभोगसुख मिळूं लागलें आणि एव्हांपासून गर्भधारणेनें प्रजोत्पादन होऊं लागलें. भागवत पुराणांत (६·९·९) तर सांगितलें आहे कीं केवळ संभोगसुखाच्या अपेक्षेनें स्त्रियांनी या पातकाचा स्वीकार केला ! यापूर्वी केवळ संकल्पानें प्रजोत्पादन होत असे. हा शाप कीं वर ? त्यांचे त्याच जाणोत ! अग्नि हा व्यभिचाराचा स्वामी आणि इंद्र हा बीजधारणाचा. इंद्र व इंद्रिय यांचें बीज एकच आहे. इंद्राचें पाप स्वीकारल्यामुळें महिनाभर केलेल्या पापांतून स्त्रिया चार दिवसांत मोकळ्या होऊं लागल्या. संकल्पित (मनुः ५·१०८) किंवा प्रत्यक्ष (याज्ञवल्क्य : १·७२) व्यभिचाराचें, अगर कोणतेंही (वसिष्ठ : २८·१) पातक रजोधर्मामुळें नष्ट होतें असें स्मृतिकारांनीं सांगितलें आहे. कारण, पराशर (१०·२०) सांगतो, स्त्री ही भूमीप्रमाणें असल्यामुळें ती सर्वस्वीं त्याज्य अशी कधींहि होऊं शकत नाहीं. भूमि दरसाल नवी होते आणि स्त्री दरमहा, एवढाच फरक !

धर्मसिंधूंत (आवृत्ति १ : तृतीय परिच्छेद : पृ. ३) रजस्वलेच्या दिनचर्येचे नियम सांगितले आहेत. त्यांपैकीं कांहीं येथें देतों : तीन दिवस पर्यंत कोणालाही स्पर्श करूं नये; रजस्वलांनीं परस्परांनाही. दंतधावन, तलाभ्यंग, काजळ व गंधपुष्पधारण; गोरस-भक्षण, मांसाशन व तांबूल-सेवन; अग्निस्पर्श, सूर्यदर्शन व प्रवास : हीं वर्ज्य करावींत; पाटावर किंवा चौरंगावर बसूं नये, वामकुक्षी करूं नये, भूमीवर शयन करावें; उदकांत बुडी मारून स्नान करूं नये. " मिताक्षरेंत (याज्ञवल्क्यस्मृति : मिताक्षरासार : श्री. बापटशास्त्री, चित्रशाळा पृ. २३) सांगितलें आहे कीं रजस्वलेनें तीन रात्री अपवित्र मलिन वस्त्रें नेसून रहावें, वीर्यवृद्धि करणाऱ्या पदार्थांचें सेवन करूं नये.

रजस्वलांच्या दैनिक व्यवहारांवर धर्मशास्त्रकारांनीं एवढे सूक्ष्म व कडक निबंध कां घातले ! कारण रजोधर्माच्या काळांत स्त्रियांचे दोष व पापें त्यांच्या शरीरांतून बाहेर पडत असतात; म्हणून त्यांच्या भोंवतालचें वातावरणही अनिष्ट व अशुद्ध झालेलें असतें आणि त्यांच्या भोंवतीं विघ्नकर्त्या क्षुद्र देवता घोंटाळत असतात. प्रथमेऽहनि चाण्डाली द्वितीये चर्मकारिणी (ब्रह्मघातिनी)। तृतीये रजकी प्रोक्ता चतुर्थेऽहनि शुध्यति (स्नानमाचरेत्)॥ असें अत्रिसंहितेत वचन आहे. एकेक दिवस जातो तसें त्याचे अपावित्र्य कमी होत जातें. श्रौतसूत्रांत चवथ्या दिवशीं अग्निकर्म विहित आणि मनूनें मात्र वर्ज्य मानलेलें आहे. यज्ञप्रसंगीं रजस्वला आजूबाजूला असली तर देवता (म. भा : १३·१२७·१३) किंवा पितर (मार्कण्डेय पुराण : ३२·२५) हविर्भागाचें ग्रहण करीत नाहींत. रजस्वलेनें स्पर्शिलेलें अन्न भक्षण करूं नये (मनु : ४·२०८), एवढेंच नव्हे, ज्या अन्नाकडे तिची नुस्ती नजर गेलेली असेल तेंही ब्राह्मणानें सेवन करूं नये, असा दण्डक आहे. भोळ्या भारतांतच नव्हे, सर्वच देशांत त्यांच्यावर असेच निबंध घातलेले आहेत आणि त्यांच्या अनिष्ट प्रभावाविषयीं अनेक समजुती प्रचारांत आहेत. प्लिनी सांगतो कीं रजस्वलेनें स्पर्शिलेल्या बीजाला अंकुर फुटत नाहींत आणि वस्तऱ्याची धार गंजून बोथटते. मध्ययुगीन स्त्रियांना मंदिरांत प्रवेश करण्याची त्यांना मनाई (Duffor : History of Prostitution : Vol III. : p. 115) होती; मांस नासेल म्हणून त्यांना स्वयंपाकघरांत व गतिदर्शकता बिघडेल म्हणून होकायंत्राच्या आसपास फिरकूं देत नसत. हॅव्हेलॉक एलिसनें (Psychology of Sex : Vol. I. Part I. p. 295) एका तंतकाराचें मत नमूद केलें आहे : रजस्वला आजूबाजूला आली कीं तंतुवाद्यांच्या तारा आपोआप व एकाएकीं तुटतात !

रजोधर्माच्या काळांत स्त्रियांच्या वासना उत्तेजित होतात आणि संयमशक्ति दुर्बळ होते. नैसर्गिक प्रवृत्तींच्या आवर्तात भिरभिरल्यामुळें या काळांत त्या पुरुषाच्या भोंवतीं घोंटाळतात असें सुश्रुतांत सांगितलेलें आहे. म्हणूनच रजस्वलेनें ब्राह्मणाला सहेतुक स्पर्श केला तर तिला चाबकानें फोडून काढावें असें विष्णुपुराणांत (५·१०५) सांगितलें आहे. पाहिलें शीलखण्डन याच काळांत होतें असा निष्कर्ष अनेक पुराव्यांवरून मानस-काम-शास्त्रज्ञांनीं काढलेला (हॅव्हेलॉक

एलिस : पूर्वोक्त : पृ. १०३) आहे. रजोधर्माच्या काळांत चित्तवृत्ति उत्तेजित झाल्यामुळें कुंतीनें सूर्याला आवाहन केलें आणि कर्णाला जन्म दिला (Dr. Myer : Sexual Life in Ancient India : Vol. I p. 29.). म्हणूनच धर्मशास्त्रकारांनीं त्यांची दिनचर्या नियंत्रित केली आहे आणि आरोग्य व नीतिनियमांना धार्मिक अवगुंठन देण्याच्या त्यांच्या नेहमीच्या पद्धतीनें सांगितलें आहे कीं रजस्वलेशीं संभोग केल्यानें ब्रह्महत्येचें पातक लागतें आणि आयुष्य क्षीण (म. भा : १२·२८२·४३) होतें. सहा महिनेपर्यंत ओलीं वस्त्रें परिधान करावींत आणि राखेवर झोपावें असें या पापाला प्रायश्चित्त महाभारतांत सांगितलेलें आहे. रजस्वला पत्नीशीं गमन करणाऱ्या पतीला जरतुष्ट्रानें दोनशें फटक्यांची शिक्षा (Scented Garden : Dr. Stern. Vol. I. p. 174) सांगितलेली आहे.

धर्मशास्त्रकारांनीं या बाबतींत घालून दिलेले नियम गाथासप्तशतीच्या काळांत बहुजनसमाजालाही मान्य व अवगत होते असें वर नमूद केलेल्या उल्लेखांवरून दिसतें. रजस्वला-समागमाबद्दलचे हे उल्लेख पाहीपर्यंत माझी समजूत होती कीं हा अनाचार अगदीं अर्वाचीन आहे; पण नाहीं; मनुष्य स्वभावाचे गुणधर्म दिक्कालातीत आहेत. जसा धर्म, तसाच अधर्मही सनातन आहे. अलिकडचे संभावित वाच्यता करीत नाहींत, एवढेंच; एक राहिलें, कोणी या विषयाला नुस्ता हात घातला तर त्याची हुरेवडी करण्यास मात्र ते सदैव सज्ज असतात !

गाथासप्तशतींतील रजस्वला मलिन वस्त्रें (क्र. ९४३) धारण करतात आणि धारण केलेलें जुनेर दुहेरी गुंडाळून (क्र. २८९, ५०३) घेतात. गजबजलेल्या कुटुंबांत त्या संकोचानें वावरतात आणि कोठें तरी, कोपऱ्यांत, अंग चोरून, अधोमुख, सलज्ज अशा उभ्या राहतात. कौटुंबिक आचार म्हणून अधोमुख; या अवस्थेंतही आपण प्रियकराला किती हव्या आहोंत याची जाणीव असल्यामुळें सलज्ज ! गोविंदाग्रजांची पुष्पवती अशीच सलज्ज आहे. आपलें दर्शनही अमंगल व निषिद्ध (क्र. ४८०) मानण्यांत येत असल्याची त्यांना जाणीव आहे. तरीही त्यांच्या अंगप्रत्यंगांत अनंग आपल्या अने

आयुधांसह सज्ज होऊन ठाकलेला आहे असें प्रियकराला (क्र. ९४३) वाटतें आणि त्यांच्या स्पर्शानें आयुष्य क्षीण होतें हें माहीत (क्र. ९४४) असलें तरी त्यांच्या समागमांत मोक्षसुख आहे असें पुरुषांना (क्र. ४८०) वाटतें. आपली अवस्था प्रदर्शित करण्यासाठीं त्या मुखाला वर्णघृत लावतात; तरीही त्यांचे पति त्यांना चुंबन तरी देण्याविषयीं आग्रह (क्र. २२-५१९) करतात. त्यापुढें त्यांचें कांहीं चालत नाहीं. हा अनाचार कोणाच्या दृष्टीस पडणार नाहीं आणि मुखाला लावलेले चिकट मलम प्रियकराच्या ओठांना लागणार नाहीं एवढी खबरदारी त्या घेतात: हेतुपुरःसर किंवा अभावितपणें प्रियकराला स्पर्श झालाच तर तो मीं केला नाहीं, माझ्या हातून झाला, असें सांगून (क्र. ४८१) हें कृत्य परस्पर झटकून टाकण्याची खटपट करतात. या स्पर्शासाठीं स्वतःचे हात स्फुरल्याचें नायिकेनें येथें मान्य केलें आहे. रात्री त्या पतीच्याच खोलींत, पण वेगळ्या बिछान्यावर (क्र. ५९२) झोपतात; पण ह्या निर्बंधाची अंमलबजावणी कोठवर ? दाराला आंतून कडी लागली नाहीं तोंवर. पतीनें एकांतांत एकशय्येचा आग्रह केला तर तो तिला मोडवत नाहीं. मग, दुसऱ्या दिवशीं, पतीच्या बाहुव्यांवर वर्णघृताचे डाग उमटलेले पाहून (क्र. ५२८) खण्डिता सवती ढसढसां रडतात. क्र. ९४४ या गाथेची पुष्पवती नायिका प्रियकराचें निवारण करीत आहे, त्याचेंच आयुष्य क्षीण होऊं नये म्हणून. पण म्हणतात ना, ज्याचें करावें बरें, तो म्हणतो माझेंच खरें ! आयुष्य क्षीण होईल ही भीति कशाला घालतेस, आजच मेलों तरी फिकीर नाहीं, तूं मात्र विनाकारण कालहरण करूं नकोस ! वारंवार विनवणी केल्यामुळें विनयवतींचाही धीर चेपतो. पत्नी किंवा प्रेयसी धर्मरक्षणार्थ उत्सुक असली तरी प्रियकराच्या हट्टापुढें निभाव कसा लागणार ?

गाथासप्तशतीच्या काळांत रजस्वला मुखाला वर्णघृत लावीत असत.

वर्णघृत :

(तुप्पलिअं : क्र. ५२८; तुप्पाणणा : क्र. २८९; वण्णअघअलिप्प : क्र. ५१९; वण्णघिअतुप्प : २२)

तुप्प हा शब्द देशी असून त्याचा अर्थ लिप्त असा आहे. चिक्ख म्हणजे विलेपनपंक. श्री. कुलकर्णी सांगतात : " ' सं. तुप् = हिंसायाम् ' या धातूशीं ह्या शब्दाचा संबंध दूरान्वयानें लागण्यासारखा आहे. मारलेल्या पशूची चरबी हा ' तूप ' या शब्दाचा मूळ अर्थ होय. हिंसा बंद झाल्यावर दुधांतून घुसळून काढलेल्या पदार्थाला तूप म्हणूं लागले. गाथासप्तशतींत " तुप्प " हा शब्द आढळतो. " गाथासप्तशतींत तुप्प हा शब्द आहे हें खरें, पण येथें तो लिप्त या देशी अर्थानेंच आलेला आहे. तुप्प या कानडी शब्दाचा अर्थ तेल असा आहे. तूप या अर्थानें ' सिणेह ' हा शब्द क्र. ३१६ या गाथेंत आलेला आहे. छायाकारांनी मात्र तुप्पाला घृत हाच समानार्थी शब्द दिलेला आहे. वण्णघिअ म्हणजे वर्णघृत:. गंगाधरानें याचें स्पष्टीकरण दिलें आहे तें असें : " हारिद्रावर्णप्रधानं घृतम् वर्णघृतम्। कुंकुमहरिद्रा माधितम्। देशविशेषे रजस्वलामुखम् चिन्हार्थं वर्णघृतम् लिप्यन इति आचारः। " हा आचार कोणकोणत्या देशांत प्रचलित होता हें त्यानें सांगितलेलें नाहीं. डॉ. मोतीचंद्र (Costume & Coiffure in Ancient India : Journal of the Society of Oriental Art : Vol. VIII : 1940 : p. 106) गाथासप्तशतींतील उल्लेखांचा निर्देश करून सांगतातः ' Ghee mixed with some colouring material was used for painting the body. " हें स्पष्टीकरण मूळ विधानाहून व्यापक आहे. सर्वांगाला वर्णघृत लावण्याचा उल्लेख मुळांत नाहीं. गाथासप्तशतींतील रजस्वला फक्त मुखाला वर्णघृत लावीत, त्यांतही ओठांना लावीत नसत (क्र. २२) आणि टीकाकार सांगतात, वर्णघृत लावीत तेंही केवळ ' चिन्हार्थं '. मूल जन्माला आल्यानंतर त्याला पहिली आंघोळ घालतात तेव्हांपासून प्रत्येक संस्काराचे वेळीं सर्वांगाला हळद लावण्याचा आपल्याकडे प्रघात आहे: मलापहारक व वर्णोज्वलक म्हणून; आणि म्हणून मंगल. मराठींत ' तोंडाला हळद लावणें ' असा वाक्संप्रदाय आहे. महाराष्ट्र—वाक्संप्रदाय कोशांत त्याचा अर्थ दोष देणें, नापसंती दर्शविणें असा दिला आहे. वर्णघृताच्या प्रथेवरून तर तो निघालेला नसेल

गाथासप्तशतींत कामक्रीडेला सहज असलेल्या प्रहार, व्रण, क्षत आदि कार्यांचे अनेक उल्लेख आलेले आहेत.

वेदना व संवेदना :

वेदना या शारीरिक पीडेच्या द्योतक आणि संवेदना या तज्जन्य मानसिक सौख्याच्या द्योतक; या अर्थानें आणि कामक्रीडेच्या संदर्भानें या संज्ञा येथें योजलेल्या आहेत. पीडा देण्याची इच्छा (Sadism) आणि पीडा करून घेण्याची इच्छा (Masochism) या काम भावनांचा वा व्यथांचा अलीकडे पाश्चात्य लैङ्गिक मानसशास्त्रज्ञांनीं पुष्कळ अभ्यास केलेला आहे; तरीही वेदना आणि संवेदना यांचें साहचर्य हें आजवर न उलगडलेलें कोडें असल्याची त्यांनीं ग्वाही दिलेली आहे. हा सिद्धांत गाथासप्तशतींत क्र. ३२६ या गाथेंत मांडला आहे : " कामशर कुसुममय खरे, पण असे प्रखर कीं त्यांचा प्रताप स्पर्शापूर्वी असह्य वाटतो आणि ते शरीराला विद्ध करतात तेव्हां सुख वाटतें. "

गाथासप्तशतींत कामपीडनाचे पुढील उल्लेख आलेले आहेत :

केशाकर्षण : क्र. १०८,१८८; दंतव्रण : क्र. ७८, ९६, २००, ५०७, ६०५ ९७५; नखव्रण : क्र. १००, १४५, १५०, २३३, ४०९, ४२७, ४३३, ४६३, ४७४, ५६९, ५७०, ७०७, ९३१, ९६५; नवलतिका: क्र. २८, ४५६, ८५६; प्रहार : क्र. ८६, ८९२, ९१०.

क्र. १०८ व १८८ या गाथांच्या नायिका प्रियकरावर क्रुद्ध झालेल्या आहेत, त्यांचे प्रियकर त्यांना प्रसन्न करण्यासाठीं त्यांचा अनुनय पादवंदन-पूर्वक करीत आहेत आणि या नायिका मात्र त्या बिचाऱ्यांचे केंस अंगुष्ठांत किंवा नूपुरांत गुंतवून त्यांचे हाल करीत आहेत. नायकांना हें सुखकारक वाटत आहे कीं पुढील सुखावर नजर ठेवून ते हें सहन करीत आहेत, कोण जाणे !

वात्स्यायनानें कामसूत्रांत चुंबनविकल्प (२·३), नखच्छेद्य (२·४) व दशनछेद्य (२·५) या प्रकरणांत या प्रयोगांचीं विहित स्थानें दिलीं आहेत: ललाट, अलक (कपाळावर भुरभुणारे केंस), कपोल, नयन, वक्ष (छाती), स्तन, ओठ आणि अंतर्मुख (जीभ) हीं चुंबनस्थानें; यांपैकीं वरचा ओंठ, अंतर्मुख व डोळा हीं दर्शनाला वर्ज्य. गाथासप्तशतींतील चुंबनाचे अनेक उल्लेख (क्र. २०, २२, ११४, १७६, ४५५, ४६५, ४९५, ५२०, ६३९,

६४९, ८२१, ८६५, ८९२, ९१७, ९३८) आलेले आहेत. क्र. ४५५ मध्ये नेत्राचें व क्र. ८२१ मध्यें अधराचें चुंबन घेतलेलें आहे; बाकीचीं सारीं कपोल–चुम्बनें आहेत. क्र. २० मधील चुम्बन हें वात्स्यायनानुसार (२·३· २६–२७) रागदीपन किंवा चलितक चुंबन आहे. क्र. २२ मधील चुंबन हें व्याख्येनुसार स्पृष्टक (कामसूत्र २·२·९) आलिंगन आहे. क्र. ११४ व ९२८ मध्यें नायिकेच्या आदर्श–सदृश कपोलांवर उमटलेल्या प्रतिबिंबाचें चुंबन घेतलेलें आहे. वात्स्यायनानें याला संक्रान्तक (२·३·३०–३१) अशी संज्ञा दिलेली आहे. गाथासप्तशतींत दंतव्रणाचे अनेक उल्लेख (क्र. ७८, ९६, २००, ५०७, ६०५, ७३१, ९६५, ९७५) आहेत. यांपैकीं क्र. ७८ मध्यें नायकानें नायिकेचा अधरोष्ठ दातांत धरलेला आहे. क्र. ७३१ मध्यें अधरावरील व्रण स्पष्ट दिसत आहे. क्र. ९६ मधील दंतव्रणाला वात्स्यायनुसार मणिमाला (२·५· ११) ही संज्ञा आहे. क्र. ५०७ मधील व्रण नायिकेच्या मांडीवर आणि क्र. ६०५ मधील व्रण जघनावर उमटलेला आहे. क्र. ५०७ मधील ' उरू 'चा अर्थ स्तन असा घेतला तर तो निधानकलशाला अधिक युक्त होतो. वात्स्यायनानुसार (२·५·१४) ' गलकक्षवङ्क्षणप्रदेश ' दंतक्षताला विहित आहेत. हीं क्षतें कालांतरानें दृश्यमान होण्याइतकीं स्पष्ट आहेत. कांख, स्तन, गळा, पाठ, जघन व मांड्या एवढींच नखच्छेद्य स्थानें वात्स्यायनानें नमूद (२·४·४) केलीं आहेत. अन्यत्र (२·४ १२) त्यानें हनुवटी व अधरोष्ठ हीं स्थानें अनुद्गतलेख अशा नखप्रयोगासाठीं सांगितलीं आहेत. स्मरदीपिकेंत सांगितलें आहे : ' कक्षा कण्ठ कपोलं च नाभिः श्रोणि कुचौ तथा। भगस्कन्धौ कर्णमूले त्रयोदश नखालयाः ॥' वात्स्यायन विचारतो, नखक्षतांचे अनेक प्रकार असून त्यांचें वर्णन करण्यास कोण समर्थ आहे ? प्रथम समागमाचे वेळीं अगर कामवासना प्रबल झाली असतां, प्रवासाला जातांना किंवा परत आल्यावर, मानिनी प्रसन्न झाली असतां अगर मद्यपानानें उन्मत्त झाली असतां च नखक्षतें करावांत; परस्त्रीचे ठायीं नखक्षत करूं नये, स्मरणार्थ करावयाचें झालें तर तें गुप्त भागीं करावें, असे निर्बंध त्यानें घातले आहेत. गाथासप्तशतींत नखक्षतांचे अनेक उल्लेख आलेले (क्र. १००, १४५, १५०, २३३, ४०९, ४२७, ४३३, ४६३, ४७४, ५६६, ५७०, ६५३, ७०७, ९३१, ९६५) आलेले आहेत. पैकीं क्र. ६५३, ९३१ व

९६५ या गाथांतील क्षतें नायकाच्या शरिरावर दिसत आहेत आणि हीं भूषणें त्यानें घराबाहेर संपादन केलेलीं आहेत. वात्स्यायन सांगतो (२·४·३०) कीं पुरुषाचे शरिरावरील क्षतें स्त्रियांचें स्थिर चित्तही चंचल करतात. क्र. २३३ ची नायिका वृद्धा आहे आणि क्र. ४७४ ची वेश्या. क्र. १०० व ४०९ मध्यें नखक्षतांमुळें पुलकोद्भव झालेला आहे. ओरखडा न उमटतां केवळ स्पर्शानें रोमाञ्चोद्भव करणाऱ्या नखक्षताला वात्स्यायनानें आच्छुरितक (२·४·१२) अशी संज्ञा दिलेली आहे. क्र. १४५ मधील क्षताला शशप्लुतक आणि क्र. ५६९ व ५७० मधील क्षतांना अर्धचंद्रक (कामसूत्र: २·४·१३) अशा संज्ञा आहेत. क्र. ४६३ मधील नखपङ्क्ति जघनावर उमटलेली आहे. वात्स्यायनानुसार याला मंडल (२·४·१६) किंवा उत्पलपत्रक (२·४·२१) या संज्ञा देतां येतील. दंतक्षत व नखक्षत यांसारखें प्रेमजागृतीचें व प्रेमवृद्धीचें साधन नाहीं अशी त्याची ग्वाही आहे. वल्लभानें दुःख दिलें तरी तें सुखकारक असतें हें तत्त्व खुद्द गाथासप्तशतींतच (क्र. १००) आलेलें आहे.

नासदीयसूक्तभाष्यांत अहिताग्नि राजवाडे सांगतात: नखछेद्य व दशनछेद्य ह्या क्रीडा अलिंगनानुसारी आहेत, आलिंगन व नखछेद्य यांत कोरडा त्वक्स्पर्श आहे आणि चुंबन व दशनछेद्य यांत त्वक्स्पर्शाबरोबर रसस्पर्शही आहे. या स्पर्शांना संवेशनाची जोड मिळाली कीं तेथें अंतःस्पर्शन घडून येते; रूप, शब्द, गंध, रस व स्पर्श तृप्त होतात.

गाथासप्तशतींत नवलतिका प्रहाराचे तीन उल्लेख आहेत. तीनही नायिकांची उमर कोंवळी आहे. कोंवळया फोकाच्या प्रहारांनी त्या रोमांचित होत आहेत. क्र. २८ ची नायिका देवरानुरक्त आहे; क्र. ४५६ चा नायक हलिकपुत्र आहे आणि क्र. ८५६ ची नायिका हलिकस्नुषा आहे. क्र. ८६ व ८९२ या गाथांच्या नायकांना नायिकांनीं फटकारलें आहे आणि यामुळें त्यांची अनुरक्ति वृद्धिंगत झालेली आहे.

सरस्वतीकण्ठाभरणांत क्र. २८ या गाथेच्या प्रस्तावांत (निर्णय : पृ. ६६७) सांगितलें आहे कीं नवलताप्रहार ही चूतलतिका संज्ञक कामक्रीडा आहे. भोजदेवानें या क्रीडेचा तपशील दिला आहे तो असा " यत्र कस्ते प्रियतम इति पृच्छद्भिः पलाशादि नवलताभिः प्रियो जनो हन्यते सा चूतलतिका । " नवलता-

प्रहार प्रश्नपूर्वक करण्यांत येत असत असें दर्शविणाऱ्या दोन गाथा हेमचंद्रानें देशीनाममालेंत (पृ. १६७) दिल्या आहेत.

जत्थ पलासलयाए जणेहि पइणाम पुच्छिया जुवई
अकहन्ती णिहणिज्जइ णिअमविसेसो लवलया सा ॥
दोलाविलाससमये पुच्छन्तीहिं सहीहि पइणामं
लट्ठीहि हणिज्जन्ती वहुआ णवलयवयं भरइ ॥

गाथासप्तशतींतील प्रहार प्रश्नपूर्वक झालेले नाहींत. ध्वन्यालोकांत (निर्णयः पृ. ६२) अशीच समानार्थी गाथा दिलेली आहे.

अज्जाए पहारो णववलदाए दिण्णो पिएण थयवट्ठे
मिअओ वि दुसहो व्विअ जाओ हिअए सवत्तीणम् ॥
[भार्यायाः प्रहारो नवलतया दत्तः प्रियेण स्तनपृष्ठे
मृदुकोऽपि दुःसह इव जातो हृदये सपत्नीनाम् ॥]

लोचन छायेंत ' अज्जा 'चा अर्थ ' कनिष्ठ भार्या ' असा दिलेला आहे. जिला प्रत्यक्ष प्रहार झाला ती रोमांचित झाली आणि तिजवरील प्रीतीच्या या प्रदर्शनामुळें तिच्या सवती खण्डित व व्यथित झाल्या. क्र. ९७५ या गाथेंत वेदना व संवेदनांचें असेंच संक्रमण झालेलें आहे.

वात्स्यायनानें कामसूत्राच्या नागरक प्रकरणांतील ' देश्या क्रीडा ' या परिच्छेदांत चूतलतिका क्रीडेचा उल्लेख केलेला आहे. देश्या म्हणजे प्रादेशिक, विशिष्ट प्रदेशांत प्रचलित असलेल्या. चूतलतिका म्हणजे ' चूतपल्लवावतंसनम् ' असें जयमङ्गलेंत सांगितलें आहे: म्हणजे आंब्याची कोंवळी पानें खुडून तीं अवतंस म्हणून धारण करणें ! या क्रीडेचा प्रदेश सूत्रकारानें किंवा टीकाकारानें सांगितलेला नाहीं. अनंगरंग, कंदर्पचूडामणि, नागरसर्वस्व, पञ्चसायक वगैरे कामशास्त्रावरील मध्ययुगीन ग्रंथांत या क्रीडेचा उल्लेख आढळत नाहीं. वात्स्यायनानें प्रहणन प्रकरणांत कीला, कर्तरि, विद्धा वगैरे प्रकारांचा उल्लेख केला आहे: पैकीं कर्तरि संज्ञक मुष्टिप्रहारानें शातवाहन कुलोत्पन्न कुंतल शातकर्णीनें महाराणी मलयवतीला मारलें असा उल्लेख केलेला (२·७·२८) आहे; यावरून त्याला महाराष्ट्रांतील कामप्रथा अवगत होत्या असें स्पष्ट दिसतें. तरीही त्यानें

नवलतिकाप्रहार या क्रीडेचा उल्लेख केलेला नाहीं. यावरून वाटतें कीं गुप्त कालाच्या सुमारास ही क्रीडा लुप्तप्राय झाली असावी.

नवलताप्रहार, मग ती लता कितीही कोंवळी किंवा फुलांनीं डंवरलेली असो, म्हणजे केवळ पुष्पवर्षाव नव्हे, कीं त्यापासून नाजूक नवोढेला सुखप्राप्ती व्हावी. गाथासप्तशतींतील उल्लेखांवरून दिसतें कीं या क्रीडेंत चार दोन शिपट्या उडविण्यापलीकडे विशेष कांहीं केलें जात नसावें. मानवी शरीर संवेदनाक्षम आहे तोंवर नाजूक प्रहारानेंही त्याला वेदना या होणारच. वेदनांची संवेदनांत परिणति (Love & Pain) या विषयाला डॉ. हॅव्हेलॉक एलिस यांनीं Psychology of Sex मध्यें सुमारें सवाशें पानें दिलेलीं आहेत. लैङ्गिक मानसशास्त्राचा हा सिद्धान्त गाथासप्तशतीच्या क्र. १०० या गाथेंत सूत्ररूपांत मांडलेला आहे. अटनी अँण्ड क्लिओपॅट्रा या नाटकांत शेक्स्पीयर सांगतो: "Like the lover's pinch which hurts & is desired." प्रियकर चिमटा घेतो, तो दुःख देतो, तरी इष्ट वाटतो. दंतक्षत व नखक्षत या सांकेतिक किंवा सांप्रदायिक व्रणांहून लताप्रहाराचे वळ हे कितीतरी पटींनीं अधिक हृदयंगम, हृदयद्रावक. द्वंद्वांत प्रतिपक्षावर प्रहार करणें हें पौरुषाचें किंवा विजिगीषु सामर्थ्याचें लक्षण; प्रहारामुळें प्रतिपक्षाला होणाऱ्या वेदना प्रत्यक्ष पाहणें हें त्याचें सार्थक. प्रेम हेंही द्वंद्वच आहे. मनुष्य जन्मजात शिकारी आहे. मनुष्य शिकार आहारासाठीं करतो, हें खरें, पण केवळ आहारासाठींच तो शिकार करतो असें म्हणतां येणार नाहीं. कौशल्यामुळें किंवा शक्तीमुळें शिकार विद्ध झालेली पाहणें हेंच शिकाऱ्याचें खरें समाधान. मनुष्यानें शिकारी पेशा अनेक शतकांपूर्वी सोडलेला असला तरी शिकारी वृत्ति त्याच्या संस्कारशरीरांत दृढबद्धमूल झालेली आहे. वधूच्या बांधवांशीं युद्ध करून तिला जबरदस्तीनें पळवून आणणें व तिच्याशीं विवाह करणे ही आसुर विवाहाची प्रथा याच वृत्तीची द्योतक आहे. प्रहणन प्रयोगामुळें पुरुषाला यशस्वी शिकारीचें समाधान प्राप्त होतें. प्रतिपक्षाच्या वेदना पाहणें हा विजयी जेत्याचा आनंद, त्याला या प्रयोगामुळें अनुभवावयास मिळतो. प्रतिपक्षाच्या असहायतेंतही लैङ्गिक आकर्षण असतें. प्रहार होत असतांना प्रतिपक्षाच्या द्रुत अंगविक्षेपामुळें पुरुष उत्तेजित होतो. सीत्कार, मणित, मुखवेप, हस्तकंप आणि कंकणांचें व नूपुरांचें शिञ्जित

ही सुरतसंग्रामाचीं लक्षणें (क्र. ३९२) त्याला अनुभवावयास मिळतात. स्तन, नितंबादि नेहमीं वस्त्राच्छादित असणाऱ्या अवयवांवर हे प्रहार होत असल्यामुळें कार्याचा आवेग ओसरल्यानंतर सांत्वनासाठीं शुश्रूषा करतांनाही पुरुष आनंदित होतो. आणि स्त्री ! कामशास्त्रज्ञ सांगतात की स्त्री ही जात्या विपुलनितंबिनी असल्यामुळें (नासदीयसूक्तभाष्यः पृ. ८०६) " वयांत येण्याच्या सुमारास त्या अवयवांवर फटके मारून घेण्याची वृत्ति सर्वसामान्य असते. इतकी कीं ती विकृति मानण्याचे एवजीं युक्त वृत्ति मानण्यास हरकत नाहीं; म्हणून कित्येक जातींत विवाहविधींत वरानें वधूच्या ढुंगणावर फटके मारण्याची चाल आहे. ' प्रेमसंग्रामांत तीही कांहीं काळपर्यंत द्वंद्व भावनेनें भाग घेते. ती जिंकते, तशीच जिंकली जाते. शिकार शिकाऱ्याला झुलवते, भुलवते; त्याच्या तावडीतून निसटण्यासाठीं. स्त्रीही पुरुषाला झुलवते, भुलवते; त्याला जिंकण्यासाठी, त्याच्याकडून जिंकली जाण्यासाठीं. तिच्या वेदना व संवेदना या त्या त्याच क्षणीं निर्माण होतात व विलीन होतात. कोठवर ? वात्स्यायनानें घालतेल्या मर्यादेपर्यंत. या मर्यादेपलीकडे कार्याचा भाग सुरू होतो. भारतापेक्षां पाश्चात्य देशांत लैङ्गिक कार्याची तीव्रता व व्याप्ति अधिक.

आपल्या चूतलतिकेसारख्या क्रीडा पाश्चात्य देशांतही प्राचीन काळापासून प्रचलित आहेत. Flagellation म्हणजे छडीमार किंवा कोरडेमार; याचे प्रकार दोन : फटके मारणें वा फटके मारून घेणें; कामक्रीडा म्हणून वा धार्मिक प्रायश्चित्त म्हणून. रोमचा विख्यात विलासी बादशहा नेरो (इ.स. ३७ ते ६६) याचा नर्मसचिव पेट्रोनियस याच्या सॅटिरिकॉन या काव्यांत पाश्चात्य वाङ्मयांतलि लताप्रहारप्रयोगाचा पहिला उल्लेख आढळतो. अतिसंभोगामुळें दुर्बळ झालेल्या तरुणांना पक्षघातासारख्या नपुंसकत्वाचा झटका येतो; त्यावर रामबाण इलाज म्हणून त्यांच्या पोटावर खाजकुयरीच्या फोकांचे फटकारे उडविण्यांत येत असेंही त्यानें सांगितलें आहे. रोमन सौंदर्यदेवता व्हीनस हिला तद्देशीय गणिका आपल्या सुरतकौशल्याचीं प्रतीकें म्हणून लगाम व चाबूक अर्पण करीत असत. दरसाल ता. १५ फेब्रुवारी रोजीं प्राचीन रोमन लोक लूपरकस् या देवताच्या तुष्टीसाठीं लूपरकाली या नांवाचा उत्सव साजरा करीत. लूपरकस् म्हणजे पॅन, याचें शरीर कमरेपासून वर पुरुषाचें व खालीं बोकडाचें असतें. याची वस्ती डोंगरकपारींत गुहेंत

असतें. पेनेलोप ही तरुणी आपल्या मेंढरांची राखण करीत असतांना मर्क्युरीनें बोकडाचें शरीर धारण करून तिचा उपभोग घेतला व हें बाळ जन्माला आलें, अशी कथा (Classical Dictionary : Dr. Charles Anthon) आहे. उपरोक्त उत्सवाच्या दिवशीं रोमन स्त्रीपुरुष जंगलांत जमत, अंगावरले कपडे उतरून ठेवीत आणि जवळ जवळ नग्नावस्थेंत असलेल्या एकांमेकांवर, विशेषतः स्त्रियांवर कोरड्याचे फटके उडवीत. समकालीन इतिहासकार सांगतात कीं या स्त्रिया हे फटकारे चुकविण्यासाठीं यत्किंचितही प्रयत्न करीत नसत; एवढेंच नव्हे, आपखुषीनें प्रहारपथांत येण्याचा प्रयत्न करीत असत; कारण या प्रहारांचें वळ धारण करण्यामुळें देव संतुष्ट होतो आणि त्याच्या कृपाप्रसादानें संतानप्राप्ति होते अशी तत्कालीन स्त्रियांची समजूत होती (Prof. R. G. Van Yelyr : The Whip & The Rod : pp. 16–17). कालांतरानें हा उत्सव नष्ट झाला. आपल्याकडील कडकलक्ष्मीचा आसूड आणि काळूबाईचा चाबूक व वेत हीं प्रतीकेंही लैङ्गिकच आहेत हें यावरून ध्यानांत येईल. प्रतोदप्रहारानें प्रमदा बहुफलप्रद होतात ही समजूत नष्ट झाली, पण प्रतोद प्रहारप्रथा मात्र उद्दीपनाचें साधन म्हणून योजण्यांत येऊं लागली.

पाश्चात्य कामवाङ्मयांत प्रहणन प्रयोगावर अनेक ग्रंथ आहेत. त्यांवरून दिसतें कीं कांहीं विकृत वृत्तीच्या व्यक्तींची कामजागृति किंवा तृप्ति क्रौर्याशिवाय होतच नाहीं; किंबहुना क्रौर्यामुळेंच होते. मार्क्विस द सेड (१७४०–१८१४) हा या क्रूरकर्म्यांचा आधुनिक आचार्य. त्याच्या नांवावरूनच लैङ्गिक क्रौर्याला अनुलक्षून वापरण्यांत येणारी सॅडिझम् ही संज्ञा सिद्ध झालेली आहे. त्याच्या लिखाणांत, तशीच प्रत्यक्ष कृतींत लैङ्गिक विकृति व अधोगति यांची परिसीमा दिसून येते. त्या मानानें वात्स्यायनानें नमूद केलेले प्रयोग पोरखेळासारखे सौम्य आहेत; त्यांचाही त्यानें कडक शब्दांत निषेधच केलेला आहे.

लताप्रहार व प्रतोदप्रहार हीं एकाच कामक्रीडेचीं रूपें आहेत. या विषयीं डॉ. हॅव्हेलॉक एलिसचा अभिप्राय (Psychology of Sex : Vol I : Part II : p. 138) अखेरचा मानण्याइतका यथार्थ आहे : प्रतोद-प्रहार

कोणी दिलेले असोत अगर सोसलेले असोत, त्यांमुळें राग व भीति या भावना जागृत होतात. मानवी वृत्तीत या भावना मूलभूत आहेत आणि त्या अनुरागाशीं संबद्ध आहेत. लैङ्गिक भावना सुस्पष्ट झालेल्या नसतात तेव्हांही प्रहारप्रयोगामुळें त्या जागृत होतात. हे संस्कार कधींही नष्ट होत नाहींत आणि तारुण्यांत ते कामक्रीडेच्या स्वरूपांत प्रकट होतात.

संकेत व संकेतस्थानें :—

संकेत म्हणजे इशारा, खूण, प्रतीक; संकेतस्थान म्हणजे (rendevous) प्रेमभेटीसाठीं ठरलेलें ठिकाण.

गाथासप्तशतींत संकेताचे अनेक उल्लेख आलेले आहेत. क्र. २५४ या गाथेंत सुनेनें पथिकास इशारा दिलेला आहे; क्र. ४९ या गाथेंत प्रपापालिकेनें पथिकाला विश्रांतीसाठीं छायावृक्षाची खूण केलेली आहे क्र. १८० या गाथेंत श्यामलेनें हलिकपुत्राला संकेताच्या प्रतीकादाखल जांभळाची डिकशी दिलेली आहे. कामशास्त्रकारांनीं मध्ययुगांत लेखकांना संकेतांचे शास्त्रच उत्क्रांत केलेलें आहे कथासरित्सागरांतलें (कथापीठलम्बकः तरंग ७ : प्रकाशक यंदः पृ. ५१) पुष्पसंकेताचें उदाहरण जिज्ञासूंनीं अवश्य पहावें.

गाथासप्तशतींत संकेतस्थानांचे अनेक उल्लेख आलेले आहेत; पैकीं निःसंदिग्ध व प्रत्यक्ष असे फार थोडे आहेत. बरेचसे अप्रत्यक्ष किंवा आरोपित आहेत. गाथांच्या नायिका व्यभिचारिणी आहेत असें गृहीत धरून उत्तरकालीन टीकाकारांनीं त्यांची संख्या अवास्तव फुगवलेली आहे.

संस्कृत व प्राकृत साहित्यांतील संकेतांचे व संकेतस्थानांचे उल्लेख सामान्यत व्यभिचारी प्रीतीशीं संबद्ध आहेत. सांकेतिक प्रतीकांचा अभिप्राय ओळखतां आला नाहीं म्हणजे घोंटाळे होतात; पण व्यभिचारी प्रीति हा मामला मुळांतच चोरीचा असल्यामुळें अशा गफलती अपरिहार्य असतात.

गाथासप्तशतींतील संकेतस्थानांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उल्लेख टीकाकारांनीं नमूद केले आहे ते असे :

संकेतस्थानें : **अंगण** : ३२२, ३७९; **अरण्य** : ११६, ४९४, ७७५, ९८१ : **अंकोट** : ११३; **कदम्ब** : ३७, १७७; **कपाशी–शेत** : १६५, ३५९, ५४९

८०५; करञ्ज : १६७, ५५३; काश–भूमि : ४३४; कुब्ज : ३७, ५८, १०२; १०३, २१८, २३२, २३९, ३६५, ३६६, ४२२, ६२६, ६४३, ६७४, ६८०, ७५४, ८७०, ८७९, ९५७ ९५८, ९९५: कुसुम्भ : १४५, ३९२; गोदातट : ५८, १०३, १७१, १७५, २३१, ३५५, ८७९, ९५८: घरीं : ८, ६३, ७७, १५९, २३७, ३२२, ३३६, ३५५, ५४९, ६६७, ७२९, ९५५; ९५९: जम्बू : १८०: तळयाचे पाळीं : ४, ८, ११०, १८६, ४१४, ४९५, ५७४, ६२२, ६९३, ९४७: तापी–तट : ३६९, ५७८, ५९९; तिलक्षेत्र : ८ ६९३, ७६३: तुवरीक्षेत्र : ३५८; तृणलतागृह : ३९४; देऊळ : ६३, ६४, १०९, १९४: परसूं : ३१३, ६८३, ९५३, ९५७; पलाश : ७७५: पाणपोई : ४९, १६१: पाणवठा : ८७४, ८७५, ९५४; प्रियङ्गु : ९५७: मधूक : १०३, १०४, १५९, ९५८; महिषशाला : ५६०; माधवी : ३२२: यव : ४०२; लतागृह : ३९४, ५५९; लिंब : ८७२: वट : ९४, १६६; २६३, २९५, ५५६; वंश : ६७४: वानीर : ३१८; विन्ध्य : ११६; वेतस : ५९९, ६३५, ६४३, ७५४, ८६८, ८७०; व्रीहिक्षेत्र : ९५२; शणवाटिका : ९; शालिक्षेत्र : ९, ५६२, ५६७, ५६८, ६११, ६९०, ६९१, ९५२; शेत : ६९३, ७९१: शेफालिका : ९५३: हरिजाल : ९: हरिद्रा : ८५७.

संकेतभंग : ६८३, ८१३, ९५६.

संकेतस्थानभंग : ८, ९, ३७, १०२, १०४, १०९. २६३, ४०२, ४०३, ४१६, ४२२, ५४९, ६२२, ७२५, ७६३.

समागमोत्सुक अपरिचितांचा परस्परांशीं परिचय करून देणें, परिचितांचा अनुनयाला अनुमति मिळविणें, अनुकूलांना एकांतासाठीं संकेतस्थान उपलब्ध करून देणें आणि आगंतुक आपत्ति वा संभाव्य व्यत्यय यांबाबत इषारा देण्यासाठीं संकेतस्थानाभोंवतीं टेहळणी ठेवणें हीं कामें दूतांचीं किंवा सखींचीं, दूतांचीं किंवा चेटांचीं: आणि नायकांचा वेश्यांशीं व गणिकांशीं स्नेह जडविणें व तो टिकवणें हें कार्य विटाचें.

गाथासप्तशतींत दूती व सखी यांचे अनेक उल्लेख आलेले आहेत. या संज्ञांची योजना विशेष विचक्षणेनें केलेली नसल्यामुळे त्यांचे अनुक्रमांक एकत्र करून देतों : ४, ९, १०, १२, १५, २८, ३०, ३२, ३७, ३९, ४५, ४९,

५७, ६०, ६९, ७६, ७७, ८४, ९१, ९३, ९६, १०१, १०२, ११४, ११९, १३१, १३८, १४०. १४४, १४५, १५३, १७७, १७८, १८१, १९३, १९८, २०४, २११, २३७. २४१, २४२, २४४, २४९, २५६, २५९, २६४, २८४, २९८, ३५६, ३८१. ३८६. ४१२, ४४०, ४५३, ४८२, ४८६, ६१७, ७०१. ७१०, ७१३. ७१८, ७१९ ७२४, ७३७, ७५१, ७९४, ८०४, ८११, ८१८, ८३४, ८४६. ८४८, ८४९, ८५०, ८५२, ८५४, ८५५, ८७३, ८७४, ८७५. ८७९, ८८०, ८८९, ८९१, ८९४. ९२९, ९३०, ९४९, ९५०, ९५२, ९५३. ९५४. ९५५, ९५६, ९५७, ९९०.

कामसूत्राच्या पारदारिक अधिकरणांत वात्स्यायन सांगतो :

विधवेक्षणिका दासी भिक्षुणी शिल्पकारिका

प्रविशत्याशु विश्वासं दूतीकार्यं च विद्गती ॥

" विधवा, शकुन सांगणारा. दासी. भिक्षुणी व कलावती ह्या इष्टस्थानीं अल्पायासानें प्रविष्ट होऊन व विश्वास संपादन करून दूती कार्य सिद्ध करतात. " अनङ्गरङ्ग (अध्याय १६), नागरसर्वस्व (८·८), पञ्चसायक (चतुर्थ सायक : २१) व रतिरहस्य (१२·१०३) या कामशास्त्रावरील ग्रंथांत दूती कर्माला योग्य असे पुढील वर्ग नमूद केलेले आहेत : कोष्टीण, गवळण, चेटी, धात्री (दाई), धोबीण, नटी, प्रव्रजिता (जैन संन्यासिनी), फेरीवाली, मणिकारिणी, माळीण, शिंपीण, शेजारीण, सखी, संबंधिनी व सैरन्ध्री (अंतःपुरदासी). अनङ्गरङ्गांत प्रतिगेहिका हा आणखी एक वर्ग नमूद केलेला आहे. स्त्रियांच्या समारंभासाठीं घरोघरीं आमंत्रणें देण्यासाठीं हिंडणारी ही निरोपी असावी. पण्डरीविठ्ठलाच्या दूतीकर्मप्रकाशांत (निर्णयसागर : काव्यमाला : गुच्छक १३) एकवीस दूतींची यादी दिलेली आहे. समाजाची मांडणी संकीर्ण होऊं लागली आणि स्त्रियांना अधिक व्यवसाय उपलब्ध होऊं लागले तसतशी वात्स्यायनाच्या यादीत भर पडूं लागली. व्यवसायाच्या निमित्तानें या स्त्रियांना अंतर्गृहांतही सहज प्रवेश मिळतो. एतद्देशीय व परदेशी जाणते सांगतात कीं हल्ली या किंवा तत्सम व्यवसायांतल्याच स्त्रिया दूतीकर्म करीत असतात. दौत्यकर्म जसें नाजूक व विश्वासाचें तसेंच धोक्याचें व जिवावरचें म्हणून दूतीचा दर्जा दासीहून श्रेष्ठ. सखीचा दर्जा त्याहून श्रेष्ठ. सखी ही नायिकेच्या दर्जाची

नव्हे; समवयस्क, विशेष विश्वासांतली, निकटवर्तिनी परिचारिका. दूतीकर्म-प्रकाशांत सखीची व्याख्या दिलेली आहे : " सखी विश्वासविश्रामकारिणी पार्श्वचारिणी । मण्डनोपालम्भ शिक्षा परिहारादिका यथा ॥ " गाथासप्तशतींत अनेक गाथांत आई, आत्या, भगिनी, मामी अशी संबोधनें आलेलीं आहेत. तीं सर्व सामान्यतः दूतींना अथवा सख्यांना अनुलक्षून योजलेलीं आहेत. " माता वृद्ध स्त्रीणां सम्बोधने भगिनी समवयस्कस्त्रीणा सम्बोधने । " दौत्य-कर्मासाठीं कोणता गुणसमुच्चय अंगीं असणें अवश्य आहे ? वात्स्यायन (१६·४०) सांगतो : वाक्चातुर्य, धाष्टर्य, इङ्गिताकारज्ञता, अनाकुलत्व, परमर्मज्ञता, प्रतारणत्व; देशज्ञान, कालज्ञान, संकटसमयीं स्थिरबुद्धि, प्रसंग जाणून ताबडतोब उपाय योजण्याची बुद्धि. दूती ही प्रागल्भ्यवती वक्रोक्ति-विभूषिता असावी असें कुट्टनीमतांत (क्र. ८९) सांगितलेलें आहे. आदिपुराणांत (५०·३९·४०) दूतीचीं षोडशविध कर्में सांगितलेलीं आहेत : सुवेषता दुःख-सहिष्णुताच । सुशीलता कोमलवाक्यताच । सन्मन्थिताऽऽच्छादित मंत्रिता च । च्छन्दानुवर्तित्वमलज्जिताच । प्रोत्साहनं गुणकथाकथनं कलानां । विश्रम्भणं बहुलता धनदर्शनं च । गाढानुराग वचनस्य सिद्धि : । कर्मेति षोडशविधं कथयन्ति दूत्या : ॥ चेट व विट यांचे गुण भरतानें नाट्यशास्त्रांत (अध्याय २४) दिले आहेत : कलाप्रियो बहुकथो विरूपो गन्धसेवकः । मान्यामान्यविशेषज्ञश्चेटो ह्येवं विधः स्मृत : ॥ वेश्योपचार कुशलो मधुरो दक्षिणः कविः । उहापोह क्षमो वाग्मी चतुरश्च विटो भवेत् ॥

नायिकेला विरहकालांत गोष्टी सांगणें (क्र. ८३४) आणि विलासानंतर तिचें चित्त विनोदानें आणखी प्रसन्न करणें (क्र. १४५): नायिकेला धीर देणें (क्र. १०) व नायकाला प्रोत्साहन देणें (क्र. ३८९); नायकाची भलावण करणें (क्र. २८४) व नायिकेला अभिमुख करणें (क्र. २५६, २८७); नायि-केसाठीं घरांत पुरुष आणून ठेवणें (क्र. ७७) व नायिकेला संकेतासाठीं घरा बाहेर काढणें (क्र. २३७, ९५६); संकेतस्थान निश्चित करणें (क्र. ४) किंवा बदलणें (क्र. ९) व त्याबाबत जरूर त्या सूचना देणें (क्र. ४०२); संकेत-स्थानाच्या सुरक्षिततेबद्दल भरंवसा देणें (क्र. ७९४) व धोक्याची सूचना (क्र. ९५२, ९५३) देणें वगैरे कामें गाथासप्तशतींतल्या दूतींनीं केलेलीं आहेत.

वेळोवेळीं विश्वासाचीं कामें केल्यामुळें दूतीला नायिकेच्या अंतर्यामांत प्रविष्ट होण्याचा (क्र. २६४) आणि प्रसंगविशेषीं नायक-नायिकांची निर्भत्सना (क्र. ४·१२·१७८) करण्याचा अधिकार प्राप्त होतो; हा तिनें (क्र. १८१) अशा कौशल्यानें वापरायचा कीं अडलेलें काम पुरें झालें पाहिजे आणि व्रण मात्र होतां कामा नये. क्र. ५४ या गाथेंत पत्नीदूतीचें हृदयद्रावक वृत्त सांगितलें आहे. क्र. ४९, ४४०, ६६७, ८७३ वगैरे गाथांच्या नायिका या स्वयंदूती आहेत. नायिकेची प्रतारणा करून नायकाशीं स्वतःच रममाण होणाऱ्या दूती व सखी (क्र. ७१३, ८५५) या अधम आहेत. महाभारतांत देवयानीची सखी शर्मिष्ठा ययातीला सांगते: समावेतौ मतौ राजन्पति सख्याश्च यः पतिः । समं विवाहमित्याहुः सख्या मेऽसि वृतः पतिः ॥ देवयानी ही तुझी भार्या व माझी सखी; सबब आम्ही दोघीही तुला भोग्य! पण सर्वच नायिकांना हें सहन होतें असें नाहीं. आपल्या गालावर उठलेले सखीचें प्रतिबिंब (क्र. ९३२, ९३३) नायकानें चुंबावें हेंही नायिकेला सहन होत नाहीं.

क्र. ४ या गाथेवरील टीकेंत गंगाधरानें रतिरहस्यांतील (५·३) वचन उध्दृत केलें आहे. तेथें श्री सिद्धपण्डित कोक्कोक सांगतो: वाहत्या नदीच्या तीरावरील कुञ्ज, वनांतील गर्द राई व पर्वतांतील गुहा हीं सोईस्कर संकेत-स्थानें आहेत. क्र. ८ या गाथेवरील टीकेंत गंगाधर सांगतो कीं तिलक्षेत्र व कमळाचें तळें हीं छान संकेतस्थानें आहेत. दामोदर गुप्ताच्या कुट्टनीमतावरील रसदीपिका टीकेंत श्री. त्रिपाठी यांनीं वचन दिलें आहे: "अटव्यामन्धकारे वा शून्ये वाऽपि सुरालये । उद्याने वा सरित्कुञ्जे प्रदेशे गर्हितेऽथवा ॥ परदारेषु संकेतः कर्तव्यो रतिसिद्धये । दूतीवक्त्रेण निश्चित्य स्वयं तत्र पुरा व्रजेत ॥" कल्याण-मल्लानें अनङ्गरङ्गांत त्याज्य स्थानांविषयीं वचन दिलें आहे "वह्निब्राह्मण-पूज्यवर्ग निकटे नद्यां च देवालये । दुर्गादौ च चतुष्पथे परगृहेऽरण्ये श्मशाने दिवा ॥ सङ्क्रान्तौ शशिसङ्क्षये (अमावास्यायाम्) च शरदि ग्रीष्मे ज्वरार्तौ व्रते । सन्ध्यायां च परिश्रमेषु सुरतं कुर्यान्न विद्वान् क्वचित् ॥" विष्णुपुराणांत हो वर्ज्य स्थानांचा तपशील दिलेला आहे: "देवद्विजगुरूणां च व्यवायी नाश्रमे भवेत् । चैत्यचत्वरतीर्थेषु न चैव च चतुष्पथे ॥" गाथाकर्त्यांनीं किंवा त्यांच्या टीकाकारांनीं यांपैकीं बहुतेक सर्व निर्बंध झुगारून दिलेले आहेत. एवढें मात्र

खरें की गाथासप्तशतीत उल्लेखिल्याप्रमाणें प्राचीन भारतांत सुरत व्यवहार पुष्कळदां उघड्यावर, फार तर वृक्षादिकांच्या आश्रयानें होत असत. म्हणूनच हेरोडोटसनें (III. 101) कुप्रसिद्ध विधान केलें आहे की हिंदुस्थानांतले लोक जनावरांप्रमाणें उघड्यावर संभोगक्रिया करतात, शिवाय त्यांचें रेतही कृष्णवर्ण असतें ! नीतीच्या व धर्माच्या दृष्टीनें व्यभिचार जितका हीन तितकीच शिष्टाचाराच्या दृष्टीनें उघड्यावरील संभोगक्रिया गर्ह्य: मग ती मिथुनांना कितीही प्रिय किंवा सोइस्कर वाटो !

गाथासप्तशतींत संकेतांचे व संकेतस्थानांचे प्रत्यक्ष व संज्ञापूर्वक असे उल्लेख फारच थोडे आहेत. क्र. ३१८ मधील संकेतस्थान वेळूच्या वनांत आहे; क्र. ३६५, ६२६ व ९५८ मधील कुंजांत आणि क्र. ६९१ मधील शालिक्षेत्रांत. गाथासप्तशतींतील संकेतस्थानांचें वर्गीकरण केलें असतां दिसून येतें कीं यांतील बहुसंख्य स्थानें खेडेगांवच्या परिसरांतील असून ग्रामीण जीवनाशी संबद्ध आहेत. शेतकींतील विशेष मेहनतीचीं कामें पुरुषांनीं करावयाचीं आणि कामकऱ्यांना न्याहरी पोंचविणें, शेताची राखण करणें, कपाशीचीं बोंडें खुडणें वगैरे कमी श्रमाचीं कामें स्त्रियांनी करावयाचीं, अशी पद्धत हल्लींप्रमाणेंच तेव्हांही प्रचलित होती. यामुळें हालिक स्त्रीपुरुषांना संकेताची संधि सहज मिळत असे. त्यांचें प्रतिध्वान किंवा प्रतिबिंबें या गाथांत उमटलेलीं आहेत. प्रियकरानें नांगरटीचें काम पत्करावयाचें व न्याहारी घेऊन येणाऱ्या प्रेयसीशीं त्याची भेट व्हावयाची, हा क्र. ६९२ मधील प्रसंग उल्लेखनीय आहे. अशा सवलती उपलब्ध नसल्यामुळें नगरच्या नारींना निराळ्या युक्त्या योजाव्या लागतात. कामकाजा-निमित्त पुरुषांना पुष्कळ दिवसांसाठीं प्रवासाला जावें लागे, ती संधि नागरिक साधतात. येथील संकेतस्थानें बहुधा घरांच असतात: किंबहुना जेथें गृह हें संकेतस्थान आहे तो संकेत नागरिकांचा आहे असें अनुमान बसविण्यास हरकत नाहीं. क्र. २३७ या गाथेच्या नायिकेनें विंचू चावल्याचें ढोंग केलें आणि सखीनें संकेतानुसार तिला दण्डाला धरून वैद्याच्या घरीं नेलें ! क्र. ३३५ व्या गाथेची स्वयंदूती नायिका शेजाऱ्याशीं रात्रीचा संकेत ठरवीत आहे. शहरांतले लोक परगांवीं जातात, त्याचप्रमाणें बाहेरगांवचे लोक उद्योग-धंद्यासाठीं किंवा ख्यालीखुशालीसाठीं शहरांत येतात आणि कांहीं लागाबांधा

लावून एखाद्या ओळखीच्या घरीं मुक्कामाची सोय लावून घेतात; चार दोन वेळां ये जा झाली कीं साहजिकच त्याची घरांतल्या घरांत बैरी-वाईट सोय लागत असे. क्र. २५४ च्या नायिकेच्या प्रोत्साहनामुळें पथिकानें अंगणाऐवजीं ओसरीवर पथारी लावला आहे. परक्या घरीं पुरुष पाहुण्यांची वर्दळ असे, त्याचप्रमाणें नात्यागोत्यांतल्या किंवा थोड्याबहुत ओळखीच्या स्त्रियाही भरल्या घरांत पाहुण्या म्हणून उतरत असत आणि घरांतील दूतीमार्फत त्यांच्या अनुकुलतेचा ठाव घेतला जात असे. क्र. ९५७ गार्थेत प्रत्यक्ष भावजयीनें दूतीकर्म केलेलें असून पाहुणीला प्रियङ्गु मण्डपांत बसविलें आहे.

गाथासप्तशती हें अकृत्रिम जानपद वाङ्मय आहे; बहुतेक गाथांतील प्रसंग, भावना व विचार प्रत्यक्ष ग्रामीण जीवनांतून निवडलेले आहेत. आणि या गाथा ग्रामीण कर्त्यांनीं बहुजनसमाजाकरितां रचलेल्या आहेत, साहित्यशास्त्रांतील सिद्धान्तांची उदाहरणें म्हणून रचलेल्या नाहात. उलटपक्षी गाथासप्तशतीवरील टीका पंडितांनीं पंडितांसाठीं लिहिलेल्या आहेत. त्यांच्या कल्पकतेचें कौतुक करावें तेवढें थोडेंच होणार आहे. ज्या संकेताच्या सूक्ष्म सूचना आहेत असें ते सांगतात त्यांचा सांकेतिक अर्थ समजण्याइतका चाणाक्षपणा सामान्य मनुष्याच्या अंगीं संभवणें अशक्यप्राय आहे. या टीकाकारांनीं उभारलेला संकेताचा डोलारा इतका कमकुवत आहे कीं जरा डिंवचलें कीं तो कोलमडतो. सामान्य बुद्धीच्या माणसांनीं अशा संकेताच्या भानगडींत पडूं नये हेंच श्रेयस्कर; नाहींतर हिरमोड व वर बोभाटा पदरीं पडावयाचा. क्र. १८६ मधील श्यामलेचा जम्बूदल संकेत हलिकाला कसा समजणार? त्याच्यापासून चाणाक्षपणाची अपेक्षा करणें हाही अडाणीपणाच.

गाथासप्तशतींतील संकेतस्थानांचें वर्गीकरण केलें असतां दिसून येतें कीं त्या काळीं नदीकांठ हें सर्वांत लोकप्रिय संकेतस्थान होतें. त्याच्या खालोखाल वेळूचीं वनें व भातशेतें. बरीचशी संकेतस्थानें तळ्यांच्या पाळी व ओसाड देवळीं मांड-लेलीं आहेत. या संख्या अशा असाव्यात हें तत्कालीन भौगोलिक व सामाजिक परिस्थितीशीं जुळतें आहे. अन्न व पाणी या प्राणीमात्राच्या प्राथमिक गरजा. कृषि-युगांतलीं मानवी वसतिस्थानें नद्यांच्या कांठाकांठानें असत. स्नानासाठीं व पुण्या-

पाण्यासाठी ग्रामीणांना सकाळीं संध्याकाळीं पाणवठ्यावर जावेंच लागतें; नजीकच देवळें व त्यांच्या ओवऱ्या असतात. यामुळें नैमित्तिक कामानंतर तरुणांना इकडे तिकडे चक्कर टाकण्यास सवड सांपडते. म्हणूनच हीं संकेतस्थानें इतकीं लोकप्रिय आहेत. गोदावरीचा परिसर जगांत सुंदर, असें पुराणांत सांगितलेलें आहे. खुद्द गाथासप्तशतींत गोदातटाकांबद्दल (क्र. ३५५) काढलेले उद्गार पहा; गोदावर्या कूलानि शीलोन्मूलानि ! गाथासप्तशतींत याविषयीं उद्युक्त असलेल्या मंडळींचीच या परिसरांत विशेष वदळ आहे. मध्ययुगीन व आधुनिक पंडित मात्र गोदावरीच्या तीरावरील तीर्थांची प्रशंसा करीत असतात. गाथासप्तशतींतील संकेतस्थानें मुख्यत्वें करून गोदा, तापी, व नर्मदा यांच्या कांठांवर विखुरलेलीं आहेत, विशेषतः गोदावरीच्या. महाराष्ट्राच्या मावळ भागांत भातशेती फार प्राचीन काळापासून अस्तित्त्वांत आहे. वेळूचीं वनें हीं मुख्यत्वेंकरून याच भागांत आढळतात. प्रेमप्रसंग होतात तींच स्थानें मनुष्याच्या विशेष आवडीचीं असतात व तीं त्यांच्या वसतिस्थानांच्या आसपास असतात आणि तींच त्यांच्या काव्यांत निर्देशिलीं जातात. या न्यायानें गाथासप्तशतीच्या निर्मिति स्थानाबद्दलही या प्रमाणावरून अनुमान करतां येतें.

व्यभिचार :

गाथासप्तशतींत व्यभिचाराचे अनेक उल्लेख आढळतात: व्यभिचार भावनेच्या संकल्पापासून सिद्धीपर्यंतच्या प्रत्येक अवस्थेबाबत; अनुभावित अपेक्षांच्या उद्गमापासून अपेक्षाभंगापर्यंत; कांहीं प्रोत्साहक व कांहीं निषेधपर: कांहीं ललित व कांहीं ग्राम्य.

स्त्रीपुरुषांचे अप्रतिबंध लैङ्गिक संबंध विवाहसंस्थेनें निर्बंधित केले; ही संस्था कोठें करारावर आधारलेली आहे तर कोठें धार्मिक संस्कारावर. समाजानें वैवाहिक शपथांच्या भंगाबाबत शासनें उत्क्रांत केलीं. या व्यवस्थेला अनेक शतकें लोटलीं; तरी स्त्रीपुरुषांची व्यभिचारी वृत्ति लोपली नाहीं, अद्याप आटोक्यांत आली नाहीं, इतकेंच नव्हे, उलट वृद्धिंगत होत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत; काव्यांतच नव्हे, व्यवहारांतही.

डॉ. हॅव्हेलॉक एलिस (पूर्वोक्तः II : III : p. 296) सांगतो कीं वैवाहिक

जीवनांत कांहीं वर्षे कंठल्यावर स्त्रीपुरुषांचे ठायीं वैचित्र्याची अज्ञेय अपेक्षा वा आसक्ति उद्भूत होते, ती भागविण्यासाठीं प्रचलित परिस्थितीच्या अनुरोधानें उपलब्ध साधनांचा उपयोग करण्यांत येतो. बौद्धिक तृषा असते ते गणिकांना आश्रय देतात आणि केवळ लैङ्गिक भूक लागते ते वेश्यांना; सामान्य लोक शेजारींपाजारीं (क्र. ७६२, ७९६) हौस भागवतात; कोणी वृद्धेकडे धांव घेतात (क्र. १९) तर कोणी कलिकामर्दनांत (क्र. ४४४) सुखसर्वस्व शोधतात. भ्रमराचा दृष्टांत घेऊन (क्र. १३९) कवि सांगतो कीं भ्रमर फुलां-फुलांचा अनुनय व परित्याग करतो हा दोष फुलांचा, त्यांच्या नीरसतेचा! भ्रमराचें हें चांचल्य पाटला नष्ट करील असें कवीला (क्र. ६१९) वाटतें; पण तसें कधीं होत नाहीं. संभोगाच्या वेळींही मनांतल्या मनांत तुलना चाललेली असते व तीमुळें विमनस्कता मात्र (क्र. ८४) पदरीं पडते. पुरुषाप्रमाणें स्त्रियांच्याही चित्तांत विकल्प निर्माण होतो आणि व्यभिचारासाठीं त्या नाना निमित्तें (क्र. १०३, १०४, १५९, २३७, ३२८, ८०८, ८१५, ८७४, ८७५, ८८१, ८८२, ८८३, ९५४, ९५६, ९८१) व संधि शोधून काढतात. त्यांवर स्त्रीवेदांतल्या अनेक श्रुतिकथा आधारलेल्या आहेत. माचीवरून पिकाची राखण करीत असतांना कोणी मार्गपृच्छा केली (क्र. ८१५) किंवा कोणी रस्त्यांत अडविलें (क्र. ९५१) तर त्यांतही कोणी धन्यता मानतात. महाभारताच्या वनपर्वातील द्रौपदी-हरणपर्वांत जयद्रथाच्या आज्ञेवरून कोटिकास्यानें द्रौपदीला अडवून प्रश्न विचार-लेला आहे. यांत स्त्रीचा बहुमान आहे असा या प्रसंगावरून डॉ. मायर निष्कर्ष काढतात, तो मात्र अप्रासंगिक आहे. कोणाचा पति स्थविर (क्र. १९७, २९३) असतो तर कोणाला स्वभर्त्याविषयीं वैराग्य वाटूं लागतें (क्र. २६७) म्हणून त्या व्यभिचाराला प्रवृत्त होतात; कोणाला रसिकाच्या सहवासाची (क्र. २२८) हौस असते तर कोणा शेटाणीला हमालाच्या (क्र. ५५४) आणि कोणा आर्येला हलिकाच्या (क्र. ३६०). स्त्रीचें परपुरुषाचें वेड क्र. ८८१ व ८८२ या गाथांत पराकोटीला गेलेलें आढळतें. एकान्तरस पुरुष सद्गुणी स्त्रियांनाही प्रिय वाटत नसावेत (क्र. ४८) असें दिसतें; कारण एकनिष्ठांना नाहीं दोषांची जाणीव, नाहीं गुणांची पारख! बारा गांवांतलें पाणी प्याल्याशिवाय पुण्याच्या पाण्याची माधुरी कशी कळणार?

गाथासप्तशतींत व्यभिचार प्रसंगांच्या अनेक गाथा आहेत. त्या मानानें पति-व्रतांचें माहात्म्य कथन करणाऱ्या गाथा फारशा नाहींत; हें खरें आहे: पण हा लोकगीतांचा धर्मच आहे. तरीही व्यभिचाराचें समर्थन क्वचित्च केलेलें आहे; आणि जेथें केलें आहे तेथें तो परिस्थितिजन्य आहे. व्यभिचाराचा निषेधही केलेला आहे. प्रथमोद्गतशीलखंडनाची पाखरांनाही लज्जा (क्र. २१८) वाटलेली आहे. कुलस्त्रीवर वैषयिक प्रेम करणें हें पाप आहे याची गाथासप्तशतीला जाणीव (क्र. १८३, ९७०) आहे. अनीतीचा प्रसार होऊं नये म्हणून ग्रामाधिकाऱ्यानें पहारेकरी (क्र. ५५६) नेमलेले आहेत, स्वैरिणीला हद्दपार करून कुग्रामांत बंदींत ठेवलेलें आहे.

व्यभिचार हा मनुष्यमात्राच्या अंतर्यामांत अनादिकालापासून मुरलेला ताप आहे. आसक्ति जागृत होते तेव्हां जणूं त्याचेंच हीव भरतें व तें जीवनाचा थरकांप करतें.

वेश्या :—

गाथासप्तशतींत वेश्यांचे अनेक उल्लेख आलेले आहेत. पैकीं नामपूर्वक असे उल्लेख फारच थोडे (क्र. १५६, ४५४, ८८४) आहेत. समाजपरिस्थिति व साहित्यप्रवाह यांच्या अनुरोधानें उत्तरकालीन टीकाकारांनीं आणखी अनेक गाथांच्या नायिकांना वेश्या ठरविलेलें आहे; त्यांपैकीं कांहीं या सदरांत समाविष्ट येण्यासारख्या (क्र. २१, ५३, ५६, ६८, २०३, २५१, ६८७, ७१०, ७५३, ८८४, ९३९) आहेत. क्र. १३४ या गाथेंत कुट्टनी व क्र. ९३९ या गाथेंत विट यांचा उल्लेख आलेला आहे: टीकाकारांनीं या सदरांत आणखी अनेकांना मांडलेलें आहे.

वेश्याव्यवसाय हा जगांतला जुन्यांत जुना व्यवसाय असें समाजशास्त्रज्ञ सांगतात: बिनभांडवली, फावल्या वेळांत अल्पायासानें कोठेंही करतां येण्यासारखा, पुरेशा बिदागीचा असा हा एकच व्यवसाय स्वैरिणींना उपलब्ध आहे. आणि कुट्टिनी व विट यांचा व्यवसाय हा दुसरा (The Second Oldest Profession : Dr. Reitman); कारण ते बिदागीसाठीं वेश्या व भुजंग यांची भेट घडवून आणण्याकरितां जरूर त्या त्या तजविजा करतात.

ऋग्वेदांत सामान्य वेश्येचा उल्लेख साधारणी (१·१६७·४) या संज्ञेनें केलेला आहे. गुप्तपणें गर्भपात करणाऱ्या व्यभिचारिणी (२·२९·१), नवऱ्याचा घात करणाऱ्या स्वैरिणी (४·५·५) आणि भ्रात्याचा आधार नसल्यामुळें (ऋ: १·१२४·७; अथर्व: १·१७·१) चरितार्थासाठी देहविक्रय करणाऱ्या कुमारी व विधवा यांचेही उल्लेख वैदिक वाङ्मयांत आलेले आहेत. वैदिक समाजांत वेश्यांना प्रतिष्ठा नाहीं. समाजांत सुसंपन्न व सुसंस्कृत वर्ग निर्माण झाल्यानंतर गणिकांचा प्रतिष्ठित वर्ग अस्तित्वांत आला. महाभारतांत वेश्यांच्या विलासांचे व धिंगाण्यांचे अनेक उल्लेख आढळतात. बौद्ध कालांत व वाङ्मयांत वेश्यांना प्रतिष्ठा प्राप्त झाल्याचें दिसतें. वाराणसीची सुलसा ही नगरशोभना (जातक: ३·४३५) मानण्यांत येई. तिच्या परिवारांत पांचशें वर्णदासी असत. एका रात्रीला एक हजार मुद्रा असा तिचा भाव होता. वैशालीची विख्यात गणिका अंबपालिका उर्फ आम्रपाली ही जशी सुंदर तशीच गायन–नर्तन–वादन प्रवीण होती. तिच्यामुळें वैशालीची भरभराट होत असलेली पाहून श्रेणिक बिंबिसारानें राजगृह येथें सौंदर्यस्पर्धेचा मेळावा भरविला आणि सौंदर्यसम्राज्ञीपद मिळविलेली राजकन्या शीलवती हिला वेश्यापण दिलें. ती सुंदर तशीच सुसंस्कृत होती, एका रात्रीला शंभर मुद्रा असा तिचा भाव होता. अशा गणिकांच्या निवासामुळें नगरीला शोभा येई व सरकारला करभार मिळे. सुंदर स्त्रियांवरून समाजांत संघर्ष निर्माण होऊं नये म्हणून लिच्छवी जमातींत त्यांना विवाहबद्ध होण्याची मनाई करण्यांत येई आणि अतिसर्गविधीनें त्या सर्वांनी उपभोगाला उपलब्ध ठेवण्यांत येत असत. बौद्ध वाङ्मयांत कुंटणखान्यांचें (वेसियाघर) आणि तांबूलमात्राच्या संप्रदानानें प्राप्त होणाऱ्या हीन वेश्यांचे(जातक: II ३०९, ३७९)हीं उल्लेख आढळतात. गणिका श्रीमंतांसाठीं आणि वेश्या श्रमिकांसाठीं ! कौटिल्यानें अर्थशास्त्रांत वेश्यानियंत्रणाला एक प्रकरण (२·२७) दिलेलें आहे. निवडक गणिकांना राजाश्रय असे; कलागुण, रतिगुण, यौवन व सौंदर्य यांच्या अनुरोधानें त्यांची निवड करण्यांत येत असे. त्यांच्या शिक्षणाचा खर्च खाजगींतून करण्यांत येत असे. राजछत्र धारण करणें, शकुनाचा सुवर्णकुंभ वाहणें आणि चवरी ढाळणें हीं दरबारी कामें त्यांचेकडे सोंपविलेलीं असत. भोगभ्रम गणिकांची वर्णी सरकारी कोठींत किंवा मुदपाकखान्यांत लावण्यांत येत

असे. रूपजीवा वेश्यांना दरमहा दोन दिवसांची प्राप्ति सरकारांत कर म्हणून भरावी लागे. वात्स्यायनानें कामसूत्रांत वेश्यांना एक संपूर्ण अधिकरण दिलेलें आहे. वेश्यांनीं आपली आकर्षकता व उपयुक्तता आणि गुणसंपन्नता व सुसंस्कृतता वृद्धिंगत व संवर्धित करण्याविषयीं त्यांत विस्तृत विवेचन केलेलें आहे. मृच्छकटिकाची नायिका वसंतसेना ही तर संस्कृत साहित्याचें भूषण मानलेली आहे. तेथें वेश्यांची तुलना स्मशानसुमनांशीं केलेली असून त्या वर्जनीय आहेत असें सांगितलेलें आहे; आपण वसंतसेनेवर आसक्त झालों हा आपल्या चारित्र्याचा दोष नसून यौवनाचा आहे असें चारुदत्त सांगतो. तरी तिच्या किंवा त्याच्याबद्दल वाचकाला किंवा प्रेक्षकाला घृणा वाटेल अशी नाटकाची मांडणी नाहीं. दामोदरगुप्तानें कुट्टनीमतम् आणि क्षेमेंद्रानें समयमातृका हे ग्रंथ तर कुट्टनी व वेश्या या विषयांवर लिहिलेले आहेत. प्राकृत व संस्कृत वाङ्मयाची निर्मिति होत होती तोंवर गणिकांचा किंवा वेश्यांचा दर्जा भ्रष्ट झालेला नव्हता असें दिसून येतें. मग हा परिणाम वाङ्मयाच्या जनतापराङ्मुखतेचा असो किंवा सामाजिक मूल्यांच्या भिन्नतेचा असो; दरबारी रिवाजांच्या प्रभावाचा असो किंवा तोंवरच्या तथाकथित फिरंग रोगांच्या अभावाचा असो. वेश्यांच्या बाबतींत हिंदी समाजाची वृत्ति आरंभापासून सहिष्णुतेची आहे; हल्ला जी घृणा दिसते ती अगदीं अलीकडची आहे आणि सुशिक्षितांव्यतिरिक्त अन्यत्र तीही विशेष तीव्र नाहीं.

वात्स्यायनानें वेश्यांचें वर्गीकरण केलें आहे तें असें : (१) कुम्भदासी : चरितार्थासाठीं हलकीं कामें व फावल्या वेळीं वेश्याव्यवसाय करणारी; (२) परिचारिका : सेवाशुश्रूषेपासून सुरवात करून धन्याची रखेली झालेली; (३) कुलटा : नवरा असलेली, त्याच्या धास्तीनें गुप्तपणें परगृहीं व्यवसाय करणारी; स्वतःचें कुल सोडून अन्य कुलाचा आश्रय करणारी; (४) स्वैरिणी : नवरा असलेली, त्याला न जुमानतां स्वगृहीं व परगृहीं व्यभिचार करणारी; पतीशिवाय पांच जणांशीं संबंध ठेवणारी; (५) नटी : व्यवसायानें नटी, संधि साधेल तेव्हां निवडक पुरुषांशीं संबंध ठेवणारी; (६) शिल्पकारिका : सकुटुंबनीं हस्तव्यवसाय करणारी, छपून व्यभिचार करणारी; (७) प्रकाशविनष्टा जिची व्यभिचारी वृत्ति लोकप्रसिद्ध आहे अशी; (८) रूपजीवा : मध्यम

वर्णांची वेश्या, जिच्यापाशीं शील व रूप एवढीच सामुग्री आहे; (९) गणिका-शील-रूप-गुण संपन्न, सन्मान्य, सुसंस्कृत आणि नीतिनियम पाळणारी.

वेश्या कोणाला म्हणावें ? पात्रापात्र विचार न करतां संप्रदानार्थ संभोग देते ती वेश्या, अशी व्हार्टनची व्याख्या (Law Lexicon) आहे. कायद्याच्या काटेकोर दृष्टीनें ती बरोबर आहे. सामान्य व्यवहारासाठीं या व्याख्येला "व्यवसाय म्हणून संप्रदानार्थ" अशी पुस्ती जोडली पाहिजे; नाहीं तर कनवठीला किंवा चंचींत खासगी व हौसेसाठीं, चार पैसे असावेत म्हणून आडवाटेनें जाणाऱ्या स्वैरिणींचाही या वर्गात समावेश करावा लागेल. कोणत्या वर्गातलि स्त्रिया या व्यवसायाचा आश्रय करतात ? मिशनरी लोगन यानें लंडन येथील वेश्याव्यवसायावर लिहिलेल्या The Great Social Evil या ग्रंथांतील याबाबतचें अवतरण डॉ. हॅव्हेलाक एलिसनें दिलें आहे :(१) घरांत किंवा दुकानांत हलकीं कामें करणाऱ्या मोलकरणी, म्हणजे वात्स्यायनाच्या कुंभदासी; (२) कारखान्यांतल्या कामकरणी, म्हणजे वात्स्यायनाच्या शिल्पकारिका; (३) भुजंग, कुंटिणी व विट यांच्या भुलथापांनी फसलेल्या खेडवळ स्त्रिया; (४) आळशी, उथळ, उन्मत्त, उपाशी स्त्रिया: स्वैर प्रवृत्तीमुळे चरितार्थासाठीं परिश्रम करण्यास प्रतिकूल किंवा व्यभिचाराविषयीं निःसंग असणाऱ्या स्त्रिया. सामान्यतः याच वर्गातील स्त्रिया आर्थिक किंवा नैतिक दौर्बल्यामुळे या व्यवसायांत पडतात. आपल्याकडे आहे तसा वेश्यांचा आनुवंशिक वर्ग फक्त जपानमध्ये आहे. नटी, नर्तिका, व गणिका या आपआपल्या पेशासाठीं लहानपणापासून शिक्षण घेतात.

पुरुष वेश्यागमन कां करतात ? कारण कुटुंबांत उपलब्ध असा संवर्धित कलागुणांचा अविष्कार विदग्ध (क्र. ८८४) गणिकांचे ठायीं (क्र. ९५३) सुसंपन्नांना व सुसंस्कृतांना मित्राचे समवेत अनुभवतां येतो. कारण वेश्या या कुलस्त्रियांहून अधिक आकर्षक (क्र. १५४) असतात, बाह्योपचारकुशल (क्र. ७५३) असतात. गणिक व वेश्या यांना लहानपणापासून मोहनतंत्र शिकविण्यांत आलेलें असतें. सौंदर्य सामान्य असलें तरी त्यांचे अंगीं निर्लज्जपणा (क्र. ८८५) भरपूर असतो आणि कोणाकोणाला, नव्हे अनेकांना (क्र. ६८७), त्याचीच हौस असते. क्र. १५६ व ८८४ मध्यें त्यांच्या कैतवयुक्त रतिव्यापाराची प्रशंसा केलेली आहे. शृंगारदीपिकेंत (क्र. ८) सांगितलें आहे: यथा-

वस्त्समसुरते तुरगारोहेव पौरुषे भावे। बलीव बंधसुरते—" पुरुषांच्या लैङ्गिक अपेक्षा व विकृति त्या भागवतात. धनार्जन हाच वेश्यांचा पुरुषार्थ. गणिकांना बिट व वेश्यांना कुट्टनी गिऱ्हाइकें आणून देतात. बिट म्हणजे नुस्ता दलाल नव्हे. नाट्यशास्त्रांत भरत सांगतो. "वेश्योपचार कुशलो मधुरो दक्षिणः कविः। उहापोहक्षमो वाग्मी चतुरश्च विटो भवेत्।" कामसूत्रांत (१–४–४५) वात्स्यायन् व कलाविलासांत (९·३९) क्षेमेंद्र सांगतो कीं आरंभीं सुसंपन्न व सुसंस्कृत असलेला व तारुण्यांत सर्व उपभोग भोगलेला, भागलेला, भोगी विभवक्षयानंतर चरितार्थासाठीं या व्यवसायाचा अवलंब करतो: तो अशी सेवा करीत असला तरी अंगीं कलाज्ञान असल्यामुळें नागरिकांच्या सभेंत त्याला सन्मानानें वागविण्यांत येतें. यशोधर सांगतो, विटति म्हणजे परस्परांना निरोप सांगतो तो विट. क्र. ९३९ या गाथेंत बिटाचा व त्याला अनायासें मिळत असलेला दलालीचा उल्लेख झालेला आहे. क्र. '३३ या गाथेंत मित्रमंडळांत निस्तेज होणाऱ्या सतेज व कलापूर्ण चंद्राचा उल्लेख आहे. तो विटाला अनलक्षून असावा. सामाजिक संमेलनांत बिट भाग घेत असत (साहित्यदर्पण : ३·४१). क्र. १३४ या गाथेंत कुट्टनीची कावळ्याशीं तुलना केलेली आहे: जितकी मार्मिक तितकीच हृदयद्रावक. " कुथ्यति छिनति नाशयति स्त्रीणां शीलम् " तो कुट्टिनी संप्रदान (क्र. ९८) म्हणजे संभोगद्रव्य. गाथासप्तशतींतल्या वेश्या कधीं हें आगाऊ घेतात (क्र. २५१) तर कधीं संभोगोत्तर (क्र. ९८). कुट्टनीमतांतील उल्लेखावरून (क्र. ३६४) दिसतें कीं संभोगद्रव्य म्हणजे ग्रहणक आगाऊ घ्यावयाचें आणि सुरतकौशल्याबद्दल बक्षीस म्हणून संप्रदान संभोगोत्तर मागावयाचें. संप्रदानही आवश्यक मानण्यांत येत असावें असें दिसतें. हा आपला व्यवसाय असल्यामुळें पुरुष कसाही, कोणत्याही वर्गातला असला तरी त्याला टाळूं नको असा उपदेश वेश्यामातेनें दुहितेला केलेला (क्र. २२७) आहे. जणं त्या आपल्याकडे न आलेल्या भोगी संपन्नांची नोंद ठेवीत (क्र. ४७४) असत. 'व्याधिता सश्रमा व्यग्रा राजकर्मपरायणा' अशा वेश्यांना गिऱ्हाइक नाकारहक्क होता असें याज्ञवल्क्य स्मृतीवरून दिसतें.

क्र. २१ या गाथेंत वेश्यांच्या व्यवसायाचें रहस्य विशद केलेलें आहे. " साजशृंगाराला किंमत नाहीं; घटका साधली पाहिजे: ती हुकली कीं

आसक्ति शिथिल होते आणि चित्तांत विकल्प येतो." वेश्यामातेच्या या उद्गारांत अनुभवाचें सारसर्वस्व सांठविलेलें आहे. मुलगी तरुण आहे, सुंदर आहे. कलावती आहे. पण अल्लड आहे, नवशिकी आहे. या व्यावहारिक खांचाखोंचा तिला कोणी तरी शिकविल्याशिवाय कशा उमगणार? म्हणूनच वात्स्यायनानें नियम घालून दिला आहे कीं तरुण वेश्येनें हरघडीला मातेचा सल्ला घ्यावा आणि तिच्या आज्ञेचें उल्लंघन करूं नये. मुलीला प्रसाधनाचें महत्त्व अधिक वाटलें तर तिच्या आईला घटकेचें महत्त्व विशेष वाटलें. आसक्ति तीव्र आहे तोंवर प्रसाधनाकडेच नव्हे तर रूपगुणांकडेही पुरुषाचें लक्ष जात नाहीं. आसक्ति ओसरल्यानंतर त्याची विचारशक्ति जागृत होते, तो तुलना करतो-बिदागीबद्दल घासाघीस करून शक्य तर टाळाटाळीचा प्रयत्न करूं लागतो. म्हणून औत्सुक्याच्या उमळीवरचा फेस विरला नाहीं तोंवर बैठकींत हजर झालेंच पाहिजे असा आदेश तिनें कन्येला दिला. मनुष्यस्वभावाचें ज्ञान आईला होतें व तें तिनें अनुभवानें मिळविलें होतें. विशेष विचक्षण अशा विशिष्ट व्यक्तींचे बाबतींत कधीं कधीं व्यावसायिक अनुभवामुळेंही फसगत होते असें क. ५३ या गाथेवरून दिसून येतें. नायक निर्धन होता तेव्हां वेश्यामातेनें त्याला नकार दिला होता. नंतर त्याला वैभव प्राप्त झालें, तेव्हां त्याला आवा, द करण्याविषयीं ती दुहितेला प्रोत्साहन देऊं लागली. यावर कन्या म्हणते, ही वंचना आहे, हा अपराध आहे; त्यांतलें कैतव त्याच्या लक्षांत येईल आणि तें त्याला रुचणार नाहीं. कन्येचे हे उद्गार अंतःकरणापासून निघालेले आहेत आणि ते खरेही आहेत. मग तिच्या मातेनें असें वैर साधण्यासारखें वर्तन कां केलें? कारण तिनें मनुष्यस्वभावाचें ज्ञान निरीक्षणानें मिळविलें होतें आणि तें अनुभवाच्या कसोटीवर पारखून ठेवलें होतें. वात्स्यायनानें सांगितलें आहे कीं आमंत्रण आल्याबरोबर स्त्रीनें घाईघाईनें त्याचा स्वीकार करूं नये, कारण अल्पायासानें प्राप्त होणाऱ्या स्त्रीबद्दल पुरुषाला आदर वाटत नाहीं. मुली, त्यानें शिटी वाजविल्याबरोबर कासोट्याचा गोंडा घोळीत त्याच्यामागें धांवावयाला तूं काय सामान्य कुत्री आहेस? ही वंचना त्याच्या ध्यानांत आली तर कसें होईल असें तूं मला विचारतेस? पूर्वीच्या वृत्तांताची आठवणही होणार नाहीं अशा प्रकारें तूं त्याला रमविलें पाहिजेस. एवढा सर्व करून

तुला सर्व कला शिकविल्या त्या काय हा प्रश्न ऐकण्यासाठीं ? कोणतीही बतावणी जमली नाहीं तर माझ्या खाष्टपणाची व लोभी स्वभावाची हवी तेवढी निंदा कर. वेश्यामातेनें अंतःकरण कठोर व वृत्ति लोभी ठेवावी असें वात्स्यायनानें सांगितलेंच आहे. शिवाय बिदागीचा आग्रह धरावयाचा नाहीं तर हा व्यवसाय कशाला करावयाचा आणि आपल्या इतमामाला लागणारा खर्च कसा भागवावयाचा ?

वेश्येचें बिदागीशिवाय चालणार नाहीं, हें खरें, पण ती तिनें घासाघीस करून ठरवावयाची नसते, तर पुरुषाला संतुष्ट करून; पण त्याच्या मनोवृत्तीचा अंदाज अगोदर बांधतां आला पाहिजे, नाहीं तर फसगत व्हावयाची. क्र. ६८ मध्यें वेश्यामाता थोडें गोड, थोडें तिखट बोलून बिदागी मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. मुलीनें तुम्हांला नाखूष तर नाहीं ना केलें ? माता म्हणते. मला आपली शंका आली आणि वाटलें कीं म्हणून तुम्ही हात आंखडता घेतला असेल. तसें कांहीं नाहीं ना ? मग हें पाहा संतुष्ट झाल्यानंतर बिदागी न देण्यांत शोभा नाहीं: आणि फार ताणून धरलेत तर तुमची शोभा होण्याला वेळ लागणार नाहीं ! निर्वाणीचें शस्त्र निघाल्यावर कोणत्याही सभ्य नागरिकाची काय हिंमत लागून गेली आहे कीं या महांकाळीची मागणी तो पुरी करणार नाहीं !

क्र. २०३ या गाथेत गुणगर्विता गणिकेचे उद्गार आहेत. ती म्हणते, नायकाचा काय दोष ! माझ्याच अंगीं गुण नसावेत. छे, छे, असें कसें म्हणतां येईल. तुमचे गुण साऱ्यांना माहीत आहेत आणि त्याची रसिकताही विख्यात आहे. गुणांना किंमत राहिलेली नाहीं. गुणांची किंमत कशी करतां येईल बरें ? आम्ही जी किंमत देतों ती आमची किंमत. तुमची नव्हे. त्याची बायको गुणी असेल ? तशी असणें संभवनीय आहे. तसें पाहिलें तर कोणाच्या लग्नाच्या बायका गुणी नसतात ? त्या गुणी नसतात म्हणून का कोणी तुमच्याकडे येतात ? ही एक तहान आहे, लौल्य आहे, ओढ आहे. आलेल्याला संतुष्ट करण्यांत तुम्हीच कुचराई केली असेल आणि आतां बसलां आहांत विचार करीत, का आणि कसें !

वेश्येनें पुरुषाला संतुष्ट केलें पाहिजे, हें खरें, पण हें कर्म किती कठिण आहे? त्यासाठीं त्या बिचाऱ्यांची काय दुर्दशा होते याची आपल्याला कल्पनाही करतां येणार नाहीं. क. १८ मध्यें ग्रामप्रधानांनीं वेश्येची ओढाताण केलेली आहे. क. ५६ मध्यें शिरीषासारख्या नाजूक नायिकेचा सुरतदुर्विदग्धानें चुरगळा केलेला आहे. हलिक असता तर लगुडप्रहार केला असता, मूर्ख असता तर हांकून दिला असता: पण हे पडले वरिष्ठ वर्गातले, स्वतःला विदग्ध मानणारे! महामूर्ख परवडला, कानउघाडणी केली म्हणजे मान खालीं घालून निघून जाईल; पण हे पडले पढतमूर्ख! निषेध केला तर झालेल्या सुरत व्यवहारावर सशास्त्र व सटीक प्रवचन सुरू करायचें!

अडाण्यांनीं चुरगळलेल्या वेश्यांचें काय होतें? त्या बाजारबसव्या होतात, योग्यायोग्यतेचा विवेक करूं शकत नाहीं. क. २२७ मधील उद्गार वेश्यामातेचे आहेत असें गृहीत धरून पहा. कोणी धनिक वेश्येकडे गेला. तो हल्कट बायकांकडे जातो असें तिनें ऐकलें होतें. म्हणून ती त्याला नाकारणार होती. तिचा मनोदय ओळखून तिची आई म्हणते, तो कसा का असेना, आपल्याला फक्त त्याचें धन हवें आहे! पोटांत निखारे घालणें म्हणतात तें याला.

अशा लोभी व कनिष्ठ वेश्या बहुधा त्यांच्या मातांपेक्षांही हीन अशा कुंटि-णींच्या हातीं पडतात. त्या कुंटिणींचें आयुष्य तरी सुखाचें असतें कीं काय? मुळींच नाहीं. त्यांची अवस्था क. १३४ या गाथेंत वर्णिलेली आहे.

या व्यवसायाचें व तो करणाऱ्या व्यक्तींभोंवतीं घोंगावणाऱ्या परोपजीवि व हीन व्यक्तींचें जीवन व त्याचें पर्यवसान भीषण आहे, हें खरें, तरीहि वेश्यांचें प्रेम ही चीज अजब आहे यांत शंका नाहीं. क. १५६ ही गाथा खुद्द हाल सातवाहनाची आहे. त्यानें येथें वेश्यांच्या प्रेमाची व त्यांच्या कैतवपूर्ण सुरताची प्रशंसा केलेली आहे. वेश्यांचें प्रेम जसें लबाडीचें, तशीच कवीची प्रशंसाहि. कौटुंबिक जीवनाच्या मर्यादांमुळें गृहिणी परतंत्र असते. तिच्या प्रेमांत लबाडी, निःशंकता, विविधता व आवेश कसा असणार?

वेश्यांचें अस्तित्व समाजजीवनाला अपकारक आहे कीं उपकारक? वैयक्तिक जीवनाला निःसंशय अपकारक. पण समाजशास्त्रज्ञ सांगतात कीं वेश्यावर्ग हा

समाजजीवनाला उपकारक आहे; कौटुंबिक स्वास्थ्य व वैवाहिक जीवनाचें स्थैर्य यांच्या संरक्षणासाठीं प्रतिष्ठेच्या सीमेवर उभारलेली ही संरक्षक फळी आहे!

स्त्री-सौंदर्य :

सौंदर्याचा विचार दोन अंगांनीं केला पाहिजे. स्थिर (Static) व चल (Dynamic). अवयव व रूप हीं सर्वांनाच असतात; त्यांची बांधणी भिन्न असते; कोठें ढबदार, कोठें बेढब; कोणी सुस्वरूप असतात व कोणी कुरूप. बांधणीच्या दृष्टीनें सौंदर्याचीं गमकें देशोदेशीं व युगायुगीं भिन्न असतात. जीवनाच्या गतीमुळें व भावनांच्या प्रेरणेमुळें चल सौंदर्याचा आविष्कार प्रत्ययास येतो.

शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध यांचें ग्रहण हीं ज्ञानेंद्रियाचीं कार्यें. श्री. राजवाडे (नासदीयसूक्तभाष्य : पृ ७०२) सांगतात : " हे पांची विषय स्पर्शमयच आहेत. त्यांचें स्पर्शनकर्म त्वक्स्पर्शाकडून चक्षुस्पर्शाकडे उत्तरोत्तर अधिकाधिक सूक्ष्म बनत जातें. म्हणून मूळ स्पर्शनाची सुरवात चक्षूचे ठिकाणीं रूपदर्शनांत होते. "

प्रेक्षकाला प्रथम रूप दिसतें आणि त्यांत ही कान्ति, शरीराचा वर्ण :

गाथासप्तशतीला दोन वर्ण माहीत आहेत : गौर व श्याम. गौरत्व या संज्ञेला गौरता अभिप्रेत आहे असें भासत असलें तरी गाथासप्तशतींत उल्लेखानुसार श्यामला बहुसंख्य आहेत. गौर म्हणजे किती ? अंधारांत ज्योतीसारखा तेवणारा (क्र. ४१५) आणि चांदण्याशीं एकरूप (क्र. ६०७) होणारा. उल्लेखित गौरी गौरीपान आहे आणि अनुल्लेखित काली श्यामल. गौरी जराशी रागाला आली कीं तिचे गाल लाल (क्र. १९२) होतात; आणि श्यामला ? वाटतें, जणूं गडद मेघांवर कोंवळे किरण प्रकाशले आहेत, किंवा अंतर्यामांतली वीज चमकली आहे! कोमलता दोघींचेंही अंगीं आहे; शिरीषासारखी (क्र. ५६), अल्प आयासानें अवयव थरकावावे एवढी (क्र. ५२); किरणांनाही संभ्रम पडावा कीं अधिक कोमल कोण (क्र. २६९), कमल कीं कमला! आणि श्यामलेची कोमलता (क्र. ९६३) तर अद्वितीयच!

सौंदर्य न्याहाळतांना प्रथम दिसतें आनन. तें तिलकानें (क. १७९) सुशोभित असतें. गाथासप्तशतींत मुखाला मुख्यत्वेंकरून चंद्राची व संख्येच्या अनुरोधानें त्या खालोखाल कमलाची उपमा दिलेली आहे. म्हणजे गाथाकवींचा आवडता मुखाचा आकार पूर्ण चंद्रासारखा वर्तुलाकार किंवा उमलत्या वा अधोमुख कमलासारखा अंडाकृति आहे. सौंदर्य शास्त्रानुसार स्त्रियांच्या मुखाचे हेच आकार अभिजात मानण्यांत येतात. सामान्यत: वर्तुलवदना सांसारिक जीवनाशीं सत्वर समरस होतात आणि कमलानना बौद्धिक जीवनाशीं. कानांतल्या डुलाला जडवलेल्या इंद्रनीलाची कान्ति कपोलावर प्रकटली (क. ३०२) किंवा अश्रूंबरोबर काजळाची छटा गालांवर ओघळली कीं मृगाङ्काची उपमा देण्याची सोय चंद्रामुळें होते आणि मुखाचा कल (क. ९, १०, ३७०), प्रफुल्लता (क. ३४३), वदनाचा परिमल (क. ७८) व निःश्वासाचा सुगंध (क. ३६६) यांची संगति कमलामुळें लावतां येते. हेलावणाऱ्या कमलाभोंवतीं भ्रमर, त्याचप्रमाणें प्रघूर्णित शीर्षाभोंवतीं ओघळलेले अलक (क. ७८) डोलतात. क. ९६६ च्या नायिकेचें मुख चंद्राहून सुंदर आहे आणि क. २६९ च्या नायिकेचे कमलाहून कोमल. क. १३ व ६४५ आणि क. ४९० व ५५० या गाथांमध्यें वर्णिलेलें मुखाचें चल सौंदर्य तुलना करून पाहण्याजोगें आहे.

गाथासप्तशतींत नायिकांचे केश काळेभोर (क. ७८) व लांब (क. ५५५, ५६३), मऊ (क. २५९) व सुगंधित (क. ५७२) आहेत. ते फणीनें विंचरून (क. ३८०), मध्यें भांग पाडून (क. ६८२) त्यांचा अंबाडा (क.७८,६१४) घातलेला आहे. यमुनेच्या लाटेवर फेसाचा पुंजका असावा तसा त्यावर सुगंधी गजरा (क. ९९२) चढविलेला आहे. क. ५२ च्या नायिकेचे केश भुरभुरीत असावेत आणि क. ६१४ च्या नायिकेचे कुरळे. विरहिणींनीं केस विंचारावयाचे नाहींत (क. २७३) असा आचार प्रचारांत होता. साहजिक आहे; पतिव्रतेचें (क. ८३५) यौवन, विभ्रम व सौंदर्य हीं पतीबरोबर प्रवासाला जावयाचीं, मग केश विंचरावयाचें कशाला व कोणासाठीं ? कीं ते विस्कटल्याचें आप्तांच्या ध्यानीं येऊं नये म्हणून हा रिवाज पडला होता ? आवेशपूर्ण चुंबन घेण्यासाठीं (क. २१३) किंवा रुसवा नष्ट करण्याकरितां मदिरा पाजण्यासाठीं (क. ५५०) केश धरून प्रियेचें मुख उत्तान करण्याची

प्रणयी जनांना फार हौस असावी. गाथासप्तशतींतील नायिकांचे गाल गुबगुबीत (क्र. ४३९, ६३९) व गोरेपान (क्र. १८२, ३००) आहेत; हसल्यानें ते लाल (क्र. ११२) होतात. त्यांची कान्ति आरसपानी (क्र. ११४, ८१८) आहे. इतकी, कीं आजूबाजूला वावरणाऱ्या व्यक्तींचीं प्रतिबिंबें त्यांवर दिसतात; अर्थात् तीं जवळून पाहिल्यावांचून दिसत नाहींत आणि म्हणून त्यांचें चुंबन घेतलें गेलें म्हणजे नायिकेला जणूं त्या प्रतिबिंबाचीही चाहूल लागते! श्रमानें (क्र. ११४) तसेंच भावनेनें (क्र. ९३२) ते ओले होतात आणि त्यांवर चंद्रधनुष्याची शोभा (क्र. ८०२) प्रकट होते. हर्षानें ते विकसित (क्र. २३, ८५०) होतात व मत्सरानें खोल (क्र. ३८२) जातात. प्रियकर त्यांवर दन्तमण्डलें (क्र. ९६, ३००, ९७५) उमटवितात आणि केव्हां केव्हां प्रीतीमुळें स्वेदाचें (क्र. ९३२) अगर मत्सरामुळें संवेदनांचे ऐवजीं सवतींच्या ठायीं वेदनांचें संक्रमण (क्र. ९७५) होतें! ह्या नायिकांचे अधर आरक्त (क्र. ८०२, ९२७) व भरदार (क्र. ९८२) आहेत. बिंबाधराची उत्तरकालीन उपमा उत्तरभागांतच आलेली आहे. शिञ्जिनी जुळवून समोरासमोर ठेवलेल्या धनुष्यांची, कामशरांचा उल्लेख आलेला असूनही कामधनुष्यांच्या जोडीची उपमा गाथाकर्त्यांना कशी सुचली नाहीं कोण जाणे; कदाचित् त्या काळांत दुहेरी बांकणाचीं धनुष्यें वापरांत नसावींत, म्हणून. क्र. १०६ या गाथेच्या नायिकेनें ओंठांना अधर राग लावलेला आहे. सहृदयांनीं वाटतें तितकी ही प्रथा अर्वाचीन नाहीं. मात्र पिपासाकुल प्रियकराला त्या केवळ अधर राग अर्पण करीत नाहींत! अधर-खण्डन (क्र. ७८, ७१३, ७९५, ८८०, ९९५) अधर-चुंबन (क्र. २१३, ८२१, ९२७, ९८४), अमृतोपम अधर-रस-ग्रहण (क्र. २१३, ८२१) व किणा होईपर्यंत अधर-शोषण (क्र. ९२७, ९८४) या प्रणयी जनांच्या आवडत्या प्रेमलीला आहेत. अधराचें आवाहन (क्र. ८२१) व स्फुरण (क्र. ९१५) आणि व्रणाला जिव्हेचें स्पर्शन (क्र. ७९५) या लीला कर्त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाच्या द्योतक आहेत. या नायिकांच्या भृकुटि धनुष्याकार (क्र. ५०४) आहेत. आणि हसल्या असतां भिवईवर त्या अशी आंठी चढवतील कीं वाटावें—

गाथाकर्त्यांनी सर्वांत सूक्ष्म व सहृदय निरीक्षण व वर्णन जर कशाचें केलें असेल तर तें नायिकांच्या नेत्रांचें व नजरेचें.

या नायिकांचे नेत्र विशाल (क्र. ४७०, ४८२, ८४६, ९१४, ९१७, ९६७), आकर्ण (क्र. ३३८, ८१७) व तेजस्वी (क्र. ७५८) आहेत. नायिकेला नेत्रावरून अभिधान फक्त एकच दिलेलें आहे : मृगाक्षी (क्र. ३००, ४६६, ९४४). त्यांवर लांब पापण्या (क्र. ४७०) आहेत आणि जणूं त्यांना धार यावी म्हणून त्यांत अंजन (क्र. ८६४) घातलेलें आहे. त्यांचें बाह्यांग धवल (क्र. ८१७) आहे आणि खेद (क्र. ८३२) व मद (क्र. ५०४), मत्सर (क्र. ९०२, ९३५) व मद्य (क्र. ८२०) यांमुळें त्यांवर क्वचित् आरक्त छटा उमटते. त्यांचें अंतरंग काळेंभोर (क्र. ४७०, ८१७) किंवा नील (क्र. ५, १४०, १५०, ८०२, ८२६, ८४४, ८४६) आहे. सामान्यतः ज्यांच्या नेत्राचें अंतरंग काळेंभोर असतें त्यांचें अंतर्याम स्वच्छ असतें. तरीही निळीं बुबुळें अधिक आकर्षक दिसतात हेंच खरें. अशा नेत्रांची नजर कधीं चंचल व तीक्ष्ण असून मन्मथाला प्रेरक (क्र. ७५८) असते, तर कधीं ती विलासी जागरणामुळें (क्र. १४८, ९००) किंवा भावनांच्या भारामुळें जड व सुस्त (क्र. ३७१) भासते. जत्रेंतल्या जमावांत गुरफटलेल्या प्रियकराच्या शोधासाठीं कधीं ती तरल (क्र. ८७४) होते आणि अंतरींच्या अपेक्षेनें टकमक (क्र. ९०३) पाहते, तर कधीं प्रेमसमाधीमुळें निश्चल (५५८) किंवा मुकुलित (क्र. ५, ३२३) होते. भरत सांगतो : रतान्ते च श्रमे चैव सुखसंभोगभावने । गन्धे स्पर्शे च हृष च मुकुला दृष्टिरिष्यते ॥ क्र. ४७० या गाथेंत कवि सांगतो : डोळे सर्वांनाच असतात; कांहींचे डोळे सुंदरही असतात, पण अशा नेत्रांनीं पहावयाचें कसें हें सर्वांनाच समजतें असें नाहीं. गाथाकर्त्यांनीं नेत्रनृत्याचीं अनेक आसनें नमूद केलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं येथें देतों : अनिमिष : प्रियेच्या अवयवांवर रोखलेली (क्र.७३); अपाङ्ग: निःशब्द हृदयनिवेदन (क्र. ३७०)अर्धतारक : प्रोत्साहक (क्र. २५४); अर्धाक्षि: [अल्हड (क्र. २५, २२५), थकव्यामुळें (क्र. ५२), रहस्यपूर्ण (क्र. ८७८) हिरमोडामुळें (क्र. १८०)]अलब्धलक्ष (क्र. २९६); अवधीरणवशविसंष्ठुलवलयनार्धदृष्टि (क्र. १४६); अवितृष्ण: तहानी (क्र.९३, ९९); उद्विग्न (क्र. ४९२); उत्फुल्ल (क्र. ८२२); उन्मत्त (क्र. ७०३);

ऊर्ध्वाक्ष (क्र. १६१), कटाक्ष (क्र. ५८१, ८८१); कृत्रिम (क्र. ३५७); घूर्णनशील (क्र. १४८, ३३८, ९३१); तिर्यक् (क्र. १४८); दरवलित (क्र. २५४); दिशामुखप्रसारित (क्र. ५७); निमीलिताक्षि : मनोमय प्रियकराच्या आलिंगनामुळें (क्र. १३३), ध्यानस्थ (क्र. ८३६), सरावासाठीं (क्र. २४९); परितोषविकसित : अनुरागजन्य (क्र. ३४१); प्रफुल्ल : प्रियकराच्या गुणश्रवणामुळें (क्र. ८६४) प्रसारित : चेष्टेनें (क्र. ९०३); पाहिलें न पाहिलें (क्र. ७१५); प्रेमहीन (क्र. ३५३); बाष्याकुलित (क्र. २५); भ्रुकुटिभङ्गसज्ज (क्र. ९१४, ९१५); मत्सरग्रस्त (क्र. ९०२); मन्थर (क्र. ३७१), रक्तविषम (क्र. ५०४); रागीट (क्र. ८९२); वक्राक्षिप्रेक्षण (क्र. १७४); विनिमीलितार्धाक्षि (क्र. ५२); शून्य (क्र. ८६४); स्नेहसद्भावभरित (क्र. १९९); हासोन्मिश्र (क्र. ४५७).

प्रौढावस्थेंत पदार्पण करतांना मुग्धेनें एवढे नेत्र–विलास संपादन केले तर तिला अजिंक्य असा पुरुष आढळणार नाहीं. कटाक्षानें महात्मेही विद्ध व व्यथित होतात (क्र. ८८१), मग सामान्यजनांची काय कथा ? तारुण्यांत नुक्तेंच पदार्पण केलेले कितीतरी स्वसंतुष्ट लोक किती तरी काळपर्यंत नुसत्या कटाक्षावर (क्र. ५८१) झुलतात ! कोणी खरोखरीच अल्लड असतात म्हणून लाडें लाडें पाहतात (क्र. २५) आणि कोणी अभिप्रायाच्या संवरणार्थ (क्र. २२५) जाणून तसें ढोंग धारण करतात. जे चतुर असतात (क्र. ८७८) किंवा जाणते (क्र. २५४) असतात ते दृष्टिक्षेपांचें रहस्य तावडतोब उमजतात ! कांहीं पहावयाचेंच असलें तर कुलवधूनें मात्र मुख वर न उचलतां पाहिलें पाहिजे (क्र. ५२५) असा दंडक होता – आणि आहेही !

कृश व नाजूक उदर (क्र. ३०९, ३१३, ३६२, ७९७) हें गाथाकर्त्यांनीं संस्कृत कवीप्रमाणेंच सौंदर्यलक्षण मानलेलें आहे. उदरावर त्रिवली (क्र. २७८, ४२५) आहे. भावनोद्रेकामुळें नेसतें वस्त्र सैल झाल्यानें क्र. १६२ च्या नायिकेच्या नाभीचें भिक्षाचराला दर्शन घडलें आहे. उदराला कृत्रिम कृशता आणण्यासाठीं कॉर्सेटसारखा कांहीं उपाय मात्र सांगितलेला नाहीं. कृशोदर हें सौंदर्याचें तसेंच सक्षम संसाराचें लक्षण आहे. उदरंभरणाच्या चिंतेनें चित्त ग्रासलें कीं एका काळीं उन्नत असलेल्या स्तनांनाही उदराचाच आश्रय

(क्र.६५२) घ्यावा लागतो; मात्र तेव्हां त्याच्या कृशतेची ही ढब नष्ट (क्र. ३०९) झालेली असते.

जसे दृष्टीचे, तसेच स्तनांचे अनेक उल्लेख गाथासप्तशतींत आलेले आहेत. स्तनांना उपमाही अधिक दिलेल्या आहेत : कलश (क्र. १४०, २५६, ३६८, ३६९, ५७६), घट (क्र. २६०), पिकें बेलफळ (क्र. ५७९) आणि राजहंसाची जोडी (क्र.६२४). सर्वच नायिकांचे स्तन कंचुकींत बद्ध (क्र. ७३०) आहेत; दोष कंचुकीचा असो किंवा गुण यौवनाचा (क्र. ७३६) असो, स्तन बंधन जुमानीत नाहींत आणि चंद्रकळेच्या (क्र. ३९५) आकारांत प्रकट होतात! कारण, त्यांचें अंतःस्फुरण (क्र. ५९६). व स्वयंवर्धन (क्र. ७३६). स्तन कसे असावेत? निर्दोष (क्र. ७०८) व सुंदर (क्र. ९७०); वर्णानें उज्ज्वल (क्र. ७०९), गोरे (क्र. ८२०) व लाल (क्र. २६०, ७०९, ७२७); आणि त्यांची अग्रें लाल (क्र. ८३); गर्भधारणेनंतर तीं काळीं पडतात, किंवा हृदयांत स्तनांचा निधि सांचल्यानंतर त्यांवर त्यांवर मदनराजाची काळी मोहोर केली (क्र. ८०७) जाते. स्तन असावेत आकारानें उत्तुंग (क्र. १५०, २५६, २५८, ३८२, ४२५, ४२७, ५७९, ८७३), उन्नत (क्र. ४३४, ४२८, ८९३, ८७३, ९१८), गंभीर (क्र. ४२८), थोर (क्र. ९१९), पीन (क्र.७०७, ९१८), पुष्ट (क्र. ५४९, ५९७, ६६९, ७०७, ७९७, ८५७), पृथुल (क्र. ७९७, ८४६) व विशाल (क्र. २६८, ५७५, ९६७). स्तन असावेत स्पर्शाला उबदार (क्र. ७७, २३८, ७६६), कठिण (क्र. २६१, ५७९), भरदार (क्र. २५८, २६८); स्तनयुगल (क्र. ८२४) निरंतर (क्र. २५८, ४२७, ६६९); स्तन सालंकृत (क्र. ४२८), मग ते अलंकार नखक्षतांचे (क्र. २३३, ४२७, ४२८, ७०७) असोत वा प्रेमचिन्हांचे (क्र. ८२४); किंवा हारादि (क्र. ९८८) लौकिक मूल्याचें असोत. भरदार स्तनांचा भार (क्र. १६०) कृशकटीला (क्र. ३६२, ७९७) पेलत नाहीं. स्तनग्रहणाला प्रियकर उत्सुक (क्र. ७२३, ८०५) असतो आणि तो गाढ आलिंगन देतो तेव्हां जणूं (क्र. २७६) ते त्याच्या छातींत रुतनात. पण प्रियकर व प्रेयसी असें नातें नसेल तेव्हां कोणाची छाती लागून गेली आहे युवतींच्या छातीला स्पर्श (क्र. ९७०) करण्याचो?

डॉ. प्लास व बार्टेल्स यांनीं आपल्या स्त्रीविषयक प्रचण्ड ग्रंथांत स्तनांचे चार वर्ग ठेवणीच्या अनुरोधानें केले आहेत : bowl-shaped, hemispherical, conical, elongated. श्री. राजवाडे यांनीं या संज्ञांना प्रतिशब्द दिले आहेत: पूर्णमण्डलाकार, दीर्घवर्तुलाकार, उच्छ्रित कोनाकार व नत नलिकाकार. पुष्ट, विशाल, उन्नत व नत हे प्रतिशब्द मला अधिक अन्वर्थक व सोपे वाटतात. हे सर्व वर्ग गाथासप्तशतींत आढळतात. स्तनांचा आकार केवढा असावा? ओव्हिड सांगतो, मुठींत मावेल एवढा. सामान्यतः याहून ते मोठे असतात. क्र. ७९ च्या नायिकेच्या स्तनांचा आकार कवठाएवढा किंवा बेलफळा एवढा आहे. कुक्कोकानें त्यांचा आकार श्रीफलाएवढा असावा असें सांगितलें आहे. स्तनांना प्राकृत–संस्कृत कवींनीं कलश, कुंभ व घट यांच्या उपमा दिलेल्या आढळतात. सामान्यतः यांहून ते लहान असतात. बालकाच्या पोषणासाठीं पुरेसें दूध धारण करणें हें त्यांचें नैसर्गिक कार्य; तेवढे ते पुष्ट असणें हेंच सौंदर्याचें लक्षण. स्तनांचें काठिण्य वर्णन करण्याची प्राचीन व मध्ययुगीन कवींना फार हौस, आणि त्यांच्या तालमींत तयार झालेल्या अर्वाचीनांनाही. 'वाटे सहजाचि कठिण कुचावर फुटेल सुपारी', हे लावणीकाराचे उद्गार रसिकतेचे द्योतक व व्यावहारिकतेचे? कीं केवळ यमक साधनेचे? क्र.२६१ या गाथेंत अशी अतिशयोक्ति आढळत नाहीं. भावनावेशानें स्तनांना झालेल्या स्पर्शानें, मग तो कामविकारानें प्रेरित असो किंवा वात्सल्यानें, स्तनाग्रें उत्थापित, रोमाञ्चित होतात, हा सिद्धांत गाथासप्तशतींत आलेला आहे. पुत्राच्या नखस्पर्शानें मातेचा एक स्तन पान्हवला व पतीच्या नखस्पर्शानें दुसरा रोमाञ्चित झाला, हें क्र. ४०९ मधील भावसंकराचें उदाहरण साहित्यांत अद्वितीय आहे. या प्रतिक्रियेच्या कारणांबद्दल इंद्रियविज्ञान व मनोविज्ञान या शास्त्रांच्या निष्कर्षांत दुमत आहे. पांचजन्य शंख फुंकतेवेळीं कृष्णाला यशोदेच्या स्तनांचें स्मरण व्हावें (क्र. ९६८) हा उल्लेख साहित्यांतील नवसांप्रदायिकांना गुदगुल्या केल्यावांचून राहणार नाहीं. स्तनांना नखांचीं व दंतांचीं एवढीं क्षतें धारण व सहन करावीं लागतात—कारण त्यांचें ग्रहण, चूषण व मर्दन पुरुषाच्या अंतःप्रेरणेनें होत असतें. हिंदुस्थानांत तर या विधीला जणूं

धर्मशास्त्राची प्रेरणा आहे; कारण स्मृतींनीं स्त्रीपुरुषांना सकचुकरतापासून परावृत्त केलेलें आहे !

गाथासप्तशतींत बाहूंना व कराग्रांना फारसें महत्त्व नाहीं. बाहुलता हें आलिंगनाचें साधन मात्र (क्र. १३३, २७६, ३५४, ७८०, ८४४) आहे. क्र. ८४४ या गाथेंत बाहूंना कमळाच्या देंठांची उपमा दिलेली आहे; करांना कमलाची (क्र. ४५५) आणि कमलदलाची (क्र. ८५५). क्र. ४०४ या गाथेंत कराग्रांना अशोक पल्लवांची व क्र. ६७८ मध्यें प्रवालाङ्कुराची उपमा दिलेली आहे. क्र. ६७८ च्या नायिकेचे तळहात स्वाभाविकपणें प्रवाळासारखे लाल आहेत; ज्यांचे हात असे नसतात त्या त्यांना धातुरंग लावतात. क्र. १९६ या गाथेची नायिका बाला किंवा मुग्धा असून ती उत्फुल्लिका खेळत आहे. प्रौढावस्थेंत जघन जड व विशाल झाले तरी पुरुषायिताच्या वेळीं श्रमू नये म्हणून हा व्यायाम करावा असा गाथेचा अभिप्राय आहे. सुरतोत्तर विवस्त्र जघन झांकण्यासाठीं क्र. ४५९ ची नायिका उत्सुक आहे. जघनाला कड-दोऱ्याची मिठी (क्र. २११) आहे; त्यांवर नखांचे ओरखडे (क्र. २३३) व नखक्षतें उठलेलीं आहेत (क्र. ४३५), इतकेंच नव्हे, दंतव्रणही (क्र. ६०९) दिसत आहेत ! हा अखेरचा विधि विहित नाहीं. शिवाय फडफडत्या लुगड्या-मुळें जघनावरले व्रण प्रकट कसे होणार, याचा नीट उलगडा होत नाहीं. ' जघनं कान्चीपदं कट्यधोगतः पुरोवर्ति प्रदेशः तस्य पश्चाद्गतो नितंबः ' अशी व्याख्या आहे. या नायिकांचें नितंब पृथुल (क्र. ८२६), विपुल (क्र. ८४६), विशाल (क्र. ७९७) व विस्तीर्ण (क्र. ३९३) आहेत. हत्तीच्या सोंडे-सारख्या मांड्या (क्र. ९१६) आहेत, म्हणूनच नायिकेला त्यांचा भार (क्र. ७९७) पेलत आहे ! नितंबांवर नखक्षतांचे ओरखडे (क्र. २३३) आहेत; घामामुळें त्यांना पातळ चिकटतें (क्र. ७१८) व क्वचित् तें ओढावें (क्र. ८७१) लागतें. रस्त्यानें चालतांना नितंबांना हेलकावा देण्याची प्रौढ नायिकांना हौस (क्र. ३९३) असावी असें दिसतें; आणि नितंबांना गुरुत्व आलेलें नसतें तेव्हांची चपल चाल कशी फुलपांखरासारखी (क्र. १७४) असते !

स्त्री तन्वंगी असावी हें खरें, पण कशी असावी ? श्रोणीभारादलसगमना स्तोकनम्रास्तनाभ्याम् ! स्त्री सौंदर्याचीं हीं लक्षणें नैसर्गिक आहेत; कारण ओवी

ही प्रजोत्पादनाशीं संबद्ध आणि स्तन प्रजापोषणाशीं! जघन–नितंबांचा गौरव हीं उत्क्रांति व सुसंस्कृति यांचीं लक्षणें आहेत. चतुष्पादांत जघनगौरवाला महत्व नाहीं; रानटी स्त्रियांचे हे अवयव पुरुषासारखेच असतात. या परिणामानुसार गाथासप्तशतीच्या नायिका सुधारलेल्या समाजांतील असल्या पाहिजेत असें अनुमान होतें. येथेंही हीं लक्षणें वन्य नायिकांचे बाबतींत प्रत्ययास येत नाहींत हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

सौंदर्याचा प्रकर्ष गतींत असतो. क्र. ६७ च्या नायिकेची चाल संथ आहे; कारण तळव्यांना चिखल लागूं नये आणि प्रियकराच्या पावलावर आपलें पाऊल पडून अप्रत्यक्ष स्पर्शाचें श्रेय मिळावें याविषयीं ती दक्ष आहे. क्र. ४६३ च्या नायिकेची चाल मंद आहे, कारण तिनें धारण केलेली मेखला तिच्या जघनांवरील नखक्षतांवर घांसत आहे. क्र. ६९० मधील कलमगापाच पाऊल तिरपें पडलेलें आहे: ही चाल वाटते तितकी अर्वाचीन नाहीं. गाथासप्तशतींत नायिकांपैकीं सर्वांत मोहक चाल कोणाची असेल तर ती क्र. १७४ च्या नायिकेची, नागमोडी! क्र. १२७ च्या नायिकेचीं पावलें स्वाभाविकपणेंच लाल आहेत; ज्यांना हें वैशिष्ट्य लाभलेलें नसतें त्या त्यांना आळिता लावतात; पूर्वी आणि हल्लींही.

गाथासप्तशतींतील नायिका भिन्न वर्गांतल्या आहेत. क्र. ११९ व ७८८ या गाथांच्या नायिका या व्याधस्त्रिया आहेत; पहिली रूपयौवनोन्मत्त आहे आणि दुसरीचें शरीर मलिन आहे. क्र. ५४५ ची नायिका ग्रामीण आहे; तिला आभरणांची अगर प्रसाधनांची जरूर नाहीं. क्र. १८२, ५१६ व ७५० या गाथांच्या नायिका सुतनु व सडपातळ आहेत; क्र. ५६ व २७८ या गाथांच्या नायिका नाजूक आहेत. क्र. ४१० ची नायिका बाला आहे, तरी तिच्या अंगीं लैङ्गिक आकर्षण इतकें आहे कीं प्रेक्षकाला त्याचा प्रभाव विषवल्लीसारखा जाणवत आहे. क्र. ५९२ च्या नायिकेचें सौंदर्य न्याहाळतांना प्रेक्षकांना पापण्या मिटण्याचेंही भान रहात नाहीं. ज्यांचें आकर्षण व लावण्य नांवाजण्यांत येतें त्यांची निर्मिति (क्र. २३५) अमृत व विष यांच्या मिश्रणानेंच झालेली असते! देहांत यौवनाचा (क्र. २९२) आणि मनांत मन्मथाचा संचार सुरू झाला म्हणजे अंगप्रत्यंगांत सौंदर्य भरूं

लागतें; इतकें कीं जणूं तें नायिकेच्या शरीरांत मावत नाहीं (क्र. २७८) आणि (क्र. २३४, २७१) प्रेक्षकालाही तें संपूर्णपणें पहातां येत नाहीं!

अंगाला सुगंध असणें हें सौंदर्याचेंच एक अंग मानण्यांत येतें. कामशास्त्रकारांनीं गंधाचे अनुरोधानें स्त्रियांचें वर्गीकरण केलेलें आहे. मत्स्यगंधेला योजनगंधा म्हटलेलें आहे कारण तिच्या अंगाचा गंध योजनपर्यंत दरवळत असे. मत्स्यगंध हा कामवर्धक असल्यामुळें पराशर हा ब्राह्मण व शंतनु हा क्षत्रिय हे दोघेही तिच्याकडे आकर्षित झाले. द्रौपदीही वर्णानें श्यामल व नीलोत्पलगंधा होती. मानव देहांत अशी एकही अंतःस्रावक किंवा बहिःस्रावक ग्रंथि नाहीं कीं जी जात्या गंधवती नाहीं. विशेषतः स्त्रियांच्या देहांतून सूर्योदयाच्या व सूर्यास्ताच्या वेळीं आणि आकाशांत मेघांचा गडगडाट सुरू होतो ते वेळीं मादक गंध दरवळतात. गाथासप्तशतींत क्र. ५१ व २८१ या गाथांत अंगसुगंधाचा आणि क्र. १८, ८६, ८९, ३१७, ३६६ या गाथांत निःश्वास सुगंधाचा प्रकर्ष वर्णिलेला आहे. वात्स्यायनानें कामसूत्रांत, बायबलांतील सालोमनच्या गीतांत आणि शेख नेफजवीनें Perfumed Garden या मध्ययुगीन ग्रंथांत सुगंधाचे माहात्म्य वर्णिलेलें आहे. मनुष्याच्या अंतर्यामावर अंगसुगंधाइतका कशाचाही उत्तेजक परिणाम होत नाहीं. अंकोल्ल (क्र. ४९७), कदंब (क्र. १५७), कुरबक (क्र. २१९), आंबेमोहोर (क्र. ४९९), शेफालिका (क्र. ४१२) यांचा सुगंध आपल्या नायिकांना विशेष कामोत्तेजक वाटतो असें दिसतें.

श्यामला :

(सामली : क्र. १२१, १८०, १८९, २३८, ७५८; सामा : क्र. ९९३; सामाइ : क्र. १८०, ४३९ : सामलङ्गि : क्र. ५५५).

प्राचीन व मध्ययुगीन, संस्कृत व प्राकृत साहित्यांत, विशेषतः काव्यांत, ज्यांना श्यामला व श्यामा या संज्ञा लावण्यांत येतात अशा सुंदरी वारंवार भेटतात. सामान्यतः श्याम व श्यामल हीं वर्णद्योतक विशेषणें आहेत. श्याम, श्यामल म्हणजे काळा, काळासांवळा; आणि श्यामा, श्यामला म्हणजे काळीसांवळी. पण कोशकारांनीं व टीकाकारांनीं संदर्भाच्या अनुरोधानें या

संज्ञांचे वेगवेगळे अर्थ दिले आहेत व छटा दाखविल्या आहेत. शिवाय कवींनींही त्याची योजना थोड्याबहुत ढिलाईनें केलेली आहे, म्हणून या संज्ञांचें विवेचन करणें भाग आहे.

अमरकोशांत श्याम व श्यामल हे शब्द धी वर्गांत आलेले आहेत : 'कृष्णे नीलासित श्याम काल श्यामलमेचका : ' = कृष्ण, नील, असित, श्याम, काल, श्यामल व मेचक हीं सात नांवें काळया रंगाचीं. हे शब्द केवळ प्रतिशब्द नाहींत, त्यांमध्यें सूक्ष्म भेद आहेत. कोशकारांनीं व टीकाकारांनीं या शब्दांनीं व्यक्त होणाऱ्या छटांची सोदाहरण फोड करून सांगितलेली नाहीं. विशिष्ट वर्णांत असलेली दुसऱ्या वर्णाची छटा व्यक्त करण्यासाठीं जो तो शब्द निवडून वापरावयाचा, अशी योजना असली पाहिजे. अमरकोशांत पांढऱ्या वर्णाला पांडुर व गोर हे शब्द दिलेले आहेत. त्यांमधील फरक उलगडून न सांगतां-ही उमजण्यासारखा आहे. गोर हा शब्द पिंवळया रंगाचाही वाचक आहे असेंही अमरकोशांत सांगितलेलें आहे. यावरून अनुमान होतें कीं श्वेत वर्णात पीत वर्णाची छटा असली म्हणजे त्या कांतिला गोर म्हणावयाचें; आणि तसा प्रघात आहेही. त्याचप्रमाणें कृष्ण अगर नील वर्णात गौर वर्णाची किंवा गौर वर्णांत कृष्ण अगर नील वर्णाची छटा असली म्हणजे त्या कांतीला श्याम किंवा श्यामल म्हणावयाचें, असा संकेत असला पाहिजे असें वाटतें.

श्याम व श्यामल हे शब्द वर्णद्योतक आहेत हें निश्चित; कारण ते पुरुषांना, त्याचप्रमाणें स्त्रियांना अनुलक्षून वापरलेले आहेत.

उत्तररामचरितांत (४, १९) अरून्धतीनें लवाच्या कांतीचें वर्णन केलें आहे : 'कुवलयदलस्निग्धश्याम' = नीलकमलाच्या पाकळीसारखी तकतकीत व श्यामवर्ण. मात्र नील कमलाचा वर्ण काळा भासण्याइतका गडद कधींच नसतो. श्यामकंठ म्हणजे नीलकंठ, शंकर. हलाहलप्राशनानें त्याचा कण्ठ काळवंडला होता. मेघदूतांत (१, १५) कालिदासानें गोपवेषधारी विष्णूच्या व मेघाच्या वर्णाला अनुलक्षून श्याम हा शब्द वापरलेला आहे. " येन श्यामं वपुरतितरां कान्तिमापत्स्यते ते। बर्हेणेव स्फुरितरुचिना गोपवेशस्य विष्णोः । ' = श्रीकृष्णाचें श्याम शरीर मयूरपिच्छांच्या मुकुटानें शोभतें, त्याप्रमाणें तुझें काळें-

भोर शरीर इन्द्रधनुष्यामुळें शोभायमान् दिसेल. श्री गीतांतही कृष्ण काळा आहे, पण काळा कुळकुळीत नाहीं. त्याची कांति सांवळी आहे, शिवाय तो सुंदरही आहे, म्हणूनच त्याला श्यामसुंदर म्हणतात. आभाळांत काळेभोर मेघ दाटले असें आपण म्हणतों, पण ते काळेकुट्ट कधींही नसतात, शिवाय त्यांना नीलनभाची पार्श्वभूमि असते. तसाच कृष्णाचा वर्ण होता. म्हणून त्याला घननीळ, मेघश्याम म्हणतात. जो वर्ण आवडता तो सांवळा आणि नावडता तो काळा असें मात्र नाहीं. मेघदूतांत (१, २३) तर कालिदासानें दशार्ण देशाला श्यामकान्त ठरविलें आहे. 'त्वय्यासन्ने परिणत फलश्यामजम्बूवनान्ताः' = फलांच्या पक्वतेनें श्यामवर्ण झालेलीं जांभूळवनें ज्याच्या ठायीं आहेत असा देश. येथें श्याम शब्दाचा अर्थ गडद जांभळा किंवा काळा निळा हा अभिप्रेत आहे.

श्यामा व श्यामला या शब्दांचे आणखी काहीं अर्थ पहा :

श्यामा म्हणजे रजनी, विशेषतः कृष्णपक्षांतली, श्यामा म्हणजे उपरसाळी तुळस, दुर्वा, निशोत्तर, प्रियङ्गु. श्यामा म्हणजे काली, दुर्गा, यमुना. श्यामा स्त्री म्हणजे यौवनमध्यस्था एक व्याख्याकार सांगतो : ' अप्रसूता भवेत् श्यामा श्यामा षोडषवार्षिकी । श्यामा च श्यामवर्णाच श्यामा मधुरभाषिणी ॥ ' पहिल्या ओळीला पाठभेद आहे तो असा : ' अप्रसूता भवेत् श्यामा तन्वी च नवयौवना । ' आणखी एक व्याख्याकार सांगतो : ' शीते सुखोष्ण सर्वाङ्गी ग्रीष्मे या सुखशीतला । तप्तकांचनवर्णाभा सा स्त्री श्यामेति कथ्यते ॥ ' अनंगरंगांत पद्मिनीच्या वर्णनांत तिचा वर्ण श्याम सुवर्णचंपकनिभ असल्याचें सांगितलेलें आहे. श्री. मुळे यांनीं प्रकाशित केलेल्या आवृत्तींत या भागाचें भाषांतर दिलें आहे: ' काळी नसतां तारुण्याच्या भरामुळें श्यामवर्ण भासणारी. ' गोऱ्या स्त्रीची कांति यौवनाच्या भरामुळें अधिक सतेज दिसेल. श्यामल कशी होईल ? शिवाय पद्मिनीनें यौवन ओलांडलें कीं तिचें पद्मिनीत्व नष्ट होतें की काय ?

हीं वचनें, वर्णनें व व्याख्या विषय सुगम करण्याऐवजीं जिज्ञासूला अधिकच घोंटाळ्यांत मात्र पाडतात. गोर वर्णाच्या श्रेष्ठत्वाबद्दल मनांत पूर्वग्रह घोंटाळत असल्यामुळेंच या बाबतींत त्यांची वृत्ति अशी संभ्रमित असावी असें वाटतें.

कालिदासानें अनेक नायिकांचीं शब्दचित्रें रंगविलेलीं आहेत. त्यांपैकी मेघ-

दूतांतला नायिका हीच काय ती त्यानें संपूर्णतया स्वतंत्रपणें निर्माण केलेली आहे. त्यानें केलेलें तिचें वर्णन पहा.

तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिंबाधरोष्ठी
मध्ये क्षामा चकितहरिणी प्रेक्षणा निम्ननाभिः ॥
श्रोणी भारादलसगमना स्तोकनम्रा स्तनाभ्याम्
या तत्र स्याद्युवतिविषये सृष्टिराद्येव धातुः ॥

विदग्ध व विलासी प्राचीन भारतीय तरुणांच्या स्त्रीविषयक अपेक्षांचें सार-सर्वस्व कालिदासानें या श्लोकांत ग्रथित केलेलें आहे. या श्लोकांत त्यानें श्यामा या संज्ञेचा जाणता उपयोग केलेला आहे. टीकाकारांनीं मात्र वैयक्तिक प्रवृत्तींच्या व उपलब्ध वचनांच्या अनुरोधानें या संज्ञेचे वेगवेगळे अर्थ केलेले आहेत. मल्लिनाथ सांगतो "श्यामा युवतिः श्यामा यौवनमध्यस्था इति उत्पलमालायाम्।" स्थिरदेव मात्र मुळापासून ढळलेला नाहीं; तो (डॉ. परांजपे संपादित आवृत्तिः १९३५ : पृ. ९४) सांगतो : "तन्वी कृशतनु इत्याकारचारुता। श्यामा श्यामला इति वर्णाभिरामता।" सर विल्यम जोन्स यांनीं या श्लोकाचें भाषांतर करतांना (Calcutta Edition : 1901 : p. 23) श्यामा हा शब्द अजिबात गाळला आहे. श्री. वामनशास्त्री इस्लामपूरकरांनीं (काव्यार्थदीपिका : पृ. २०५) 'तारुण्याच्या ऐन भरांत आलेली' हा अर्थ स्वीकारला आहे. "श्यामास्वङ्गं चकित हरिणी प्रेक्षणे दृष्टिपातम्।" या मेघदूतांतील वचनावरील टीकेंत मल्लिनाथ सांगतो : "श्यामासु प्रियङ्गुलतासु। अङ्गं शरीरमुत्पश्यामि। सौकुमार्यादिसाम्यादङ्गमिति तर्कयामीत्यर्थः।" आणि स्थिरदेव सांगतो : "श्यामासु प्रियङ्गुलतासु अङ्गं वपुः। श्यामत्वतनुत्वाभ्यां तत्सादृश्यम्।" या टीकांवरून दिसून येईल कीं मेघदूतांतील श्यामा हा शब्द नायिकेच्या वयाचा द्योतक नसून तिच्या कांतीचा वाचक आहे.

गाथासप्तशतींत आलेल्या श्यामा व श्यामला या संज्ञांचा अर्थाबद्दल बरीच अनिश्चितता आहे. साऱ्याजणी तरुण, सुंदर व सुकुमार आहेत, एवढें मात्र खरें.

क्र. १२३ मधील श्यामलेला प्रसूति-वैराग्याची लहर आलेली आहे; म्हणून येथें 'अप्रसूता' हा अर्थ लागू पडत नाहीं. येथें गंगाधरानें श्यामलेचा अर्थ

'वरत्नी' असा दिलेला आहे. हा शब्द येथें वर्णवाचक आहे असें म्हणतां येणार नाहीं. क्र. १८० मधील संदर्भ 'सामाइ सामलिज्जइ'—श्यामाया: श्यामलायते, असा आहे. हा उल्लेख निःसंशय वर्णवाचक आहे. क्र. १९८ या गाथेंतील श्यामला सुकुनार आहे. हा उल्लेख वर्णवाचक नसावा असें सकृद्दर्शनीं वाटतें; पण कवीनें जम्बूकषायाची योजना करून तिचा वर्ण सूचित केलेला आहे. क्र. २३८ या गाथेची नायिका 'शीते सुखोष्ण सर्वांगी' अशी आहे; तिची अंगकांति धगधगीत अंगारासरखी आहे. तप्तकांचनाचा वर्ण असाच असतो. कोळसा सवंग व काळा आणि सोनें महाग व पिवळें, म्हणून तीं तारतलीं असतां त्यांच्या वर्णांत फरक पडेल कीं काय? क्र. ४३९ या गाथेच्या नायिकेबद्दल गंगाधर सांगतो 'श्यामाया उत्तमनायिकायाः।' ही षोडशवा-र्षिकी नसावी, यौवनमध्यस्था असावी असें वाटतें. हिचा वर्ण ध्वनीनेंही सूचित केलेला नाहीं. क्र, ५५५ या गाथेची नायिका श्यामलाङ्गी आहे असें मुळांतच सांगितलेलें आहे. शिवाय काळ्याभोर लांबसडक केशांच्या साह-चर्याची जोड दिलेली आहे. क्र. ७५८ मध्यें नायिकेच्या वर्णाची सूचना नाहीं; मात्र, शरीराचा वर्ण श्यामल आणि नेत्रांच्या बाह्यांगांचा धवल, असें असलें म्हणजे त्यांची शोभा विशेष आकर्षक असते. क्र. ९६३ या गाथेंतील श्यामलेची कांति अद्वितीय आहे. हिला पाहून कवीला वाटलें कीं तुम्हांआम्हांला निर्माण करणाऱ्या सर्वसामान्य प्रजापतीकडेच हिचें कर्तृत्व असावें हें खरें वाटत नाहीं. वर दिलेल्या कालिदासाच्या उद्गाराशीं ही भावना तोलण्याजोगी आहे.

भारतांत सुखकारक काय असतें?

कूपोदकं, वटच्छाया, शामा स्त्री, इष्टिकागृहं –

आणि हीं सुखकारक कां असतात?

शीतकाले भवेदुष्णं ग्रीष्म कालेच शीतलम् ॥

आडाचें ताजें पाणी, उन्हाळ्यांत प्रकृतीला मानवेल व रुचेल एवढेंच गार असतें; कृत्रिमपणें गार केलेलें पाणी रुचतें पण मानवत नाहीं. कूपोदक हिंवा-ळ्यांत कोमट असतें, कारण भोंवतालच्या भूमींत मुरलेला उष्मा तें धारण करतें. सरोवरांचा विस्तार मोठा असल्यामुळें त्याचें पाणी हिंवाळ्यांत फार थंड असतें. वडाची छाया दाट असते, पानें मोठीं असल्यामुळें त्यांतून ताजी